(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

उप सभापती : आता सोमवार, दिनांक 26 मार्च, 2012 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली परंतु पुढे ढकलण्यात आलेली प्रश्नोत्तरे घेण्यात येत आहेत.

--

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे

महाराष्ट्रात रोजगार हमी योजना व शेतीची कामे यांची सांगड घालण्याबाबत

(१) * २५७८८ *श्री.विनोद तावडे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.संजय केळकर , श्रीमती शोभाताई फडणवीस* : सन्माननीय ***रोजगार हमी योजना मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्रामध्ये रोजगार हमी योजना सुरु करताना अकुशल बेरोजगारांना वर्षातील १०० दिवस कामाची हमी देतानाच त्यांना दिलेल्या रोजगाराच्या माध्यमातून पायाभूत सुविधांची निर्मिती करण्यात आली,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, रोजगार हमी योजनेमध्ये शासन आज देत असलेले १२७ रुपये प्रती दिन मजुरीमुळे महाराष्ट्रातील बऱ्याचशा जिल्ह्यांमध्ये मजूर उपलब्ध होत नाहीत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शेतक-यांच्या शेतावर मजूर उपलब्ध करुन दिल्यास व त्यांची शासनाच्या १२७ रुपये दराव्यतिरिक्त मजूरी शेतक-यांना दिल्यास शेतक-यांना मजूर उपलब्ध होऊन अकुशल मजुरांनाही वाढीव मजुरी मिळेल, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, त्या अनुषंगाने शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे?

श्री.गुलाबराव देवकर, डॉ.नितीन राऊत यांच्याकरिता : (१) होय.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना-महाराष्ट्र अंतर्गत अकुशल काम करण्यास इच्छुक असलेल्या प्रौढास संपूर्ण वर्षभर रोजगार उपलब्ध करुन देणे व स्थायी स्वरुपाची मालमत्ता या योजनेंतर्गत निर्माण करणे हा मुख्य उद्देश आहे. महाराष्ट्रात याप्रमाणे सदर योजनेंतर्गत कार्यवाही करण्यात येत आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, रोजगार हमी योजना या राज्यामध्ये 1965 मध्ये सुरु झाली. या योजनेचे महत्व ओळखून केंद्र सरकारने देखील केंद्र स्तरावर महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना सुरु केली. या योजनेबाबत कोकण विभागात व राज्यातील इतरही जिल्हयाचा अनुभव असा आहे की, रोजगार हमी योजनेवर काम करण्यासाठी मजूर उपलब्ध होत नाहीत. कारण दररोज 127 रुपये इतकी अल्प मजुरी दिली जाते. माझा प्रश्न असा आहे की,

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

27-03-2012 (असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही) A.2

SGB/ MMP/ 10:00

श्री.विनोद तावडे..... ता.प्र.क्र.25788....

कोणकोणत्या जिल्हयात प्रत्यक्षात कामावर किती मजूर उपलब्ध होते आणि त्यांनी किती मनुष्यदिन काम केले? रोजगार हमी योजनेवर मजुरी वाढवून दिली तर शेतीच्या कामाला मजूर मिळणार नाहीत, त्यामुळे जाणीवपूर्वक रोजगार हमी योजनेवर मजुरी कमी दिली जाते हे वास्तव आहे.

उप सभापती : वास्तव आपण सांगितले. परंतु प्रश्न काय आहे?

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, राज्यातील कोणकोणत्या जिल्हयात मजूर उपलब्ध होतात हे मंत्री महोदयांनी सांगावे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, लातूर, वर्धा या जिल्हयातील रोजगार हमी योजनेवरील मजुरांच्या उपस्थितीची माहिती सभागृहाला द्यावी. शेतीच्या कामाला मजूर मिळाले पाहिजेत म्हणूनच रोजगार हमी योजनेच्या कामावर मजुरी कमी दिली जाते यात तथ्य आहे काय?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, राज्यामध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची कामे सुरु आहेत. दिनांक 17.3.2012 पर्यंत रायगड जिल्हयात 5473, रत्नागिरी जिल्हयात 3675, सिंधुदुर्ग जिल्हयात 3789 मजुरांची रोजगार हमी योजनेच्या कामावर उपस्थिती असून संपूर्ण राज्यात या वर्षी 6,15,539 इतकी मजुरांची रोहयोच्या कामावर उपस्थिती आहे. संपूर्ण जिल्हयात शेल्फवर मोठया प्रमाणात कामांची तरतूद केलेली आहे. कोणत्याही गावात किंवा तालुक्यात काम नसल्यामुळे मजुरांना काम देता आलेले नाही असे उदाहरण पहावयास मिळणार नाही. ज्या ज्या ग्रामसभेमध्ये मजुरांनी कामाची मागणी केली तेथील मजुरांना काम देण्याची व्यवस्था निश्चितपणे केलेली आहे. कामावर मजूर उपस्थित नाहीत अशी स्थिती नाही. ज्यांना काम पाहिजे त्या मजुरांना काम देण्याची व्यवस्था केलेली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत या वर्षी मोठया प्रमाणावर निधी खर्च झालेला आहे. मागील वर्षी 350 कोटी रुपये खर्च झाले होते. या वर्षी जवळपास 1057 कोटी रुपये खर्च केलेले आहेत. त्यामुळे आपल्याला निश्चितपणे मोठया प्रमाणात कामांची व्याप्ती आणि मजुरांची उपस्थिती राज्यात दिसून येते. 127 रुपये प्रती दिन मजुरी दिली जाते त्यामुळे रोहयोच्या कामावर मजूर मिळत नाहीत असे सांगण्यात आले. शेतीच्या कामावर मजूर मिळत नाहीत म्हणून रोहयोच्या कामावरील मजुरीचा दर कमी ठेवला आहे.....

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25788..... श्री. गुलाबराव देवकर.....

अशी परिस्थिती सध्या राज्यात नाही तर 127 रुपये इतका मजुरीचा दर जो ठेवलेला आहे तो एक बेस म्हणून धरलेला आहे. एखाद्या कामाचे एस्टीमेट करीत असताना त्यात मजुरीच्या बाबतीत तरतूद करणे आवश्यक असते त्यासाठी हा आधार ठेवलेला आहे. परंतु एखाद्या मजुराने 160 रुपयाचे काम केले तरी त्या मजुराला तेवढी मजुरी देण्याची व्यवस्था आपण केली आहे. त्यात 127 रुपये मजुरी ही केंद्र शासनाकडून मिळते व त्यापेक्षा जास्त मजुरी द्यावी लागली तर ती आपल्या राज्याच्या निधीतून देण्यात येते. आपल्या राज्यात ज्या ज्या मजुरांनी आतापर्यंत रोजगार हमी योजनेवर काम केले आहे त्यांचे ॲव्हरेज पाहिले तर 163 रुपये एवढी सरासरी दिसून येते.

श्रीमती शोभा फडणवीस : महोदय, शेतकऱ्यांना शेतीवर मजूर उपलब्ध करुन दिल्यास व त्यांची शासनाच्या 127 रुपये दराव्यतिरिक्त मजुरी शेतकऱ्यांना दिल्यास शेतकऱ्यांना मजूर उपलब्ध होऊन अकुशल मजुरांनाही वाढीव मजुरी मिळेल, या प्रश्नाचे उत्तर आपण नाही असे दिलेले आहे. पण खऱ्या अर्थाने शेतकऱ्यांना न्याय द्यावयाचा असेल आणि महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेसाठी केंद्र शासनाचा पैसा आहे. आपल्या राज्याकडे रोजगार हमी योजनेचे जे 3000 कोटी रुपये शिल्लक आहेत त्यातून शेतकऱ्यांवर जर खर्च केला तर शेतकऱ्यांनाही न्याय मिळेल, या दृष्टीने शासन विचार करणार आहे काय, त्याचबरोबर राज्यात सर्व ठिकाणी मजूर मिळतात असे आपण आताच उत्तरातून सांगितले. पण चंद्रपूर जिल्ह्यातील राजुरा, वरोरा आणि भद्रावती येथे डब्ल्यूसीएल कंपनीची कामे सुरु असल्याने रोजगार हमीवर मजूर येत नाहीत असे पालक मंत्र्यांनी सुध्दा सांगितलेले आहे. असे असताना सर्वच ठिकाणी मजूर मिळतात हे मंत्री महोदयांचे म्हणणे संयुक्तिक वाटत नाही. यामध्ये सुधारणा करुन ज्या भागात मजूर मिळत नाहीत तेथे मजुरीचे दर वाढवून देणार काय, त्यानंतर तिसरा प्रश्न असा आहे की, चंद्रपूर जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत संपूर्ण जिल्ह्यात पाटबंधारे विभागाचे इंजिनिअर्स कामाला लावलेले आहेत व त्याचा परिणाम म्हणून स्टेट सेक्टरची तलावाची व मोठ्या तलावांची कामे मागे पडलेली आहेत. अशा प्रकारे एकीकडे अन्याय करुन दुसरीकडे न्याय देण्याचा प्रयत्न शासन करीत आहे. माझी मागणी अशी आहे की, रोजगार हमी योजनेसाठी जे इंजिनिअर्स घेतलेले आहेत ते त्यांच्या त्यांच्या विभागात परत पाठविणार काय ?

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. 257.....

श्री. गुलाबराव देवकर : महोदय, शेतीसाठी मजूर उपलब्ध करुन द्यावे अशी तरतूद सध्याच्या धोरणात नाही पण अमरावती जिल्ह्यात शासनाने एक पथदर्शी प्रकल्प हाती घेतला असून त्या माध्यमातून जिल्ह्यातील टाकळी, रामपूर आणि नरदोडा या गावांमध्ये 250 हेक्टरमध्ये काही योजना सुरु केल्या आहेत. त्याचा शेतकऱ्यांना व्यक्तिगत फायदा होईल आणि वेगवेगळ्या प्रकारे खाजगी स्वरुपाची कामे सुध्दा शेतीसाठी करता येतील असा हा कार्यक्रम आहे. या पायलट कार्यक्रमाचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर व ते सोईचे असेल व शेतकऱ्यांच्या हिताचे असेल तर पुढील काळात नक्कीच अशा योजना घेण्यात येतील. यामध्ये शासनाचा उद्देश असा आहे की, शेतीमध्ये जलसंधारणाची कामे झाली पाहिजेत, मृद संधारणाची कामे झाली पाहिजेत व त्या माध्यमातून पाणी अडवा व पाणी जिरवा हा कार्यक्रम राबविता येईल. त्याचा फायदा शेतकऱ्याच्या शेतात पाणी साठून राहील व त्याचे उत्पादन वाढेल असे वेगवेगळे उपचार देखील या कार्यक्रमात घेतलेले आहेत. हा प्रयोग यशस्वी झाला तर पुढील काळात संपूर्ण राज्यासाठी त्याचा उपयोग करता येईल. जेणेकरुन शेतकऱ्यांना त्याचा आधार होईल. तसेच चंद्रपूर जिल्ह्यात मजुरांची परिस्थिती कशी आहे असे सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई यांनी विचारले त्याबद्दल मला असे सांगावयाचे आहे की, आतापर्यंत या जिल्ह्यात 38260 मजुरांना काम मिळाले आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. गुलाबराव देवकर....

रोजगार हमी योजनेत मजुरांना कामे मिळत नाही असा विषय नाही.....

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, काही तालुक्यांमध्ये मजूर कामावर येत नाहीत. माझ्या भागातील 100 टक्के मजूर रोजगार हमी योजनेच्या कामावर जात असतात.

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, शासनाने सर्व गावांमध्ये शेल्फवर कामे उपलब्ध करुन दिलेली आहेत. कामे असतांना कामे मागण्यासाठी मजूर जात नसतील तर त्याला काही पर्याय नाही. मजुरांना जास्तीत जास्त कामे मिळाली पाहिजे अशा प्रकारची व्यवस्था शासनाने केलेली आहे. जो मजूर काम मागेल त्याला काम मिळालेच पाहिजे. काम नाही म्हणून मजुराला मजुरी मिळाली नाही असे होणार नाही. जो मजूर 127 रुपयांपेक्षा जास्त काम करेल अशा मजुरांना जास्त मजुरी देण्याची तरतूद केलेली आहे. केंद्र शासनाच्या योजनांवर आपण काही थांबलो नाही तर मजुरांना राज्य सरकारच्या हिश्श्यातून मजुरी देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. शासनाने रोहयोच्या कामावरील मजुरांना 163 रुपये मजुरी देण्याचा प्रयत्नही केलेला आहे.

सभापती महोदय, 615 इंजिनिअर कॉन्ट्रक्ट पध्दतीने घेण्यात आलेले आहेत असा प्रश्न सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांनी विचारलेला आहे. कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने 615 इंजिनिअर घेण्यात आलेले आहेत हे मी या निमित्ताने सांगू इच्छितो. रोहयोच्या कामाच्या संदर्भात इंजिनिअरची स्वतंत्र व्यवस्था करावी असे सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे. त्यामुळे यासंदर्भात मी सांगू इच्छितो की, ही कामे करण्यासाठी कॉन्ट्रॅक्ट पध्दतीने इंजिनिअरची व्यवस्था करण्यात आलेली आहे. त्यामुळे विभागाचा स्टाफ न घेता स्वंतत्र व्यवस्था करण्यात आलेली आहे.

श्री. जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, सन 2011-2012 या आर्थिक वर्षामध्ये राज्यामध्ये जिल्हा निहाय महात्मा गांधी राष्ट्रीय रोजगार योजनेअंतर्गत किती कामे सुरु आहेत व या कामावर आतापर्यंत किती निधी खर्च झालेला आहे ?

श्री.गुलाबराव देवकर : सभापती महोदय, राज्यामध्ये सद्याच्या परिस्थितीत एकूण 54, 871 कामे सुरु असून त्यामध्ये 6,15,539 मजुरांना काम उपलब्ध करुन देण्यात आले आहेत यासाठी एकंदर 1,57,98 कोटी रुपये चालू वर्षात खर्च करण्यात आलेले आहेत. सन्माननीय सदस्यांना जिल्हा निहाय माहिती पाहिजे असेल तर त्यांसदर्भातील यादी मी पटलावर ठेवतो.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 25788 .....

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये मजूर रोहयोच्या कामाची मागणी करीत नसतांना त्या ठिकाणी जिल्हाधिका-यांमार्फत बीडीओ व तहसीलदार यांच्याकडून कामे करुन घेण्यासाठी गेल्या 15 दिवसापासून सायंकाळी 6.00 ते रात्री 11.00 पर्यंत या अधिका-यांची व्हिडिओ कॉन्फरसींग करुन त्यांच्यावर कामे करण्याची सक्ती केली जात आहे हे खरे आहे काय, व तसे करण्याचे कारण काय ?

श्री. गुलाबराव देवकर : सभापती महोदय, मजुरांना कामे उपलब्ध करुन दिली जात नाहीत असे प्रश्न विचारले जात असतात. तसेच मजुरांच्या कामाच्या संदर्भात अनेक ठिकाणी तक्रारी देखील असतात. मागेल त्या मजुराला काम मिळाले पाहिजे यासाठी अधिका-यांवर प्रेशर ठेवले जात असते. कोणत्याही ठिकाणच्या मजुरांना कामे मिळालीच पाहिजे यासाठी अधिका-यांनी काळजी घेतली पाहिजे. ज्या ज्या अधिका-यांवर यासंदर्भात जबाबदारी टाकलेली आहे त्या त्या अधिका-यांनी चोख कामे केली पाहिजेत अशा पध्दतीच्या सूचना दिल्या जातात व वेळोवेळी व्हिडिओ कॉन्फरसींग केले जात असते. अशा पध्दतीचे उपक्रम राबविल्यामुळे रोहयोच्या कामावर आपण मोठया प्रमाणात निधी खर्च करु शकलो आहोत.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस.क्यू. ज़मा : सभापति महोदय, एम.आर.ई.जी.एस. में कार्यों की मंजूरी ग्रामसभा देती है या ग्राम सरपंच तय करते हैं ? 127 रुपए से अधिक मजदूरी देने के लिए क्या आप राज्य सरकार की ई.जी.एस. में से कुछ फंड देते हैं ? एम.आर.ई.जी.एस. का ऑडिट केन्द्रीय सरकार करती है, मेरा प्रश्न यह है कि क्या ऑडिट करने के लिए राज्य सरकार की कोई मशीनरी है ?

श्री.गुलाबराव पाटील : सभापती महोदय, ग्राम सभा घेतली जाते. ग्राम सभेमध्ये लोकांनी सूचना करावयाच्या असतात की, आपल्या गावामध्ये, परिसरामध्ये कोणती कामे करावयाची आहेत त्यानंतर त्यासंबंधातील ठराव ग्राम सभा करते. ग्राम सभेने ठराव केल्यानंतर कामाला मंजुरी दिली जाते. गट विकास अधिकारी यांच्या मार्फत ठराव जिल्हा परिषदेकडे पाठवून या कामांना मंजुरी दिली जाते. राज्य योजनेतील निधी आपण देतो काय असा सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न आहे. एमआरइजीएस सुरू आहे. रूपये 127 पेक्षा जास्त मजुरी मजुरांना द्यायची असेल तर तो राज्य सरकारच्या राज्य रोजगार हमी योजना निधीतून देण्याची व्यवस्था केलेली आहे.

श्री.सय्यद पाशा पटेल : सभापती महोदय, 127 रूपये मजुरी नेमकी कुठल्या बेसवर ठरलेली आहे. बिगारी काम करणाऱ्या माणसाला कमीतकमी रूपये 270/- च्या खाली मजुरी देता येत नाही, असे महागाई निर्देशांकामध्ये आहे. तेव्हा रूपये 127/- साठी कुठला बेस धरण्यात आला आहे ? तसेच काम करणाऱ्याला एकूण किती कॅलरीज लागतात, या संबंधातील माहिती शासनाकडे आहे काय ?

श्री.गुलाबराव पाटील : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांचा हा प्रश्न नेहमीच असतो. त्यामुळे मला या प्रश्नाची चांगली माहिती आहे. रूपये 127/- चा रोजंदारीचा विषय आहे. आपण फक्त रूपये 127/- एवढीच मजुरी देत नाही, तर या पेक्षा जास्त काम केले तर राज्य शासनाच्या निधीतून जास्तीची रोजंदारी देण्याचा प्रयत्न करतो. आपल्या राज्यामध्ये मजुरीचा ॲव्हरेज दर रूपये 163/- आहे. रूपये 127/- नाही. रूपये 127/- इतका दर हा केंद्र शासनाने ठरवून दिलेला आहे. मजुराने जास्तीचे काम केले असेल तर राज्य सरकार निधी देते. ॲव्हरेज मजुरी आपण रूपये 163/- इतकी देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील मुख्याध्यापकांना केंद्राप्रमाणेच वेतन श्रेणी देणेबाबत

(2) * 25055 श्री.भगवान साळुंखे , श्री.चंद्रकांत पाटील , श्री.रामनाथ मोते , श्री.नागो पुंडलिक गाणार , डॉ.रणजित पाटील : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील सर्व माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील मुख्याध्यापकांना केंद्राप्रमाणेच वेतन श्रेणी देणेसाठी त्रुटी समितीकडे शिफारस करण्याचे आश्वासन मा.शिक्षणमंत्र्यांनी मुख्याध्यापक महामंडळाच्या शिष्टमंडळाला देऊन अद्यापपर्यंत मुख्याध्यापकाच्या वेतनश्रेणीत वाढ न झाल्याचे माहे डिसेंबर, 2011 च्या तिसऱ्या आठवडयात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, मा.शिक्षणमंत्र्यांनी दिलेल्या आश्वासनाची पूर्तता करणेसाठी कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान श्री. राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (1), (2) व (3) प्रस्ताव वेतन त्रुटी समितीकडे सादर करणेची कार्यवाही दिनांक 31.8.2009 पर्यंत करणे अपेक्षित होते, तथापि सदर प्रस्ताव वित्त विभागास संदर्भित करण्यात येत आहे.

श्री.भगवान साळुंखे : सभापती महोदय, केंद्र शासनाने त्यांच्या शाळेतील माध्यमिक मुख्याध्यापकांना 15600 ची वेतनश्रेणी दिलेली असताना राज्य शासनाने मात्र 9300 ची वेतनश्रेणी दिलेली आहे. खरे तर केंद्र शासनाच्या वेतरश्रेणी जशाच्या तशा राज्यात लागू करण्याचे अभिवचन दिले असताना सरकार वेगळ्या पद्धतीने कसे चालू शकते त्याचे हे उदाहरण आहे. या संबंधी अनेक वेळा निवेदने देण्यात आली आहेत. मंत्रिमहोदयांनी शिफारस करण्याचे वचन दिले. त्याप्रमाणे त्यांनी शिफारस केली आहे काय, त्यावर कृती झाली आहे काय, उच्च न्यायालयाने यासंबंधी विचार करण्याचा शासनाला निदेश दिला आहे, त्यानुसार शासनाने काही विचार केला आहे काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, राज्यातील खाजगी मान्यता प्राप्त अनुदानित माध्यमिक शाळातील शिक्षकांना आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सहावा वेतन ज्यावेळी राज्यात लागू करण्यात आला त्यावेळी या कर्मचाऱ्यांना देखील लागू करण्यात आला. पाचव्या वेतन आयोगानुसार त्यांची वेतनश्रेणी 7500-12000 अशी होती. त्यांना 9300-34800 ग्रेड पे 4800 अशी वेतनश्रेणी देण्यात आली आहे. केंद्रामध्ये मुख्याध्यापक आहेत त्यांना पाचव्या वेतन आयोगामध्ये 7450-225-11500 अशी वेतनश्रेणी होती. त्यांना सहाव्या वेतन आयोगामध्ये 9300-34000 ग्रेड पे 4600 अशी वेतनश्रेणी देण्यात आली.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आपण राज्यामध्ये केंद्र शासनापेक्षा 200 रुपये जास्त गेड-पे दिलेला आहे. सन्माननीय सदस्यांचा दुसरा प्रश्न असा होता की, याबाबतीत माननीय मंत्री महोदयांनी प्रपोजल देण्याचे आश्वासित केले होते. त्याबाबतीत वेतनत्रुटी समितीकडे दिनांक 31-08-2009 रोजी प्रस्ताव येणे गरजेचे होते. परंतु तसा प्रस्ताव प्राप्त झाला नव्हता. ज्यावेळी प्रस्ताव आला तेव्हा माननीय मंत्री महोदयांच्या आदेशानुसार तो प्रस्ताव संचालकांकडून मागवून वित्त विभागाकडे पाठविण्यात आला आहे. सन्माननीय सदस्यांचा तिसरा प्रश्न असा होता की, याबाबतीत कोर्टाने काही डायरेक्शन्स् दिलेल्या आहेत काय ? याबाबतीत सांगावयाचे तर कोर्टाने केस खारीज केलेली आहे आणि असे सांगितले आहे की, शासनाने या प्रस्तावावर विचार करावा आणि त्यानुसार विचार सुरु आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, याठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी दिशाभूल करणारे उत्तर दिलेले आहे. मुळातच केंद्र शासनाप्रमाणे राज्यातील कर्मचाऱ्यांना वेतनश्रेणी लागू केली आहे आणि उत्तरामध्ये सांगितले आहे की, आम्ही संबंधितांना त्यांच्यापेक्षा अधिकची वेतनश्रेणी दिली आहे, ग्रेड-पे दिला आहे. मात्र हे चुकीचे आहे. केंद्र शासनाप्रमाणे त्यांना वेतनश्रेणी देण्यात आलेली नाही. याबाबत आम्ही स्वत: निवेदन दिलेले आहे. श्री.बक्षी साहेबांसमोर आमची सुनावणी झालेली आहे. त्यामुळे याबाबतीत वेळेवर निवेदन देण्यात आले नाही असे सांगण्यात येत आहे, ती गोष्ट बरोबर नाही.मुख्याध्यापकांना केंद्र शासनाप्रमाणे जी वेतनश्रेणी दिली आहे,त्यानुसार त्यांना 15 हजारापर्यंत वेतनश्रेणी मिळणे अपेक्षित आहे आणि न्यायालयाने ते मान्य केलेले आहे आणि सन्माननीय न्यायालयाने क्र.6598, दिनांक 5-9-2011 रोजी निर्देश दिलेले आहेत. त्यांनी ही केस खारीज केलेली नाही. त्यांनी ही केस निकाली काढली आहे, रद्द केलेली नाही. तसेच यामध्ये "With directions to the Government of Maharashtra" असे त्यांचे म्हणणे आहे आणि त्यामध्ये तथ्यांश आहे. आपण याबाबतीत विचार करावा. म्हणून केंद्र शासनाने दिलेली वेतनश्रेणी आणि आपण दिलेली वेतनश्रेणी यामध्ये असलेली तफावत दूर करण्यासाठी केंद्र शासनाप्रमाणे वेतनश्रेणी देणार आहात काय ?

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य जे मुद्दे उपस्थित करीत आहेत, त्यामध्ये फरक आहे. मी याठिकाणी केंद्र शासनाच्या मुख्याध्यापकांची वेतनश्रेणी बरोबर सांगितली आहे. त्याचप्रमाणे त्याकरता जे क्वॉलिफीकेशन पाहिजे ती म्हणजे राज्यातील . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदया सदनाची दिशाभूल करीत आहेत.

श्रीमती फौजिया खान : सभापती महोदय, मी दिशाभूल करीत नाही, माझे ऐकून घ्यावे. राज्यातील मुख्याध्यापकांचे क्वॉलिफीकेशन असे आहे की, ते पदवीधर असले पाहिजेत, बी.एड. असले पाहिजेत आणि त्यांना पाच वर्षाचा अनुभव असावयास पाहिजे. याचपमाणे केंद्र शासनाचे जे मुख्याध्यापक आहेत, त्यांचे क्वॉलिफीकेशन सुध्दा याच स्वरुपाचे आहे. परंतु सन्माननीय सदस्य हे नवोदय विद्यालयाच्या प्राचार्यांप्रमाणे मागणी करीत आहेत आणि त्याचे जे क्वॉलिफीकेशन आहे त्यानुसार पी.जी.म्हणजे पोस्ट ग्रॅज्युएशन आणि बी.एड.पाहिजे. तसेच त्यामध्ये त्यांना पी.जी.मध्ये 50 टक्के गुण मिळावयास पाहिजेत आणि 10 वर्षाचा ज्युनिअर कॉलेजमधील अनुभव असला पाहिजे. या पध्दतीची ती वेतनश्रेणी आहे आणि ती वेतनश्रेणी प्राचार्यांसाठी आहे, मुख्याध्यापकांसाठी नाही. आपल्या राज्यात उप संचालकांची वेतनश्रेणी 15,600 ते 39,000 आहे. अशा वेळी आपण उप संचालकांच्या बरोबरीने मुख्याध्यापकांना वेतनश्रेणी कशी देऊ शकतो हा मुद्दा आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदया सभागृहाची दिशाभूल करीत आहेत. या ठिकाणी महाराष्ट्रातील शासकीय कर्मचारी, निम शासकीय कर्मचारी आणि शिक्षक यांना केंद्र शासनाप्रमाणेच वेतनश्रेणी देण्यात यावी असा करार झालेला आहे. सध्याचे माननीय केंद्रीय कृषी मंत्री आणि तेव्हाचे माननीय मुख्यमंत्री श्री.शरदजी पवार साहेबांनी देखील करार केलेला आहे. महाराष्ट्रातील जेवढे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी असतील त्यांना केंद्र शासनाप्रमाणे वेतनश्रेणी देण्यात यावी. त्यानुसार याठिकाणी सहावा वेतन आयोग जसाच्या तसा देण्यात यावा. मात्र यावेळेस महाराष्ट्र शासनाने श्री.हकीम नावाचा एक मनुष्य आणला आणि त्यांनी सर्व काही विस्कळीत करुन टाकलेले आहे. त्यांनी वेतनश्रेणी कमी केलेली आहे. आमचा सोपा प्रश्न आहे की, केंद्रातील शिक्षकांप्रमाणे राज्यातील शिक्षकांना जसाच्या तसा सहावा वेतन लागू करणार आहात काय ?

यानंतर श्री.अ.शिगम .....

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

ता.प्र.क्र.25055...

श्री.वसंतराव खोटरे....

आम्ही वेतन त्रुटी समितीसमोर अर्ज केलेला आहे. एकूण 408 अर्ज आहेत. या संदर्भात शासन वेळ काढू धोरण अवलंबित आहे. आम्ही प्रश्न टाकला की, शासन समितीला 31 मार्चपर्यंत मुदत वाढवून देते. परंतु मुदतीमध्ये काम होत नाही. तेव्हा माझा प्रश्न आहे की, महाराष्ट्रातील मुख्याध्यापक आणि बी.एड.शिक्षकांना केंद्राप्रमाणे वेतनश्रेणी देणार काय ?

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, शासनाने राज्यातील मुख्याध्यापकांना केंद्राप्रमाणे वेतनश्रेणी दिलेली आहे. तसेच आपण मागणी केल्या प्रमाणे वेतन त्रुटीकडे प्रस्ताव सादर केलेला आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील ग्रामीण भागातील आठवीच्या 10 % विद्यार्थ्यांना दुसरीच्या पुस्तकातील धडे वाचता येत नसल्याबाबत

(3) * 25199 **श्री.चंद्रकांत पाटील , श्री.विनोद तावडे , श्री.भगवान साळुंखे , श्री.सुभाष चव्हाण , श्री.राजन तेली , श्री.अमरनाथ राजूरकर , प्रा.सुरेश नवले , श्री.अनिल भोसले , श्री.रमेश शेंडगे , ॲड. उषा दराडे , श्री.हेमंत टकले , श्री.दीपकराव साळुंखे , श्री.किरण पावसकर , श्री.जयवंतराव जाधव** : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील 31 जिल्ह्यामधील ग्रामीण भागातील आठवीच्या 85.9 टक्के विद्यार्थ्यांना दुसरीच्या पुस्तकातील धडाही वाचता येत नसल्याचे असर 2011 च्या अहवालासाठी "प्रथम" या संस्थेने शाळांना भेटी दिल्या असता माहिती निदर्शनास आल्याचे माहे जानेवारी, 2012 च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शासनाने याप्रकरणी चौकशी केली आहे काय,

(3) त्यानुसार ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र द्रर्डा यांच्याकरिता : (1) नाही.

(2), (3) व (4) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, माननीय केंद्रीय मनुष्यबळ मंत्री श्री.कपिल सिब्बल यांच्या हस्ते जो अहवाल प्रकाशित झाला आहे त्यामध्ये नमूद केलेले आहे की,राज्यातील 31 जिल्ह्यांमधील आठवीच्या 85.09 टक्के विद्यार्थ्यांना दुसरीच्या पुस्तकातील धडे वाचता येत नाहीत हे खरे आहे काय, या प्रश्नाचे उत्तर "नाही" असे दिलेले आहे. माझा पहिला प्रश्न आहे की, सदरहू अहवाल माननीय केंद्रीय मनुष्यबळ मंत्री यांनी प्रकाशित केला हे खरे आहे काय ? दुसरा प्रश्न असा की, महाराष्ट्रातील विद्यार्थ्यांची गुणवत्ता तपासण्यासाठी वेगळी यंत्रणा आहे काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25199...

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, माननीय केंद्रीय मनुष्यबळ मंत्री श्री.कपिल सिब्बल यांच्या हस्ते हा अहवाल प्रकाशित झालेला आहे. सन्माननीय सदस्यांनी बातमीच्या अनुषंगाने प्रश्न विचारलेला आहे. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, 85 टक्के विद्यार्थ्यांना वाचता येत नाही. परंतु अहवालानुसार 14.1 टक्के विद्यार्थ्यांना वाचता येत नाही. ही परिस्थिती समाधानकारक आहे असे आपणास अजिबात म्हणता येणार नाही. सन्माननीय सदस्यांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबाबत प्रश्न विचारला त्याबाबत मी त्यांचे अभिनंदन करते. विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविणे हे आपल्यासाठी खूप काळजीची आणि महत्वाची बाब आहे. विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी शासन आपल्या परीने अनेक प्रयत्न करीत आहे. सन्माननीय सदस्यांनी येथे अहवालाचा उल्लेख केला त्याबाबत मी सांगू इच्छिते की, महाराष्ट्र शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, पुणे यांना आदेश दिलेले आहेत की त्यांनी या संदर्भात काय कारणे आहेत व त्यावर कोणती उपाय योजना करणे आवश्यक आहे याबाबत संशोधन करुन शासनाला अहवाल सादर करावा. त्याचप्रमाणे शिक्षकांना प्रशिक्षण देणे, नवीन इक्विपमेंट देणे, वाचन इम्प्रूव्ह करणे, गट संमेलनामध्ये आढावा घेणे इत्यादी प्रयत्न सुरु केलेले आहेत. तसेच सर्व शिक्षा अभियानांतर्गत गुणवत्ता विकास कार्यक्रम राबवित आहोत असे अनेक प्रयत्न शासनामार्फत सुरु आहेत. गुणवत्तेचा प्रश्न सर्वांशी संबंधित आहे. यामध्ये सर्वात मोठी जबाबदारी शिक्षकांची आहे. शिक्षकांना चांगले प्रशिक्षित करुन त्यांनी वर्गामध्ये चांगली गुणवत्ता आणण्याचा प्रयत्न करावा यासाठी शासनाला आपला हातभार पाहिजे एवढी माझी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयात तासिका तत्वावर कार्यरत असलेल्या प्राध्यापकांचे गेल्या अनेक महिन्यांपासूनचे मानधन मिळाले नसल्याबाबत

(4) * 25582 श्री.विक्रम काळे , श्री.वसंतराव खोटरे , प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.सतीश चव्हाण

: सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयात तासिका तत्वावर कार्यरत असलेल्या प्राध्यापकांचे गेल्या अनेक महिन्यांपासूनचे मानधन देय झालेले नाही ते त्वरित मिळावे यासाठी सहसंचालक, उच्चशिक्षण कार्यालय, औरंगाबाद यांच्यासमोर प्राध्यापकांनी माहे जानेवारी, 2011 मध्ये वा त्या दरम्यान उपोषण व धरणे, आंदोलन करुन दाद मागितली, हे खरे आहे काय,

(2) तसेच, या तासिका तत्वावरील प्राध्यापकांचे मानधन इतर प्राध्यापकांच्या दरमहा वेतनाबरोबर मिळत नाही, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, ते दरमहा न मिळण्याची कारणे काय आहेत, तसेच थकीत मानधन देण्यासाठी शासनाने काय कार्यवाही केलेली आहे वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.डी.पी.सावंत, श्री. राजेश टोपे यांच्याकरिता : (1) होय.

(2) होय.

(3) विद्यापीठाकडून तासिका तत्वावरील अध्यापकांची मान्यता मिळणे व संबंधित अशासकीय अनुदानित महाविद्यालयामध्ये तासिका तत्वावर कार्यरत असलेल्या अध्यापकांच्या मानधनाच्या रकमेची देयके संबंधित प्राचार्यांकडून सहसंचालक कार्यालयाकडे विहित कालावधीत प्राप्त होत नाहीत. सन 2010-11 मध्ये सहसंचालकाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावानुसार मागणी करण्यात आलेली रक्कम छाननीअंती शिक्षण संचालनालयाकडून अदा करण्यात आली आहे. सन 2011-12 वर्षातील संबंधित प्राचार्यांकडून प्राप्त झालेली मागणी विचारात घेऊन तरतूद उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

(4) प्रश्न उद्‌भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25582....

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, राज्यात वरिष्ठ महाविद्यालयांमध्ये तासिका तत्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांना मिळणाऱ्या मानधना संदर्भातील हा प्रश्न आहे. प्राध्यापकांना सत्र संपल्यानंतर मानधन मिळते. परंतु बऱ्याच कॉलेजमध्ये तासिका तत्वावर काम करणाऱ्या प्राध्यापकांना अजून मानधन मिळालेले नाही.

यानंतर कु.थोरात...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25582. . . .

श्री. वसंतराव खोटरे...

"देयके संबंधित प्राचार्याकडून सहसंचालक कार्यालयाकडे विहित कालावधीत प्राप्त होत नाहीत" असे उत्तरात म्हटले आहे ते बरोबर आहे. माझा एक लहान प्रश्न आहे. या बाबत प्राचार्यांना किंवा लिपिकांना समज देऊन वेतन देयके वेळेवर येण्याच्या दृष्टीने तसेच महिन्याला मानधन मिळेल या दृष्टीने उपाययोजना करण्यात येतील काय?

श्री. डी.पी.सावंत :सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे तासिका तत्वावर जे अध्यापक काम करतात त्यांची देयके हाताळण्याची पध्दत फार लेंग्दी आहे. विद्यापीठातून समितीमार्फत नेमणूक होणे, विद्यापीठातून मान्यता मिळणे कन्सर्न एचओडीने देयके तयार करणे आणि प्राचार्यांकडे पाठविणे, त्यानंतर प्राचार्यांनी जॉईन्ट डायरेक्टरकडे पाठविणे आणि जॉईन्ट डायरेक्टरने डायरेक्टरकडे पाठविणे आणि डायरेक्टरकडून देयके तयार होणे अशी प्रोसिजर आहे. या प्रोसिजरला विलंब होतो ही गोष्ट खरी आहे. सन 2010-2011 ची सर्व देयके देण्यात आलेली आहेत. त्यासंदर्भात काही प्रॉब्लेम निर्माण झाले होते परंतु पुरवणी मागण्यांमध्ये या संदर्भात तरतूद करुन मानधन देण्यात आलेले आहे. सन 2011-2012 च्या जवळ जवळ 31 कोटी रुपयांच्या मागण्या शासनाकडे आलेल्या आहेत या अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्याचीही मागणी केलेली आहे त्यामुळे मानधनाचे पैसे लवकरात लवकर देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

श्री. सतीश चव्हाण : सभापती महोदय, या तासिका तत्वावरील अध्यापकांना महिन्याला फक्त दोन ते तीन हजार रुपये मिळतात आणि तेही दोन-तीन वर्षे मिळत नाहीत. मंत्री महोदयांनी या संदर्भातील लेंग्दी प्रक्रिया सांगितलेली आहे तसेच या मार्च अधिवेशनात या संदर्भात तरतूद करण्यात येईल असे मंत्री महोदयांनी उत्तर दिलेले आहे. या संदर्भात कायम स्वरुपी उपाययोजना करण्यात येईल काय? रेग्युलर शिक्षकांप्रमाणेच त्यांचा पगार 1 तारखेला होणार काय?

श्री. डी.पी.सावंत : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांनी अतिशय महत्वाचा प्रश्न या ठिकाणी उपस्थित केलेला आहे. त्यांनी सांगितल्याप्रमाणे तासिका तत्वावरील अध्यापकांचा सध्याचा दर 60 मिनिटांसाठी 300 रुपये आहे आणि हा दर गेल्या वर्षीच वाढविण्यात आलेला आहे. त्यांच्या देयका संदर्भातील प्रक्रिया लेंग्दी आहे, या अध्यापकांना महिन्याला पगार मिळत नाही ही गोष्ट बरोबर आहे. ही प्रक्रिया कमीत कमी कशी करता येईल किंवा ऑन लाईन

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 25582. . . .

श्री. डी.पी.सवंत....

पध्दतीने देयके विद्यापीठाकडे पाठवून कमीत कमी वेळात मानधन कसे देता येईल यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. सतीश चव्हाण यांच्या प्रश्नाला उत्तर देऊन मंत्री महोदयांनी तो मुद्दा क्लिअर केलेला आहे. परंतु हे खरे आहे की, या अध्यापकांना वर्षभर मानधन मिळत नाही. काही प्राध्यापक असे आहेत की, ते केवळ सीएचबीवर काम करतात. अन्य ठिकाणी ते नोकरी करत असतील नसतील, करत असतील तर ठीक आहे त्यांना तो पगार मिळतो परंतु काही अध्यापक फक्त सीएचबीवर काम करतात, त्यावरच त्यांचे कुटुंब अवलंबून असते. माध्यमिक किंवा कनिष्ठ महाविद्यायात एकदा मान्यता मिळाली की, दर महिन्याला त्यांचे वेतन सुरु होते. मंत्री महोदयांनी सांगितले त्याप्रमाणे ही थोडीशी लेंग्दी प्रोसेस असल्यामुळे त्यासाठी विलंब होतो. सन 2010-2011 ची देयके आता देण्यात आलेली आहेत. सन 2011-2012 हे वर्ष संपलेले आहे. या वर्षातील देयके अद्याप देण्यात आलेली नाहीत त्यामुळे या वर्षभराची त्यांची थकबाकी आहे. या संदर्भातील प्रोसिजरच्या बाबतीत काही धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. साधरणत: पहिल्या एक-दोन महिन्यात विलंबाने किंवा उशिराने वेतन मिळाले तर आम्ही समजू शकतो पण साधारणत: जून, जुलै, ऑगस्ट किंवा सप्टेंबरपासून वर्ष अखेर पर्यंत त्यांना वेतन नियमितपणे मिळावे यासाठी काही धोरणात्मक निर्णय घेऊन उपाययोजना करण्यात याव्यात अशी माझी सूचना आहे.

श्री. डी. पी. सावंत : सभापती महोदय, मी थोडया वेळापूर्वीच धोरणात्मक निर्णयाच्या बाबतीत सांगितले की, ही पध्दत ऑन लाईन कशी करता येईल, कमीत कमी वेळात ती कशी पूर्ण करता येईल यासाठी शासन प्रयत्नशील आहे.

श्री. भगवान साळुंके : सभापती महोदय, तासिका तत्वावरील अध्यापकांना दहा-दहा, पंधरा-पंधरा वर्षे अल्प वेतनावर काम करावे लागते आणि त्या महाविद्यालयात जेव्हा नवीन पद निर्माण होते तेव्हा त्यांना कोणताही अधिकार दिला जात नाही, त्यांना काढण्यात येते. तेव्हा अशा दहा वर्षे तासिका तत्वावर काम करणाऱ्या अध्यापकांना सेवेत प्राधान्याने समाविष्ट करुन घेण्याचे आदेश देण्याची शासनाची मानसिकता आहे काय?

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. डी.पी. सावंत : सभापती महोदय, ज्यावेळी नियमित सेवाभरतीसाठी विद्यापीठाची समिती नियुक्त करण्यात येते. या समितीमार्फत मुलाखती घेण्यात येतात. तासिका तत्वावरील अध्यापकांना देखील या समितीसमोर मुलाखतीसाठी ॲपिअर व्हावे लागते. कोणाला नियुक्ती द्यावयाची हे समिती ठरविते. तासिका तत्वावर दहा वर्षे काम केले म्हणून त्यांचा त्या जागेवर हक्क रहात नाही. त्यांना समितीसमोर जाऊन स्वत:चे मेरिट प्रुव्ह करुन द्यावे लागते.

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मेळघाट (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथून स्थलांतरित होणाऱ्या आदिवासी मुलांसाठी वसतिगृहे निधी अभावी न उघडल्याबाबत

(५) * २५२८१ ***श्रीमती विद्या चव्हाण , श्री.हेमंत टकले , ॲड. उषाताई दराडे , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , श्री.किरण पावसकर , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.राजन तेली , श्री.अरुण गुजराथी , श्री.एम.एम.शेख , श्री.सुरेशदादा देशमुख , श्री.उल्हास पवार , श्रीमती दिप्ती चवधरी , डॉ.सुधीर तांबे , श्रीमती अलका देसाई , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.सुभाष चव्हाण , श्री.नितीन गडकरी , श्रीमती शोभा फडणवीस , श्री.विनोद तावडे , श्री.नागो पुंडलिक गाणार , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.जयप्रकाश छाजेड*** : सन्माननीय ***शालेय शिक्षण मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (ता.चिखलदरा, जि.अमरावती) येथून स्थलांतरित होणाऱ्या आदिवासीच्या मुलांसाठी सर्व शिक्षा अभियानांतर्गत उघडण्यात येणारी हंगामी वसतीगृहे निधीअभावी न उघडल्याने सुमारे दीड हजार विद्यार्थी व त्यांच्या पालकांची गैरसोय होत असल्याचे दिनांक ४ जानेवारी, २०१२ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चिखलदरा तालुक्यात गत वर्षी १३ वसतिगृहे सुरु करण्यात आली होती त्याप्रमाणे या वर्षीही वसतिगृह सुरु करण्यात यावी असे चिखलदरा पंचायत समितीने अभियानाच्या जिल्हास्तरीय कार्यालयाकडे माहे डिसेंबर, २०११ मध्ये वा त्या दरम्यान मागणी केली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुंषगाने हंगामी वसतीगृहे उघडण्यास दुर्लक्ष व टाळाटाळ करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच आदिवासी विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून शासनामार्फत निधी उपलब्ध करुन देणेबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (१) अंशत: खरे आहे. १४४ विद्यार्थी स्थलांतरित झालेले आहेत.

(२) होय.

(३), (४) व (५) सर्व शिक्षा अभियान कार्यक्रमांतर्गत अमरावती जिल्ह्याच्या कार्यक्रम अंदाजपत्रकामध्ये सन २०११-१२ वर्षासाठी हंगामी वसतीगृहे या उपक्रमाकरीता निधीच्या तरतुदीची मागणी करण्यात आलेली नव्हती. त्यानंतर शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, अमरावती यांनी डिसेंबर, २०११ मध्ये हंगामी वसतीगृह उपक्रमाकरीता पुनर्विनियोजनाद्वारे निधी उपलब्ध करण्यासाठीचा प्रस्ताव सादर केला होता. तथापि, सदर प्रस्तावास वसतीगृह सुरू न केल्यामुळे मान्यता देण्यात आली नाही. याप्रकरणी शासनाने चौकशी करण्याचे आदेश दिलेले असून त्यानुसार संबंधितावर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात येईल.

सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे.

..5...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25281. . . ..

पहिल्या प्रश्नाच्या उत्तरात शेवटी "झालेले आहे" असे म्हटले आहे त्याच्या ऐवजी "झाले होते" असे वाचण्यात यावे.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, हा अतिशय गंभीर प्रश्न आहे. आदिवासी मुलांसाठी हंगामी वसतिगृह निधी अभावी न उघडल्याने जवळ जवळ दीड ते दोन हजार मुलांचे नुकसान होत आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आणि आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाचा हक्क सुध्दा त्या ठिकाणी नाकारला जातो. या ठिकाणी पहिल्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "अंशत: खरे आहे. 144 विद्यार्थी स्थलांतरित झालेले आहेत" असे म्हटले आहे. चिखलदरा पंचायत समितीने जिल्हा स्तरीय सर्व शिक्षा अभियानाकडे सन 2011 मध्ये मागणी केली होती की, मागच्या वर्षी प्रमाणे पुन्हा 13 वसतिगृहे सुरु करावीत. परंतु ती वसतिगृहे सुरु करण्यात आली नाहीत. याला जबाबदार कोण आहे आणि त्यांच्यावर काय कारवाई होणार आहे ? आदिवासींसाठी एवढा मोठा निधी असताना आपण तो देत नसाल तर सर्व शिक्षा अभियानाचा उपयोग काय ? या बाबतीत संबंधितांवर शासन काय कारवाई करणार आहे ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मेळघाट क्षेत्रामध्ये हंगामी वसतिगृहे सुरु करण्याच्या बाबतीत अपेक्षा अशी होती की, जेव्हा आपण सर्व शिक्षा अभियानाचे बजेट करतो त्यावेळी त्यांच्याकडून मागणी आली पाहिजे. असे अपेक्षित असताना त्या वेळी त्या लोकांची मागणीच आलेली नव्हती त्यामुळे एमएससीआरटीच्या संचालकांनी नंतर एक पत्र लिहिले होते की, ज्यांची मागणी आलेली नाही असे जे जिल्हे आहेत त्यांना वयानुरुप समकक्ष वर्गात दाखल केलेल्या मुलांसाठी विशेष प्रशिक्षण वर्ग असे जे लेखा शीर्षक आहे त्याचे पुनर्विनियोजन करुन त्यांचा प्रस्ताव पाठवावा. काही जिल्ह्यांनी तसे प्रस्ताव पाठविले आहेत. चिखलदरा आणि धारणी विभागामध्ये स्थलांतरित झालेले जे विद्यार्थी आहेत त्यांच्यासाठी हंगामी वसतिगृहे नंतर दाखल केली आणि 274 विद्यार्थ्यांसाठी ही सुविधा करण्यात आलेली आहे. 144 विद्यार्थी स्थलांतरित झालेले आहेत. तरी सुध्दा वसतिगृहाची ही जी चूक झालेली आहे त्यामध्ये त्यावेळी प्रस्ताव पाठविण्याची मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची जबाबदारी होती. त्यामुळे त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात येत आहे आणि प्रकल्प संचालकाला एक महिन्याच्या आत या बाबतीत सर्व चौकशी करुन शासनाला त्याचा अहवाल देण्याबाबत सूचना देण्यात आली आहे. पुढच्या वर्षापासून ही चूक होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, मुळातच धारणी आणि चिखलदारा आणि विशेषत: धारणी हा भाग एवढा दुर्गम आहे की, तिकडून येत असताना एक एक दिवस लोकांना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अर्धी गावे पायी चालत येऊन अमरावतीला पोहोचावे लागते. एवढी गंभीर परिस्थिती असताना ज्या ठिकाणी एक वर्ष आपण हंगामी वसतिगृह दिलेले आहे म्हणजे पुढच्या वर्षी देणे आहे हे माहीत आहे. हे माहीत असल्यामुळे त्याचे प्रस्ताव येवो अगर न येवो, ही हंगामी वसतिगृहे द्यावयाची आहेत असे गृहीत धरुन पुढच्या वर्षापासून ही योजना कायम स्वरुपी करणार का ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, प्रस्ताव येणे हे आवश्यक आहे. पण प्रस्ताव आला पाहिजे याबद्दल दक्षता घेण्याचे काम शासनाकडून होणार आहे. तेवढी दक्षता घेण्यात येईल.

श्रीमती विद्या चव्हाण : सभापती महोदय, शिक्षणासारख्या कार्यामध्ये अशा प्रकारच्या तांत्रिक सबबी सांगणे हे अत्यंत चुकीचे आहे, असे मला वाटते. मुळात जेव्हा शाळेमध्ये पहिलीपासून दहावीपर्यंत जातात तेव्हा जी गळती होते त्याबाबत शासनाने घरोघरी जाऊन पुढच्या वर्षी मुले शाळेत का आली नाहीत हे विचारले पाहिजे. त्या ठिकाणी दुर्गम आदिवासी भागामध्ये त्यांची राहण्याची व्यवस्था नसेल आणि प्रस्तावच आला नाही अशा प्रकारची जर उत्तरे मिळत असतील तर आदिवासींसाठी एवढा मोठा निधी द्यावयाचा, त्यांना शिक्षणासाठी प्रोत्साहन द्यावयाचे आणि ऐनवेळी प्रस्ताव आला नाही म्हणून आम्ही दिले नाही अशी ही चुकीची तांत्रिक कारणे आहेत. मुले जर शाळेत येत नसतील तर ती शाळेत का आली नाहीत हे त्यांच्या घरापर्यंत जाऊन विचारणे ही जबाबदारी सुध्दा शासनाने घेतली पाहिजे. या बाबतीत शासन काय विचार करणार आहे ?

प्रा. फौजिया खान : सभापती महोदय, मुले ज्या ठिकाणावरुन स्थलांतरित होतात त्या ठिकाणी हंगामी वसतिगृह सुरु करण्याची योजना आहे. पण ज्या ठिकाणी स्थलांतरित होतात म्हणजे ज्या ठिकाणी ते जातात त्या ठिकाणी सुध्दा त्यांना शाळेमध्ये पाठविण्याची जबाबदारी शासनाने घेतलेली आहे आणि त्यासाठी जिल्हाधिकारी महोदयांच्या अध्यक्षतेखाली समिती निर्माण करण्यात आलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25281.... प्रा.फौजिया खान....

मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी याबाबतीत नोडल ऑफिसर यांना नेमून घरोघरी जाऊन ते शाळेला जातात की नाही ते बघावे. राईट टू एज्यूकेशन या कायद्यानुसार 6 ते 14 वयोगटातील मुलांना शाळेमध्ये पाठविणे बंधनकारक आहे. ही जबाबदारी शासनावर असल्यामुळे नोडल अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. त्यांना त्या शाळांमध्ये असलेल्या सुविधा पाहण्यास सांगितलेले आहे. त्या गावातील शिक्षण समितीवर सुध्दा सुविधांसंबंधी जबाबदारी टाकण्यात आलेली आहे. त्या समितीने खर्चाच्या बाबीकडे लक्ष द्यावयाचे आहे.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांचे उत्तर समाधानकारक नाही. मुळात धारणी हा अतिशय दुर्गम भाग आहे. अमरावती जिल्ह्यात आम्ही नेहमी फिरत असतो. मघाशी सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी सांगितल्या प्रमाणे त्या भागात एका गावातून दुसऱ्या गावामध्ये जात असताना काही वेळा मध्य प्रदेश राज्याची सीमा ओलांडून जावे लागते. मंत्री महोदयांनी असे सांगितले की, त्या ग्रामस्थांकडून याबाबत ठराव आला नाही. या भागातील लोक अशिक्षित आहेत, आदिवासी आहेत. त्यांच्या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहामध्ये आणावयाचे आहे की त्यांना तसेच दूर लोटावयाचे आहे हे एकदा शासनाने ठरवावे. त्या ठिकाणची 144 मुले स्थलांतरित झालेली आहेत. त्या भागातील मुले शिक्षण घेण्यास उत्सुक नसतात, याची खातरजमा मंत्री महोदयांनी स्वत: त्या भागात जाऊन करुन घ्यावी. त्या भागात गाडी सुध्दा जाऊ शकत नाही, अशा परिस्थितीत लांब अंतरावरील वसतिगृहामध्ये ही मुले पायी कशी काय जाणार ? म्हणून वसतिगृहे त्यांच्या गावातच झाली पाहिजेत. त्यामुळे ती मुले तेथेच राहू शकतील. तसेच त्या मुलांचे शिक्षण पूर्ण होईल. वसतिगृहांचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्याच्या कामामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी व शिक्षणाधिका-यांनी दिरंगाई केलेली आहे. त्यामुळे शासन त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई करणार आहे ?

श्री.राजेंद्र दर्डा : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती विद्या चव्हाण व इतर सन्माननीय सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नाला सन्माननीय राज्यमंत्र्यांनी उत्तर दिलेले आहे. परंतु त्यांच्या उत्तराने सन्माननीय सदस्यांचे समाधान झालेले नाही. सन्माननीय सदस्यांनी शासनाकडून झालेली चूक लक्षात आणून दिल्याबद्दल मी या सर्व सन्माननीय सदस्यांचे मनापासून आभार मानतो.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

जे पालक स्थलांतरित होतात त्यांच्या पाल्यांसाठी अत्यंत चांगल्या भावनेतून ही योजना शासनाने सुरु केली आहे. फेब्रुवारी महिन्यामध्ये सर्व शिक्षा अभियानाचे बजेट तयार केले जाते. मागील वर्षी 21 जिल्ह्यांमध्ये ही योजना लागू होती. या वर्षी 12 जिल्ह्यांमध्ये ही योजना दाखविली होती. त्यावेळीच या अधिकाऱ्यांच्या लक्षात ही बाब यावयास पाहिजे होती. इतके जिल्हे का दाखविण्यात आले नाही, त्यांची ही चूक निश्चितच झालेली आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी जे जिल्ह्याचे प्रमुख असतात त्यांच्या निदर्शनास येणे आवश्यक होते. त्यांनी सर्व शिक्षा अभियानासाठी मागणी करणे आवश्यक होते, परंतु त्यांनी ती केलेली नाही. डिसेंबर महिन्यामध्ये हे लक्षात आले की, एमपीएसपीकडे मागणी करण्यात आलेली नाही. त्यासाठी त्यांनी पत्र लिहून मागणी केली. परंतु मागणी करण्यात सुध्दा उशीर झालेला आहे. हे मी मान्य करीत आहे. सन्माननीय सदस्यांना शासनाकडून उत्तर देण्यात आले असले तरी ही बाब गंभीर आहे. त्यामुळे प्रकल्प संचालक यांना कालच असे आदेश देण्यात आले आहेत की, त्यांनी सर्व शिक्षा अभियानाच्या बाबतीत मुख्य कार्यकारी अधिकारी किंवा सर्व शिक्षा अभियानाचे ज्यांनी बजेट तयार केले असेल त्यांची चौकशी करुन एक महिन्याच्या आत अहवाल द्यावा. सर्व शिक्षा अभियानाच्या माध्यमातून हजारो कोटी रुपये खर्च होत असताना आदिवासी लोक एका वेगळ्या बेटावर राहतात असे सांगून त्यांना काम करता येणार नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील विनाअनुदानित भाषिक शाळांना (इंग्रजी व्यतिरिक्त)
100% टक्के वेतन अनुदान देणेबाबत

(6) * 25664 श्री.कपिल पाटील , श्री.जयंत प्र.पाटील : सन्माननीय **शालेय शिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील कायम विनाअनुदानित भाषिक शाळांना (इंग्रजी व्यतिरिक्त) 100 टक्के वेतन अनुदान देण्याबाबत शिक्षण हक्क कायदयातील बंधनकारक शर्तीनुसार (मोफत शिक्षण) पूर्तता शासनाने अद्याप केलेली नाही, हे खरे आहे काय,

(2) पुरेशी पटसंख्या असलेल्या सर्व शाळांना माहे जून 2012 पासून भौगोलिक सुविधांचा आग्रह न धरता अनुदान देण्याचा निर्णय शासनाने केला आहे काय,

(3) असल्यास,त्याचा तपशील काय आहे ?

प्रा.फौजिया खान, श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (1) बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009, देशात 1 एप्रिल, 2010 पासून अंमलात आला असून सदर कायद्यातील तरतुदीनुसार 3 वर्षात 'नजीकची शाळा' उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. राज्यात यापूर्वीच मोठ्या प्रमाणात 'नजीकच्या शाळा' उपलब्ध असून जेथे शाळा उपलब्ध नाही, त्या ठिकाणी शाळा देण्याबाबत बृहत आराखडा अंतिम करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(2) व (3) इंग्रजी माध्यम वगळता इतर माध्यमाच्या 'कायम' शब्द वगळलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांचे दिनांक 15 नोव्हेंबर, 2011 च्या आदेशानुसार मूल्यांकन निकष विहित केले असून अनुदान पात्र ठरण्यासाठी शाळांनी शैक्षणिक गुणवत्ता व भौतिक सुविधा पुरविणे आवश्यक आहे.

श्री.कपिल पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाच्या दोन्ही उत्तरांमध्ये विसंगती दिसून येत आहे. यापूर्वीच्या प्रश्नाला मंत्री महोदयांनी सकारात्मक उत्तर दिले आहे त्याप्रमाणे मंत्री महोदयांनी याही प्रश्नाला सकारात्मक उत्तर द्यावे अशी माझी अपेक्षा आहे. कायद्यातील तरतुदीनुसार 3 वर्षामध्ये नजीकच्या काळात शाळा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. 1 एप्रिल, 2013 रोजी या शाळांची मुदत संपत आहे. शासनाने राज्यात अशा किती शाळा उपलब्ध करुन दिलेल्या आहेत आणि आणखी किती शाळांची गरज आहे ? दि.1.4.2013 पूर्वी खाजगी शाळांना किंवा शासकीय शाळांना 100 टक्के अनुदान दिले जाणार आहे काय ?

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रश्न क्रमांक 2 आणि 3 च्या उत्तरामध्ये देखील विसंगती आहे. दिनांक 15 नोव्हेंबर 2011च्या आदेशानुसार मूल्यांकन निकष विहित केले असून अनुदान पात्र ठरण्यासाठी शाळांनी शैक्षणिक गुणवत्ता व भौतिक सुविधा पुरविणे आवश्यक आहे, असे उत्तरामध्ये नमूद केलेले आहे. शैक्षणिक गुणवत्ते बाबतचे मूल्यांकनाचे निकष कठोर असले पाहिजे. हे निकष ठरवून दिल्याबद्दल मी शासनाचा आभारी आहे. परंतु भौतिक सुविधा पुरविण्याची जबाबदारी ही शासनाची आहे. अशा प्रकारे शासनाचे उत्तर असेल तर कायद्यानुसार शासनावर जी भौतिक सुविधा पुरविण्याची जबाबदारी टाकलेली आहे ती शासन टाळत आहे असा त्याचा अर्थ होतो. भौतिक सुविधा पुरविणे याचा अर्थ मी सॅलरी ग्रॅण्टसह शिक्षक पुरविणे असा समजतो. ही जबाबदारी शासनाने टाळलेली आहे काय ? "कायम" शब्द वगळलेल्या प्राथमिक व माध्यमिक शाळांचे मूल्यांकनाचे निकष विहित केलेले आहेत. पण भौतिक सुविधा पुरविण्याची जबाबदारी शासनाने संस्थावर टाकून कायद्यातील तरतुदींना बगल दिली जात असेल तर ते क्षमाशील होणार नाही. तेव्हा याबाबतीत शासनाची भूमिका काय आहे ?

प्रा. फौजिया खान : शासन आपली भौतिक जबाबदारी टाळत आहे काय असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. तर ते सत्य नाही. सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 प्रमाणे 2013 पर्यन्त 1 कि.मी., 2 कि.मी. 3 कि.मी. या प्रमाणे जे काही निकष आहेत त्याप्रमाणे शाळा ॲक्सेसिबल झाल्या पाहिजेत आणि या नियमानुसार शासनाला तशा सुविधा निर्माण करुन देणे हे बंधनकारक आहे. त्याबाबतीत शासन बृहत आराखडा तयार करीत असून तो स्वीकृतीच्या टप्प्यावर असून या आठवड्यात त्याला स्वीकृती मिळण्याची शक्यता आहे. मूल्यांकनाचे निकष कठोर असले पाहिजेत हे सन्माननीय सदस्यांनी मान्य केले त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. शाळांची शैक्षणिक गुणवत्ता व शाळांना भौतिक सुविधा पुरविणे ही शासनाची जबाबदारी आहे असे सन्माननीय सदस्यांनी सांगितले. लर्निंग आऊटकमसाठी 50 गुण मूल्यांकनामध्ये ठेवलेले आहेत. 75 टक्के गुण प्राप्त करणे ही शाळांची जबाबदारी आहे. शैक्षणिक संस्थामध्ये प्रॉपर टिचिंग आणि प्रॉपर इव्हॅल्यूएशन झाले पाहिजे. त्याबाबतीत गुणवत्ता टिकविणे ही शाळांचीच जबाबदारी आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील : गुणवत्तेबद्दलच्या कठोर निकषाबद्दल माझा आक्षेप नाही. भौतिक सुविधा देण्याची जबाबदारी ही शाळांची नसून शासनाची आहे. तेव्हा असे निकष करुन शासन स्वत:ची जबाबदारीतून सुटका करुन घेत आहे काय ?

प्रा. फौजिया खान : 8 हजार प्राथमिक शाळा निर्माण केलेल्या आहेत. सर्वशिक्षा अभियानाच्या माध्यमातून भौतिक सुविधा देण्याचे काम शासनाकडून मोठया प्रमाणावर आणि चांगल्या प्रकारे होत आहे.

...3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मुंबईतील अनुदानित खाजगी प्राथमिक मराठी शाळांतील पटसंख्या दीडशेच्या खाली घटल्याने २७ शाळांतील लिपिक अतिरिक्त ठरल्याबाबत

(७) * ***२५७१७ श्री.प्रकाश बिनसाळे , ॲड. उषाताई दराडे , श्री.हेमंत टकले , श्री.रमेश शेंडगे , श्री.विक्रम काळे , श्री.किरण पावसकर , श्री. एस. क्यू. ज़मा , श्री.मोहन जोशी , श्री.चरणसिंग सप्रा , श्री.जैनुद्दीन जव्हेरी , श्री.राजन तेली*** **:** सन्माननीय ***शालेय शिक्षण मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील अनुदानित खाजगी प्राथमिक मराठी शाळांतील पटसंख्या दीडशेच्या खाली घटल्याने २७ शाळांतील लिपिक अतिरिक्त ठरल्याचे माहे नोव्हेंबर, २०११ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर अतिरिक्त लिपिकांचे नुकसान होवू नये म्हणून त्यांचे समायोजन करणेबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप कोणतीच उपाययोजना केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

प्रा. फौजिया खान,श्री.राजेंद्र दर्डा यांच्याकरिता : (१) अंशत: खरे आहे, दिनांक १ ऑगस्ट, २०११ च्या पट पडताळणीनुसार ज्या शाळांची पटसंख्या १५० ते ५०० पेक्षा कमी झाली आहे. अशा शाळांमधील ३४ लिपिक अतिरिक्त झाले आहेत.

(२) अतिरिक्त लिपिकांचे समायोजन इतर माध्यमांच्या अनुदानित शाळेत करण्यात आले आहे. व उर्वरीत कर्मचाऱ्यांचे समायोजन शिक्षण विभागामध्ये तात्पुरत्या स्वरुपात करण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

श्री. प्रकाश बिनसाळे : 34 अतिरिक्त लिपिकांपैकी किती लिपिकांचे इतर माध्यमांच्या अनुदानित शाळेत समायोजन करण्यात आले आहे आणि किती लिपिकांचे समायोजन करण्याचे राहिलेले आहे ? मुंबई शहरातील लोकसंख्या वाढत असून शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या कमी कमी होत आहे. शाळांचा शैक्षणिक दर्जा घसल्यामुळे विद्यार्थ्यांची संख्या कमी झालेली आहे काय, असल्यास शासन त्याबाबतीत काय पावले उचलणार आहे ?

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.फौजिया खान : सभापती महोदय, 34 लिपिकांना 100 टक्के समायोजन करुन घेणार आहोत. 34 पैकी 13 लिपीकांचे इतर माध्यमांच्या अनुदानित शाळांमध्ये समायोजन झालेले असून 21 लिपिकांचे पगार चालू आहेत, त्यांना तात्पुरत्या स्वरुपात घेतले आहे. जसजशी पदे रिक्त होतील तसतसे त्यांचे समायोजन करणार आहोत.

श्री.प्रकाश बिनसाळे : मुंबई शहरात अशा किती शाळा आहेत?

प्रा.फौजिया खान : मुंबई महानगरपालिकेच्या प्रायमरी शाळा 1174 असून त्या ठिकाणी विद्यार्थी संख्या 3,85,657 इतकी आहे. माध्यमिक शाळा 145 असून विद्यार्थी संख्या 60132 इतकी आहे. 3 कनिष्ठ महाविद्यालये असून 271 विद्यार्थी आहेत. विद्यार्थी संख्या कमी कशी होते असा प्रश्न माननीय सदस्यांनी विचारला आहे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, 34 लिपिक अतिरिक्त ठरले. कारण त्या शाळांमधील विद्यार्थी संख्या कमी झाली. अशा शाळा किती आहेत, त्या शाळातील विद्यार्थी संख्या कमी का झाली, तेथील शैक्षणिक गुणवत्ता ढासळली आहे का?

प्रा.फौजिया खान : विद्यार्थी संख्या घसरलेली नाही. मुंबई महानगरपालिकेचे जे निकष आहेत ते राज्य शासनापेक्षा वेगळे आहेत. मुंबई महानगरपालिकेमध्ये 500 पटसंख्या असल्यास दोन लिपिक अपेक्षित आहेत. 150 पेक्षा अधिक पटसंख्या असल्यास एक लिपिक अपेक्षित आहे. राज्य शासनाच्या निकषाप्रमाणे 150 ते 500 पटसंख्येपर्यंत लिपिक अनुज्ञेय नाही. त्यापेक्षा जास्त पटसंख्या असल्यास एक लिपिक अपेक्षित आहे. त्या शाळांची पटसंख्या तेवढी नसल्यामुळे ही संख्या अतिरिक्त झालेली आहे.

श्री.रामनाथ मोते : सभापती महोदय, खाजगी प्राथमिक शाळांमधील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या समायोजनाचा हा प्रश्न आहे. मराठी माध्यमाच्या शाळांमधील विद्यार्थी संख्या दिवसेंदिवस कमी होत जाणार आहे, यामध्ये बदल होणार नाही. त्यामुळे जे पद मंजूर करण्याचे निकष वर्षानुवर्षे त्याच पध्दतीने सुरु आहेत. खाजगी प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा किंवा अन्य शाळांचा प्रश्न असला तरी प्रशासकीय मर्यादा ठरलेली आहे. या संदर्भातील कायदा 1947 चा आहे त्यामध्ये बदल केलेला नाही. या निकषामध्ये बदल करण्याचा शासनाचा प्रस्ताव आहे काय, निकषामध्ये बदल केले जातील काय? निकषामध्ये बदल करण्याची आवश्यकता आहे. प्राथमिक शाळामधील

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रामनाथ मोते..... ता.प्र.क्र.25717....

लिपिकाचे काम आणि माध्यमिक शाळामधील लिपिकाचे काम सारखेच आहे. मुंबई आणि राज्यामध्ये जवळजवळ 121 कनिष्ट लिपिक आणि 103 चतुर्थ श्रेणी कर्मचारी अतिरिक्त ठरले आहेत. हे कर्मचारी वर्षानुवर्षे घरी बसून पगार घेत आहेत. माध्यमिक शाळांमध्ये एका बाजूला काल पद निर्माण झाले की आज मान्यता मिळते. राज्यातील ज्या ज्या शाळांमध्ये लिपिक व चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची पदे रिक्त आहेत तेथे प्राथमिक शाळामधील कर्मचाऱ्यांचे नेचर ऑफ वर्क सारखेच असल्यामुळे समायोजन करण्यात आले पाहिजे. नगरपालिकेच्या, महानगरपालिकेच्या प्राथमिक वा माध्यमिक शाळा असल्या तरी तेथे शासन 100 टक्के अनुदान देत असल्यामुळे अशा शाळांमध्ये तातडीने समायोजन केले पाहिजे. या दृष्टीने समायोजन करण्याबाबत धोरणात्मक निर्णय घेतला जाईल काय? मंत्री महोदयांबरोबर माझी चर्चा झाली त्यावेळी त्यांनी सकारात्मक भूमिका घेतली होती. या संदर्भात तातडीने निर्णय घेतला जाईल काय?

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25717.....

प्रा. फौजिया खान : महोदय, हा प्रश्न मुंबईतील शाळांपुरता मर्यादित असून सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी जे मुद्दे उपस्थित केले ते या प्रश्नाशी संबंधित नाहीत. त्यासाठी एखाद्या दुसऱ्या आयुधाचा वापर करुन त्यांना त्यांचे प्रश्न उपस्थित करता येतील. सध्या तरी त्यांच्या प्रश्नांची उत्तरे देता येणार नाहीत.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अनुसूचित जाती-जमाती इतर मागासवर्गीय यादी राखीव प्रवर्गातून अभियांत्रिकी, व्यवस्थापन, औषधनिर्माणशास्त्रात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जात प्रमाणपत्राबरोबरच जात-पडताळणी (Cast Validity) प्रमाणपत्र सादर करणेबाबत

(8) * 26363 प्रा.दिलीपराव सोनवणे , श्री.वसंतराव खोटरे, श्री.विक्रम काळे , श्री.उल्हास पवार , डॉ.सुधीर तांबे, श्रीमती दिप्ती चवधरी : सन्माननीय **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती इतर मागासवर्गीय यादी राखीव प्रवर्गातून तंत्रशिक्षण अभ्यासक्रम, अभियांत्रिकी व्यवस्थापन, औषधनिर्माण शास्त्रात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना जात प्रमाण पत्राबरोबर जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, जात पडताळणी प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना वेळेवर मिळत नसल्यामुळे अनुसूचित जाती जमाती व इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांना त्यांच्या मागासवर्गीय प्रवर्गामधून प्रवेश मिळत नसल्याने विद्यार्थी व पालक यांच्यात तीव्र असंतोष पसरल्याचे माहे जानेवारी, 2012 मध्ये वा त्या दरम्यान आढळून आले हे खरे आहे काय,

(3) राज्यात गतवर्षी अभियांत्रिकी व इतर अभ्यासक्रमासाठी राखीव प्रवर्गातील किती विद्यार्थ्यांनी जात पडताळणीसाठी अर्ज केलेले आहेत, त्यापैकी किती विद्यार्थ्यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र प्रलंबित आहेत,

(4) असल्यास, सदरहू विद्यार्थ्यांना जात पडताळणी प्रमाणपत्र त्वरित मिळण्याबाबत शासनाने कोणती कायम स्वरुपी कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(5) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.राजेश टोपे : (1) होय, हे खरे आहे.

(2) अंशत: खरे आहे.

(3) राज्यात गतवर्षापर्यंत एकूण 78098 एवढ्या विद्यार्थ्यांचे जात पडताळणीसाठी अर्ज प्राप्त झालेले होते. त्यापैकी 58231 एवढे अर्ज प्रलंबित आहेत.

(4) जात पडताळणीच्या कामकाजात अधिक गतिमानता, पारदर्शीपणा आणि सुसूत्रता आणण्यासाठी समितीच्या कामकाजाचे संगणकीकरण करण्याची कार्यवाही शासनाच्या सामाजिक न्याय विभागामार्फत करण्यात येत आहे.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

प्रा. दिलीपराव सोनावणे : महोदय, राज्यातील अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती इतर मागासवर्गीय यादी राखीव प्रवर्गातून तंत्रशिक्षण अभ्यासक्रम, अभियांत्रिकी व्यवस्थापन, औषधनिर्माण शास्त्रात प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या दृष्टीने हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. त्यांना प्रवेशासाठी जात प्रमाणपत्रा बरोबरच जात पडताळणी प्रमाणपत्र देखील आवश्यक केलेले आहे. पण जात पडताळणी प्रमाणपत्र वेळेत मिळत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना प्रवेशापासून वंचित रहावे लागते. माझा प्रश्न असा आहे की, प्रवेश प्रक्रियेपूर्वी अशी जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्याची व्यवस्था शासन

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

करणार काय, तसे शक्य नसल्यास शासनाने त्यांना जातीच्या आधारावर प्रवेश देण्याबाबत विचार करील काय, त्यानंतर गत वर्षीच्या जात प्रमाणपत्राच्या आधारावर या मुलांना जात पडताळणी प्रमाणपत्र मिळण्याची व्यवस्था शासन करणार काय ?

श्री. राजेश टोपे : महोदय, पूर्वीची म्हणजेच आजपर्यंतची शासनाची पध्दत अशी होती की, तीन महिन्यांचा कालावधी देऊन 100 रुपयांच्या बॉंड पेपरवर जात पडताळणीसंबंधी लिहून घेत होतो व त्यांना प्रवेश देत होतो. परंतु सन 2009 ते 2012 पर्यंत काही प्रकार असे आढळून आले की, सन 2009-10 मध्ये एकूण 500 अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांची जात प्रमाणपत्रे खोटी आढळून आली, परिणामी त्यांना अवैध ठरविण्यात आले. विशिष्ट जातीच्या नावाने प्रवेश देण्यात आले पण ती प्रमाणपत्रे नंतर पडताळणी होऊ न शकल्याने चुकीची आढळून आली व त्याच विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत अडचण निर्माण झाली. सन 2011-12 या वर्षात एकूण 205 अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांच्या बाबतीत हा प्रकार घडला. अशा प्रकारे या तीन वर्षातील आकडाच 781 पर्यंत गेला. नंतरच्या काळात यासंदर्भात अनेक लिटिगेशन्स झाले व न्यायालयीन प्रकरणे वाढली.

वास्तविक जातीच्या आधारावर प्रवेश घेतल्यानंतर त्या जातीसाठी लागू असणाऱ्या सवलती सुध्दा शासन देत असते. अशा प्रकारे रिअम्बर्स स्कीमचा गैरफायदा या माध्यमातून घेण्याचे प्रकार वाढत होते. त्यामुळे शासनाने सन 2012-13 या वर्षापासून जात वैधता प्रमाणपत्र प्रवेश घेण्यापूर्वीच कंपल्सरी केलेले आहे. यातील एकच महत्वाचा भाग म्हणजे अवेअरनेस वाढला पाहिजे. नुकत्याच जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि नगरपालिकांच्या निवडणुका झाल्या त्यात निवडून आलेल्या व फॉर्म भरलेल्या उमेदवारांना देखील हाच निर्णय कंपल्सरी करण्यात आला आहे, जेणेकरुन या माध्यमातून अवेअरनेस वाढला पाहिजे असा शासनाचा उद्देश आहे. त्यासाठी शासनाने वर्तमान पत्राच्या माध्यमातून, जाहिराती तसेच अधिसूचना इ. माध्यमातून सर्व ठिकाणी कळविलेले आहे. तसेच सामाजिक न्याय व आदिवासी विकास विभागाचे हे मुख्य काम असून या दोन्ही विभागांनी आपापल्या यंत्रणा सक्षम करण्याच्या दृष्टीने कार्यवाही केलेली आहे. त्यात संगणकीकरण वाढविले जात आहे व त्यामुळे लवकरात लवकर जात पडताळणी समितीसमोरील प्रकरणे निकाली काढली जातील याबाबत संबंधित मंत्री महोदयांनी आश्वासित केलेले आहे.

.....4

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 26363.....

श्री. संजय केळकर : महोदय, मंत्री महोदयांनी तपशीलवार उत्तर दिलेले आहे. पण 78 हजार प्रकरणांपैकी 58231 प्रकरणे अद्यापही पडताळणी समितीसमोर प्रलंबित आहेत. या प्रकरणांच्या बाबतीत शासन काय निर्णय घेणार आहे, तसेच प्रलंबित प्रकरणांमध्ये जात वैधता प्रमाणपत्र मिळाले नाही म्हणून जे शैक्षणिक नुकसान होणार आहे त्यासाठी शासन कोणत्या उपाययोजना करणार आहे ?

श्री. राजेश टोपे : महोदय, आताच सांगितल्याप्रमाणे संबंधित दोन्ही विभागांनी अनुक्रमे आदिवासी विकास विभागाने राज्यात 6 ठिकाणी आणि सामाजिक न्याय विभागाने 15 ठिकाणी अशी जात वैधता प्रमाणपत्र प्रकरणे निकाली काढण्यासाठी विशिष्ट कक्ष निर्माण केले आहेत. ही शासनाची जबाबदारी राहील आणि त्यादृष्टीने लवकरात लवकर ही प्रकरणे निकाली काढण्याची व्यवस्था केली जाईल.

उप सभापती : जात वैधता प्रमाणपत्र देणारी जी यंत्रणा आहे तीच मुळात ढिसाळ आहे. वर्षानुवर्षे या समितीसमोर प्रकरणे प्रलंबित राहतात. सभागृहात देखील अनेक वेळा या विषयावर चर्चा केली जाते. या समितीशी संबंधित अधिकाऱ्यांमध्ये प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळलेला आहे त्यामुळे जाती वैधता प्रमाणपत्र म्हणजे जवळपास पैशाची खाण झालेली आहे. मी मुद्दाम एका उदाहरणाच्या माध्यमातून सांगू इच्छितो की, केवळ शैक्षणिक क्षेत्रच नव्हे तर नुकत्याच झालेल्या निवडणुकांच्या वेळी असा प्रकार झालेला आहे की.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

एका विशिष्ट उमेदवाराच्या संदर्भात हायकोर्टाने आदेश दिल्यानंतरही संबंधित उमेदवाराला प्रमाणपत्र मिळण्यासाठी तीन महिन्यापेक्षा अधिक विलंब लागला. शेवटी त्या अधिका-याला मला रात्री फोन करावा लागला व त्यानंतरही त्या अधिका-याने 50 हजार रुपये घेऊनच संबंधित उमेदवाराला प्रमाणपत्र दिले. अशा पध्दतीने जात प्रमाणपत्र देण्याच्या संदर्भात भ्रष्ट आणि ढिसाळ यंत्रणा काम करीत असेल तर आपण कितीही अवेअरनेस आणण्याचा प्रयत्न केला तरी त्याचा काही एक उपयोग होणार नाही. तुम्ही विद्यार्थ्यांमध्ये अवेअरनेस आणण्याचा प्रयत्न करु नका, They are aware" तुम्हाला अवेअरनेस आणावयाचा असेल तर यंत्रणेमध्ये आणावा अशी मी आपल्याला या ठिकाणी सूचना करतो.

श्री. जयंत जाघव : सभापती महोदय, आमच्या परिसरात हिंदू ठाकूर नावाची आदिवासी जमात राहते. या आदिवासी समाजाची प्रकरणे जात पडताळणी विभागामध्ये विशेष करुन अडवली जातात. यामध्ये दि.17.12.2009 सालचे एका विद्यार्थ्याचे प्रकरण प्रलंबित आहे. वैधता प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिले नाही तर आपली ॲडमिशन रद्द करण्यात येईल अशी सूचना कॉलेजने त्या विद्यार्थ्याला केलेली आहे. जात पडताळणीच्या संदर्भात विद्यार्थ्याने अर्ज दिल्यानंतर ठराविक मुदतीत विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र मिळाले पाहिजे. त्यामुळे मंत्री महोदयांना मी विचारु इच्छितो की, विद्यार्थ्यांना जात वैधता प्रमाणपत्र ठराविक मुदतीत उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे काय ?

श्री. राजेश टोपे : सभापती महोदय, आदिवासी विकास मंत्री, सामाजिक न्याय मंत्र्याच्या अखत्यारीतील हा विषय आहे. या दोन्ही मंत्री महोदयांचा त्यांच्या विभागाच्या दृष्टिकोनातून जास्त आग्रह होता. हा मोठा व्हयूज कॉन्टम असल्यामुळे हे काम सक्षमपणे करण्याच्या संदर्भातील 100 टक्के खात्री त्यांनी दिलेली आहे. त्यामुळे कोणत्याही परिस्थितीत यंत्रणा वाढवू, सगळया गोष्टी करु परंतु हे काम करुन देण्याचा विश्वास त्यांनी दिलेला आहे. त्यामुळे मी सुध्दा सभागृहाची भावना लक्षात घेऊन याच आठवडयात दोन्ही मंत्री महोदयांबरोबर एक बैठक घेऊन, यंत्रणे मार्फत सगळी प्रकरणे निकाली निघण्याच्या संदर्भातील सूचना निश्चितपणे दिल्या जातील.

उप सभापती : आजच्या कार्यक्रम पत्रिकेमध्ये दर्शवलेला कालचा प्रश्नोत्तराचा तास आता संपलेला आहे. आजचे नियमित कामकाज 11.15 वाजता पुन: सुरु होईल.

(सभागृहाची बैठक 11 वाजून 2 मिनिटांनी 11.15 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(स्थगिती नंतर)

सभापती स्थानी माननीय सभापती

वाढदिवसानिमित्त अभिष्टचिंतन

डॉ.पंतगराव कदम : सभापती महोदय, माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांचा आज वाढदिवस आहे. त्यांना आपण सभागृहाच्या वतीने शुभेच्छा देऊ या.

सभापती : माननीय मंत्री श्री.शिवाजीराव मोघे यांच्या आज वाढदिवस असल्याने मी त्यांना माझ्या व सभागृहाच्या वतीने वाढदिवसाच्या शुभेच्छा देतो.

(श्री.शिवाजीराव मोघे उभे राहून अभिवादन करतात.)

कालच्या दोन व आजची एक अशा तीन नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावाच्या सूचना विचारात घेतल्या जातील. आता मी प्रश्नोत्तराला सुरूवात करतो.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: तोंडी उत्तरे.

संपूर्ण राज्यात दुष्काळ जाहीर करण्यासंदर्भात

(1) * 25799 श्री.विनोद तावडे , श्री.चंद्रकांत पाटील , श्रीमती शोभाताई फडणवीस , श्री.केशवराव मानकर : सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील

काय :-

(1) संपूर्ण राज्यावर दुष्काळाची छाया असताना नाशिक व पुणे विभागातील 1744 गावांसह एकूण 1767 गावांमध्येच दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, संपूर्ण विदर्भ, मराठवाडा, कोकण या भागातील शेतकरी दिनांक 15 सप्टेंबर नंतर पाऊस न पडल्याने व उत्पादन खर्च वाढल्याने अडचणीत आला आहे, हे खरे आहे काय,

(3) असल्यास, संपूर्ण महाराष्ट्रातील शेतकऱ्यांची दयनिय अवस्था असताना केवळ 1767 गावांमध्येच दुष्काळ जाहीर केल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष पसरला आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, त्या अनुषंगाने शासनाकडून कोणती कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ?

श्री.प्रकाश सोळंके, डॉ.पंतगराव कदम यांच्याकरिता : (1) होय, नाशिक व पुणे विभागात 1777 गावांमध्ये खरीप हंगामातील अंतिम पैसेवारीमध्ये 50 पैशापेक्षा कमी पैसेवारी असल्याचे आढळून आले आहेत.

(2) व (3) राज्यातील एकूण खरीप गावांपैकी 6201 व रब्बी मधील 1231 गावांमध्ये 50% पेक्षा कमी पैसेवारी आढळून आल्याने या गावांना टंचाईग्रस्त गावे जाहीर करण्यात आली असून, या गावांकरिता आवश्यक त्या सवलती व उपाययोजना जाहीर करण्यात आल्या आहेत.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

सभापती महोदय, या प्रश्नाच्या उत्तरात मला आपल्या परवानगीने पुढील सुधारणा करावयाची आहे.

लेखी उत्तराच्या (2) व (3) मधील पहिल्या ओळीमध्ये राज्यातील एकूण खरीप गावांपैकी 6201 व रब्बी मधील 1231 गावांमध्ये असे नमूद करण्यात आले आहे. यातील "**1231**" ऐवजी "**1552**" असे वाचावे. बाकीचे उत्तर छापल्याप्रमाणे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.चंद्रकांत पाटील : सभापती महोदय, संपूर्ण महाराष्ट्रात आणि त्याही पेक्षा विदर्भ, मराठवाड्यात प्रचंड दुष्काळी परिस्थिती आहे. विदर्भातील वाशिम, यवतमाळ, अकोला, वर्धा,भंडारा, चंद्रपूर येथे कापूस, सोयाबीन आणि धान पिकाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर कमी झाले आहे. विदर्भातील वाशिम, यवतमाळ, अकोला, वर्धा,भंडारा, चंद्रपूर या जिल्ह्यातील एकही गाव दुष्काळी म्हणून घोषित केले नाही हे खरे आहे काय, असल्यास, त्याचे कारण काय आहे ? माननीय महसूल मंत्र्यांच्या नगर जिल्ह्यामध्ये 431 गावांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे, तर माननीय मंत्री डॉ.पतंगराव कदम यांच्या सांगली जिल्ह्यामध्ये 340 गावांमध्ये दुष्काळ जाहीर करण्यात आला आहे. या दोन जिल्ह्यांतील गावांमध्ये दुष्काळ जाहीर करण्याचे कारण काय आहे ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, लेखी उत्तरात नमूद करण्यात आले आहे की, 6201 गावांमध्ये 50 टक्क्यांपेक्षा कमी पैसेवारी आली आहे. नागपूर विभागामध्ये 7799 गावांपैकी 1662 गावे आणि अमरावती विभागामध्ये 7351 पैकी 2728 गावे आपण टंचाईग्रस्त म्हणून घोषित केली आहेत. त्यामुळे सन्माननीय सदस्य म्हणतात तशी परिस्थिती नाही. या दोन्ही विभागांमध्ये मिळून जवळ जवळ 4500 गावे टंचाईग्रस्त म्हणून जाहीर करण्यात आली आहेत.

श्रीमती शोभाताई फडणवीस : सभापती महोदय, नोव्हेंबर महिन्यामध्ये अवकाळी पाऊस झाल्यामुळे दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी आम्ही डिसेंबर महिन्यामध्ये केली होती. नोव्हेंबर मध्ये प्रचंड पाऊस झाला होता. त्यामुळे उभे पीक आडवे झाले होते. त्यावेळी वाद घालून आम्ही हा प्रश्न उपस्थित केला होता.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25799 . . . .

श्रीमती शोभा फडणवीस . . . .

तेव्हा सांगितले की, दुष्काळाच्या बाबतीत आम्ही फेर चौकशी करुन मदत करु. परंतु याठिकाणी नागपूर विभागातील ज्या गावांमध्ये आपण दुष्काळ जाहीर केलेला आहे, ती गडचिरोली, चंद्रपूर या विभागातील गावे नाहीत. 50 टक्के धानाचे पीक घेणारी गावे आहेत. तेथे 50 टक्क्याच्या वर म्हणजे 51 टक्के उत्पादन दाखविण्यात आले आहे, पण तसे प्रत्यक्षात झालेले नाही. आम्ही असे सांगितले होते की, आता धानाची कापणी झालेली आहे. त्यामुळे तुम्ही याठिकाणी फेर सर्व्हे करु शकत नाही. त्यामुळे सरसकट मदत देण्यात यावी अशी सर्वांची मागणी होती. परंतु ही आणेवारी अवकाळी पावसाच्या अगोदर काढण्यात आली होती. त्या आणेवारीच्या भरवशावर 50 टक्क्याच्या वर उत्पादन झाल्याचे दाखवून विदर्भावर अन्याय केलेला आहे. आम्ही या गोष्टी वारंवार मांडत आहोत. नाशिक, पुणे येथे 70 टक्के इरिगेशन आहे, तेथे सरकार दुष्काळ जाहीर करते आणि आमच्या भागामध्ये 16 टक्के इरिगेशन आहे, तेथे दुष्काळी परिस्थिती आहे आणि तेथील शेतकरी आत्महत्या करीत आहेत. परंतु त्याठिकाणी मात्र दुष्काळ जाहीर करीत नाही म्हणून मदत देता येणार नाही अशा प्रकारे विदर्भावर हा प्रचंड अन्याय होत आहे. त्यामुळे फेर सर्व्हे करण्याच्या बाबतीत शासन विचार करणार आहे काय ? तसेच ज्या गावांमध्ये 50 टक्के आणेवारी दाखविलेली आहे, ती अवकाळी पावसाच्या अगोदरची असून याबाबतीत मी तुम्हाला चॅलेंज करु शकते. कारण त्याठिकाणी आम्ही परिस्थिती . . ..

सभापती : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी प्रश्न विचारावा.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, माझा प्रश्न असा आहे की, त्याठिकाणी आणेवारी काढण्यासारखी परिस्थिती नव्हती. त्यामुळे तेथे सरसकट दुष्काळ जाहीर करावा अशाच प्रकारची मागणी होती आणि त्यावेळी सन्माननीय मंत्री महोदयांनीही कबूली दिली होती. म्हणून आता पुन्हा एकदा या सगळया गावांचा विचार करुन आम्हाला मदत करणार आहात काय ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, याठिकाणी पैसेवारी जाहीर करण्याच्या ज्या विभागवार तारखा आहेत. त्यामध्ये हंगामी पैसेवारी नागपूर आणि अमरावती साठी 30 सप्टेंबरला जाहीर करतो. सुधारित हंगामी पैसेवारी 15 नोव्हेंबरला आणि अंतिम 15 जानेवारी रोजी जाहीर करतो. त्यामुळे अंतिम पैसेवारी . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, ...

सभापती : आपण प्रथम माननीय मंत्री महोदयांचे उत्तर ऐकून घ्यावे.

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी उत्तर ऐकून घ्यावे आणि मग जर काही प्रश्न असतील ते विचारावेत. अंतिम पैसेवारी ही 15 जानेवारी रोजी जाहीर होते. त्यामुळे सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांचे म्हणणे आहे की, अवकाळी पावसाच्या अगोदर आणेवारी झालेली आहे, पण ते खरे नाही. आपण 15 जानेवारीला अंतिम पैसेवारी जाहीर केलेली आहे.

श्री एस. क्यू. जमा : सभापति महोदय, विदर्भ के बारे में उन्होंने कहा कि नागपुर विभाग में और अमरावती विभाग में बहुत सारे गांवों को उन्होंने पानी टंचाई की वजह से दुष्कालग्रस्त घोषित किया है.

मेरे दो प्रश्न बहुत महत्वपूर्ण हैं. पहला प्रश्न यह कि विदर्भ के 6 जिलों में सभी उपाय करने के बाद भी किसानों की आत्महत्याएं रुक नहीं रहीं हैं, बल्कि आत्महत्याओं की संख्या लगातार बढ़ रही है. मेरा कहना है कि इन छह जिलों के गांवों के लिए आणेवारी निकालने का जो पुराना तरीका है, उसमें सरकार कोई बदल करने वाली या नहीं ?

मेरा दूसरा प्रश्न यह है कि क्राप बीमा योजना के लिए या ज्यादा बारिश हो गयी उसके लिए या सूखा पड़ गया उसके लिए कृषि उत्पन्न निकालने का जो तरीका है, उस संबंध में आप कोई नया तरीका अपनाएंगे या नहीं. मेरा पहला प्रश्न उन 6 जिलों के बारे में है जहां पर किसान आत्महत्या कर रहे हैं. इसके अलावा मेरा एक जनरल प्रश्न यह है कि आणेवारी निकालने के जो अलग-अलग तरीके हैं, उसमें आप कोई समानता लायेंगे या नहीं. यानी मेरा प्रश्न है कि क्या उस तरीके में कोई बदलाव आप करेंगे ?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, अध्यक्ष महाराज, या संदर्भात सन्माननीय सदस्यांनी असा प्रश्न उपस्थित केला की, विदर्भातील आत्महत्याग्रस्त जिल्हे आहेत, त्याबाबतीत पीक पैसेवारी काढण्याच्या पध्दतीमध्ये बदल करणार आहात काय ? तर याबाबतीत त्यांनी निश्चितपणे काही सूचना केल्या तर त्यांचा शासन जरुर विचार करील.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25799 .

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय हे काय सांगत आहेत ? माननीय श्री.विलासराव देशमुख मुख्यमंत्री असताना त्यांनी जाहीर केले होते की, जर आणेवारी चुकीच्या पध्दतीने झाली असेल तर सरकार त्याचा विचार करुन आता आणेवारी बदलण्यात येईल. या गोष्टीला पाच वर्षे झाली आहेत आणि आता पाच वर्षानंतर सरकार आम्हालाच सांगत आहे की, तुम्ही सूचना करा. सरकार झोपा काढीत आहे काय ? ही काळाची गरज आहे आणि सरकारनेच याबाबत धोरण ठरवावयाचे असते. पण याबाबतीत विरोधकांना विचारीत आहेत आणि आम्ही याबाबत सांगितल्यानंतरही सरकार करीत नाही मग वरुन असे म्हटले जाते की, विरोधक काय करीत आहेत म्हणजे तुमचा नाकर्तेपणा आमच्या डोक्यावर कशा साठी लादत आहात? त्यामुळे याबाबतीत सरकार काय करणार आह ते सांगावे.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25799...

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, हा नाकर्तेपणाचा प्रश्न नाही. आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांसाठी आणेवारीची पध्दत बदलणार काय असा सन्माननीय सदस्यांनी प्रश्न विचारला होता. त्यावर मी उत्तर दिले की, आपल्या सूचनेचा जरुर विचार करण्यात येईल. सजेशन फॉर ॲक्शन असे माझे उत्तर आहे.

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती : मी सन्माननीय राज्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, पैसेवारी किंवा आणेवारीच्या विद्यमान पध्दती बाबत लोकप्रतिनिधींनी अनेक वेळा अनेक माध्यमातून सरकारचे लक्ष वेधण्याचा प्रयत्न केलेला आहे. ही पध्दती निकोप होण्याच्या दृष्टीने त्यामध्ये काही दुरुस्ती करता येईल काय असा सन्माननीय सदस्यांचा प्रश्न आहे. त्या अनुषंगाने मंत्री महोदयांनी उत्तर द्यावे.

डॉ.पतंगराव कदम : सभापती महोदय, आणेवारी संबंधी प्रश्न आहे. आत्महत्याग्रस्त जिल्ह्यांसाठी वेगळी आणेवारी लावावी अशी सन्माननीय सदस्यांची मागणी आहे. या संदर्भात मागील 50 वर्षात अनेक समित्या नेमण्यात आल्या. परंतु त्यातून चांगले निष्कर्ष बाहेर आले नाहीत. सन्माननीय सदस्यांनी केलेली मागणी योग्य आहे. या जिल्ह्यासाठी स्पेशल आणेवारी पध्दत... (अडथळा) आणेवारीची पध्दत सर्व राज्यांत आहे. आणेवारीची सध्याची पध्दती बदलण्यासाठी अनेक समित्या झाल्या. परंतु त्यातून अंतिम उत्तर आलेले नाही. तेव्हा पुन्हा एकदा आणेवारी पध्दतीबाबत फेरतपासणी करण्यात येईल.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, प्रत्येक अधिवेशनात दुष्काळा संदर्भात चर्चा होते. महाराष्ट्रातील अनेक तालुक्यांमध्ये सातत्याने दुष्काळ पडतो त्याला अनेक कारणे आहेत. सिंचनाचा अभाव हे एक त्यातील महत्वाचे कारण आहे. अनेक जिल्ह्यांमध्ये पिण्याच्या पाण्याचा दुष्काळ असतो. दुष्काळी तालुक्यांतील दुष्काळ निवारण्यासाठी सभागृहात अनेकवेळा चर्चा झालेली आहे. दुष्काळ निवारण्यासाठी उर्वरित महाराष्ट्रासाठी महामंडळ नेमण्याची सन्माननीय सदस्यांकडून सातत्याने मागणी होत आहे. तेव्हा याबाबत शासन केव्हा निर्णय घेणार आहे ?

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25799...

डॉ.पंतगराव कदम : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी धोरणात्मक प्रश्न विचारलेला आहे. या संदर्भात सभागृहात आणि सभागृहाच्या बाहेर अनेकवेळा घोषणा झाल्या. परंतु प्रत्यक्षात हे महामंडळ अस्तित्वात आलेले नाही.

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, ज्या गावामध्ये टंचाईग्रस्त परिस्थिती जाहीर करण्यात येते तेथे जनावरांना देखील चारा द्यावा असा जी.आर.मध्ये उल्लेख आहे. सहकारी संस्थांकडे चारा वाटप दिलेले आहे. कवठेमहाकाळ हा कायम स्वरुपी दुष्काळी तालुका आहे. तेथे आता पिण्याच्या पाण्यासाठी टँकर सुरु आहे. मागील पंधरा दिवसांपूर्वी कवठेमहाकाळ तहसील कार्यालयासमोर लोक उपोषणास बसले होते. हे चार हजार लोकवस्तीचे गाव आहे. परंतु जी.आर.नुसार गावातील फक्त तीन लोकांची निवड झालेली आहे. शासनाने काढलेल्या जी.आर मधील अटींमुळे टंचाईग्रस्त गावात चारा वाटप होत नाही. शेकड्यासाठी अडीच हजार रुपये दर आहे. त्यामुळे कोणत्याही सहकारी संस्था चारा वाटपासाठी पुढे येत नाहीत. तेव्हा ज्या ठिकाणी सहकारी संस्था चारा वाटपासाठी पुढे येत नाहीत त्या ठिकाणी शासना मार्फत चारा वाटप करण्यात येईल काय ? तसेच जी.आर.मधील अटींमुळे गावांना लाभ मिळत नाही, तेव्हा त्यामध्ये दुरुस्ती करणार काय ?

डॉ.पंतगराव कदम : सभापती महोदय, या संदर्भात दोन जी.आर. आहेत. जे अतिशय गरीब लोक आहेत, दारिद्र्य रेषेखालील आहेत, ज्या ठिकाणी पाण्याची अजिबात सोय नाही, बागायकती शेती नाही त्यांना 10 टक्के पैसे भरुन 90 टक्के शासन सबसिडी देते. इतरांना 25 टक्के त्यांचे आणि 75 टक्के शासनाचे या प्रमाणे सबसिडी मिळते. जे डेअरीमध्ये दूध घालतात त्यांना सबसिडी द्यायची की नाही याबाबत सुरुवातीच्या जी.आर.मध्ये कन्फ्युजन झाले होते. कमर्शिअल डेअरी चालविणाऱ्यांना यातून वगळलेले होते. परंतु ज्यांच्याकडे पाच जनावरे असतील मग ती दुभती असो वा कोणतीही असो त्यांना चारा देण्याचे सुधारित आदेश शासनाने काढलेले आहेत.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, पहिल्या खरीप हंगामातील धानाच्या आणेवारीचे प्लॉट ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात पाडले जातात.

यानंतर कु.थोरात..

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25799....

श्रीमती शोभा फडणवीस....

खरीप आणि रब्बी हंगामाची आणेवारी एकत्रितपणे डिसेंबरमध्ये घोषित करण्यात येते. या संदर्भात फेर चौकशी करण्यात येईल काय या प्रश्नाला 'होय' असे उत्तर देण्यात आले होते त्याप्रमाणे डिसेंबरमध्ये पुन्हा चौकशी केली आणि पुन्हा जुनीच आणेवारी कळवून विदर्भावर अन्याय केलेला आहे. याबाबत शासन पुन्हा फेर विचार करणार आहे का?

श्री. प्रकाश सोळंके :सभापती महोदय, खरीप हंगामाची अंतिम आणेवारी 15 जानेवारीला जाहीर करण्यात येते आणि रब्बी हंगामाची अंतिम आणेवारी 15 मार्च रोजी जाहीर करण्यात येते त्यामुळे खरीप व रब्बी हंगामाची आणेवारी एकाच तारखेला जाहीर करण्यात येते असे म्हणणे संयुक्तिक होणार नाही.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

केज (जि.बीड) येथील जिल्हापरिषद बांधकाम उपविभागांतर्गत उपअभियंता व शाखा अभियंता यांनी केलेला भ्रष्टाचार

(2) * 25750 श्री.विनायकराव मेटे, ॲड.उषाताई दराडे , श्री.विक्रम काळे , श्री.रमेश शेंडगे : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) बीड जिल्ह्यातील केज येथील जिल्हा परिषद बांधकाम उपविभागांतर्गत तत्कालीन उपअभियंता व शाखा अभियंता यांनी विडा-युसुफ वडगाव व असरडोह या तीन जिल्हा परिषद सर्कल मधील विविध गावातून करण्यात आलेली 1 कोटी 25 लक्ष रुपयांची विविध कामे बोगस व निकृष्ट प्रतीची केल्याचे तसेच काही कामे न करताच निधी उचलून भ्रष्टाचार केल्याचे माहे डिसेंबर, 2011 च्या शेवटच्या सप्ताहात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(3) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व तद्नुसार सदर भ्रष्टाचार करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(4) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.जयंत पाटील : (1) सदरच्या कामाची चौकशी करण्याबाबतचे निवेदन तहसीलदार केज यांना प्राप्त झाले आहे.

(2) प्रश्न भाग-1 मधील कामाची तपासणी उप विभागीय अभियंता माजलगांव व अंबाजोगाई जिल्हा बीड यांचेमार्फत करण्यात आली आहे.

(3) व (4) सदरील कामे अंदाजपत्रकीय तरतुदीनुसार झालेली आहेत. सदरील कामात कोणत्याही प्रकारची अनियमितता आढळून आलेली नाही.

श्री. विनायक मेटे :सभापती महोदय, हा प्रश्न बीड जिल्हयातील केज तालुक्यातील जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या संदर्भात विचारण्यात आलेला आहे. जिल्हा परिषदेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून जी रस्त्यांची आणि त्यांच्या दुरुस्तीची कामे होत आहेत ती किती निकृष्ट आणि बोगस होत आहेत या संदर्भात संबंधित लोकांनी तक्रार केल्यानंतर या संबंधीची चौकशी करण्यात येईल, तपासणी करण्यात येईल असे आश्वासन देण्यात आले होते. त्यानंतर समकक्ष अधिकारी नेमून थातूर-मातूर चौकशीचे नाटक करण्यात आले आणि या चौकशीतून काहीही निष्पन्न झालेले नाही असे सांगण्यात आलेले आहे हा सर्व बोगसपणा आहे. एवढेच नाही तर या व्यतिरिक्त नांदूरघाट सर्कल या ठिकाणीसुध्दा लाखो रुपयांची बोगस कामे झालेली आहेत. एकूणच केज तालुक्यातील सर्व कामांची वरिष्ठ अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करण्यात येईल काय?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, नाही.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25750...

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, केज तालुक्यातील अनेक ठिकाणच्या रस्त्यांची आणि कामांची नावे तसेच त्यावर झालेला खर्च ही सर्व माहिती मी आपल्या मार्फत मंत्री महोदयांना देऊ शकतो. त्या ठिकाणची सर्व कामे बोगस झालेली आहेत. असे असताना या कामांची चौकशी करण्याच्या बाबतीत शासनाची काय अडचण आहे?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, या प्रश्नाच्या संदर्भात बाहेरचे दोन उप अभियंते पाठवून तक्रारीची शहानिशा करण्यात आली. त्यामधील तीन पूल, स्मशान भूमीच्या कम्पाऊण्ड वॉलचे एक बांधकाम, सभागृहाची दोन बांधकामे, रस्त्यांच्या दुरुस्तीची आणि सिमेंट कॉक्रींटची बऱ्याच रस्त्यांची कामे, अशी वेगवेगळी कामे आहेत. मनसे या संघटनेने तहसीलदारांकडे तक्रार केली होती. तहसीलदारांनी ती संबंधित विभागाला कळविली होती. त्यानंतर दुसऱ्या भागातील दोन इंजिनियर पाठवून ज्या कामांची तक्रार आहे ती कामे तपासण्यात आली. ग्राम पंचायतीच्या सरपंचानी ही कामे समाधानकारक झालेली आहेत असे सर्टिफाय केलेले दाखले माझ्याकडे आहेत. त्यामुळे या कामांबद्दल त्या ग्राम पंचायतीची तक्रार नाही. तथापि माझ्याकडे मनसे नावाच्या संघटनेचे बीड जिल्ह्याचे संघटक श्री. सुमंत धस यांनी "विविध कामाची चौकशी करणे बाबत" कार्यकारी अभियंत्यांना पाठविलेले एक पत्र आहे. त्या पत्रामध्ये असे म्हटले आहे की, "उपरोक्त विषयी सविनय कळविण्यात येते की, मौजे जाधव-जवळा येथील सिमेंट रस्त्याच्या कामाची मी स्वत: पाहणी केलेली आहे त्यामुळे जाधव-जवळा वगळून इतर कामाची चौकशी माझ्या समक्ष करावी, ही विनंती."

यानंतर श्री. बरवड....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25750..... श्री. जयंत पाटील ....

माझा मुद्दा असा आहे की, 12 कामांच्या तक्रारी करावयाच्या आणि त्यातील कोणी तरी एखाद्याने येऊन आपले समाधान केले की उरलेल्या 11 कामांचीच तपासणी करा, हे काम वगळा असे म्हणावयाचे हा व्यवहार महाराष्ट्रामध्ये थोडासा चालू आहे असे दिसते. तालुक्याच्या सगळ्या कामांची चौकशी करावयाची म्हटली तर शासनाला चौकशीशिवाय दुसरे कामच राहणार नाही. म्हणून सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांनी स्पेसिफिक कामे सांगितली तर ती स्पेसिफिक क्वॉलिटी कंट्रोलकडे पाठवून तपासणी करुन त्यामध्ये दोष असेल तर दोषी लोकांना घरी पाठविण्यात येईल्.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरातून असे आले की, मनसे नावाच्या संघटनेने तक्रार केली. ती तक्रार माननीय मंत्री महोदयांनी वाचून दाखविली. राष्ट्रवादी आणि मनसे यांचे जे काही मनोमिलन झाले त्यांच्या अंतर्गत सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे यांच्या प्रश्नाला माननीय मंत्री महोदय उत्तर देत आहेत का ?

श्री. जयंत पाटील : सभापती महोदय, महाराष्ट्र नवनिर्माण सेना नावाच्या संघटनेच्या बीड जिल्ह्याच्या संघटकाने हे पत्र दिलेले आहे. सन्माननीय सदस्य श्री. विनायक मेटे साहेबांनी मेरीटवर प्रश्न विचारलेला आहे असे गृहीत धरुन मी उत्तर दिलेले आहे. सभागृहाच्या बाहेर कोणाचे काय मनोमिलन झाले याचा कामाच्या क्वालिटीशी कोणताही संबंध येत नाही हे सन्माननीय सदस्यांनी लक्षात घ्यावे.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ KTG/ KGS/

खारभूमीचे बंधारे बांधण्याकरिता पर्यावरण मंत्रालयाचे दाखले घेण्याची अट सिंधुदुर्ग जिल्हाधिकाऱ्यांनी घातल्याबाबत

(३) * २५५०० *श्री.परशुराम उपरकर , डॉ.दिपक सावंत , श्री.रामदास कदम* : सन्माननीय ***खार जमिनी मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खारभूमीचे बंधारे बांधण्याकरिता पर्यावरण मंत्रालयाचे दाखले घेण्याची अट सिंधुदुर्ग जिल्हाधिकाऱ्यांनी घातली आहे, हे खरे आहे काय,

(२) वरील अटीमुळे गतवर्षी एकही खारभूमीच्या विकासाचे काम सुरु होऊ शकले नाही, हे खरे आहे काय,

(३) खारभूमीचे विकासाचे वेंगुर्ले येथील दतद मानस रेगी मानस हे बंधारे रोजगार हमीतून बांधलेले असून त्यांना दुरुस्ती करण्याकरिता शासनाकडून तरतूद केली जाणार आहे काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) सदर बंधारे दतद मानस, रेगी मानस, नसून दत्तमानस, रेगेमानस या नावाने संबोधले जातात. हे बंधारे रोजगार हमीतून बांधलेले नसून शेतकऱ्यांनी स्वत: बांधलेले आहेत. त्यामुळे त्यांच्या दुरुस्तीची कामे करण्याकरिता शासनाकडून तरतूद करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

सभापती महोदय, छापील उत्तरामध्ये मला आपल्या अनुमतीने थोडी दुरुस्ती करावयाची आहे. प्रश्न क्रमांक 1 च्या उत्तरामध्ये नाही असे म्हटले आहे त्याच्या पुढे "तथापि खारभूमी बंधारे बांधण्याकरिता पर्यावरण मंत्रालयाचे ना हरकत दाखले घ्यावे लागतात" असे वाचावे तसेच दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये "प्रश्न उद्‌भवत नाही" या ऐवजी "हे खरे नाही" असे वाचावे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, या ठिकाणी या वर्षापासूनच पर्यावरण मंत्रालयाचे दाखले घेण्याची पध्दत चालू करण्याचे कारण काय ? त्या ठिकाणी या वर्षी किती कामे सुरु झाली आणि त्यासाठी किती निधी उपलब्ध झाला ? सिंधुदुर्ग जिल्ह्यातील असे जे खारभूमी बंधारे आहेत, जे रोजगार हमी योजनेतून बांधले गेले आहेत त्यांच्या दुरुस्तीसाठी निधी मिळत नाही. तो निधी मिळणार का ? रेगे मानस हा जो बंधारा आहे तेथील लोकांची अशी मागणी आहे की, तेथील जमीन खारभूमी होत आहे त्यातून वाचविण्याकरिता या बंधाऱ्याची दुरुस्ती व्हावी. 20 वर्षापासून हा बंधारा बांधलेला आहे. त्याची दुरुस्ती शासन करणार का ?

श्री. बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, पर्यावरण विभागाची ना हरकत लागणे हे या वर्षीपासूनच लागू आहे असे नाही. असे 575 प्रकल्प जे 50 हजार हेक्टर क्षेत्र पुनर्प्रापित करतील

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25500..... श्री. बाळासाहेब थोरात ....

अशा प्रकारचे होते त्यासाठी 1991 मध्येच आपल्याला मान्यता मिळाली. त्यामध्ये पर्यावरण विभागाचे ना हरकत दाखले घेतले. परंतु त्यामध्ये नंतर आपल्याला काही बदल करावे लागले किंवा काही क्षेत्र वाढले. मी आपल्याला संपूर्ण कोकण किनारपट्टीच्या बाबतीत सांगत आहे. पाहिजे तर सन्माननीय सदस्यांना त्यांच्या जिल्ह्याच्या बाबतीत सांगता येईल. यामध्ये 32 आणि 1345 बंधाऱ्यांच्या बाबतीत परत आपण पर्यावरण विभागाकडे पाठवित आहोत आणि त्यामध्ये फार वेळ लागेल असे नाही. मी त्याबाबत बैठका घेतलेल्या आहेत. दोन महिन्यांमध्ये पर्यावरण विभागाचे ना हरकत दाखले मिळू शकतील अशी परिस्थिती आहे. दुरुस्ती हा एक विषय खारभूमी बंधाऱ्यांच्या संदर्भात मोठा प्रश्न आहे हे मी नाकारत नाही. त्याकरिता पुरेसा निधी मिळावा यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. सन्माननीय सदस्यांनी प्रश्नामध्ये दत्त मानस आणि रेगे मानस या दोन बंधाऱ्यांच्या दुरुस्तीची मागणी केलेली आहे. त्या ठिकाणी विशेषत: रस्त्याचा प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. कारण त्यावरुन रस्ता आहे. त्या बाबतीत कशा पध्दतीने उपाययोजना करता येईल याचा विचार केला जाईल.

श्री. राजन तेली : सभापती महोदय, या खार बंधाऱ्यांसाठी पर्यावरणाची हरकत ही फार चुकीची आहे. कारण त्या ठिकाणी जे खारभूमी बंधारे घातले जातात ते शेतीची नासधूस होऊ नये, शेती फुकट जाऊ नये म्हणून घातले जातात. पर्यावरण खात्याने ही जी काही अट घातलेली आहे ती अट शासन रद्द करणार का ? उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, काही बंधारे खाजगी लोक करतात. खार बंधारे खाजगी लोक करत नाहीत. हे बंधारे खारभूमी विकास विभागाच्या माध्यमातूनच घेतले जातात. म्हणून ही अट काढण्याची शिफारस शासन करणार का ?

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25500.....

श्री.बाळासाहेब थोरात : सभापती महोदय, केंद्र सरकारच्या पर्यावरण विभागाच्या या अटी आहेत. नवीन बंधाऱ्यांसाठी पर्यावरण विभागाचे नियम लागू आहेत. केंद्र सरकारचा पर्यावरण विभाग आहे आणि राज्यामध्ये सुध्दा पर्यावरण विभाग आहे. राज्य शासनाला काही प्रमाणात परवानगी देण्याचे अधिकार आहेत. तसेच काही प्रमाणात केंद्र शासनाच्या पर्यावरण विभागाला अधिकार आहेत. काही ठिकाणी सीआरझेडमधील तरतुदींच्या अधीन राहून काही अटींवर परवानगी दिलेली आहे. ही वस्तुस्थिती आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी प्रथम बंधाऱ्यांसाठी पर्यावरण विभागाची परवानगी आवश्यक आहे की नाही ते स्पष्टपणे सांगावे. खाजगी लोक बंधारे बांधत नाहीत. शासनाच्या निधीतूनच हे बंधारे बांधलेले आहेत. पर्यावरण खात्याची बंधाऱ्यांसाठी अट आहे असे अधिकारी सांगत असतात. यातील वस्तुस्थिती काय आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : नवीन बंधाऱ्यांसाठी पर्यावरण खात्याची मान्यता घ्यावी लागते. हा प्रश्न दत्तमानस व रेगेमानस या मुख्य बंधाऱ्यांच्या नंतर काही बंधारे शेतकऱ्यांनी तयार केलेले आहेत. त्याच्या झडपांच्या वर रस्ता बांधण्यासाठी त्यांनी निधीची मागणी केलेली आहे. त्यासाठी मदत करु असे मी मघाशी सांगितले आहे.

श्रीमती अलका देसाई : सभापती महोदय, केंद्र सरकारच्या पर्यावरण खात्याने केवळ सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी ही अट घातली आहे की अन्य जिल्ह्यांना सुध्दा अट घातली आहे ?

श्री.बाळासाहेब थोरात : शासनाने 575 कि.मी.परिसरासाठी मास्टर प्लॅन तयार केलेला आहे तो संपूर्ण किनारपट्टीसाठी लागू आहे. राज्यातील 740 कि.मी.परिसरात किनारपट्टी आहे. त्या सगळ्या ठिकाणी हा कायदा लागू आहे. त्या ठिकाणी नवीन बंधारे बांधण्यासाठी पर्यावरण विभागाची मान्यता घ्यावी लागेल.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नवीन बंधारे बांधण्यासाठी पर्यावरण खात्याची परवानगी लागते. पण अनेक ठिकाणी जुने बंधारे आहेत. रायगड जिल्ह्यामध्ये मी स्वत: शेतकऱ्यांचे प्रबोधन केले असून रो.ह.यो.च्या माध्यमातून बंधारे बांधण्याची सुरुवात केलेली आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पर्यावरण खात्याशी संबंधित असलेल्या एनजीओज मुंबईत इंटरनेटच्या माध्यमातून या कामामध्ये कारण नसताना अडथळे आणत असतात. ज्या ठिकाणी तिवरांची झाडे आहेत त्या ठिकाणी 2-4 फूट खारे पाणी आले की त्यांची झपाट्याने वाढ होते. बंधारा फुटला की त्याची तातडीने दुरुस्ती करावी लागते. कारण त्यामुळे शेतीमध्ये पाणी जाऊन नुकसान होऊ शकते. म्हणून जुन्या बंधाऱ्यांसाठी पर्यावरण खात्याची गरज नाही अशा आशयाचे आदेश खालच्या स्तरावर शासन देईल काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : सन्माननीय सदस्यांसमवेत पर्यावरण विभागाच्या व महसूल अधिकाऱ्यांची एक बैठक घेऊन याबाबत योग्य तो निर्णय घेण्यात येईल.

श्री.परशुराम उपरकर : पर्यावरण खात्याची परवानगी मिळण्यास वेळ लागेल. परंतु दरम्यानच्या काळात शेतकऱ्यांची गरज म्हणून उपलब्ध असलेला निधी या बंधाऱ्यांच्या दुरुस्तीच्या कामासाठी वापरला जाईल काय ?

श्री.बाळासाहेब थोरात : बंधाऱ्यांच्या दुरुस्तीसाठी वेगळा निधी दिला जातो आणि नवीन कामासाठी वेगळा निधी दिला जातो. सध्या जो निधी उपलब्ध झालेला आहे, त्या निधीतून बंधाऱ्याची कामे घेण्यात येणार आहेत. कारण पावसाळयापूर्वी ही कामे करावी लागतात. त्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

जिल्हा परिषदांमध्ये कंत्राटी ग्रामसेवकांची भरती प्रकियाबाबत

(४) * २५३३८ *श्री.संजय केळकर , श्री.विनोद तावडे , श्री.रामनाथ मोते* : सन्माननीय ***ग्रामविकास मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषदांमध्ये कंत्राटी ग्रामसेवकांची भरती प्रक्रिया राबविण्यासाठी शासनाने कोणकोणते निकष निश्चित करण्यात आलेले आहेत,

(२) असल्यास, सदर निकषानुसार रायगड जिल्हा परिषदेत कंत्राटी ग्रामसेवक भरती प्रक्रिया राबविली आहे काय,

(३) असल्यास, रायगड जिल्हा परिषदेत शासनमान्य निकषाचे पालन न करता अपात्र उमेदवारास पात्र ठरवून परिषदेस बसण्याची संधी दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासन नियमाचा भंग करणाऱ्या रायगड जिल्हा परिषद अधिकाऱ्यांविरोधात कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, श्री.जयंत पाटील यांच्याकरिता : (१) ग्राम विकास व जलसंधारण विभाग, शासन अधिसूचना, दिनांक २५ ऑगस्ट, २०११ अन्वये कंत्राटी ग्रामसेवक पद भरतीसाठी शासनाने शैक्षणिक अर्हतेबाबत पुढील प्रमाणे निकष ठेवले आहेत.

उच्च माध्यमिक शाळा प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य अर्हता परीक्षेत किमान ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण किंवा शासनमान्य संस्थेची अभियांत्रिकी पदविका (तीन वर्षाचा अभ्यासक्रम) किंवा शासनमान्य संस्थेची समाज-कल्याणची पदवी (बी.एस.डब्लू) आणि संगणक हाताळणी / वापराबाबत माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित केलेल्या परीक्षा उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील.

किंवा

माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा किंवा तुल्य अर्हता आणि कृषि विषयाची पदविका दोन वर्षाचा कृषि पदविका अभ्यासक्रम धारण करीत असतील अशा उमेदवारांमधून नामनिर्देशनाद्वारे नेमणूक करण्यात येते.

(२) होय.

(३) नाही.

(४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, ग्रामसेवकांच्या भरतीसंबंधीचा हा प्रश्न आहे. ग्रामसेवकांच्या भरतीमध्ये प्रचंड अनियमितता व भ्रष्टाचार झालेला आहे. त्या ठिकाणी 50 तरुण दोन दिवस उपोषणाला बसले होते. मी त्यांची भेट घेऊन चौकशी केलेली आहे. या भरतीसाठी शासनाने दिनांक 1.9.2011 रोजी जाहिरात प्रसिध्द केली होती. त्यानंतर परीक्षेसाठी पात्र असलेल्या उमेदवाराची यादी प्रसिध्द करण्यात आली. त्यानंतर परीक्षा झाल्यावर दिनांक 25 ऑक्टोबर रोजी निकाल जाहीर करण्यात येईल असे सांगण्यात आले होते. पण त्या अवधीत निकाल जाहीर न करता डिसेंबर महिन्यात निकाल जाहीर करण्यात आला.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. संजय केळकर... ता.प्र.क्र.25338..

माझे दोन स्पेसिफिक प्रश्न आहेत. पात्र आणि अपात्र उमेदवारांच्या दोन याद्या तयार केलेल्या आहेत. 3625 उमेदवार पात्र झालेले आहेत तर 802 उमेदवार अपात्र झालेले आहेत. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, या दोन्ही याद्यांमध्ये ज्या उमेदवारांची नावे नाहीत अशा उमेदवारांना देखील मुलाखतीसाठी बोलावलेले आहे. आवश्यक ती शैक्षणिक अर्हता नसलेल्या उमेदवारांची देखील पात्र उमेदवारांच्या यादीत नावे आहेत. या भरती प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणावर अनियमितता आणि भ्रष्टाचार झालेला आहे. या बाबतीत माझे अधिका-यांशी जे बोलणे झाले त्यावरुन मला ही माहिती मिळालेली आहे. तेव्हा या भरती प्रक्रियेमध्ये ज्या अधिका-याने अनियमितता केली त्याच्यावर काय कारवाई करण्यात येणार आहे ? तसेच पात्र झालेल्या उमेदवारांची निवड केली जाणार आहे काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : कंत्राटी ग्राम सेवक पदासाठी 4 हजार उमेदवारांचे अर्ज आले होते त्यापैकी 3 हजार पात्र उमेदवारांची यादी जाहीर केली होती. ही यादी जाहीर केल्यानंतर अपात्र उमेदवारामधील 3 जणांची तक्रार आली होती. एकाचा एमएससीआयटीच्या प्रमाणपत्रामध्ये प्रॉब्लेम होता, एकाचा 12वीच्या मार्कशीटबाबत प्रॉब्लेम होता आणि एकाला तो बी.एससी (ॲग्री) असताना अपात्र करण्यात आले होते. या तिन्ही उमेदवारांच्या तक्रारी आल्यानंतर त्यांना पुन्हा परीक्षेला बसण्याची संधी दिली. भरती प्रक्रियेमध्ये उमेदवारांच्या लेखी परीक्षा घेतल्यानंतर मौखिक परीक्षा घेतली जाते. मौखिक परीक्षा घेतल्यानंतर 26 तारखेला अंतिम यादी जाहीर केलेली आहे.

श्री. संजय केळकर : अपात्र उमेदवारांना देखील मौखिक परीक्षेला बोलावलेले आहे...

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : माहितीच्या अधिकारामध्ये सर्व माहिती उपलब्ध असते. या भरती प्रक्रियेमध्ये कोणतीही अनियमितता झालेली नाही. तीन उमेदवारांच्या बाबतीत निश्चितपणे अडचण निर्माण झाली होती. या तिन्ही उमेदवारांना परीक्षेला बसण्याची संधी दिलेली आहे. त्यामुळे कोणत्याही उमेदवारावर अन्याय झालेला नाही.

श्री. जयंत प्र. पाटील : सन्माननीय सदस्य श्री. संजय केळकर यांनी भरती प्रक्रियेबाबत जे सांगितले ती वस्तुस्थिती आहे. भोसले नावाचे जे मुख्य कार्यकारी अधिकारी आहेत त्यांचा 25 ते 50 हजार रुपये प्रती सीट भाव आहे. या बाबतीत रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षांनी देखील

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तक्रार केली होती. माझे बंधू रायगड जिल्हा परिषदेचे अध्यक्ष आहेत. तेव्हा उमेदवारांची ही जी निवड केलेली आहे, ही निवड प्रक्रिया रद्द करण्यात येईल काय ? सभापती महोदय, आपण ग्राम विकास खात्याचे मंत्री होता. त्यावेळी मेरिट प्रमाणे उमेदवारांची भरती होत होती. आता ती पध्दत नाही. आता सर्व खात्यामध्ये होणा-या निवड प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार सुरु आहे. हे अधिकारी उमेदवारांना आमदारांचे पत्र घेऊन येण्यास सांगतात आणि नंतर ते अधिकारी आम्हाला सांगतात की पहा, तुम्ही पत्र दिल्याप्रमाणे उमेदवाराची निवड केलेली आहे. मला एवढेच सांगायचे आहे की, या निवड प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. तेव्हा पूर्वी मेरिट प्रमाणे उमेदवारांची निवड करण्याची जी पध्दत होती त्याप्रमाणे निवड करण्याचे अधिकार निवड समितीला देण्यात येतील काय ?

...नंतर श्री. भोगले....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, या परीक्षेच्या माध्यमातून जेवढी पारदर्शकता आणता येईल तेवढी आणण्याचा सातत्याने शासन प्रयत्न करीत आहे. ही यादी रद्द करणे शक्य होणार नाही. अन्यथा पुन्हा कोर्ट मॅटर होण्याची शक्यता आहे. ज्यांना नियुक्ती दिली ते हजर झाले आहेत. तीन तक्रार आल्या होत्या, उपोषणाला बसले होते त्या संदर्भातील खुलासा मी मागच्या उत्तरामध्ये केलेला आहे. विशिष्ट पुरावा दिला किंवा तक्रार दिली तर त्या अनुषंगाने चौकशी केली जाईल. एकूण 180 गुणांची परीक्षा आहे. ग्रामविकास खात्याच्या माध्यमातून पारदर्शक कारभार करण्याची भूमिका स्वीकारली आहे. महिन्याच्या तिसऱ्या शनिवारी सगळ्या फाईल्स क्लिअर झाल्या पाहिजेत अशा पध्दतीचा धोरणात्मक निर्णय ग्रामविकास खात्याने घेतला आहे. भविष्यात परीक्षेमध्ये ओरल परीक्षा असू नये या दृष्टीने निर्णय घेणार आहोत. परीक्षेच्या माध्यमातून संपूर्णपणे पारदर्शकता आणण्याचा खात्याचा प्रयत्न आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

परिविक्षाधीन कालावधीत भ्रष्टाचार करणाऱ्या आदिवासी विकास निरीक्षक यांचेवर कारवाई करण्यासंदर्भात

(५) * २६५६३ ***श्री.दिवाकर रावते , श्री.जगदीश गुप्ता*** : सन्माननीय ***आदिवासी विकास मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी विकास निरीक्षक श्री.ए.आर.पाटणे यांचेविरुध्द प्रशासन २००६/श्री.पाटणे/वि.चौ.का/का.१अ/५३७२, दिनांक १ नोव्हेंबर,२००७ अन्वये चौकशी अहवाल अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, अमरावती यांना सादर करण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या अहवालामध्ये लेखी परीक्षेचे पेपर तपासण्याचे काम चालू असताना श्री.पाटणे यांना पेपर तपासणीचे काम अधिकृतपणे दिले नसताना तपासण्याच्या ठिकाणी ते हजर होते व आसन क्रमांक १५००/०८९५ या पेपर मधील प्रश्न क्रमांक ५४, ५५, ५८, ५९, ६२ व ६५ या प्रश्नांची उत्तरे त्यांनी स्वहस्ताक्षरात लिहिल्याचे नमूद केले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, श्री.ए.आर.पाटणे आदिवासी विकास निरीक्षक यांच्या परिविक्षाधीन कालावधीत उपरोक्त प्रकार घडल्यामुळे त्यांना शासकीय सेवेतून बडतर्फ करणे गरजेचे असतांना अपर आयुक्त, श्री.वरवंटकर यांनी त्यांना अमरावती येथील मुख्यालयात घेऊन जबाबदारीची कामे दिलीत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, श्री.ए.आर.पाटणे आदिवासी विकास निरीक्षक यांना सेवेतून बडतर्फे करुन त्यांना चुकीच्या पध्दतीने संरक्षण देणाऱ्या श्री.वरवंटकर अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांच्यावर निलंबनाची कारवाई शासन करणार आहे काय ?

श्री.बबनराव पाचपुते: (१) व (२) होय,

श्री.पाटणे यांच्या गैरवर्तनाबाबत करण्यात आलेल्या चौकशीमध्ये ते दोषी असल्याचे आढळून आल्याने तत्कालीन अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती यांनी त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही करुन त्यांचे स्थानांतर प्रकल्प अधिकारी, पांढरकवडा या कार्यालयात केले होते.

(३) व (४)

श्री.पाटणे यांचा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प अधिकारी, पांढरकवडा कार्यालयातील ३ वर्षांचा पदावधी पूर्ण झाल्याने बदली अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांची बदली अपर आयुक्त, आदिवासी विकास, अमरावती येथील कार्यालयात करण्यात आलेली आहे. सदरहू कार्यवाही नियमानुसार करण्यात आली असल्याने याबाबत कारवाई करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

श्री.जगदीश गुप्ता : सभापती महोदय, श्री.पाटणे यांच्या भ्रष्टाचाराबद्दल व अनियमिततेबद्दल मागील दोन वर्षे सातत्याने सभागृहात मी प्रश्न उपस्थित केले होते. आपण स्वत: आदेश देऊनही त्यांच्यावर कोणतीही कारवाई होत नाही. मंत्री महोदय या अधिकाऱ्याला वाचविण्यासाठी त्याच्या मागे का उभे रहात आहेत? या अधिकाऱ्याची किमान बदली व्हावी अशी अपेक्षा आहे. मागील वेळी हा विषय सभागृहात उपस्थित झाला होता. सभापती महोदय, आपण स्वत: या प्रश्नामध्ये मंत्री

..३..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ KGS/

११:५०

ता.प्र.क्र.२६५६३..... श्री.जगदीश गुप्ता.....

महोदयांनी लक्ष घालावे असे सूचित केले होते. तरी देखील शासन त्यांची बदली करावयास तयार नाही. त्यांची बदली करण्यात येईल काय?

श्री.बबनराव पाचपुते : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य सांगतात तो प्रश्न या संदर्भात नाही. जे प्रश्न उपस्थित केले त्या संदर्भात मी सांगू इच्छितो की, श्री.पाटणे यांनी गैरव्यवहार केले त्या संदर्भात त्यांच्यावर कारवाई केल्यानंतर ते अपंग असल्यामुळे नैसर्गिक न्यायाप्रमाणे त्यांना सेवेत परत घेण्यात आले. त्यांची बदली केलेली होती. तीन वर्षे झाल्यानंतर त्यांची पुन्हा बदली केली गेली. त्यामध्ये गैर काही झालेले नाही. या संदर्भात ज्यांनी त्यांना सेवेत घेतले ते लिमये नावाचे अधिकारी आहेत. या संदर्भात कागदपत्रे सादर केल्यानंतर आठ दिवसात पुढील डी.ई. करण्याचे काम सुरु करु.

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

११:५०

देवरी येथील रहिवासी श्री उजागरसिंह भाटीया यांनी सदर जागा खरेदी केली असल्याचे सांगून टॅक्स लावण्यासंबंधी

(६) * २५४०० *श्री.केशवराव मानकर , श्री.पांडुरंग फुंडकर , श्री.संजय केळकर , श्री.जगदीश गुप्ता* : सन्माननीय ***ग्रामविकास मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ग्रामपंचायत देवरी (ता.देवरी, जि.गोंदिया) मधील दिनांक १७ जानेवारी, २००६ च्या ठराव क्रमांक ८/५ अन्वये श्री. दीपक जुगलकिशोर शर्मा यांचे घर क्रमांक १९२२ ची नमुना ८ मधील अ.क्र. २६४८ वर नोंद घेण्यात आली असून सन २००६-०७ पासून सदर प्लॉटचे घरटॅक्स सुद्धा ग्रामपंचायतीकडे भरण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, देवरी येथील रहिवासी श्री उजागरसिंह भाटीया यांनी सदर जागा खरेदी केली असल्याचे सांगून टॅक्स लावण्यासंबंधी ग्रामपंचायतीला दिनांक १० मार्च, २०११ ला दिलेल्या अर्जावर सरपंच, ग्रामपंचायत, देवरी यांनी दिनांक १४ मार्च, २०११ ला या अर्जानुसार दर्शविलेल्या जागेवर श्री दीपक शर्मा यांचे नावाने टॅक्स सुरू आहे, असा शेरा मारला आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, सरपंच व सचिव यांनी संगनमताने दिनांक २० ऑक्टोबर, २०१० च्या ठराव क्रमांक १२/१९/१ नुसार श्री उजागरसिंह भाटीया यांच्या टॅक्स लावण्यासंबंधीचा ठराव पारित करून ठरावात १२/१९ ऐवजी १२/१९/१ अशी सुधारणा करण्यात आली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांनी उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) जिल्हापरिषद गोंदिया यांचेकडे सदर प्रकरणात खोडतोड करून शासनाच्या नियमांचे उल्लंघन केल्याचे सिद्ध झाल्यासंबंधी अहवाल दिनांक २२ जून, २०११ अन्वये सादर करण्यात आला असून अद्याप जिल्हा प्रशासनाकडून सदर प्रकरणात सरपंच, सचिव व दोषींवर कार्यवाही करण्यात आली नाही, हे खरे आहे काय, असल्यास, शासनाने यासंबंधी कोणती कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील, श्री.जयंत पाटील यांच्याकरिता : (१) होय.

(२) होय.

(३) होय. सदर १२/१९/१ च्या ठरावामध्ये श्री.उजागरसिंह भाटिया यांचे नावाची नोंद घेण्यात आली आहे.

(४) विभागीय आयुक्त नागपूर, विभाग नागपूर यांचेकडून ग्रामपंचायत देवरीच्या सरपंच यांच्या विरुध्द मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ३९(१) अन्वये कारवाई करण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, देवरीच्या या महत्वाच्या प्रश्नाबद्दल मंत्री महोदयांनी पॉझिटिव्ह उत्तर दिले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो. या प्रश्नाला न्याय मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करतो. माझ्याकडे जी कागदपत्रे उपलब्ध आहेत त्यानुसार ठराव क्रमांक.१२/१९/१ ऐवजी ठराव क्रमांक १२/१९ असे उत्तरामध्ये नमूद करणे आवश्यक होते. रेकॉर्डमध्ये खाडाखोड करण्यात आली आहे. सचिवांनी शेऱ्यामध्ये लिहिले की, तलाठी यांचा अतिक्रमण नसल्याचा पुरावा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SGB/ KTG/ KGS/

११:५०

श्री.केशवराव मानकर..... ता.प्र.क्र.२५४००...

सोबत जोडलेला नाही. तरी ठराव मंजूर करण्यात आला आहे. उत्तर क्रमांक-३ मध्ये ठराव अवैध असल्याचे शासनाने मान्य केले आहे. त्यामुळे हा ठराव रद्द करण्यात येईल काय?

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ च्या कलम ३९(१) अन्वये कारवाई प्रस्तावित केली आहे असे उत्तरामध्ये म्हटले आहे. ग्रामपंचायतीच्या दहा सदस्यांनी १.८.२०११ रोजी आयुक्तांकडे अर्ज सादर केलेला होता. आयुक्तांनी या अर्जाबाबत जिल्हा परिषदेला पत्र पाठविले, त्याची चौकशी झाली. परंतु उप मुख्य कार्यकारी अधिकारी आणि मुख्य कार्यकारी अधिकारी यांना या प्रकरणाचा निपटारा करण्यासाठी वेळ नाही.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25400..... श्री. केशवराव मानकर .....

म्हणून शासन उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत) आणि मुख्य कार्यपालन अधिकारी यांनी जी गैरवर्तणूक केली त्यांच्यावर कारवाई करणार काय, तसेच अफरातफर करणारे सरपंच यांच्यावर कारवाई करणार काय, तसेच ग्रामसेवक यांना निलंबित करणार काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : महोदय, मी लेखी उत्तरातच ग्रामसेवक आणि सरपंचावर कारवाई प्रस्तावित केलेली आहे. तसेच मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे हे प्रकरण प्रलंबित असेल तर त्यांना त्वरित निर्णय घेण्याचे आदेश देण्यात येतील.

श्री. केशवराव मानकर : महोदय, ग्रामपंचायतीच्या 10 सदस्यांनी नियम 39 अन्वये कारवाई करण्याची विनंती केली असून आयुक्तांनी देखील तसा प्रस्ताव जिल्हा परिषदेकडे पाठविलेला आहे. त्यासाठी दोन दोन महिने तारखा सुध्दा दिल्या जात नाहीत. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडे वेळ नाही म्हणून सांगण्यात येते व ते म्हणतात की उप मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी तसा प्रस्ताव सादर करावा अशा प्रकारे टोलवाटोलवी केली जात आहे. म्हणून या लोकांना निलंबित करुन या प्रकरणाचा निकाल 15 दिवसात शासन देणार आहे काय ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी.पाटील : महोदय, निश्चितपणे या प्रकरणी एक महिन्याच्या आत निकाल देण्याच्या सूचना करण्यात येतील.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अमरावती जिल्हा आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित असलेल्या मागण्याबाबत

(7) * 25242 डॉ.रणजित पाटील , श्री.भगवान साळुंखे, श्री.नागो पुंडलिक गाणार, श्री.पांडुरंग फुंडकर : सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) अमरावती जिल्हा आश्रमशाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना कोणतेही शासकीय निवासस्थान न पुरविता कर्मचाऱ्यांच्या घरभाडे व वाहन भत्ता कपातीचे आदेश मागे घेऊन प्रलंबित ठेवण्यात आलेला पगार देयके त्वरित मंजूर करण्याबाबतचे निवेदन अमरावती जिल्हा आश्रमशाळा शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संघटना यांनी मा.विभागीय समाजकल्याण अधिकारी, अमरावती विभाग व विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी, अमरावती यांना दिनांक 26 डिसेंबर, 2011 रोजी देऊन मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, सदर मागणीवर शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(3) असल्यास, निर्णयाचे थोडक्यात स्वरूप काय आहे,

(4) अद्याप, निर्णय घेतला नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री. सचिन अहिर, श्री.शिवाजीराव मोघे यांच्याकरिता : (1) होय.

(2) प्रलंबित वेतन अदा करण्यात आलेले आहे.

(3) घरभाडे भत्ता व वाहन भत्ता कपात न करता वेतन अदा करण्यात आलेले आहे.

(4) प्रश्न उद्भवत नाही.

डॉ. रणजित पाटील : महोदय, ज्या विभागाचा हा प्रश्न आहे त्या विभागात चार-चार, पाच-पाच महिने कर्मचाऱ्यांचे पगार होत नाहीत. मंत्री महोदयांनी त्याला "होय" असे उत्तर दिलेले आहे. म्हणून ज्यांनी नियमबाह्य वेतन देयके परत करुन आर्थिक अन्याय केला आहे त्या अधिकाऱ्यांवर शासन काय कारवाई करणार आहे, त्याचबरोबर शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचा समान प्रश्न असा आहे की, काही जिल्ह्यांमध्ये या कर्मचाऱ्यांना कालबध्द पदोन्नती आणि वेतनश्रेणी मिळत आहे त्या धर्तीवर संपूर्ण राज्यात एका समान धोरणानुसार अशी कालबध्द पदोन्नती आणि वेतनश्रेणी शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनाही देण्यात येणार आहे काय ?

श्री. सचिन अहिर : महोदय, मुळात वेतन देण्याचा विषय असा होता की, या कर्मचाऱ्यांना कोणत्याही प्रकारे घरभाडे भत्ता व वाहन भत्ता कपात न करता वेतन देण्यात आलेले आहे. पूर्वी आश्रमशाळेच्या ठिकाणी वास्तव्य असल्याने असा भत्ता देण्याची भूमिका नव्हती पण आपण ही बाब समोर आणल्यानंतर तो देण्याचा प्रयत्न केला आहे. त्याचबरोबर इतर बाबतीत देखील व्हीजेएनटी

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता. प्र. क्र. 25242..... श्री. सचिन अहिर .....

आणि एससी च्या शाळांमध्ये समानता आणता येईल काय याचा विचार करता काही प्लॅनिंग आणि काही नॉन प्लॅनिंगचे विषय असतात त्यामुळे अशी एक वाक्यता आणता येणार नाही.

श्री. वसंतराव खोटरे : महोदय, राज्यात सामाजिक न्याय विभागामार्फत ज्या आश्रमशाळा चालविल्या जातात त्या शाळांमध्ये शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा एक तारखेला होत नाहीत. त्यांना वर्षातून केवळ तीन-चार वेळाच पगार मिळतो ही वस्तुस्थिती आहे काय, दुसरा प्रश्न असा आहे की, राज्यातील 22 हजार शाळांचे पगार जर 1 तारखेला होत असतील तर आश्रमशाळांतील पगार वर्षातून फक्त चार वेळा का होत आहेत, म्हणून हे पगार एक तारखेला ऑन लाईन करण्याचा शासनाचा विचार आहे काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : महोदय, राज्यात व्हीजेएनटीच्या 1171 शाळा असून त्यात 526 प्राथमिक शाळा आहेत, 296 माध्यमिक शाळा आहेत, 2 शाळा ऊस तोड कामगारांच्या मुलांसाठी आहेत, विद्या निकेतनची 1 शाळा आहे तर 346 कनिष्ठ महाविद्यालये आहेत. सन्माननीय सदस्यांनी या आश्रमशाळांमध्ये पगाराच्या संदर्भात तफावत असल्याची जी बाब निदर्शनास आणून दिली त्या अनुषंगाने मी सांगू इच्छितो की, आमच्या विभागाच्या एकूण ज्या आश्रमशाळा व वसतिगृहे आहेत त्यांचे पगार 1 तारखेलाच करण्यात येतील असा प्रयत्न शासन करेल.

श्री. रामनाथ मोते : महोदय, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या वेतनाचा हा प्रश्न असून एकूण या विभागाच्या ज्या आश्रमशाळा आणि वसतिगृहे आहेत त्यातील कर्मचाऱ्यांना कधीही वेळेवर वेतन मिळत नाही. आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्र. 11 "राज्यातील अनुदानित अनुसूचित जातीच्या आश्रमशाळांमधील शिक्षक कर्मचाऱ्यांना गेल्या अनेक महिन्यांपासून वेतन न मिळाल्याबाबत" तसेच प्रश्न क्र. 14 "बीड जिल्ह्यातील आश्रमशाळेतील शिक्षकांना माहे ऑक्टोबर, 2011 पासून वेतन मिळाले नसल्याबाबत" अशा दोन्ही प्रश्नांमध्ये हाच विषय आहे.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : 25242 .....

श्री. रामनाथ मोते.....

सभापती महोदय, या निमित्ताने मी शासनाकडून माहिती मिळवू इच्छितो की, जसे इतर विभागांमध्ये 1 तारखेला, 5 तारखेला, 10 तारखेला वेतन देण्याचा प्रयत्न केला जातो त्याच प्रमाणे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना 1 तारखेला वेतन देण्याच्या संदर्भात शासन धोरणात्मक निर्णय घेऊन उपाययोजना करणार आहे काय ?

श्री. शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, घरभाडे भत्ता व वाहन भत्त्यांमध्ये कपात करण्यात आलेली आहे असा प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. परंतु घरभाडे भत्ता व वाहन भत्त्यांमध्ये कपात केलेली नाही. सन्माननीय सदस्यांनी वेतन देण्याच्या संदर्भात जो प्रश्न उपस्थित केलेला आहे व त्यामध्ये जी काही इरेग्युलरिटी आहे ती दूर करुन शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना 1 तारखेला वेतन देण्याचा निश्चितपणे प्रयत्न केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आदिवासी उपयोजना क्षेत्रांतर्गत असलेल्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील शिक्षक शिक्षकेत्तरांना अनेक महिन्यापासून नियमित वेतन न मिळाल्याबद्दल

(८) * २६४०९ *श्री.रामनाथ मोते , श्री.विनोद तावडे , श्री.संजय केळकर , श्री.भगवान साळुंखे , श्री.नागो पुंडलिक गाणार* : सन्माननीय ***आदिवासी विकास मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदिवासी उपयोजना क्षेत्रातील शासनमान्य अनुदानित माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळांमधील अनेक शिक्षक शिक्षकेतरांना गेली अनेक महिने आदिवासी विभागाने अनुदान न दिल्याने नियमित वेतन मिळाले नाही, हे खरे आहे काय,

(२) सन २०११-१२ मधील वेतन अदा करण्यासाठी शालेय शिक्षण विभागाने आदिवासी विभागाकडे माहे नोव्हेंबर, २०११ मध्ये मागणी केलेली निधीची रक्कम किती आहे,

(३) आदिवासी विभागाने अद्यापही ही रक्कम न देण्याची कारणे काय आहेत,

(४) अनुदान वितरित करण्यासाठी आदिवासी विभागाने माहे नोव्हेंबर, २०११ मध्ये ज्या अटी टाकल्या आहेत त्या अटींचे स्वरुप काय आहे,

(५) या विषयाच्या संदर्भात महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेचे कार्याध्यक्ष व कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी निवेदने दिली आहेत, हे खरे आहे काय,

(६) असल्यास, निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.बबनराव पाचपुते : (१) हे खरे नाही.

(२) माहे नोव्हेंबर, २०११ मध्ये मागणी केलेली निधीची एकूण रक्कम रु. १५.६८८३ कोटी इतकी आहे.

(३) शालेय शिक्षण विभागाचा प्रस्ताव मान्य करण्यात आला आहे.

(४) १. एकूण किती शाळांना व त्यातील किती तुकड्यांना अनुदान दिले जाते. त्या शाळांची यादी, शाळा मान्यतेचे आदेश, तुकड्या मान्यतेचे आदेश, तसेच पदभरती प्रकरणी आरक्षणाचे पालन केल्याबाबतचे मागासवर्ग कक्षाचे प्रमाणपत्र सादर करावे.

२. सदर शाळांच्या यादीनिहाय, तुकडीनिहाय विद्यार्थ्यांचे फोटो व अंगठ्याचे ठसे तसेच हजेरीपटाची साक्षांकित प्रत तसेच अनुसूचित जमातीच्या विद्यार्थी संख्या ५० टक्के पेक्षा जास्त असल्याचे प्रकल्प अधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करावे.

३. शासन निर्णय आदिवासी विकास विभाग क्र.टिएसपी२००३/प्र.क्र.१०१/का.६, दि.२६ जुलै,२००४ मधील परिच्छेद २(१) अनुसार प्रत्येक प्रकरणी आदिवासी विकास विभागाची पूर्वमंजूरी घेण्यात आली होती काय, असल्यास मंजुरीची कागदपत्रे सादर करावीत.

(५) याबाबतचे एक निवेदन प्राप्त झाले आहे.

(६) प्रश्न भाग २) व ३) प्रमाणे प्रस्ताव मान्य करण्यात आले आहेत.

(७) प्रश्न उद्भवत नाही.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. : २६४०९ .....

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, शालेय शिक्षण विभागाच्या संदर्भातील हा प्रश्न आहे. आदिवासी भागातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा शालेय शिक्षणाच्या अखत्यारित असल्या तरी त्या शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांना आदिवासी विभागामार्फत अनुदान दिले जात असते. सर्व अनुदान संबंधितांना देण्यात आलेले आहे असे उत्तरामध्ये म्हटलेले आहे. परंतु यासंदर्भात मी सायंकाळी सुध्दा माहिती घेतली तसेच यासंदर्भातील डाक्युमेंट सुध्दा माझ्याकडे आहेत. ३८ शिक्षकांना सन २०१०-२०११ चे वेतन मिळालेले नाही. यासंदर्भात मी आजही संचालक महोदयांशी चर्चा केली असून आपण या शाळांना २२.६४ कोटी रुपये दिल्याबद्दल मी मंत्री महोदयांना धन्यवाद देतो. परंतु आजही सन २०१०-२०११ व २०११-२०१२ चे वेतन देण्यासाठी अजूनही किमान १० कोटी रुपयांची आवश्यकता असून यासंदर्भातील मागणी सुध्दा विभागाकडे करण्यात आलेली आहे. त्यामुळे हे अनुदान तातडीने देऊन या शिक्षकांचा वेतनाचा प्रश्न कायम स्वरुपी सोडविला जाणार आहे काय ?

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, ज्या शाळा अनुदानाची मागणी करतात त्यांना अनुदान दिले जाते परंतु त्या शाळांनी अटींची पूर्तता करणे आवश्यक असते. यामध्ये आदिवासींची मुले किती, तुकडया किती, मुलांकडे आदिवासींचे दाखले आहेत काय, विद्यार्थ्यांचे सहया व अंगठे घेतले आहेत काय अशा स्वरुपातील रेकॉर्ड पूर्ण नसेल तर आदिवासी विभागाकडून शाळांना पैसे दिले जात नाही. शाळांनी रेकॉर्ड पूर्ण करुन दिले तर तर आम्ही पैसे देण्यास तयार आहोत एवढेच या निमित्ताने सांगावयाचे आहे.

श्री. वसंतराव खोटरे : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी या ठिकाणी दिशाभूल करणारे उत्तर सभागृहाला दिलेले आहे. संस्था शासन मान्य आहेत, त्यांचे सर्व रेकॉर्ड क्लिअर आहे परंतु आदिवासी विकास विभागाच्या निधी अभावी शिक्षकांचे पगार झालेले नाहीत. आजही अमरावती, नागपूर विभागामध्ये माहे नोव्हेंबर २०१० पासून वेतन देण्यात आलेले नाही, त्यांची बाकी थकीत आहे ही बाब खरी आहे काय, या शिक्षकांची थकित बाकी देण्यासाठी आदिवासी विभाग तातडीने प्रयत्न करणार आहे काय, तसेच या शिक्षकांचा पगार दर महिन्याला करण्याच्या संदर्भात प्रयत्न केला जाणार आहे काय ?

..४...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. बबनराव पाचपुते : सभापती महोदय, संबंधित संस्थेने रेकॉर्ड पूर्ण केले तर अशा संस्थांना तातडीने पैसे दिले जातील. संस्था रेकॉर्ड पूर्ण करीत नसल्यामुळे अशा संस्थांना पैसे दिले जात नाही.

(अनेक सन्माननीय सदस्य एकाच वेळी बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती महोदय, संबंधित संस्थांना आदिवासी उप योजनेतून पैसे दिले जात असतात. पैसे देत असतांना संस्थावर काही अटी घालण्यात आलेल्या असून संस्थेने जर अटींची पूर्तता केली नाही तर संबंधित संस्थांना आमच्या विभागाकडून पैसे दिले जात नाहीत. सन्माननीय सदस्यांनी सांगितल्या प्रमाणे सन २०१०-२०११ व २०११-२०१२ या दोन वर्षासाठी ७.६४ कोटी रुपये मंजूर केले असून ही बाब पुरवणी मागण्यांमध्येही आलेली असल्यामुळे निधीचा प्रश्नच शिल्लक राहिलेला नाही. आम्ही सर्व संस्थांना कळविले आहे की, तुम्ही निधीची मागणी वेळेवर केली व अटींची पूर्तता केली तर तातडीने पैसे उपलब्ध करुन दिले जातील. मागणी वेळेवर आली नाही किंवा रेकॉर्ड पूर्ण करुन दिले नसेल तर आदिवासी विभागाला पैसे उपलब्ध करुन देण्यात अडचणी येतात. संस्थेने रेकॉर्ड पूर्ण केले तर आदिवासी विभागाला पैसे देण्यात काहीही अडचण येणार नाही.

सभापती : सन्माननीय मंत्रीमहोदयांना मी यासंदर्भात सांगू इच्छितो की, त्यांनी या प्रश्नाच्या संदर्भात संबंधित सन्माननीय सदस्यांच्या समवेत आपल्या दालनात एक बैठक घेवून चर्चा करावी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : यानंतर तारांकित प्रश्न क्रमांक ***२६०४०*** चर्चेला घेण्यात येईल.

डॉ. दीपक सावंत : सभापती महोदय, या प्रश्नाचे उत्तर देण्यासाठी संबंधित मंत्री महोदय सभागृहात उपस्थित नाही.

श्री. सुभाष चव्हाण : सभापती महोदय, संबंधित मंत्री महोदय उत्तर देण्यासाठी सभागृहात उपस्थित नसल्यामुळे सदर प्रश्न राखून ठेवण्यात यावा अशी माझी आपणास विनंती आहे.

सभापती : ठीक आहे. सदर प्रश्न राखून ठेवण्यात येत आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

हिंगोली जिल्हा परिषदेला दिलेला निधी खर्च न झाल्यामुळे परत पाठवावा लागल्याबाबत

(10) * 25080 श्री.जयंत प्र.पाटील , श्री.कपिल पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक 24995 ला दिनांक 19 डिसेंबर, 2011 रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) हिंगोली जिल्हा परिषदेला वार्षिक सुधारित अंदाजपत्रकानुसार सन 2010-11 या कालावधीसाठी किती रकमेचा निधी मंजूर करण्यात आला होता,

(2) असल्यास, सुधारित अंदाजपत्रकानुसार मंजूर करण्यात आलेल्या निधीतून प्रत्यक्षात किती निधी वितरित करण्यात आला,

(3) असल्यास, वितरित करण्यात आलेल्या एकूण निधी पैकी माहे नोव्हेंबर,2011 पर्यंत किती रकमेचा निधी खर्च करण्यात आला ?

श्री.जयंत पाटील : (1) हिंगोली जिल्हा परिषदेला वार्षिक सुधारित अंदाजपत्रकानुसार सन 2010-2011 या कालावधीसाठी रु. 29775.72 लक्ष एवढा निधी मंजूर करण्यात आलेला होता. त्यापैकी आस्थापना अनुदान अंतर्गत रु.22918.85 लक्ष व आस्थापनेतर (योजना) अनुदान रु. 6856.87 लक्ष इतके होते.

(2) सुधारित अंदाजपत्रकानुसार मंजूर करण्यात आलेला संपूर्ण निधी जिल्हा परिषदेला प्राप्त झालेला आहे.

(3) सन 2010-2011 या कालावधीसाठी रु.29775.72 लक्ष एवढा निधी मंजूर करण्यात आलेला होता. त्यापैकी आस्थापना अंतर्गत रु.22918.85 लक्ष व आस्थापनेतर (योजना) रु. 6856.87 लक्ष इतके अनुदान होते त्यापैकी आस्थापना अनुदानाचा रु.18803.28 लक्ष एवढा व आस्थापनेतर अनुदान (योजना) रु.3900.93 लक्ष एवढा असा एकूण खर्च रु.23823.75 लक्ष माहे मार्च, 2011 अखेर झाला आहे. आस्थापना अनुदानाचा रु.4115.57 लक्ष एवढा निधी अखर्चित आहे. सदर निधी शासनखाती जमा करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

विकास निधी पैकी माहे नोव्हेंबर, 2011 अखेर रु.5020.467 लक्ष इतका निधी खर्च झाला असून उर्वरित रु. 1836.40 लक्ष एवढा अखर्चित निधी जिल्हा परिषदेने मार्च, 2012 अखेर खर्च करण्याचे नियोजन केले आहे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, रू.1836.40 लक्ष एवढा अखर्चित निधी जिल्हा परिषदेने मार्च 2012 अखेर पर्यंत खर्च करण्याचे नियोजन केले आहे. मार्च महिना उद्या संपतो आहे. तेव्हा आता पर्यंत किती निधी खर्च झाला आहे, कामाची प्रगती काय आहे व आता पर्यंत काम कुठल्या स्तरापर्यंत आलेले आहे ?

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, सन 2010-2011 या आर्थिक वर्षात 47.93 कोटी इतका निधी अखर्चित राहिला. त्यातील 41.15 कोटी इतका वेतनावरचा खर्च होता. तो शासनाकडे पुन्हा वळता करून घेण्यात येत आहे. रूपये 6.78 कोटी इतका निधी विकास कामासाठी अखर्चित होता तो 31 मार्च 2012 पर्यंत पूर्ण खर्च होत आहे. ..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.25080 ...

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, नागपूर अधिवेशनामध्ये सन्माननीय सदस्य श्री.सुधीर तांबे आणि प्रा.सुरेश नवले यांनी ता.प्र.क्र.24095 विचारला होता. या तारांकित प्रश्नाला 19 डिसेंबर 2011 रोजी लेखी उत्तर देण्यात आले होते. त्यात नमूद करण्यात आले आहे की, आर्थिक वर्षात सुधारित अंदाजपत्रकानुसार दिलेला निधी खर्च झाला असून हिंगोली जिल्हा परिषदेने कोणताही निधी खर्च न करता परत पाठविला आहे.

श्री.जयंत पाटील : सभापती महोदय, बरोबर आहे. आस्थापनेच्या खर्चासाठी रक्कम मंजूर केली होती. ती खर्च झाली नाही. त्यामुळे ती रक्कम शासनाकडे परत घेतली जाते. त्याप्रमाणे त्यांनी ती रक्कम परत केली आहे. विकास कामावर निधी खर्च करण्याची गरज होती. तो निधी मात्र जिल्हा परिषदेकडे राहिलेला आहे. तो निधी त्यांनी मार्च 2012 पर्यंत खर्च करत आणलेला आहे.

.....

सभापती : सन्माननीय सदस्य श्री.सुभाष चव्हाण यांचा ता.प्र.क्र.26040 माननीय मंत्री महोदय त्यावेळी सभागृहात उपस्थित नसल्यामुळे मी राखून ठेवला होता. आता माननीय मंत्री महोदय सभागृहात उपस्थित असल्यामुळे मी सदर प्रश्न चर्चेसाठी घेत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सिंधुदुर्ग जिल्ह्यात शेती बागायतीच्या नावाखाली बेसुमार वृक्षतोडीने बिबटयासह इतर वन्यजीवांच्या अस्तितवाला धोका निर्माण झाल्याबाबत

(9) * 26040 श्री.सुभाष चव्हाण , श्री.राजन तेली , श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप , श्री.एम.एम.शेख , प्रा.सुरेश नवले , श्रीमती अलका देसाई : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) सिंधुदुर्ग जिल्ह्यात शेती बागायतीच्या नावाखाली बेसुमार वृक्षतोडीने बिबटयासह इतर वन्यजीवांच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाल्याचे माहे जानेवारी, 2012 मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, शासनाने सिंधुदुर्गात होणाऱ्या बेसुमार वृक्षतोडीला आळा घालण्यासाठी तसेच वृक्षतोड करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, याबाबत कोणतीच कार्यवाही होत नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.भास्कर जाधव,डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता : (1) हे खरे नाही.

(2) व (3) प्रश्न उद्‌भवत नाही. तथापि, वनातील झाड तोडीस आळा घालणेकामी वन अधिकारी/कर्मचारी यांचेमार्फत नियमित जंगलफिरती करण्यात येते. अचानक धाडी घातल्या जातात. लाकुड वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या हद्दीवर तपासणी नाके स्थापन केलेले आहेत.

श्री.सुभाष चव्हाण : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्हा वनाने व्यापलेला आहे. माझ्या गावातील 3/4 भाग हा वनाने व्यापलेला आहे. तेथे दिवसाढवळ्या वृक्ष तोड होत असल्याचे आम्ही बघत असतो. त्यामुळे अशंत: खरे नाही असे जे उत्तर दिलेले आहे ते योग्य नाही. वृक्ष तोडी मुळे वन्य जीवांना धोका पोहचत आहे. आजतागायत तेथे किती वृक्षतोड झाली आहे? तपासणी नाके स्थापन केले आहेत असे देखील आपण उत्तरात नमूद केले आहे. त्यामुळे एकूण किती तपासणी नाके स्थापन केले आहेत व त्यासाठी किती कर्मचारी काम करीत आहेत ?

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय महोदय, शासनाच्या वन जमिनीतील झाडे तोडली आहेत काय, या सन्माननीय सदस्यांच्या प्रश्नाला अंशत: खरे आहे अशा प्रकारचे उत्तर देण्यात आलेले आहे. अद्याप पर्यंत तेथील 2000 झाडे तोडण्यात आली आहेत. त्या संबंधातील गुन्हे देखील दाखल करण्यात आले आहेत. सन 2009 साली या संबंधातील गुन्हे दाखल करून 185.958 घनमीटर माल जप्त करण्यात आला असून संबंधितांकडून 12,55,232 रूपये वसूल करण्यात आले. सन 2010 मध्ये 10,85.389 वसूल करण्यात आले. सन 2011 मध्ये 8,83,874 रूपये एवढी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली. एकूण कर्मचारी किती आहे असे सन्माननीय सदस्यांनी विचारले आहेत. येथे सब डिएफओची पोस्ट आहे. त्यांच्या हाताखाली 6 रेंजर व बाकीचा स्टाफ आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26040...

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये खाजगी व शासकीय वनात मोठ्या प्रमाणावर वृक्ष तोड होत आहे. मायनिंगच्या माध्यमातून देखील वृक्ष तोड होत आहे. येथील वृक्ष तोडीला आळा घालण्यासाठी समिती नेमण्याची घोषणा केली होती. या समितीचे काय झाले ? वृक्ष तोड बंदी बाबत आपण निर्णय घेणार होता त्याचे काय झाले ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील एकूण जमिनी पैकी 10 टक्के जागेवर शासकीय वन आहे. उर्वरित संपूर्ण जागा खाजगी मालकांची आहे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र.26040

श्री.भास्कर जाधव .....

वृक्षतोड बंदीचा कायदा आला तर सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनावर आणि नित्याच्या वापरासाठी जी काही थोडीफार लाकूड तोड करावी लागते, त्यावर खूप मोठा परिणाम होण्याची शक्यता असल्यामुळे शासन शेतकऱ्यांच्या बाबतीत सहानुभूतीपूर्वक विचार करीत आहे.

. . . . वाय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

राज्यातील अनुदानित अनुसुचित जातीच्या आश्रमशाळांमधील शिक्षक कर्मचाऱ्यांचे गेल्या अनेक महिन्यापासून वेतन न झाल्याबाबत

(11) *25580 श्री.विक्रम काळे, श्री.वसंतराव खोटरे, प्रा.दिलीपराव सोनवणे, श्री.सतीश चव्हाण, श्री.मोहन जोशी,श्रीमती दिप्ती चवधरी, श्री.उल्हास पवार, श्री.जयप्रकाश छाजेड, श्री.एम.एम.शेख :

सन्माननीय **सामाजिक न्याय व व्यसनमुक्ती कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) राज्यातील अनुदानित अनुसुचित जातीच्या आश्रमशाळांमधील शिक्षक कर्मचाऱ्यांचे गेल्या अनेक महिन्यापासून वेतन न झाल्याने सर्व कर्मचारी पुणे येथील समाजकल्याण आयुक्त कार्यालयासमोर माहे जानेवारी, 2012 मध्ये वा त्या दरम्यान वेतनाच्या मागणीसाठी उपोषणास बसले होते, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, अनुसुचित जातीच्या आश्रमशाळांमधील शिक्षक कर्मचाऱ्यांच्या वेतनाची तरतूद जिल्हानियोजन निधीतून केली जाते, हे ही खरे आहे काय,

(3) असल्यास, समाजकल्याण आयुक्त, पुणे यांनी यापुढे अनुसूचित जातीच्या आश्रमशाळांमधील शिक्षक कर्मचाऱ्यांचे वेतन राज्यनिधीतून करणेबाबतचा प्रस्ताव माहे जानेवारी, 2012 मध्ये वा त्यादरम्यान शासनाकडे पाठविला आहे, हे खरे आहे काय,

(4) असल्यास, त्या शाळांमधील शिक्षक कर्मचाऱ्यांचे वेतन दरमहा व्हावे यासाठी शासनस्तरावरून काय कारवाई करण्यात येत आहे वा केली आहे,

(5) अद्याप कोणतीच कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.शिवाजीराव मोघे : (1) हे खरे आहे.

(2) हे खरे आहे.

(3) हे खरे आहे.

(4) सदर आश्रमशाळेतील कर्मचाऱ्यांचे वेतन देण्यासाठी पुनर्विनियोजनाद्वारे निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. सदर योजनेचा योजनांतर्गत योजनेमधून योजनेत्तर योजनेमध्ये समावेश करण्याबाबत कार्यवाही चालू आहे.

(5) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.वसंतराव खोटरे : सभापती महोदय, या प्रश्नाबाबत आताच चर्चा झालेली आहे. माझी एवढीच विनंती आहे की, आश्रमशाळेतील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे वेतन 1 तारखेला होण्यासाठी आपण कारवाई करणार आहात काय ?

श्री.शिवाजीराव मोघे : सभापती महोदय, राज्यामध्ये अनुसूचित जातीच्या अनुदानित फक्त 16 आश्रमशाळा सहा जिल्ह्यांमध्ये आहेत. यासाठी डी.पी.सी.मधून तरतूद होत असते. परंतु यातील रक्कम थोडी कमी झाल्यामुळे नंतर पुनर्विनियोजनाव्दारे तरतूद केली असून आपण ती 31 मार्च पूर्वी अदा करणार आहोत म्हणजे पैसे मिळणार आहेत. परंतु आपला जो मूळ प्रश्न आहे, त्या प्रश्नाबाबत आश्वासन दिलेले आहे, त्याप्रमाणे अंमलबजावणी होईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पापळ-वाढोणा (जि.अमरावती) परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध वृक्ष तोड करण्यात येत असल्याबाबत

(12) *26283 श्री.जैनुद्दीन जव्हेरी, श्रीमती अलका देसाई, श्री.राजन तेली, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप : सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(1) पापळ-वाढोणा (जि.अमरावती) परिसरात मोठ्या प्रमाणात अवैध वृक्ष तोड करण्यात येऊन त्याची तस्करी करण्यात येत असल्याचे माहे नोव्हेंबर, 2011 मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(2) असल्यास, अवैध वृक्षतोड थांबविण्याबाबत तसेच अवैध वृक्षतोड करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(3) अद्याप, कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.भास्कर जाधव, डॉ. पतंगराव कदम यांच्याकरिता (1) हे खरे नाही.

(2) व (3) प्रश्न उद्भवत नाही.

श्री.जैनुद्दीन जव्हेरी : सभापती महोदय, मघाशीच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील वृक्ष तोडीच्या संबंधात तारांकित प्रश्न क्र.26040 हा चर्चेसाठी आला होता. त्याचप्रमाणे अमरावती जिल्ह्यातही आणि विदर्भामध्ये चंद्रपूर, गडचिरोली येथे मोठी जंगले आहेत आणि तेथे देखील अवैध वृक्ष तोड खासकरुन गडचिरोलीमध्ये सिरोंचा येथे होत असल्याबाबत अनेक वेळा तक्रार झालेली आहे. याबाबतीत शासनाचे नियम आहेत, पण त्याबाबत संबंधितांवर शासन काही कडक कारवाई करीत नाही. यामध्ये काही उद्योगपती अथवा व्यापारी यांची मिलीभगत आहे काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, याबाबतीत सांगावयाचे तर यापूर्वी आपल्याकडे स्टाफ कमी प्रमाणात होता. गार्ड कमी होते आणि शस्त्रात्रे नव्हती. त्यामुळे आम्हाला आमच्या वनाचे संरक्षण करता येत नाही अशा प्रकारे वन विभागाकडून सांगितले जात असे. पण आता याबाबतीत सर्व सोय केलेली असल्यामुळे आताच्या कालावधीत शासकीय वनाची तोड होऊ नये, चोरी होऊ नये यादृष्टीकोनातून अधिकाऱ्यांना ताकीद देण्यात आलेली आहे. जर चोरी झाली तर संबंधित अधिकाऱ्यांना जबाबदार धरण्यात येईल अशा प्रकारच्या सक्त सूचना दिलेल्या आहेत. तसेच सन्माननीय सदस्यांचे म्हणणे आहे की, अशा प्रकारे तस्करी करणारे आणि आमचे अधिकारी यांचे काही संगनमत किंवा मिलीभगत आहे काय ? जर या अनुषंगाने काही स्पेसिफीक उदाहरणे दिली तर त्याबाबतीत सुध्दा चौकशी करुन उचित कारवाई करता येईल.

श्री.शोभा फडणवीस : सभापती महोदय, अमरावतीच्या काही भागामध्येच मोठ्या प्रमाणावर जंगल आहे. तसेच अमरावती जिल्ह्यामध्ये पापड वाढवणी या भागामध्ये वृक्ष तोडीची तस्करी झाली

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

आहे. प्रत्यक्षात मी त्या जिल्ह्यामध्ये फिरते कारण तो माझा पालक जिल्हा आहे. त्याठिकाणी मोठ्या प्रमाणावर वृक्ष तोड होते, परंतु ती लपविली जाते, ते सांगितले जात नाही. त्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणात तस्करांना वाव मिळतो. यासंबंधात मी कोर्टामध्ये पी.एल.आय.दाखल केली होती. त्यामध्ये विशेषत्वाने तुम्हाला उच्च न्यायालयाने सुध्दा मार्गदर्शक तत्वे दिली होती, त्याला 11 वर्षे झाली. परंतु अजूनपर्यंत तेथील वृक्ष तोड थांबलेली नाही.त्यामुळे वृक्ष तोड संरक्षणासाठी शासन काही नवीन नियम करणार आहात काय? कारण शासनाचे सध्याचे नियम बरोबर नाहीत. त्यामुळे याबाबतीत नवीन नियम तयार करुन वृक्ष वाचविण्यासाठी प्रयत्न करणार आहात काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती तपासून घेऊन जर संबंधित कायद्यामध्ये अधिकची तरतूद करण्याची गरज असेल तर ती केली जाईल.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

कोकणातील कांदळवनाच्या संरक्षणासाठी स्वतंत्र प्राधिकरण नेमल्याबाबत

(१३) ***२६४८३ श्री.राजन तेली, श्री.सुभाषचव्हाण, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप :*** सन्माननीय ***वने मंत्री*** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणातील कांदळवनाच्या संरक्षणासाठी स्वतंत्र प्राधिकरण नेमले जाणार असून या प्राधिकरणातील ३७ पदांना नुकतीच मंजुरी देण्यात आली असून १३ व्या वित्त आयोगातून दीड कोटी रुपये देण्यात येणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रक्कम व पदे यांची पूर्तता कधी करण्यात येणार आहे,

(३) अद्याप, याबाबत कारवाई करण्यात आली नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

श्री.भास्कर जाधव, डॉ.पतंगराव कदम यांच्याकरिता (१) अंशत: खरे आहे. स्वतंत्र कांदळवन कक्षाची निर्मिती करण्यात आली आहे. सदर कांदळवन कक्षाचे प्रमुख मुख्य वनसंरक्षक (मँग्रोव्ह) असून त्यांचे प्रशासकीय नियंत्रणाखाली ३७ पदांना मंजुरी देण्यात आली आहे. सन २०११-१२ या वर्षाकरिता कांदळवन संवर्धानासाठी १३ व्या वित्त आयोगांतर्गत रुपये ३.१३ कोटी निधी उपलब्ध करण्यात आलेला आहे.

(२) कांदळवन कक्षाच्या प्रमुख पदावर मुख्य वनसंरक्षक (मँग्रोव्ह) यांची पदस्थापना करण्यात आली आहे. सद्य:स्थितीत १३ कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली असून उर्वरित अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्याची कार्यवाही चालू आहे. तसेच उक्त नमूद केल्याप्रमाणे निधी उपलब्ध करण्यात आलेला आहे.

(३) विलंब झालेला नाही.

श्री.राजन तेली : सभापती महोदय, कांदळवनाच्या संदर्भात कोकणातील शेतकऱ्यांवर अन्याय होत आहे. शेतकऱ्यांच्या खाजगी जमिनीवर कांदळवन वनस्पती म्हणजे मॅग्रोव्हज उगवत आहे. त्यामुळे दोन तीन वर्षानंतर प्रश्न उपस्थित होत आहे. कारण एकदा तेथे मँग्रोव्हजचे उपज इ ाल्यानंतर ती सरकारी जमीन होते. तेव्हा या प्रश्ना संदर्भात कमिटी नेमण्यात येणार आहे त्या समितीच्या माध्यमातून सर्वसामान्य शेतकऱ्यांना दिलासा देणार आहात काय ?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ता.प्र.क्र. 26483...

श्री.भास्कर जाधव : सन्माननीय सदस्यांनी मूलभूत प्रश्न विचारलेला आहे. ही जी कांदळवन वनस्पती आहे ज्याला मँग्रोव्हज म्हणतात. या वनस्पतीची विशिष्ट प्रकारची जात असून तिची विशिष्ट वातावरणात निर्मिती होते अशातला भाग नाही. ज्या ठिकाणी खारे पाणी आणि दलदल असते तेथे ही वनस्पती वाढते. ती वनस्पती मँग्रोव्हज आहे म्हणून वन आणि महसूल विभागामार्फत शेतकऱ्यांना त्रास होऊ नये यासाठी काळजी घेण्याची आवश्यकता आहे. अन्यथा आजारापेक्षा उपचार भयंकर व्हायचा. तेव्हा सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे कोकण किनारपट्टीवर अशा प्रकारचे किती मँग्रोव्हज आहेत व किती क्षेत्रावर आहे याचा सर्व्हे केला जाईल.

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, या संदर्भात सन 2005 मध्ये माननीय उच्च न्यायालयाने सर्व्हे करण्याबाबत आदेश दिले होते. या संदर्भातील मोजणी करुन घेण्यासाठी जिल्हाधिकारी आणि आयुक्त यांना चार आठवड्याची मुदत दिली होती हे खरे आहे काय, या मोजणीकरिता महसूल विभागाकडे केव्हा पैसे वर्ग करणार आहात आणि ही मोजणी केव्हा पूर्ण होईल ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, या प्रश्नाची सोडवणूक करण्याकरिता मुख्य वनसंरक्षक दर्जाच्या अधिकाऱ्याच्या हाताखाली 37 जणांचा स्वतंत्र स्टाफ दिलेला आहे. महसूल विभाग मोजणी करीत नाही म्हणून हा स्वतंत्र विभाग स्थापन करण्यात आलेला आहे.

सभापती : प्रश्नोत्तराचा तास संपला आहे.

मी सभागृहाला सांगू इच्छितो की, आजच्या प्रश्नोत्तराचा तासामध्ये एकूण 13 तारांकित प्रश्नांवर चर्चा झाली. त्याबद्दल मी सर्वांना धन्यवाद देतो. माझी सभागृहाला विनंती आहे की, सन्माननीय सदस्य प्रश्न विचारण्याच्या अगोदर प्रश्न डेव्हलप करण्यामध्ये जी तीन-चार मिनिटे घेतात ती त्यांनी टाळली तर पंधरा- सोळा प्रश्नांवर चर्चा होऊ शकते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: शोक प्रस्ताव

मु.शी.: श्री माणिक गोडघाटे उर्फ कवी ग्रेस यांच्या निधनाबद्दल शोक प्रस्ताव

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, श्री माणिक गोडघाटे उर्फ कवी ग्रेस यांच्या निधनाबद्दल मी खालील शोक प्रस्ताव मांडतो.

"श्री माणिक गोडघाटे उर्फ कवी ग्रेस यांच्या दु:खद निधनाबद्दल हे सभागृह अतीव दु:ख व्यक्त करते."

कै. माणिक गोडघाटे तथा कवी ग्रेस यांचा जन्म दिनांक 10 मे 1937 रोजी नागपूर येथे झाला. त्यांचे शिक्षण एम.ए. पर्यंत झाले होते. त्यांना लहानपणापासून कवितांचे विलक्षण वेड होते. कवितेपुरते त्यांनी 'ग्रेस' हे नाव स्वीकारले. "संध्याकाळच्या कविता', "राजपुत्र" व "डार्लिंग" हे त्यांचे कविता संग्रह अतिशय लोकप्रिय झाले. त्यांच्या कवितांमधील प्रतिमा आणि शब्दकला यांचे शब्दसौंदर्य तसेच अर्थसौंदर्य हे दोन्ही त्यांच्या प्रतिभेचे साक्ष देतात.

कै.ग्रेस यांच्या "चर्चबेल" आणि "चंद्रमाधवीचा प्रदेश" या पुस्तकांना राज्य साहित्य पुरस्कार तर त्यांच्या "वाऱ्याने हलते रान" या पुस्तकास साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता. "मितवा" हा त्यांचा निबंध संग्रह अलीकडेच प्रसिद्ध झाला होता. त्यात त्यांनी आपल्या प्रगल्भ वाङ्मयीन जाणिवा आणि कलात्मक रुचीचे दर्शन घडविले आहे. त्यांच्या लेखणीने मराठी साहित्य समृद्ध झाले आहे.

कै.ग्रेस यांनी "युगवाणी" व "संदर्भ" या नियतकालिकांचे संपादक तसेच मराठी साहित्य अकादमी व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळाचे सदस्य म्हणूनही कार्य केले होते. त्यांना "विदर्भ भूषण" पुरस्काराने सन्मानित केले होते.

कै. ग्रेस यांच्या कवितेतून जीवनातील गूढ व अचाट कल्पनाशक्तींची प्रचिती येते. आधुनिक कवितेत त्यांचे स्थान महत्त्वाचे आहे.

अशा या प्रतिभावंत ज्येष्ठ कवीचे सोमवार, दिनांक 26 मार्च 2012 रोजी दु:खद निधन झाले.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, या सभागृहाचे नेते व उप मुख्यमंत्री माननीय अजित पवार यांनी कवी ग्रेस यांच्या दु:खद निधानाबद्दल जो शोक प्रस्ताव या ठिकाणी मांडला आहे त्याला समर्थन देण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, मराठी कवितेच्या दालनात स्वंयभूपणे ज्यांनी 45 वर्षे अधिराज्य केले असे ज्येष्ठ कवी के. माणिक गोडघाटे ऊर्फ कवी ग्रेस. खरे म्हटले तर कवी ग्रेस यांची एक्झिट त्यांच्यासाठी जरी ग्रेसफूल झाली असली तरी ती मराठी रसिकांना नक्कीच पेनफूल आहे. मराठी साहित्य आणि कवितांमधील माणिकच गमावल्याची भावना आज सामान्य मराठी रसिकांमध्ये आपण अनुभवत आहोत. समजण्यास अत्यंत अवघड येथपासून केवळ शब्द अभियांत्रिकी किंवा अर्थच नाही येर्थपर्यंतची टीका कवी ग्रेस यांच्या काव्यावर अनेकांकडून झाली होती. पण ही टीका झाल्यानंतर, मी माझ्या कवितेचा प्रियकर किंवा पाठीराखा नाही इतके साधे आणि सरळ उत्तर देऊन ते मोकळे व्हायचे. कवी ग्रेस यांचे "वाऱ्याने हलते रान" या गद्यलेखन संग्रहाला काही महिन्यांपूर्वीच साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला तेव्हा आपल्या एका प्रिय कवीला अशा प्रकारचा पुरस्कार मिळाला याचे अनेक मराठी वाचकांना व काव्य रसिकांना समाधान वाटले. पण मला असे वाटते की, अशा कवीचा खरा सन्मान "वाचक प्रियता" हा असतो आणि कवी ग्रेस यांना सामान्य माणसाकडून हा पुरस्कार सातत्याने मिळत गेला.

ती गेली तेव्हा रिमझिम पाऊस निनादत होता ।
मेघात मिसळलेली किरणं हा सूर्य सोडवित होता ॥
ती आई होती म्हणूनही घन व्याकूळ मी ही रडलो ।
त्या वेळी वारा सावध पाचोळा उडवित होता ॥

या सारख्या त्यांच्या कविता मराठी कविता वाचणाऱ्या प्रत्येकाला माहीत आहेत. लेखक आपल्या भावनांना शब्दरुप देतात आणि कुणाला तीव्र दु:खाचा अनुभव होतो तर कुणाला या ओळीमध्ये आपल्या दु:खाचे प्रतिबिंब दिसते. त्यामुळे अशा अनेकांना कवी ग्रेस हे नेहमीच भावत होते.

पाऊस कधीचा पडतो, झाडांची हलती पाने ।
हलकेच जाग मज आली, दु:खाच्या मंद सूराने ॥

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे. . ..

हे शब्द वाचताना कवी निसर्गाचे नाते आपल्याला उलगडून दाखवितात. अशा सगळया शब्दांनी आणि अशा सगळया काव्य पंक्तींनी मराठी रसिकांना एका वेगळया पध्दतीने जोडणारे अस हे कवी होते. त्यांनी कधीच कोणाच्या सांगण्यावरुन कविता केली किंवा गाणे लिहिले असे कधी केले नाही. पण त्यांनी जेव्हा काव्य केले तेव्हा त्यांच्या हृदयात हृदयनाथ मंगेशकर असतील किंवा आताचे तरुण कौशल इनामदार असतील. या कवितांना जेव्हा त्यांनी चाली लावल्या त्यावेळी अनेकांना या कविता भावल्या मग ती निवडूंग असेल किंवा बाकीच्या कविता असतील. हृदयनाथ मंगेशकर यांच्यामुळे संगीताच्या रुपाने त्या सर्वसामान्यांपर्यंत पोहचल्या. "ती गेली तेव्हा, रिमझिम पाऊस कधीचा पडतो, वाऱ्याने हलते रान, किंवा घर थकलेले, संन्याशी" हे त्यांचे काव्य गाणी रुपाने त्यांचे काव्य आजही आपल्या स्मरणात राहील.

सभापती महोदय, कवी ग्रेस यांना समजणे खूप अवघड होते. त्यांच्या कविता कळावयाला खूप अवघड होत्या. पण मला नेहमीच असे वाटते की, चांगले साहित्य, चांगले काव्य, चांगला खेळ हा समजून त्याचा आनंद घेणे हे नेहमीच अवघड असते. कारण ते आपल्याला त्या उंचीवर घेऊन जात असते. अशा काव्य पंक्ती कवी ग्रेस यांच्याकडून ज्यावेळी वाचायला मिळावयाच्या त्यावेळी एक वेगळे समाधान साहित्य रसिक म्हणून आपल्याला मिळत होते. "संध्याकाळच्या कविता" हा कविता संग्रह त्यांनी इंग्रीट बर्कबन या जगप्रसिध्द अभिनेत्रीला अर्पण केला आणि नुसता अर्पण केला असे नाही तर तो त्या अभिनेत्रीकडे प्रत्यक्ष नेऊन पोहोचवला. त्यांच्या काव्याला महाराष्ट्राच्या, मराठीच्या अशा कुठल्याच कक्षा नव्हत्या. त्यांच्या लिखाणामध्ये आंतरराष्ट्रीय स्तरावरील कलाकारांचा, कलावंताचा आणि लेखकांचा उल्लेख दिसायचा.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

खऱ्या अर्थाने या मराठी साहित्य कवितेतील एक माणिक आपण काल गमावलेले आहे असे मला वाटते. त्यांना मी सर्व पक्षाच्या आणि विशेषत: विरोधी पक्षांच्या सदस्यांच्या वतीने भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, धबधब्याने कोसळताना सौंदर्य कसे सांगावे हे आपल्या अमोघ वक्तृत्वाने सांगणारे राम शेवाळकर नागपुरातून गेले तेव्हा मनामध्ये अशी एक पोकळी वाटत होती. उसवणाऱ्या रात्रीचे अमोघ सौंदर्य सांगणारे कवी सुरेश भट गेले त्यावेळी कोठे तरी उदासीनता वाटावी तसे नागपूर भासत होते पण कवी ग्रेस गेले त्यावेळी नागपूरच्या मराठी साहित्यातील नभांगणच आता मोकळे झाल्यासारखे वाटावयास लागले आहे. नागपूरमधील मराठी साहित्यिकांमध्ये असे जबरदस्त सामर्थ्य होते.

सभापती महोदय, चिंतनाची उत्तुंगता, मनाची गहनता आणि वास्तवाची प्रखरता या तीनही जाणिवा एकत्र सांगणारा कवी म्हणजे कवी ग्रेस. अनेकांनी आज त्यांचे वर्णन करताना दु:खाचा कवी असे वर्णन केले आहे पण तसे नसून कवी ग्रेस हे वेदनांचे कवी होते. मानवतेच्या, माणुसकीच्या, मातृत्वाच्या, ममत्वाच्या वेदना सांगणारे कवित्व हे ग्रेस यांच्या व्यक्तिमत्वातून मोकळे होत होते, फुलत होते आणि ते कठीण सुध्दा होते. काल झी 24 तास या वाहिनीने दीड तासाचा एक अप्रतिम कार्यक्रम दाखविला. तो कार्यक्रम बघताना कवी ग्रेस कसे उलगडत होते हे मनापासून बघत होतो. कवी ग्रेस हे समजण्यास अवघड असताना ते एवढे सोपे असतील हे कालच्या कार्यक्रमातून जाणवत होते. त्यावेळी लतादीदींनी गायलेले गीत सतत वाजत होते. कवी ग्रेस यांच्या नावातच ग्रेस आहे. लतादीदीनी गायलेले "भय इथले संपत नाही, मज तुझी आठवण येते, मी संध्याकाळी गातो, तू मला शिकविली गीते" हे गीत सतत वाजत होते आणि त्या कार्यक्रमामध्ये संपूर्ण दीड तास कवी ग्रेस यांच्या जाण्याची उणीव अत्यत प्रखरतेने जाणवत होती.

सभापती महोदय, कवी ग्रेस यांच्याशी माझा प्रत्यक्षात दोन वेळा सबंध आला. एक म्हणजे मी प्रेक्षक म्हणून त्यांचा कार्यक्रम पाहताना संबध आला तो लांबचा होता. त्यानंतर एकदा त्यांच्या बाजूला बसून कवी ग्रेस यांचा अनुभव घेतला. जीवनात कसे अनुभव निर्माण होतील हे सांगता येत नाही. मी मराठवाड्यामध्ये काम करीत असताना वाचण्यासाठी भरपूर वेळ मिळावयाचा. त्यावेळी बी. रघुनाथ माझ्या वाचण्यामध्ये आले. अव्दितीय कर्तृत्वाचे, प्रतिभेचे आणि निजाम काळातील समाजाला त्याच ताकदीने सांगण्याचे सामर्थ्य असलेले असे ते व्यक्तिमत्व होते. त्यांनी तशा प्रकारचे साहित्य निर्माण केले. ते अल्प वयामध्ये गेले.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते ....

माझ्या पत्नीने त्यावेळी मुंबई विद्यापीठामध्ये आचार्याच्या पदवीकरिता म्हणजे ज्याला आपण पी.एचडी. म्हणतो त्यासाठी प्रवेश घेतला होता. मी पत्नीला सांगितले की, मराठवाड्याच्या मातीशी माझे लागेबांधे आहेत त्यामुळे माझ्या घरात मराठवाड्याची पदवी असली पाहिजे. म्हणून श्री. गोरे सरांच्या नेतृत्वाखाली बी. रघुनाथ यांचे साहित्य हा विषय तिने घेतला. तात्यासाहेब शिरवाडकराचा विषय पदवीच्या वेळी घेतला होता म्हणून यावेळी मी सांगितले की, बी. रघुनाथ हा विषय घे. त्या साहित्यातून ती पी.एचडी. झाल्यानंतर मी परभणीमध्ये बी. रघुनाथ यांचे स्मारक उभे केले. त्याच्या उद्घाटनासाठी साहित्याचे गाढे अभ्यासक असलेले आपले जिल्हाधिकारी श्री. लक्ष्मीकांत देशमुख उपस्थित होते. स्मारक बघून ते भारावले. कोणी घर देता का घर असे लिहिणाऱ्या आमच्या तात्यांसाहेबांच्या नाटकाची तारीफ आजही होते पण तात्यासाहेबांच्या स्मारकाकरिता या सदनामध्ये आम्हा सदस्यांना निधी देता का हो, कधी निधी देता, असे सांगण्याची पाळी आली. ही सगळी जाणीव असल्यामुळे मी बी. रघुनाथ यांचे स्मारक परभणीमध्ये उभे केले. त्या स्मारकाच्या उद्घाटनाला कवी ग्रेस आले होते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते....

आमचे रान कवी ना.धों.महानोर उपस्थित होते, तसेच मोठमोठे साहित्यिकही आले होते. कवी ग्रेस हे सकाळपासून ते संध्याकाळच्या कार्यक्रमापर्यंत रमले होते. कवी ग्रेस यांची पत्रकार परिषद कोणी ऐकली नसेल. परंतु पत्रकारांनी कवी ग्रेस यांची मुलाखत घेतली होती त्यावेळी मी स्वत: त्या व्यासपीठावर उपस्थित होतो. शेजारी बसून अनुभवलेले कवी ग्रेस त्यावेळी वेगळे होते. काव्यात्मक न बोलता बी.रघुनाथ या एका विषयावर कवी ग्रेस यांनी आपले विचार मांडले होते मराठवाड्याच्या एका मोठ्या साहित्यिकाच्या पुतळ्याचे उद्घाटन नागपूरच्या अत्यंत उंचीच्या एका कवीने सन्मानित केले, त्यांच्या पुतळयाचे उद्घाटन कवी ग्रेस यांच्या हस्ते झाले होते याचा मला अभिमान वाटला होता. रात्री मैफिलीत कवी ना.धों.महानोर बसल्यानंतर आपण फक्त श्रोत्यांच्या भूमिकेतून ऐकत बसावयाचे असते. समुद्र सपाटीपासून फक्त हिमालायाची उंची मोजता येते तशी मैफिल ऐकण्याचे भाग्य मला लाभले होते. ती मैफिल वेगळ्याच दर्जाची होती. असे कवी ग्रेस मी स्वत: अनुभवले आहेत.

सभापती महोदय, 'सामना' या वृत्तपत्राच्या माध्यमातून त्यांचे लिखाण सातत्याने येत होते. अन्य वर्तमानपत्राताच्या माध्यमातून लिखाण न करता सामना या वृत्तपत्रातून त्यांनी लिखाण केले होते. सामना या वृत्तपत्राचा त्यांनी केलेला हा बहुमान आहे. कवी ग्रेस यांच्या भावना अत्यंत तीव्र असायच्या. हॉलिवूडमधल्या कलाकारांसारखे त्यांचे व्यक्तिमत्व आकर्षक होते. त्यांचा पेहराव, गॉगल लावण्याची पध्दत, त्यांचे हावभाव वेगळेच होते. कवी ग्रेस यांच्या कविता मी आज वाचत होतो. त्यातील एक कविता अशी आहे,

या वाटेवर रघुपपित आहे, त्या वाटेवर शीळा,
सांग साजणी कुठे ठेवू मी तुझा उमला गळा

समाजाच्या हृदयातील आकांत, आर्दता, कारुण्य हे कठोरतेने सांगण्याचे त्यांच्यात सामर्थ्य होते.

मी आत्ता जाऊनि येते
तोवरी राख हे पाणी

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.दिवाकर रावते.....

थोरवी तशी पायाळू
तू माझी लेक शहाणी
गाईला टाकुनी चारा
सर्पाला देशिल दूध
टाळूत कुणाच्या घुमती
हत्येचे माझ्या वेध

आकांताचा उमाळा व आकांताची परिणिती एकजीव करुन दुसऱ्याच्या चोर वाटेने परत आलेल्या भावविश्वात रमणारे हे काव्य त्यांनी ज्यावेळी म्हटले त्यावेळी त्यांचे स्वत:चे मुलाखतीच्या वेळचे मत गंभीर होते. आकांताने वावरलेला संत, आकांताची परिणिती करुणेत करुन देवत्व मिळवितो, मी फक्त अनुभूतीचे करुणामूल्य शोधतो.

जळा सोडी मासा
म्हणून मी तुकया संत बनतो
जसा कल्पांताला
प्रलयभरला कंठ फुटतो

अशा रौद्ररुपी भावना कवी ग्रेस यांनीच व्यक्त कराव्यात. म्हणून दिनांक 7 सप्टेंबर, 2002 रोजी माझ्या सोबत असलेले कवी ग्रेस मला सरळ दिसू लागले. अशा या ओजस्वी, तेजस्वी कवीच्या जाण्यामुळे खऱ्या अर्थाने नागपूरमध्ये पोकळी निर्माण झाली आहे. तेथे इतर साहित्यिक आहेत, चांगले आहेत, त्याबद्दल वाद नाही. परंतु महाराष्ट्राला सामर्थ्य व अभिमान वाटावा असे कवी ग्रेस होते. त्यांच्या नावात ग्रेस असले तरी मराठी साहित्य मंडळाला त्यांचा सन्मान करावा असे वाटले नाही. कवी ग्रेस यापासून अलिप्तच असायचे, एकांतात असायचे. अशा प्रकारचा महान कवी आपल्यातून गेला आहे. आपल्या विधिमंडळाच्या माध्यमातून आदरांजली वाहत असताना मला मनापासून बरे वाटत आहे. महाराष्ट्राच्या सर्वोच्च सदनाने कवी ग्रेस यांचा आदराने सन्मान केला आहे. सभापती महोदय, आपण आम्हाला ही संधी दिली त्याबद्दल मी आपल्याला मनापासून धन्यवाद देतो. कवी ग्रेस गेले, पण त्यांचे काव्य अखंड चालत राहील. एवढेच बोलून मी येथेच थांबतो. धन्यवाद.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.कपिल पाटील (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, केवळ मराठी कवितेच्या प्रांतातच नाही तर भारतीय कवितेच्या प्रांतामध्ये स्वत:चा स्वायत्त, स्वतंत्र प्रदेश निर्माण करणाऱ्या वेदनेचा महाकवी आज हरपला आहे. कवी ग्रेस यांच्यावर दुर्बोधतेचा आरोप नेहमी होत असे. त्यांची कविता कळण्यास अवघड असे. पण त्यांची कविता म्हणजे गुढरम्य कवितांचे जाळ असायचे. त्या जाळ्यात जेवढे शिराल तेवढी गुढता तुम्हाला अनुभवयास मिळत असे. आपले विश्वच मुळी अगम्य असे आहे. त्याचा ठाव लागत नाही. ते सुबोध कसे असेल, अबोध आहे. याचे कारण आपले अज्ञान असते. कवी ग्रेस यांची कविता अशीच आहे.

यानंतर श्री.शिगम....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील..

बायबल मधील ख्रिस्ताची व्याकुळता त्यामध्ये आहे. माणसाच्या,स्त्रीच्या सनातन दु:खाचा स्वर त्यात आहे. कवी ग्रेस यांच्यावर मराठी साहित्याने आणि भारतीय साहित्याने मोठा अन्याय केला. साहित्य अकादमीचा पुरस्कार त्यांना मिळाला, परंतु तो त्यांच्या ललित लेख संग्रहाला मिळाला. राजकारण असे असते की ते मान्यता देत नाही आणि साहित्यातील राजकारणाने त्यांच्या कवितेला मान्यता दिली नाही. पण आज प्रत्येक रसिकाच्या मनात नाही तर ज्याला कविता कळते अशा जगातल्या प्रत्येक माणसाला ग्रेस गेल्याचे अधिक दु:ख आहे. मग त्या लताबाई असोत किंवा गुलजार असोत. इस्पितळामध्ये असताना त्यांनी ज्या ओळी लिहिल्या त्या मला आवर्जून सांगायच्या आहेत.

घरभर सरणाचे पात्र,
सांडून जाई
फिरुनी फिरुनी माझा वंश
निर्वंश होई

त्यांना श्रध्दांजली वाहताना त्यांच्याच शब्दांचा पुन्हा एकदा आसरा घेतो.

तो स्तोत्रांत इंद्रिये अवघी
गुणगुणती दु:ख कुणाचे
ते सरता संपत नाही
चांदणे तुझ्या स्मरणाचे

एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवितो. धन्यवाद.

...2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, महाराष्ट्राच्या मराठी साहित्यामध्ये जे काही मैलाचे दगड म्हणून कायम चिरंतर राहतील अशा धाटणीचे कवी ग्रेस यांचे दु:खद निधन झाले. निधनापूर्वी 8 मार्चला प्रसिद्ध हिंदी कवी आणि गीतकार गुलजार यांची पुण्याच्या हॉस्पिटलमध्ये भेट झाली होती. गुलजार आणि ग्रेस यांच्या भेटीचे माझ्या मनात असे कल्पना चित्र उभे रहाते की, कुमार गंधर्वांची मैफिल असावी आणि पंडित भीमसेन जोशी समोर बसून ऐकत असावेत. इतके हे उच्च प्रतीचे कलाकार. जेव्हा ही भेट झाली त्यानंतर गुलजार यांनी म्हटले "उम्मीद लगाकर बैठा हूँ कि कुछ बात बन जाए, शायद ग्रेस से और एक मुलाकात हो जाए " कवी ग्रेस यांची कविता जितकी अवघड असायची तितकीच ती समजावून घेता घेता तुम्हाला प्रत्येक शब्दातून पुढच्या वळणावर न्यायची. हॉस्पिटलमध्ये कॅन्सरशी सामना करताना त्यांचा शेवट जवळ आलेला होता. त्यावेळी त्यांनी हॉस्पिटलच्याच नावाने पत्र लिहिले. ते पत्र आज प्रसिध्दही झालेले आहे. त्यामध्ये ग्रेस असे म्हणतात, "फुलांची लागवड विस्ताराने करता येते पण त्यांचे अत्तर प्रत्येक निरुत्तर थेंब पिळल्या शिवाय सगळीकडे देता येत नाही." ही आर्तता, असमर्थता त्यांनीच नमूद करुन ठेवली आहे, ती या शब्दात, " कोण पाण्याला शिवतो गूढ घावांचे अस्तर" ही कल्पनाच फार विलक्षण आहे. पुढे ते म्हणतात, "नांगी पिळून विषाचे जसे काढावे अत्तर" म्हणजे कशा कशातून काय काय शोध लागेल याबाबतीत ग्रेस यांची प्रतिभा आपल्याला आश्चर्यचकित करुन जाते.

साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळतो तो त्यांच्या ललित लेखनाला. त्यांच्या कवितांचा मान, सन्मान हा खरे तर आंतरराष्ट्रीय पातळीवर व्हायला पाहिजे. "वा-याचे हलते पान" या संग्रहाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला. 1967 पासून कवितेच्या प्रांतातून चालतानाचा त्यांचा प्रवास पाहिला तर, एक अस्वस्थता असताना सुध्दा त्रयस्थपणाने, निसर्गाकडे, माणसाकडे, प्रवृत्तीकडे बघण्याची त्यांची वृत्ती होती. मराठी साहित्यामध्ये फार दुर्मीळ अशा प्रकारचे साहित्य कवी ग्रेस यांनी निर्माण केले. आज "संध्या मधुरा" आणि "चंद्र चांदण्यांची रात्र" यांच्या मधल्या पोकळीत ते विसर्जित झाले आहेत. एका संपादकाने म्हटल्याप्रमाणे हा रक्तबिंबाचा दिवा लौकिकार्थाने आज विझला असला तरी त्यांच्या कवितेतून तो असाच कायम तेवत राहील. त्यामुळे कवी ग्रेस याना आदरांजली अर्पण करताना एवढेच म्हणावेसे वाटते, आज जाने कि जिद न करो, यूँ ही पहलू में बैठे रहो. धन्यवाद.

-- ...नंतर श्री. भोगले...

अशुद्धित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्री.उल्हास पवार (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आज कविश्रेष्ठ ग्रेस यांना श्रध्दांजली अर्पण करीत असताना काल एका क्रांतीवीराला म्हणजे स्व.नागनाथ अण्णा नायकवडी यांना श्रध्दांजली वाहिली. आज मराठी सारस्वताच्या दरबारातील आपले एक अढळ स्थान ज्या महाकवीने निर्माण करुन ठेवले त्यांना आपली भावांजली, श्रध्दांजली या सदनाच्या माध्यमातून आपण व्यक्त करीत आहोत.

सभापती महोदय, खरे तर स्वत:ला दु:खाचा महाकवी म्हणवून घेणारा हा कवी, मी यांना अनेकवेळा पुण्याच्या दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटलमध्ये भेटायला गेलो होतो. मला या ठिकाणी नमूद केले पाहिजे की, कै.सुरेश भट आणि कवी ग्रेस या दोन्ही मराठी महाकवींची सेवा त्या दिनानाथ रुग्णालयामध्ये डॉ.धनंजय केळकर असतील, स्वत: पंडित हृदयनाथ मंगेशकर असतील, त्यांचे कुटुंबीय असतील, त्यांनी केली. मी अनेकवेळा त्या हॉस्पिटलमध्ये गेलो, अनेकदा माझी त्यांच्याशी भेट झाली. अगदी आपल्या कुटुंबातील किंवा घरातील एखाद्या माणसाची काळजी घ्यावी इतक्या मनोभावे त्यांनी सेवा केल्याचे मी पाहिले आहे. परवा ग्रेस यांना भेटायला गेलो होतो. खरे म्हणजे कॅन्सरसारख्या दुर्धर आजारातून ते पूर्ण बरे झालेले होते. ते अनेक ठिकाणी कार्यक्रमाला स्वत: जात होते. गेल्या नागपूरच्या हिवाळी अधिवेशन काळात त्यांना नागभूषण पुरस्कार मिळाला. राज्याचे सन्माननीय मुख्यमंत्री, उप मुख्यमंत्री त्या समारंभाला हजर होते. त्या ठिकाणी ग्रेस यांनी केलेले भाषण, साहित्य अकादमी पुरस्कारानंतर त्यांनी व्यक्त केलेले विचार हे सर्व मला दिनानाथ रुग्णालयामध्ये आठवले. तो आजार त्यांचा पुन्हा बळावला. माझ्याशी बोलत असताना त्यांनी माझा हात हातात घेतला आणि म्हणाले, उल्हासराव माझा हात जोराने ओढा. त्यांचा मुलगा आमच्या शेजारीच उभा होता. इतकी व्याकुळता, इतक्या वेदना त्यांना होत होत्या. या पूर्वी ज्या ज्यावेळी मी त्यांच्याकडे गेलो त्यावेळी गप्पांची मैफल त्यांनी रंगविली. स्वत: दु:खाचा महाकवी म्हणवून घेणारा माणूस माझ्या दृष्टीने मानवी जीवनाचे तत्वचिंतन करीत, जीवनाच्या सुखदु:खाचे हळूवार धागे उलगडताना, विणताना आणि वेदनांना हुंकार देताना शेवटी आनंदाचा शोध घेणारा होता असे मी जर त्या महाकवीबद्दल बोललो तर ते चुकीचे होणार नाही. इतका मनस्वी, उत्तम राहणी, केसाची ठेवण, गॉगल याबाबत या ठिकाणी अनेकांनी वर्णन केले. त्यांच्या घरी जाणे म्हणजे आणखी एक गंमत होती. एकदा श्री.रामदास फुटाणे यांच्याबरोबर मी त्यांच्या घरी अनेकदा गेलो होतो. उत्तम पेंटिंग्ज, लँडस्केप चित्रे, रेखाचित्रे त्यांना फार आवडायची. ते

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.उल्हास पवार.....

स्वत: रेखाचित्र काढायचे. उत्तम फोटोग्राफी करायचे, उत्तम शिल्पकला करायचे. ते मराठीचे विद्यार्थीप्रिय प्राध्यापक होते. मराठी, हिंदी, इंग्रजी आणि उर्दू या चारही भाषांवर त्यांचे असामान्य प्रभुत्व होते. मी त्यांच्या अनेक भाषणांचा आस्वाद घेतला. चार किंवा पाच महिन्यांपूर्वी पुण्याला एका समारंभाचा मी अध्यक्ष होतो. एका साप्ताहिकाचे प्रकाशन त्यांच्या हस्ते होणार होते. भाषण म्हणजे विलक्षण अभिनय, मनस्वी संवाद लोकांबरोबर असायचा. कधीही ते माईकपासून लांब जायचे आणि लोकांबरोबर संवाद साधायचे. लोकांबरोबर सुसंवाद झालेला मी अनेक समारंभामध्ये पाहिलेला आहे. खरे तर त्यांच्या काव्यसंग्रहाला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला, त्याचा अनेकांनी या ठिकाणी उल्लेख केला. आज खरोखरच सगळ्या मराठी दैनिकामध्ये याची बातमी छापून आली आहे. गुलजार यांच्यापासून लतादीदी यांच्यापर्यंत अनेकांचा उल्लेख करावा लागेल, इतकी भावपूर्ण श्रध्दांजली कवी ग्रेस यांना वाहिली आहे. मला या निमित्ताने सांगावेसे वाटते की, आता सगळ्या विविध क्षेत्रात समाजकारण, राजकारण, साहित्यकारण, धर्मकारण या सर्व क्षेत्रामध्ये आपण चर्चा करीत असताना, चिंतन करीत असताना एकांगीपणा, संकुचितपणाचा प्रभाव ठिकठिकाणी आपल्याला जाणवतो. पण हा महामानव असा होता, धर्माच्या, जातीच्या, पंथाच्या, भाषेच्या पलीकडे जाऊन उदार मानवतावादाचे तत्वचिंतन आपल्या वाड़मयातून त्यांनी केले असे मी जर म्हटले तर ते वावगे होणार नाही. अशा या महाकवीला मला असे वाटते की, अंधार कधीचा झाला...काय सुंदर.... भय इथले संपत नाही. या दोन ओळीमध्ये जीवनात घडत असणाऱ्या सर्व सुखदु:खाचा अंधार त्यांना दिसतो आहे, परंतु भय संपत नाही. या भयावर मात करण्याची ताकद मनामध्ये निर्माण केली पाहिजे हे त्यांच्या वाड़मयाचे दर्शन मला याठिकाणी अतिशय विनम्रपणे सांगितले पाहिजे.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. उल्हास पवार .....

सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते व माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी कवी श्री. ग्रेस यांना श्रध्दांजली अर्पण करीत असताना अनेक गोष्टींचा उल्लेख केला. कवी ग्रेस यांच्या कविता क्लिष्ट व दुर्बोध असल्याचीही चर्चा अनेक वेळा व्हायची. त्याला त्यांनी अत्यंत साधे उत्तर दिले होते. त्यांच्यावर मराठी भागवत संप्रदाय आणि संत वाङ्:मयाचाही प्रभाव होता. एका ठिकाणी उत्तर देताना ते म्हणाले की, "भाकरीचा तुकडा तोंडात घेऊन धावणारा कुत्रा हा माणसाला भावतो, दिसतो, समजतो पण त्याच्या पाठीमागे तुपाची वाटी घेऊन "अरे, देवा थांबा, थांबा, भाकरीमुळे पोटात दुखेल, त्याला तूप लावा असे म्हणणारे नामदेव त्यांना समजणार नाही. अशा प्रकारे क्लिष्ट आणि दुर्बोध कवितांच्या बाबतीत त्यांनी कुत्र्याच्या पाठी तुपाची वाटी घेऊन धावणाऱ्या नामदेवांना त्या कुत्र्यात देव दिसला होता हे यांना समजणार नाही, असे त्यांनी उत्तर दिले आहे. ते ज्यावेळेस माझ्या घरी आले तेव्हा आम्ही खूप गप्पा मारल्या. मी त्यांना म्हटले की आपण पुन्हा माझ्या घरी यावे, मला खूप आनंद होईल, त्यानंतर ते खूप वेळा आले होते. नंतरच्या काळात त्यांचा आजार बळावला, मी त्यांना परवा हॉस्पिटलमध्ये भेटायला गेलो असता तेथेही त्यांना आठवण झाली. तेव्हा ते म्हणाले की मी जरुर आपल्या घरी येईन. त्यावेळेस त्यांना आठवण झाली आणि त्यांनी मिर्झा गालिबचा एक शेर त्या वेळेस सांगितला. उर्दू भाषेवर त्यांचे विलक्षण प्रभुत्व होते. त्यांना कधी इंग्रजी कविता तर कधी एखादा इंग्रजी कादंबरीकार आठवायचा. मला ते म्हणाले की मी जरुर तुमच्या घरी येईन. असे म्हणून त्यांनी मिर्झा गालिबचा शेर ऐकवला. कधी मिर्झा गालिब तर कधी मीर यांचे अनेक शेर त्यांना आठवायचे. त्यांनी मला मिर्झा गालिबचा शेर ऐकवला तो मी येथे सांगू इच्छितो. ते म्हणाले की, "मेहरबान होकर बुलाओ मुझे, चाहो जिस वक्त, मैं गया वक्त नही हूँ कि कभी न आ सकू असेच मला वाटते. एवढे बोलून कवी ग्रेस यांना भावपूर्ण श्रध्दांजली अर्पण करतो आणि माझे भाषण पूर्ण करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. लक्ष्मणराव ढोबळे (पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री) : महोदय, कवी ग्रेस यांना आदरांजली अर्पण करताना गोडघाटे या नावाने ओळख असलेल्या डोळ्याच्या पाण्यालाही अश्रूंच्या थेंबांचे ओझे वाटावे अशा एका अर्थाने हळूवार ओलावा असलेला हा कवी. त्याचबरोबर लेकराच्या ओढीसाठी घराकडे येणारी माय असो, वासराच्या ओढीने गोठ्याकडे येणारी गाय असो ती जशी वात्सल्य पदरात घेऊन येते तशाच पध्दतीने सर्वसमावेशक अशा भावना जतन करणाऱ्या साहित्याला वैश्विक चौकट देणारा असा महाकवी आज हरपल्याचे महाराष्ट्राला दु:ख आहे. कवी ग्रेस हे महाराष्ट्राचं माणिक होतं. सारा महाराष्ट्र वेदनेला पोरका झाल्याचे दु:ख झाले हे आपण त्यांच्या आदरांजलीच्या निमित्ताने व्यक्त करतो. वेदनाच पोरकी झाल्याचे दु:ख मनात असले तरी चंद्राच्या करस्पर्शाने दगडाचे पाचू होतात पण त्यांच्या काव्याच्या ओळी अंत:करणात जतन करताना माणसाला जगण्याची उमेद वाटते.

माणसाचा मनातला अंध:कार नाहीसा करण्याचे सामर्थ्य त्यांनी शब्दांना दिले तरी सारस्वताच्या ओठावर असलेल्या शब्दाला तारुण्य देणारी त्यांची प्रतिमा आज एका लाक्षार्थाने निघून गेली असली तरी देखील त्यांनी जे समर्थ असे वाङ्:मय महाराष्ट्राला दिले त्यामुळे साहित्याला एक ताजेपण, साहित्याला एक नवेपण या निमित्ताने प्राप्त झालेला आहे. साहित्याला चौकट देताना किंवा गुढ गुंजनात्मक कवितेचा विषय अनेक सन्माननीय सदस्यांनी मांडतांना अध्यात्माची ओळख असलेल्या माणसाला गुढ गुंजनात्मक काव्याचा सोस असतोच, हे ज्यांना अध्यात्माचा अभ्यास आहे त्यांना ते लक्षात आल्याशिवाय राहणार नाही. त्याचबरोबर गंधाळलेले आभाळ, भेगाळलेली जमीन, काव्य प्रतिभेला दिसली, जे सूर्याला दिसत नाही ते कवीला दिसते असे आपण म्हणतो. त्यांच्यामुळे आमची मराठी समृध्द झाली, लक्तरं गुंडाळून मंत्रालयाच्या दारात उभी असलेली मराठी समृध्द करण्याचं काम या कवीने केले आहे. एवढे बोलून कवी ग्रेस यांना मानाचा मुजरा करतो व माझे भाषण पूर्ण करतो.

यानंतर श्री. जुन्नरे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. एस.क्यू. ज़मा (महाराष्ट्र विधानसभा द्वारा निर्वाचित) : सभापति महोदय, कवि "ग्रेस" मराठी साहित्य के महान कबि थे, इसके बारे में सब को मालूम है. पिछले 2-3 साल से मैं उनके सम्पर्क में आया और उनके कार्यक्रम में जब मैं उनसे मिला तो मुझे उनके व्यक्तित्व की गहराई का अहसास हुआ. मैं उनका अंग्रेजी में लेखन पढ़ता था तो मुझे लगता था कि कवि "ग्रेस" कोई विदेशी लेखक होंगे. लेखक के रुप में उनका नाम माणिक गोडघाटे नहीं लिखा जाता था. जब मैं उनसे सम्पर्क में आया तो मुझे उनके बारे में जानकारी हुई, तब मुझे महसूस हुआ कि वे महान साहित्यकार हैं. उनका जन्म नागपुर में हुआ था और वे अंग्रेजी भाषा के लेक्चरर थे. उनका अंग्रेजी, हिन्दी, उर्दू और मराठी पर बहुत अच्छा कमांड था. उनकी पर्सनलिटी बहुत सुन्दर थी. जब वे बोलते थे तो ऐसा लगता था कि ऑडिएन्स से संवाद कर रहे हैं. उन्हें देखने से ही लगता था कि यह कोई बुद्धिजीवी और महान व्यक्ति हैं. कल उनका देहावसान हो गया है और आज उनका अंतिम संस्कार हो रहा होगा. मैंने उनको अल्प समय के लिए जाना. उनके निधन से न केवल महाराष्ट्र का नुकसान हुआ है, बल्कि पूरे देश के लिए मराठी साहित्य का बहुत बड़ा नुकसान हुआ है. उनको साहित्य अकादमी का अवार्ड मिला था, उनको विदर्भ भूषण का अवार्ड भी मिला था. मैं सभी नागपुरवासियों की ओर से, विदर्भवासियों की ओर से और पूरे सदन की ओर से इस महान कवि को भावभीनी श्रद्धांजलि देता हूँ.

. . . . . .

. . . भाषण पूर्ण,
नंतर GG-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती :सभागृहाचे नेते, मा. उप मुख्यमंत्री, ना. अजितदादा पवार यांनी श्री. माणिक सीताराम गोडघाटे तथा कवी ग्रेस यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव मांडला आहे. त्यावर सन्माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे हयांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

कै.माणिक गोडघाटे तथा कवी ग्रेस यांना लहानपणापासून कवितांचे विलक्षण वेड होते. कवितेपुरते त्यांनी "ग्रेस" हे नाव स्वीकारले. "संध्याकाळच्या कविता", "राजपुत्र" व "डार्लिंग" हे त्यांचे कविता संग्रह अतिशय लोकप्रिय झाले. त्यांच्या कवितामधील प्रतिमा आणि शब्दकला यांचे शब्दसौंदर्य तसेच अर्थसौंदर्य हे दोन्ही त्यांच्या प्रतिभेचे साक्ष देतात. कर्णाची कवचकुंडले तशी माझ या कवितेची दुर्बोधता असे ते म्हणते होते. लोककथा, पुराणकथा, मिथककथा, रामायण महाभारतातले संदर्भ यांनी समृध्द असलेली ग्रेस यांची कविता समिक्षकांनाही चकवा देत राहिली. मात्र तरीही "मात्र तरीही "ती गेली तेव्हा रिमझिम पाऊस निनादत होता...", भय इथले संपत नाही..."या सारख्या त्यांच्या अनेक कविता जनमानसांवर मोहिनी घालत राहिल्या. गेली 40 वर्षे कविता व ललित लेखांच्या माध्यमातून ते घरोघरी पोहचले.

कै. ग्रेस यांच्या "चर्चबेल" आणि "चंद्रमाधवीचा प्रदेश" या पुस्तकांना राज्य साहित्य पुरस्कार तर त्यांच्या "वा-याने हलते रान" या पुस्तकास साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला होता. "मितवा" हा त्यांचा निबंध संग्रह अलीकडेच प्रसिध्द झाला होता. त्यात त्यांनी आपल्या प्रगल्भ वाड़:मयीन जाणिवा आणि कलात्मक रुचीचे दर्शन घडविले आहे. त्यांच्या लेखणीने मराठी साहित्य समृध्द झाले आहे.

कै. ग्रेस यांनी "युगवाणी" व "संदर्भ" या नियतकालिकांचे संपादक तसेच मराठी साहित्य अकादमी व महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मित मंडळाचे सदस्य म्हणूनही कार्य केले होते. त्यांना "विदर्भ भूषण पुरस्कार", "मास्टर दिनानाथ पुरस्कार", "नागभूषण पुरस्कार" या सारख्या अनेक पुरस्कारांनी सन्मानित केले होते.

कै.ग्रेस यांच्या कवितेतून जीवनातील गूढ व अचाट कल्पनाशक्ती यांची प्रचिती येते. आधुनिक कवितेत त्यांचे स्थान महत्वाचे आहे.

अशा या प्रतिभावंत ज्येष्ठ कवीचे सोमवार, दिनांक 26 मार्च, 2012 रोजी दु:खद निधन झाले.

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

यांच्या स्मृतीला मी अभिवादन करतो व भावपूर्ण आदरांजली वाहतो.

सन्माननीय सदस्यांनी स्तब्ध उभे राहून शोक प्रस्ताव संमत करावा अशी माझी विनंती आहे.

(सदस्य उभे राहतात.)

सदस्यांनी खाली बसावे.

शोक प्रस्ताव संमत करण्यात आला आहे. प्रस्तावाची एक प्रत शोकाकुल कुटुंबीयांकडे पाठविण्यात येईल.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

म.वि.प.नियम 289 च्या प्रस्तावाबाबत.

सभापती : माझ्याकडे कालच्या एक दोन आणि आजची एक अशी मिळून म.वि.प. नियम 289 अन्वयेच्या एकूण 3 प्रस्तावाच्या सूचना आल्या आहेत. यात सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांचा देखील प्रस्ताव आहे. सिडकोच्या माध्यमातून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना साडेबारा टक्के जमीन देण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. सिडकोच्या माध्यमातून अजून जमीन मिळालेली नाही. जेएनपीटीचे असे म्हणणे आहे की, सिडकोने आम्हाला जमीन दिलेली नाही. आम्ही त्यांची जमीन संपादित केलेली नाही. त्यामुळे 289 च्या प्रस्तावान्वये जी सूचना दिली आहे त्यावर सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी आपले म्हणणे अगदी थोडक्यात मांडावे.

श्री.जयंत प्र.पाटील : सभापती महोदय, जेएनपीटीमध्ये ज्यांची जमीन गेली त्या शेतकऱ्यांना साडेबारा टक्के दराने जमीन परत देण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला. त्याची मध्यस्थी या देशाचे माननीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांनी केली होती. गेले वर्षभर याची अंमलबजावणी होत नाही. आज जेएनपीटीच्या गेटवर 50 हजार शेतकरी बसले आहेत. त्यांची मागणी पूर्ण होईपर्यंत ते गेटवरून उठणार नाहीत असे त्यांचे म्हणणे आहे. हा सर्व पक्षीय निर्णय आहे. आज शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने 50 हजार शेतकरी जेएनपीटीच्या गेटवर बसले आहेत. उद्या काँग्रेस आणि परवा राष्ट्रवादी काँग्रेस निदर्शन करणार आहे. यासंबंधी सर्व पक्षीय निर्णय घेतलेला आहे. शेतकऱ्याची जमीन सिडकोने घेतली. सिडकोने ती जमीन जेएनपीटीला दिली. त्यामुळे सिडको म्हणते की, साडेबारा टक्केचा खर्च जेएनपीटीने केला पाहिजे. हे जेएनपीटीने देखील मान्य केले आहे. पण त्याची प्रत्यक्षपणे अंमलबजावणी होत नाही. तेव्हा याबाबत राज्य शासनाने तातडीने लक्ष घालून शेतकरी करीत असलेले निदर्शन थांबवावे व शेतकऱ्यांना न्याय देण्याच्या दृष्टीने सभागृहा समोर असलेले आजचे कामकाज बाजूला सारून यावर चर्चा करावी अशी मी या 289 च्या प्रस्तावाद्वारे मागणी करीत आहे.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील यांनी नियम 289 अन्वये प्रस्तावाची जी सूचना दिली आहे तिला पाठिंबा देण्यासाठी मी उभा आहे.

...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

या विषयामध्ये भूमीपुत्र आणि प्रकल्पग्रस्तांची लढाई फार पूर्वीपासून सुरू आहे. गेली 27 वर्षे हे प्रकल्पग्रस्त लढाई लढत आहेत. सदर आंदोलन 1984 मध्ये सुरू झाले. यामध्ये 5 जणांना हौतात्म्य प्राप्त झालेले आहे. अजून देखील या प्रकल्पग्रस्तांचा साडेबारा टक्केचा प्रश्न सुटलेला नाही. हा विषय रायगडसह महाराष्ट्रातील अन्य प्रकल्पग्रस्तांच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचा आहे. त्यामुळे या विषयाला तातडीने न्याय मिळाला पाहिजे. आज तेथे बेमुदत धरणे-आंदोलनासाठी शेतकरी, प्रकल्पग्रस्त बसलेले आहेत. त्यांना न्याय देण्याकरिता शासनाने तातडीने निर्णय घ्यावा. केंद्र सरकारशी बोलून शेतकऱ्यांना न्याय मिळवून द्यावा. त्यामुळे या विषयावर आपण दिवसभर चर्चा करावी व सभागृहासमोर असलेले आजचे कामकाज बाजूला सारून प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या प्रश्नाला न्याय मिळवून द्यावा अशा प्रकारची मी मागणी करतो.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, नियम 289 अन्वये प्रस्ताव दिल्यानंतर त्यावर चर्चा करावी अशातला हा भाग नाही. उरण हे हाकेच्या अंतरावर आहे. तेथे जेएनपीटी आहे. तेथे आज शेतकरी एकेरीवर येऊन बसले आहेत. ते शेतकरी आपल्या हक्कासाठी वर्षानुवर्षे लढत आहेत. सरकार मध्ये असलेले दोन्ही पक्ष आम्ही तुमच्या बरोबर आंदोलनात सामील होतो असे कसे काय सांगत आहेत ? त्यामुळे मला शासनाची मानसिकताच समजत नाही. प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांचा प्रश्न सोडवायचा सोडून आम्ही तुमच्यामध्ये बसतो, तुमच्या आंदोलनात उतरतो असे सांगणे हे सरकारला भूषणावह आहे काय ? हा प्रश्न सोडविण्यासाठी वेगळ्या चर्चेची आवश्यकता देखील नाही. शासनाने सांगावे की, आम्ही तातडीने बैठक बोलावतो. 1984 पासून प्रकल्पग्रस्त शेतकरी मागणी करीत आहे. आता प्रश्न सरकारचा आहे. जेएनपीटीने साडेबारा टक्के जमीन देण्याचे कबूल केले आहे. त्यामुळे ते काम त्यांच्याकडून ताबडतोबीने करून घेतले पाहिजे. काँग्रेस-राष्ट्रवादी काँग्रेसने तेथे बसणे हे भूषणावह आहे काय ? आमचा तेथे नंबर लागण्याचा प्रश्नच येत नाही. खरे तर हा प्रश्न सोडविला गेला पाहिजे. त्यामुळे शासनाने सांगितले पाहिजे की, हे अधिवेशन संपण्याच्या आधी या प्रश्नाचा 100 टक्के निकाल लागला जाईल आणि सहा महिन्यामध्ये अंमलबजावणी होईल. अशा प्रकारचे धोरण शासनाने स्वीकारले पाहिजे. तसे धोरण स्वीकारले नाही तर हे असेच चालू राहील. ते बरोबर नाही.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.अजित पवार (उप मुख्यमंत्री) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.जयंत प्र.पाटील साहेब, सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते साहेब यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे, त्याबद्दल आजच राज्य शासनाच्या वतीने कॅबिनेट मंत्री महोदयांना दिल्लीला चर्चा करण्यासाठी पाठविलेले आहे. एक गोष्ट खरी आहे की, याबद्दल निर्णय झालेला असतानाही याला विलंब लागणे योग्य नाही. म्हणून माझी आपल्यामार्फत सभागृहाला विनंती आहे की, याबद्दल चर्चा घडवून आणण्याऐवजी याबाबतीत लवकर निर्णय कसा घेतला जाईल यादृष्टीने शासनाच्या वतीने प्रयत्न केला जाईल. आजच सकाळी सन्माननीय जलसंपदा मंत्री श्री.सुनील तटकरे यांना सन्माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार साहेबांशी चर्चा करण्याकरता पाठविलेले आहे. त्या अनुषंगाने तेथे कोणकोणती चर्चा होते आणि त्याबाबत अंतिम निर्णय काय होतो याबद्दल सभागृहाला उद्या अवगत केले जाईल.

---

2 आय-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

नियम 289 अन्वये देण्यात आलेल्या प्रस्तावाच्या सूचनेसंबंधी

सभापती : काल दिनांक 26 मार्च 2012 रोजी सकाळी 9 वाजून 2 मिनिटांनी श्री.जयंत प्र.पाटील, वि.प.स. तसेच 9 वाजून 25 मिनिटांनी सर्वश्री. विनोद तावडे, दिवाकर रावते, पांडुरंग फुंडकर, रामदास कदम, जयंत प्र.पाटील, संजय केळकर, डॉ.दीपक सावंत, सर्वश्री.प्रीतमकुमार शेगांवकर, चंद्रकांत पाटील, डॉ.नीलम गोऱ्हे, श्रीमती शोभा फडणवीस, सर्वश्री.परशुराम उपरकर, केशवराव मानकर, रामनाथ मोते, सय्यद पाशा पटेल, डॉ.रणजित पाटील, वि.प.स. यांनी सभागृहाचे सर्व कामकाज बाजूला ठेऊन "दिवेआगार (तालुका श्रीवर्धन, जिल्हा रायगड) येथील सोन्याची गणेश मूर्ती अज्ञात दरोडेखोरांनी दरोडा टाकून लुटून नेणे व मंदिराच्या पहारेकऱ्यांना जबरदस्त मारहाण केल्यामुळे एका पहारेकऱ्याला प्राणही गमवावे लागणे" या विषयावर नियम 289 अन्वये प्रस्तावाची सूचना दिली होती. या नियम 289 च्या सूचनेवर मी माझा निर्णय आज सकाळी देईन असे सांगितले होते.पण हा विषय नियम 289 अन्वये कसा होतो या बाबतीत माननीय विरोधी पक्षनेत्यांनी आपले म्हणणे मांडावे.

. . . .2 आय-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, दि.17 नोव्हेंबर 1997 रोजी नारळ, सुपारीच्या बागेमध्ये श्रीमती द्रौपदीबाई धर्मा पाटील या मावशींना गणपतीची सुवर्ण मूर्ती असलेली पेटी सापडली आणि ती त्यांनी ग्रामस्थांसमोर उघडून दाखविली आणि त्यांनी विश्वासाने ही सुवर्ण मूर्ती त्यांच्या कडे सुपूर्द केली. त्यानंतर त्या निर्धास्त होत्या की, यापुढे गणरायाची नीट पूजा होईल, सुरक्षा केली जाईल अशा विश्वासाने त्यांनी संबंधितांकडे ती सोपविली. परंतु दिवेआगारच्या देवळामध्ये जी मूर्ती होती ती नेण्यासाठी दरोडेखोरांनी तेथील जे सुरक्षा रक्षक होते, त्यांना मारहाण केली आणि ती मूर्ती पळविली. मात्र सुरक्षा रक्षकांना केलेल्या मारहाणीमध्ये श्री.घरशी नावाच्या एका सुरक्षा रक्षकाचा मृत्यू झाला. त्याठिकाणी मी स्वत: तसेच सन्माननीय सदस्य श्री.संजय केळकर, विधान सभेतील शिवसेना पक्षाचे सन्माननीय सदस्य आणि स्थानिक नेते तेथे आले होते. मग आम्ही सर्वांनी तेथील स्थानिक ग्रामस्थांबरोबर, देवस्थानच्या मंडळींबरोबर तसेच पोलीस अधिकाऱ्यांबरोबर चर्चा केली. आम्ही महाराष्ट्रातील कायदा आणि सुव्यवस्थेबाबत अनेक वेळा विषय उपस्थित करतो. मग कुठे मुलींचे अपहरण झाले असेल, मारहाण झाली असेल किंवा बलात्कार झाला असेल असे प्रकार ऐकत असतो. पण केवळ राजकीय वाक्य म्हणून सांगावयाचे नाही पण खरोखरच या राज्यामध्ये देव सुरक्षित आहेत काय? असा प्रश्न निर्माण झालेला आहे. माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांना हे बोलणे खूपच राजकीय आहे असे वाटेल. काही महिन्यापूर्वी एकवीरा देवीच्या देवळावर सुध्दा अशाच प्रकारे सशस्त्र दरोडा घालण्याचा प्रयत्न झाला होता, पण तेथील सुरक्षा रक्षकांमुळे तो प्रसंग टळला.

सभापती महोदय, दिवेआगार येथील सोन्याची गणेश मूर्ती हा ॲन्टीक पीस आहे आणि एखाद्या महिलेला ही मूर्ती सापडल्यानंतर ती शासनाच्या स्वाधीन करते आणि शासन त्याच्या सुरक्षेसाठी व्यवस्था करील अशी तिला अपेक्षा असते. परंतु पोलीस प्रशासन असे सांगते की, हा संस्थांनचा विषय आहे.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे..

राज्यात कायदा व सुव्यवस्थेबाबत चिंता होत असताना अशा पध्दतीने देवळातील सोन्याची मूर्ती चोरली जाते आणि यामध्ये आंतरराष्ट्रीय टोळीचा सहभाग असण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे म्हणून आम्ही हा विषय या माध्यमातून उपस्थित केलेला आहे. यामध्ये सर्वसामान्य जनतेच्या तसेच भाविकांच्या भावना गुंतलेल्या आहेत. सरकारने केलेला हलगर्जीपणा त्यांना जाणवत आहे. तेव्हा या प्रश्नावर सरकारने काय प्रगती केली आहे याची माहिती आम्हाला मिळाली पाहिजे. या सोन्याच्या मूर्तीच्या चोरीमागे आंतरराष्ट्रीय टोळी असण्याची शक्यता वर्तविण्यात येत असल्यामुळे ही मूर्ती लवकरच विदेशामध्ये जाऊ शकते आणि मग ती मूर्ती आणणे आपल्या हाता पलीकडे जाईल. तेव्हा या बाबत लवकरात लवकर तपास झाला पाहिजे. सीसीटीव्हीमध्ये आढळून आलेल्या फुटेजमध्ये ती स्थानिक माणसे नसल्याचे पोलीस अधिकारी सांगत आहेत. तेव्हा या प्रश्ना संबंधी सरकारने काय प्रगती केली आहे हे या सभागृहाच्या माध्यमातून जनतेला समजले पाहिजे. आता देव देखील सुरक्षित नाहीत अशी भाविकांची भावना झालेली आहे. तेव्हा या संदर्भात सरकारने निवेदन करावे अशी माझी विनंती आहे.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये अनेक श्रध्दास्थाने आहेत. त्यामध्ये सातारा जिल्ह्यातील मांढरदेवी, पुणे जिल्हयामध्ये पांरुडेश्वर जुन्नर तालुका, राजगुरु नगरमध्ये खंडोबा, त्याच बरोबर धूपपातेश्वर, जैन मंदिर, एकवीरा देवी, देहू येथील तुकाराम मंदिरातील मुखवटा इत्यादी ठिकाणी चोऱ्या झालेल्या आहेत. हा राजकारणाचा विषय नसला तरी हा सर्वांच्या श्रध्दास्थानाचा विषय आहे. म्हणून मी सभागृहात गणेश मूर्ती आणलेली आहे. आपण गणेशाला संरक्षण देऊ शकत नाही तर गणेश आपले कसे संरक्षण करणार असे साकडे आज महाराष्ट्रभर गणेशभक्त पक्षाच्या पलीकडे जाऊन घालत आहेत. मी स्वत: गणरायाला नियम 289 बरोबर येण्यासाठी विनंती केलेली आहे. मंदिरातील मूर्तीची चोरी करणारे जे नराधम आहेत त्यांच्यावर कडक कारवाई झाली पाहिजे. जेणेकरुन आम्हाला पुन्हा अशा प्रकारचे 289 अन्वये प्रस्ताव उपस्थित करता येऊ नयेत, अशी आमची अपेक्षा आहे.

सभापती : ही अतिशय गंभीर घटना आहे. या ठिकाणी गृह राज्यमंत्री उपस्थित आहेत. त्यांनी याबाबत सभागृहाला अवगत करावे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, घडलेली घटना अतिशय दुर्दैवी आहे. या संदर्भात तपास पथके तयार करण्यात आली असून त्यांना आजूबाजूच्या जिल्ह्यांमध्ये तसेच राज्यांमध्ये शीघ्र गतीने तपास करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. या संदर्भात परराज्यातील टोळ्या सक्रीय होत्या काय या बाबत तपास करण्यास सांगण्यात आले आहे. सीसीटीव्हीच्या माध्यमातून जे फूटेज उपलब्ध झालेले आहे त्या माध्यातून देखील तपास सुरु आहे. तसेच सर्व धार्मिक स्थळांबाबत करावयाच्या उपाय योजनांचे पालन करण्याबाबत सूचना देण्यात आल्या आहेत. तेथील ट्रस्टची जबाबदारी असावी..

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती : मी माननीय राज्यमंत्री महोदयांना सांगितले आहे की, आपल्याकडे जी माहिती उपलब्ध आहे ती सभागृहाला द्यावी. त्यानंतर या संदर्भात काही सूचना द्यायच्या असतील तर त्या मी वेगळ्या देईन.

एकंदरीत चोरीचा घडलेला प्रकार अतिशय गंभीर आहे. कोकण विभागातील सर्व सामान्य जनतेला त्यांचे दैवत चोरीला गेल्याचे दु:ख झालेले आहे. महाराष्ट्रामध्ये त्याबाबत एक वेगळी सद्भावना आहे. माननीय गृह राज्यमंत्री महोदयांनी येथे थोडे निवेदन केले आहे. त्यांनी या संदर्भात सविस्तर निवेदन सभागृहात सादर केले तर त्यावर एक-दोन प्रश्न विचारता येतील.

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, सभागृह संपण्यापूर्वी निवेदन करावे अशी विनंती आहे.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, या प्रकरणातील तपास सुरु आहे...

(विरोधी पक्षातील अनेक सन्माननीय सदस्य एकाचवेळी जागेवर उभे राहून बोलण्याचा प्रयत्न करीत असतात.)

सभापती : मी माननीय राज्यमंत्री महोदयांना सांगू इच्छितो की, त्यांनी या प्रकरणी काय तपास सुरु आहे याबाबत निवेदन केले. त्या व्यतिरिक्त आणखी काही माहिती द्यावयाची असेल तर ती माहिती सभागृहाला द्यावी.

श्री.सतेज उर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, ठीक आहे.

-------- यानंतर कु.थोरात..

अशुद्धीरत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी "राज्य शिक्षण मंडळाने इयत्ता 5 वी च्या नवीन अभ्यासक्रमात हिंदी विषय बंद केला आहे. तसेच इंग्रजी आणि अन्य माध्यमातील मराठी (दुसरी भाषा) या विषयाची पुस्तके अत्यंत दुर्बोध करुन ठेवली आहेत. राज्याच्या त्रिभाषा सूत्राच्या धोरणात अचानक बदल करुन मराठी माध्यमांच्या लक्षावधी विद्यार्थ्यांचे नुकसान करण्यात आले आहे. देशाची संपर्क भाषा, चित्रपट उद्योग आणि इलेक्ट्रॉनिक माध्यमे यातील व्यावसायिक संधीपासून मराठी विद्यार्थी वंचित होणार आहेत. हिंदी विषय माध्यमिक स्तरावर कायम ठेवण्याची आवश्यकता आहे, मराठी सुलभ व आनंददायी करण्याची आवश्यकता आहे. हिंदी-संस्कृत याप्रमाणे हिंदी-उर्दू, हिंदी-पाली या पध्दतीने द्वितीय भाषेमध्ये अनेक जोड पर्याय देण्याची आवश्यकता आहे. हिंदी आणि अन्य माध्यमातून मराठी हद्दपार करण्याचे कारस्थान होत असणे" या विषयाच्या संदर्भात नियम 289 अन्वये प्रस्ताव दिलेला आहे. हा विषय नियम 289 अन्वये कसा होतो या बाबत सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी आपले म्हणणे मांडावे.

श्री. कपिल पाटील : सभापती महोदय, राज्य शासनाच्या भाषा धोरणाच्या संदर्भात एका मूलभूत मुद्याकडे लक्ष वेधण्याकरिता मी हा नियम 289 अन्वयेचा प्रस्ताव दिलेला आहे.

सभापती महोदय, त्रिभाषा सूत्राचे राज्य शासनाचे धोरण असताना राज्य शिक्षण मंडळाने त्याला बगल देऊन इयत्ता पाचवी पासून संबंध अभ्यासक्रमातून हिंदी हा विषय काढून टाकलेला आहे. त्यामुळे या राज्यातील मराठी भाषिक विद्यार्थ्यांना जी हिंदी भाषा शिकण्याची संधी असते आणि जी अनेक व्यवसायामध्ये संधी उपलब्ध करुन देते, तो विषयच बाद केलेला आहे. कोणतीही चर्चा न करता अशा प्रकारचा निर्णय घेतलेला आहे या प्रश्नाकडे मला या निमित्ताने सभागृहाचे लक्ष वेधावयाचे आहे.

सभापती महोदय,चित्रपट उद्योग असो वा इलेक्ट्रॉनिक माध्यम असो या सगळया माध्यमांमध्ये रोजगाराच्या अनेक संधी या विषयामुळे मिळू शकतात. इंग्रजी आणि अन्य माध्यमांच्या शाळांमध्ये मराठी हा विषय इतका दुर्बोध करुन ठेवलेला आहे की, विद्यार्थ्यांनी मराठी हा विषयच सोडून द्यावा. अतिशय चुकीच्या पध्दतीने या दोन्ही बाबतीत अधिकारी पातळीवर निर्णय घेतला

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. कपिल पाटील...

गेला आहे. मला वाटते कदाचित मंत्री महोदयांना सुध्दा याची कल्पना असू शकत नाही. सबंध भाषा धोरणाची वासलात लावलेली आहे. राज्य शासनाच्या धोरणात्मक मुद्याचा हा प्रश्न आहे. लक्षावधी आणि कोट्यवधी विद्यार्थ्यांशी निगडीत, त्यांच्या भवितव्याशी निगडीत असा हा प्रश्न आहे.त्यामुळे या प्रश्नाची चर्चा या सभागृहात झाली पाहिजे. हिंदी हा विषय असलाच पाहिजे पण त्याचबरोबर हिंदी-संस्कृत, हिंदी-पाली, हिंदी-उर्दू अशा प्रकारचे जोड पर्याय उपलब्ध करुन दिले पाहिजेत जेणेकरुन अनेक पर्याय विद्यार्थ्यांना उपलब्ध होऊ शकतील. इंग्रजी आणि अन्य माध्यमांच्या शाळांमधील मराठी हा विषय आनंददायी,सोपा आणि सुलभ झाला पाहिजे या दृष्टीने मराठी या पुस्तकाची रचना झाली पाहिजे. एकाच वेळेला मराठी विषयाला मारायचे आणि मराठी विद्यार्थ्यांच्या संधीला सुध्दा मारायचे अशा पध्दतीचे कारस्थान शिजले आहे म्हणून या विषयावर या सभागृहात चर्चा झाली पाहिजे आणि शासनाने यासंदर्भातील आपली भूमिका स्पष्ट केली पाहिजे म्हणून मी हा नियम 289 अनव्येचा प्रस्ताव या ठिकाणी दिलेला आहे.

श्री. दिवाकर रावते : सभापती महोदय, नियम 289 अन्वये जो प्रस्ताव या ठिकाणी मांडण्यात आलेला आहे तो नियम 289 अन्वयेच्या प्रस्तावापेक्षा गंभीर आहे. शेवटी कुठलेही राज्य, कुठलाही देश आणि कुठल्याही समाजाची संस्कृती ही भाषेवर अवलंबून असते. हे राज्य मराठी राज भाषेचे असतानाच इंग्रजी भाषेचा पगडा कसा बसेल या दृष्टिकोनातून शिक्षण प्रवृत्ती लादली जात आहे. त्याकरता हिंदी भाषेचा खातमा करण्याचा हा प्रयोग अत्यंत गंभीर आहे. आपण सर्वजण आपल्या लहान वयात मराठी शिकत असताना थोडे-थोडे हिंदी देखील शिकत होतो. घटनेच्या कलम 341, 342 आणि 343 अनुसार राज्यामध्ये कोणतीही भाषा असली तरी त्या ठिकाणी हिंदीचे काय स्थान असावे हे सांगण्यात आलेले आहे. या देशामध्ये प्रत्येक राज्याची आपली मातृभाषा आहे आणि त्यानंतर घटनेने जिला राष्ट्र भाषेचा दर्जा मिळाला नाही तरी देखील संपर्क भाषा म्हणून हिंदी भाषेचा वापर केला गेला पाहिजे अशा प्रकारचे बंधन घातलेले आहे. इंग्रजी त्यातील एक भाषा आहे पण ती अनिवार्य नाही. महाराष्ट्रामध्ये हिंदी भाषेला काढावयाचे, मराठी भाषेला मारावयाचे आणि इंग्रजीला वरती नेऊन तारावयाचे अशा प्रकारची जी कुटील रणनीति आखलेली आहे ती अत्यंत गंभीर आहे, भेदक आहे, ती ताबडतोब बंद झाली पाहिजे. या संदर्भातील शासनाचे धोरण पुढे येणे महत्वाचे आहे.

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. दिवाकर रावते...

सभापती महोदय, तातडीने सर्व विषय बाजूला सारुन या विषयावर चर्चा करावी इतका हा विषय गंभीर आहे. या राज्याचा कारभार, या राज्याचे शिक्षण, या राज्याचा समाज, या राज्याचे विद्यार्थी कसे घडवणार एवढा हा मूलभूत प्रश्न आहे. त्यामुळे या प्रस्तावावर चर्चा व्हावी अशी आमची अपेक्षा आहे. पण सभागृहासमोरील कामकाजाची मला कल्पना आहे. म्हणून मी या ठिकाणी विनंती करतो की, सभागृहासमोरील आजच्या कामकाजाचे महत्व लक्षात घेऊन या विषयाकरिता स्वतंत्र अशा प्रकारची चर्चा देणे अत्यंत आवश्यक आहे. ही घटनात्मक बाब आहे म्हणून सभापती महोदय, मी आपल्याला विनंती करतो की, आपण याचा आवश्यक विचार करावा.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, अत्यंत गंभीर विषय या सभागृहात चर्चेला आलेला आहे. 1964 सालापासून शासनाने त्रिभाषा सूत्र स्वीकारलेले आहे. हिंदी भाषा ही राष्ट्र भाषा आहे. संपर्काची भाषा आहे.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते ...

आणि अशा या महत्वाच्या राष्ट्रभाषेला आपण अभ्यासक्रमातून वगळणे योग्य नाही. आता शिक्षण मंडळाने जो पुनर्रचित अभ्यासक्रम तयार केलेला आहे त्यामध्ये खरोखरच हिंदी विषय त्यांनी काढून टाकलेला आहे. आठवीपासून हिंदी विषय राहील असा शासनाने धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे. लाखो पालकांनी आणि विद्यार्थ्यांनी त्यांच्या सह्यांचे निवेदन राज्य शासनाला दिलेले आहे. म्हणून या निमित्ताने माझी विनंती आहे की, हिंदी विषयाच्या संदर्भात राज्य शासनाने किंवा शिक्षण मंडळाने जो धोरणात्मक निर्णय घेतलेला आहे तो बदलण्याची आवश्यकता आहे. त्याचा फेरविचार करण्याची आणि पूर्वीप्रमाणेच हिंदी हा विषय अभ्यासक्रमामध्ये ठेवण्याची नितांत आवश्यकता आहे. म्हणून या संदर्भात चर्चा व्हावी अशी माझी नम्र विनंती आहे.

सभापती : सन्माननीय मंत्री महोदय श्री. ढोबळे साहेब यांना विचारु इच्छितो की, या ठिकाणी सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी मांडलेला विषय अतिशय महत्वाचा आहे. या संदर्भातील चर्चेच्या अनुषंगाने शासनाचे काय मत आहे ?

प्रा. लक्ष्मण ढोबळे : सभापती महोदय, चर्चा घेण्यास हरकत नाही.

सभापती : सन्माननीय सदस्य श्री. कपिल पाटील यांनी मांडलेला विषय मला समजलेला आहे. सन्माननीय सदस्य सर्वश्री दिवाकर रावते, रामनाथ मोते यांनी या विषयाचे गांभीर्य सदनामध्ये सांगितलेले आहे. माननीय मंत्री महोदय प्रा. ढोबळे साहेब यांनी या संदर्भात चर्चा व्हावी असे सांगितलेले आहे. सन्माननीय सदस्यांनी नियम 289 अन्वये दिलेल्या प्रस्तावाच्या सूचनेतील विषय जरी आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत नसला तरी मी या गंभीर विषयाच्या बाबतीत चर्चा घडवून आणण्याचे ठरविले आहे. ही चर्चा कधी घ्यावयाची तसेच या चर्चेसाठी किती वेळ द्यावयाचा या बाबतचा निर्णय मी घेईन परंतु या विषयाच्या संदर्भात चर्चा घेण्याचे मी ठरविले आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: नियम 93 अन्वये सूचना

सभापती : आज नियम 93 अन्वये ज्या सूचना आलेल्या आहेत त्यामध्ये सन्माननीय सदस्य श्रीमती शोभा फडणवीस, श्री. विनोद तावडे यांनी "चंद्रपूर जिल्ह्यातील ताडोबा व्याघ्र प्रकल्पातील मोहुर्ली व कोळसा वनपरिक्षेत्रात दिनांक 16.3.2012 ला व त्यानंतर आग लागून 2700 हेक्टर जंगल जळून खाक होणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री नागो पुंडलिक गाणार, नितीन गडकरी, रामनाथ मोते, डॉ. रणजित पाटील, भगवान साळुंखे यांनी "इंदिरा गांधी माध्यमिक कन्या विद्यालय, कळमेश्वर, जि. नागपूर या शाळेत 27 वर्षे झाली तरी सोयीसुविधाचा अभाव व गैरप्रकाराबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री पांडुरंग फुंडकर, संजय केळकर, केशवराव मानकर यांनी "अंधेरी येथील जुहू गल्लीजवळ वायरलेस रोडवर नवभारत सोसायटी ही झोपडपट्टी या जमिनीवर सन 1991 पासून म्हाडाकडून भाडेतत्वावर असून एस.आर.ए. अंतर्गत विकासकास देणे, या रहिवाशांमध्ये जवळपास 75 टक्के लोक अल्पसंख्यांक असून विकासकाकडून त्यांच्यावर अन्याय करणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री चंद्रकांत पाटील, विनोद तावडे, भगवान साळुंखे यांनी "राज्यातील शेतकऱ्यांना एक लाख रुपयांपर्यंतचे बिनव्याजी आणि तीन लाखापर्यंतचे दोन टक्के व्याजाने कृषी कर्ज देण्याची योजना दोन वर्षापूर्वी होऊनही त्याची अद्याप अंमलबजावणी न होणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभापती .....

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री केशवराव मानकर, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, डॉ. रणजित पाटील यांनी "राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियान अंतर्गत राज्यातील जिल्हा, उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयांमध्ये नियुक्त केलेल्या पदवीधर 'आयुष' डॉक्टरांकरिता सोयीसुविधा पुरविण्याबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्या डॉ. नीलम गोऱ्हे यांनी "पुणे शहरातील हडपसर भागातील सर्व बीआरटी मार्गावर होत असलेल्या खाजगी वाहन चालकांच्या मनमानी वाहतुकीबाबत तसेच महानगरपालिकेचे व वाहतूक पोलिसांचे होत असलेले दुर्लक्ष" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य श्री. परशुराम उपरकर यांनी "सिंधुदुर्ग जिल्ह्यात दोन दिवसापूर्वी शिरोडा येथे लोहखनिज वाहतूक करणाऱ्या डंपरचा अपघात होणे, दोडामार्ग तालुक्यातून प्रतिदिन सुमारे 500 ते 1000 डंपर लोहखनिज वाहतूक करत असताना भरधाव गाड्या धावत असल्याने गेल्या वर्षभरात या रस्त्यावर अपघात होऊन 10 ते 15 ग्रामस्थांना जीव गमवावा लागणेबाबत " या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

यानंतर सन्माननीय सदस्य सर्वश्री विनोद तावडे, चंद्रकांत पाटील, संजय केळकर, रामनाथ मोते यांनी "रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील आंबा बागायतदारांच्या झालेल्या आर्थिक नुकसानीमुळे त्यांना शासनाने आर्थिक मदत देणेबाबत" या विषयावर नियम 93 अन्वये सूचना दिली आहे. तो नियम 93 चा विषय होत नसल्याने, मी सूचनेस अनुमती नाकारीत आहे. मात्र या विषयावर शासनाने निवेदन करावे.

इतर सूचनांना मी दालनात अनुमती नाकारलेली आहे.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

<u>नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 1 बाबत</u>

सभापती : नियम 93 अन्वयेच्या सूचनेवरील निवेदन क्रमांक 1 नंतर घेण्यात येईल.

2.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

पृ.शी. / मु.शी. :गोंदिया जिल्ह्यात एका मुलीच्या विक्रीचे प्रकरण उघडकीस येणे याबाबत सर्वश्री केशवराव मानकर, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर, श्रीमती शोभाताई फडणवीस, श्री.जगदीश गुप्ता वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 3 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...3 ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.केशवराव मानकर : सभापती महोदय, अत्यंत महत्वाच्या विषयावर मी नियम 93 अन्वये सूचना दिली होती. पूर्व विदर्भ या भागात मुलींना आमिष देऊन, त्यांना फूस लावून पळविण्याचे प्रकार होत आहेत. या घटनेतील टोळीचा मुख्य सूत्रधार कोण आहे, अटक झालेल्या 6 आरोपींची नावे काय आहेत, या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे आणि अशा प्रकरणांना आळा बसण्यासाठी शासन कोणती उपाययोजना करीत आहे ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मुख्य 6 आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. यापैकी दोन आरोपींना 21 मार्चपर्यंत व तिघांना 29 फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडी मिळाली होती. संबंधित फिर्यादीच्या तक्रारीवरुन संबंधित लोकांना अटक करण्यात आली होती.

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. / मु.शी. :मुंबईहून सोलापूरकडे गॅस घेऊन जाणारा टँकर उलटल्याने झालेली गॅस गळती याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्य मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून, आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी निवेदन क्रमांक 2 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...5...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KTG/ KGS/

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, मुंबई-पुणे किंवा पुणे-सोलापूर या महामार्गांवर गॅस गळतीच्या घटना नेहमी होत असतात. सोलापूरकडे जाताना ही घटना घडलेली आहे. अशा महामार्गांवर संपूर्ण 180 कि.मी.च्या परिसरात गॅस, तेल गळती झाल्यास कंपनीचे लोक पोहोचण्यापूर्वी काय केले पाहिजे याबाबत रस्ते विकास महामंडळ, परिवहन विभाग व मुंबई-पुणे रस्ते विकास महामंडळ यांच्या माध्यमातून डिझास्टर मॅनेजमेंट सेंटर प्रत्येक 50 कि.मी.अंतरावर निर्माण केले जाईल काय ? मुंबई-पुणे किंवा अन्य महामार्गावर तेल किंवा गॅस गळती झाली तर त्याची माहिती नकाशासहित येईल म्हणजे 50 कि.मी.च्या परिसरातील लोकांना त्याबाबतची दक्षता घेता येईल. अशा प्रकारची उपाययोजना शासन करील काय ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, गॅस गळतीचा विषय अत्यंत महत्वाचा आहे. नॅशनल डिझास्टर मॅनेजमेण्टच्या गाईड लाईन्स ऑईल इंडस्ट्री डायक्टोरेटच्या माध्यमातून वाहतुकीसाठी कोणत्या उपाययोजना केल्या पाहिजेत यासंबंधी त्यांनी सूचना दिलेल्या आहेत. भारत पेट्रोलियम, हिंदुस्थान पेट्रोलियम किंवा इंडियन ऑईल या कंपन्यांचे महाराष्ट्रात 22 प्लान्ट आहेत. या प्लान्टच्या माध्यमातून संपूर्ण राज्यात या बाबींचा पुरवठा केला जातो. यासाठी इमर्जन्सी रिस्पॉन्स व्हॅन असणे गरजेचे आहे. व्हेइकल ट्रॅकिंग सिस्टीम असेल किंवा थर्ड पार्टी इन्सपेक्शन असेल त्यांची एक नियमावली अस्तित्वात आहे. या नियमावलीचे काटेकोरपणे पालन होण्यासाठी या कंपन्यांना सूचना देण्यात येतील. इमर्जन्सी रिस्पॉन्स व्हॅन किती असाव्यात यासाठी नियोजन करण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : इमर्जन्सी रिस्पॉन्स व्हॅन कधीपासून कार्यरत होतील ?

श्री.सतेज ऊर्फ बंडी डी.पाटील : इमर्जन्सी रिस्पॉन्स व्हॅनची संपूर्ण जबाबदारी तेल कंपन्यांची आहे. राज्यातील कायदा व सुव्यवस्था राखण्याची जबाबदारी पोलिसांची आहे. पण अशी घटना घडू नये यादृष्टीने नॅशनल डिझास्टर मॅनेजमेण्टच्या गाईड लाईन्सप्रमाणे या तेल कंपन्यांना शासन सूचना करीत आहे. नुकतीच झालेली ही घटना असेल किंवा भविष्यात अशा घटना घडू नयेत यासाठी गाईड लाईन्स दिलेल्या आहेत. त्याची जिल्हाधिकाऱ्यांमार्फत अंमलबजावणी केली जाते. या सगळ्यांचा समन्वय जिल्हा स्तरावर रहावा, या गाईड लाईन्सची अंमलबजावणी व्हावी यासाठी या सर्वांची बैठक घेऊन या संदर्भात ॲक्शन प्लॅन निश्चितपणे तयार केला जाईल.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./ मु.शी : गोंदिया जिल्हयातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी करावयाची उपाययोजना याबाबत सर्वश्री केशवराव मानकर, विनोद तावडे, पांडुरंग फुंडकर व श्रीमती शोभा फडणवीस, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

प्रा. लक्ष्मण ढोबळे (पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन क्रमांक 5 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. केशवराव मानकर : गोंदिया जिल्ह्यातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी 1 कोटी 91 लक्ष रु. खर्चाचा आराखडा सादर केलेला आहे. मागील वर्षी 1 कोटी रुपयाची मागणी केलेली होती. मागील वर्षी काही दिले नाही. या वर्षी 1 कोटी 91 लाख रु. दिलेले आहेत. या मधील पहिला टप्पा ऑक्टोबर ते डिसेंबर, दुसरा टप्पा जानेवारी ते मार्च आणि तिसरा टप्पा एप्रिल पासून सुरु होणार आहे. या प्रत्येक टप्प्याला शासनाने किती निधी दिलेला आहे ? या वर्षी 109.4 मिमी पाऊस पडला. सुरुवातीला आणि शेवटी पाऊस पडला नाही. हा पाऊस मध्यावर पडला आणि खूप पाणी वाहून गेले. पाणी टंचाई निवारणार्थ 229 विहिरींना मंजुरी दिलेली आहे. त्याबद्दल शासनास धन्यवाद. पाऊस मोठ्या प्रमाणावर पडत असला तरी भूजल पातळीमध्ये वाढ झालेली नाही. तेव्हा भूजल पातळीमध्ये वाढ होण्यासाठी काय उपाययोजना करण्यात येणार आहेत ?

श्री. लक्ष्मण ढोबळे :एप्रिल ते 12 जून या कालावधीमध्ये पाण्याची टंचाई भासण्याची शक्यता आहे. सन्माननीय सदस्यांनी जे टप्पे सांगितले त्यामध्ये दोन टप्प्यात कुठेही टँकर लावण्याची मागणी केलेली नाही. परंतु भूजल पातळी वाढविण्यासाठी शिवकालीन कार्यक्रम असो, मृदसंधारणाचा कार्यक्रम असो, एखाद्या स्त्रोताच्या वर पाझर तलाव देण्याचा विषय असो, गोंदिया जिल्ह्याचा जो आराखडा केलेला आहे त्यामध्ये 1 कोटी 91 लाख रुपयाची तरतूद केलेली आहे. जे शासकीय टँकर असतील ते सुस्थितीत करण्यास सांगितलेले आहे. टँकर उपलब्ध होत नसतील तर खाजगी निविदा मागवून टँकर देण्याची व्यवस्था करावी, असे सांगण्यात आलेले आहे. 253 गावे आणि 186 वाड्यांमध्ये 928 उपाययोजना करण्याचा आराखडा देखील तयार केलेला आहे. या आराखड्याप्रमाणे ही कामे चालू राहातील. सन्माननीय सदस्यांनी दिलेली माहिती विचारात घेता जर आणखी काही गावामध्ये पाण्याचे दुर्भिक्ष्य निदर्शनास आले तर त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्यासाठी उपाययोजना करण्याच्या बाबतीत, टँकर देण्याच्या बाबतीत, 10 लाखाच्या खर्चाच्या आतील पिण्याच्या पाण्याच्या योजनांच्या बाबतीत, पाईप रिप्लेस करण्याच्या योजना असतील तर त्याबाबतीत सन्माननीय सदस्यांनी केलेल्या सूचनांचा आदर केला जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./ मु.शी : कोल्हापूर जिल्ह्यातील 18 सहकारी बँका बुडण्याच्या मार्गावर असणे याबाबत डॉ. नीलम गो-हे, वि. प. स. यांनी दिलेली नियम 93 अन्वये सूचना.

श्री. प्रकाश सोळंके (सहकार राज्यमंत्री) : सभापती महोदय, नियम 93 अन्वये दिलेल्या सूचनेला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना अगोदरच वितरित केलेल्या असल्याने मी हे निवेदन क्रमांक 4 सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

...नंतर श्री. भोगले...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सूचना क्रमांक-4.....

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, उत्तरामध्ये दिलेल्या माहितीवरुन कोणाच्या खांद्यावर कोणाचे ओझे लादले आहे हे सिध्द होते. तिसऱ्या परिच्छेदामध्ये बँकेच्या संचालकांवर आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यासाठी कलम 88 ची कारवाई सुरु आहे असे म्हटले आहे. ही कारवाई केव्हा सुरु झाली आणि केव्हा संपणार आहे? किती संचालक या कारवाईमध्ये दोषी आढळले, त्यांच्यावर काय कारवाई केली आहे याचा तपशील दिला जाईल काय?

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, 25 नागरी सहकारी बँकांची कलम 83 अन्वये चौकशी सुरु आहे. 73 नागरी सहकारी बँकांच्या संचालकांवर आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करण्यासाठी कलम 88 अन्वये कारवाई सुरु आहे. कलम 83 आणि 88 अंतर्गत सुरु असलेल्या कारवाईसंबंधी सन्माननीय सहकार आयुक्त यांनी आढावा घेतला होता. मार्च महिन्यापर्यंत ही सगळी कारवाई पूर्ण झाली पाहिजे अशा त्यांनी सूचना दिलेल्या होत्या. परंतु मार्चपर्यंत ही कारवाई पूर्ण झाली नाही तरी मी सभागृहाला सांगू इच्छितो की, एका महिन्याच्या आत कलम 83 आणि 88 अंतर्गत सर्व चौकशी पूर्ण होऊन योग्य ती कारवाई केली जाईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, मंत्री महोदयांनी सांगितले की, मार्चपर्यंत कारवाई पूर्ण झाली नाही तरी एका महिन्यात पूर्ण करु. कोणाकोणावर कारवाई सुरु आहे याचा तपशील पटलावर ठेवण्यात येईल काय, ही कारवाई केव्हा पूर्ण होईल?

श्री.प्रकाश सोळंके : तपशील पटलावर ठेवण्यात येईल.

श्री.दिवाकर रावते : सभापती महोदय, जालना जिल्हा बँकेच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने भ्रष्टाचार सिध्द झाल्यामुळे 36 कोटी रुपये वसुलीचे आदेश दिले. या घटनेला दहा वर्षे उलटून गेली आहेत. मी कोणाचे नाव घेऊ इच्छित नाही. परंतु संबंधित संचालक राजकारण करीत आहेत, आराम करीत आहेत. 36 कोटी रुपये वसुलीबाबत विभाग काय कारवाई करणार आहे? अशा किती बँकांबाबत वसुली करण्याचे न्यायालयाने निर्णय दिले आहेत, वसुलीचे निर्णय देऊनही शासनाने काहीही कारवाई केली नाही, त्यांच्याकडून किती रक्कम वसुली करणे शिल्लक आहे, ती कशी वसूल करणार आहात?

.2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश सोळंके : सभापती महोदय, माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते यांनी जो प्रश्न उपस्थित केला तो जालना जिल्हा मध्यवर्ती बँकेबाबतचा असावा असे माझे मत आहे. ही नियम 93 अन्वये उपस्थित केलेली सूचना नागरी सहकारी बँकेबाबतची आहे. निश्चितपणे जो प्रश्न उपस्थित केला आहे तो वेगळा असला तरी त्या संदर्भातील माहिती घेऊन माननीय सदस्यांना कळविण्यात येईल.

सभापती : सभागृहाची बैठक आता मध्यंतरासाठी स्थगित होत आहे. सभागृहाची बैठक दुपारी 2.00 वाजता पुन्हा भरेल.

(सभागृहाची बैठक मध्यंतरासाठी दुपारी 1.33 ते 2.00 वाजेपर्यंत स्थगित झाली.)

--

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(मध्यंतरा नंतर)

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

<u>अहेरी , जि. गडचिरोली येथे नक्षलवाद्यांनी केलेल्या बॉम्बस्फोटात 13 जवानांचा झालेला मृत्यू</u>

श्रीमती शोभा फडणवीस : महोदय, मला आताच एक बातमी समजली की, अहेरी जि. गडचिरोली येथे नक्षलवाद्यांनी बॉम्ब ब्लास्ट केला व 13 जवान त्यात मारले गेले. यासंबंधीचे निवेदन शासनाने करावे व वस्तुस्थिती सभागृहाला अवगत करावी, अशी मी विनंती करते.

श्री. भास्कर जाधव : महोदय, ही अत्यंत गंभीर बाब असून तत्काळ माहिती घेऊन सभागृहाला वस्तुस्थिती अवगत करण्यात येईल.

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कोकणातील समुद्र किनारपट्टीवर मासेमारी करणा-या मच्छीमारांच्या विविध मागण्या

मु.शी.: : कोकणातील समुद्र किनारपट्टीवर मासेमारी करणा-या मच्छीमारांच्या विविध मागण्या यासंबंधी श्री. परशुराम उपरकर, वि.प.स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना

श्री. परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे माननीय मत्स्यव्यवसाय मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि याबाबत त्यांनी निवेदन करावे अशी विनंती करतो.

"कोकणातील समुद्र किनारपट्टीवर मासेमारी करणाऱ्या मच्छीमारांवर येत असलेली उपासमारीची पाळी, या मच्छीमारांनी घेतलेल्या नौकांची कर्जे फेडता न येणे, मच्छिमारी नौकांना डिझेल खर्चा इतके मासे न मिळणे, यामुळे अनेक मच्छीमारी नौका समुद्राबाहेर न काढता मच्छीमारी न करता तशाच उभ्या असणे, समुद्रातील मासे मिळण्याचे प्रमाण कमी होणे, मच्छीमारी करण्याकरिता आखण्यात आलेले नकाशे हे ब्रिटीशकालीन असल्याने त्यात सुधारणा करण्याबाबत मा.मंत्री महोदयांनी सभागृहात वारंवार आश्वासन देऊनही त्या आश्वासनांची पूर्तता न होणे, त्यामुळे मच्छीमारांनी शेतकऱ्याप्रमाणे कर्ज माफी करण्याची केलेली मागणी, मत्स्य व्यवसायाकरीता 4 टक्के दराने कर्ज मिळावे तसेच मच्छीमारी व्यक्तिरिक्त पर्यटनावर आधारित व्यवसायांना चालना देणे, सबसिडीव्दारे रॉकेल पुरवठा करणे, पर्सनेट मासेमारी बंद करण्याबाबत शासनाने निर्णय घेण्याची आवश्यकता, अशा विविध मागण्या करण्यात येणे, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

श्री. भास्कर जाधव (मत्स्य व्यवसाय राज्य मंत्री) : महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहासमोर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहासमोर ठेवण्यात आले आहे.

नि वे द न

प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे.

.....3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर : महोदय, मच्छीमारांच्या संदर्भात सभागृहात नियम 93 अन्वये सूचना, तारांकित प्रश्न तसेच लक्षवेधी सूचना अशा अनेक आयुधांच्या माध्यमातून प्रश्न उपस्थित करण्यात येतात. अशा प्रकारची एक लक्षवेधी सूचना दि. 9.6.2009 रोजी उपस्थित करण्यात आली होती. त्यात मच्छीमारांना सबसिडाईज्ड रॉकेल पुरवठा करण्याच्या संदर्भात विचारणा करण्यात आली होती. त्याला मंत्री महोदयांनी उत्तर दिले होते की, "नौका धारकांना अनुदानित रॉकेल मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे प्राप्त झाला आहे". पण अद्यापही त्याची अंमलबजावणी होत नाही. माझी मागणी आहे की, असे अनुदानित रॉकेल शासन मच्छीमारांना देणार काय ? त्याचबरोबर मच्छीमारांची मागणी आहे की, शासनाने मत्स्य दुष्काळ जाहीर करावा. हे करीत असताना मच्छीमारांचे मोजमाप करण्याच्या पध्दतीत शासनाने सन 1980 व 1987 मध्ये सुधारणा करुन त्या निर्णय घेतला पण ही पध्दत ब्रिटीश कालीन असल्याने तत्कालीन मंत्र्यांनी माहिती दिली होती की ही जुनी पध्दत बदलण्यासाठी समिती नेमण्यात येईल व त्या माध्यमातून शास्त्रशुध्द पध्दतीने हे मोजमाप करण्यात येईल, त्याचीही अंमलबजावणी किंवा तसा निर्णय झालेला नाही, असा निर्णय शासन घेणार आहे काय ? तसेच दि. 17.12.2011 रोजी सभागृहात एक प्रश्न उपस्थित करण्यात आला असता शासनाकडून उत्तर देण्यात आले की, पारंपरिक मच्छीमारांचे रक्षण करण्यात येईल. यासंदर्भात सुप्रीम कोर्टात शासनाची बाजू मांडतांना सांगण्यात आले होते की, फेब्रुवारी महिन्यात समितीचा अहवाल प्राप्त होईल. पण आता फेब्रुवारी महिना सुध्दा उलटून गेला. त्याचबरोबर सप्टेबर महिन्यात सुप्रीम कोर्टाची एक तारीख सुध्दा झाली. मंत्री महोदयांनी यासंदर्भात कोणत्या उपाययोजना केल्या ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ...

सभापती महोदय, इतर राज्यात पर्सनेट धारकांना 12 नॉटीकल मैला पर्यंत मासेमारी करता येत नाही त्यामुळे इतर राज्यांप्रमाणे आपल्या राज्यातही त्या प्रमाणे निर्णय घेतला जाणार आहे काय?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी पहिला प्रश्न मोजमाप करण्याचा उपस्थित केलेला आहे. सदर मोजमाप करण्याची पध्दत ही ब्रिटीशकालीन असल्यामुळे या पध्दतीचे पुनर्विलोकन झाले पाहिजे अशा प्रकारची अपेक्षा त्यांनी व्यक्त केलेली आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी मत्स्य दुष्काळाच्या संदर्भात प्रश्न उपस्थित केलेला आहे. मच्छीमारीची गेल्या सहा वर्षाची आकडेवारी पाहिली तर महसूल विभागाने ठरवून दिलेल्या दुष्काळ परिस्थितीचे जे परिमाण आहे त्या परिमाणामध्ये ही आकडेवारी बसत नाही असे स्पष्ट होते. सन्माननीय सदस्यांचा तिसरा प्रश्न हा पर्सनेटद्वारे मच्छीमारी केली जाते व या पध्दतीमुळे जे छोटे छोटे मच्छीमारी करणारे जी व्यावसायिक आहेत त्यांच्या व्यवसायावर परिणाम होतो. सन्माननीय सदस्यांचे जे मत आहे तसेच मत शासनाचे देखील आहे. पर्सनेटच्या द्वारे मच्छीमारी 12 फॅदमच्या आत करता येणार नाही यासंदर्भात शासनाने निर्णय घेतला होता. परंतु याला हाय कोर्टात चॅलेंज दिल्यानंतर हाय कोर्टाने पर्सनेट व्यावसायिकांच्या बाजूने निर्णय दिल्यानंतर शासनाच्या वतीने सुप्रीम कोर्टात चॅलेंज केले गेले. छोटया मच्छीमारांचे हिताचे रक्षण झाले पाहिजे अशीच शासनाची धारणा आहे.

श्री. किरण पावसकर : सभापती महोदय, कोकणातील छोटया मच्छीमारांवर उपासमारीची वेळ आलेली आहे. लक्षवेधी सूचनेच्या उत्तरामध्ये म्हटले आहे की, ही दुष्काळजन्य परिस्थिती नाही. मी आपले लक्ष वेधू इच्छितो की, सन 2005-2006 मधील मत्स्य उत्पादन 4.45 लक्ष मेट्रीक टन झाले होते व पुन्हा सन 2010-2011 मध्ये मत्स्य उत्पादन 4.47 लक्ष मेट्रीक टन झाले होते अशी माहिती दिलेली आहे. आपण सांगत आहात की, मागच्या तीन वर्षात मत्स्य उत्पादन 50 टक्क्यापेक्षा कमी असेल तर त्या परिस्थितीला दुष्काळजन्य म्हटले जाते. माझे एवढेच म्हणणे आहे की, सन 2006 ते 2011 पर्यंत मत्स्य उत्पादनामध्ये आपण काहीच प्रगती केली नाही काय ? खरे म्हणजे या काळात ही आकडेवारी 9 लक्ष मेट्रीक टनापर्यंत जावयास पाहिजे होती. त्यामुळे ही परिस्थिती ख-या अर्थाने दुष्काळजन्य असतांनाही आपण चुकीच्या पध्दतीने कॅलक्युलेशन करीत आहात असे माझे म्हणणे आहे. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ...

दुसरा प्रश्न असा आहे की, आपण मच्छीमारांना जशी डिझेलमध्ये सबसीडी देतो तशीच सबसीडी केरळ आणि पश्चिम बंगालमध्ये रॉकेलच्या संदर्भात सबसीडी दिली जाते का? त्या राज्यात जर मच्छीमारांना रॉकेलवर सबसीडी दिली जात असेल तर निवेदनात म्हटले आहे की, "खुल्या बाजार भावाच्या दराने रॉकेल पुरवठा करण्याची कार्यवाही सुरु आहे." सभापती महोदय, जर केरळ व पश्चिम बंगालमध्ये रॉकेलवर सबसीडी दिली जात असेल तर त्याच पध्दतीने आपल्या मच्छीमारांना रॉकेलची सबसीडी देणार आहात काय ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, केरळ, ओरिसा तसेच पश्चिम बंगाल या ठिकाणच्या मच्छीमारांना जो रॉकेलचा पुरवठा केला जातो त्यावर सबसीडी दिली जात नाही.

सभापती महोदय, आपली मासेमारी 9 लक्ष मेट्रीक टनापर्यंत जावयास पाहिजे होती किंवा तिचे प्रमाण वाढावयास पाहिजे होते ही वस्तुस्थिती आहे. याचे कारण असे आहे की, मासे खाणारी तोंडे दिवसागणीक वाढली असून मच्छीमारी करणारे हात देखील वाढलेले आहेत. परंतु आपल्याकडे पारंपारिक पध्दतीने मोठया प्रमाणात मच्छीमारी केली जाते. त्यामुळे खोल समुद्रात जाऊन मासेमारी करण्यासाठी लाँग लाईनर बोटी तयार करावयाच्या असतात व त्या तयार करण्यासाठी प्रशिक्षण देण्यासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात त्यासाठी तरतूद करण्यात आली असून जास्तीत जास्त खोल पाण्यात जाऊन मासेमारी करण्यासाठी पारंपरिक व्यवसाय धारकांना अधिक प्रोत्साहीत करण्यासाठी शासन प्रयत्न करीत आहे.

सन्माननीय सदस्यांनी रॉकेलवर सबसीडी देणार काय असा प्रश्न उपस्थित केलेला आहे.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव...

राहता राहिला प्रश्न रॉकेलच्या सबसिडीसंबंधातील. सन्माननीय सदस्य सर्वश्री किरण पावसकर व परशुराम उपरकर यांनी रॉकेलवर सबसिडी देणार काय, असा प्रश्न विचारला आहे. कोकणामध्ये फार मोठ्या प्रमाणावर शासकीय योजनांचा लाभ घेण्याकरिता म्हणून आम्ही मंडळींनी जेवढे म्हणून पुढे यायला हवे होते तेवढे येत नाही. तुलनेने कोकणाला याचा फार मोठा फायदा होत नाही. म्हणून माझ्या विभागामार्फत राज्याचे माननीय वित्त मंत्री आणि उप मुख्य मंत्री महोदयांना विनंती केली जाईल की,ज्या पद्धतीने इतर राज्यांमध्ये रॉकेलला सबसिडी दिली जाते त्याच पद्धतीने महाराष्ट्रातील या व्यावसायिकांना देखील सबसिडी द्यावी. त्यासाठी माझा विभाग निश्चितपणे प्रयत्न करील. आता पर्यंत केंद्र सरकारकडून खास कोटा इतर राज्यांना मिळत होता. परंतु, महाराष्ट्राच्या मच्छीमारांना किंवा आंबा व्यावसायिकांना हा कोटा मिळत नव्हता. गेल्या दीड वर्षापूर्वी मी सभागृहाला आश्वासन दिले होते. तेव्हा पासून मी पाठपुरावा करीत आहे. केंद्रीय मंत्री आदरणीय श्री.शरद पवार साहेबांनी त्यास प्रतिसाद दिला. आज राज्याचा कोटा मंजूर आहे. परंतु, त्यास सबसिडी नसल्यामुळे हे व्यावसायिक तो कोटा उचलायला तयार नाहीत. तेव्हा त्यांना सबसिडी देण्याचा महाराष्ट्र शासन निश्चितपणे विचार करेल.

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, लेखी उत्तरामध्ये असे नमूद करण्यात आले की, 12 व्या पंचवार्षिक योजनेमध्ये समाविष्ट होण्यासाठी हा प्रस्ताव नियोजन विभागाने केंद्र शासनाकडे पाठविला आहे. हा प्रस्ताव शासनाने कधी पाठविला आहे व त्यास किती दिवसात मान्यता मिळणार आहे ? माझा दुसरा प्रश्न देखील महत्त्वाचा आहे. लेखी उत्तरामध्ये नमूद करण्यात आले आहे की, दिनांक 9 सप्टेंबर 2011 अन्वये समिती गठित करण्यात आलेली आहे. या समितीमध्ये निरनिराळ्या विभागाचे अधिकारी आहेत. या समितीने सागरी जिल्ह्यामध्ये भेटी देऊन मच्छीमार प्रतिनिधींशी चर्चा केली आहे. समितीच्या अहवालाची कार्यवाही प्रगतिपथावर आहे. सप्टेंबर मध्ये आपण समिती गठित केली आहे. तेव्हा या समितीचा अहवाल आला आहे काय, या अहवालाचा निष्कर्ष काय आहे, या अहवालाच्या अनुषंगाने शासन पुढे कोणते पाऊल उलणार आहे ? माझा तिसरा प्रश्न पर्ससीन नेट संबंधातील आहे. पर्ससीन नेटचा वापर करताना खलाशी सापडले आहेत.

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर...

त्यांच्याकडे स्मार्ट कार्ड नव्हते. अनेक वेळा अशा प्रकारचे खलाशी सापडतात त्यांच्याकडे स्मार्ट कार्ड मिळत नाही. अनेक वेळा आवश्यक त्या गोष्टी पाहिजेत त्या खलाशांकडे नसतात. त्यांच्याविरूद्ध दंडात्मक कारवाई करून आपण त्यांना सोडून देतो. त्यामुळे स्मार्ट कार्ड न बाळगता मोठ्या प्रमाणावर खलाशी फिरत असतात. तेव्हा शासन या संबंधी कुठल्या प्रकारची ठोस कारवाई करणार आहे ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विचारलेला पहिला प्रश्न NCDC च्या संबंधातील आहे. आपण त्यांना 4 टक्के दरोन कर्ज देतो. हा निर्णय केवळ महाराष्ट्रा पुरता होऊन चालणार नाही. यासंबंधी केंद्र शासनाने निर्णय घेणे आवश्यक आहे. जो निर्णय होईल तो संपूर्ण देशाकरिता होईल. जो पर्यंत भारत सरकार निर्णय घेत नाही त्याबद्दल आताच राज्य सरकार म्हणून मी उत्तर देणे उचित नाही. सन्माननीय सदस्यांनी दुसरा प्रश्न असा विचारला आहे की, 9 सप्टेंबर रोजी जी उच्चस्तरिय समिती नेमली होती तिचा अहवाल काय आला आहे ? त्यांनी हा अहवाल सुप्रीम कोर्टाला सादर करावयाचा आहे. तो त्यांनी शासनाला सादर करावयाचा नाही. हे प्रकरण न्यायप्रविष्ट आहे.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. माननीय मंत्री महोदयांनी प्रश्नाला उत्तर देताना असे म्हटले होते की, सन 2004 मध्ये आम्ही सुप्रीम कोटात गेलो. शासनाचे म्हणणे सुप्रीम कोर्टा समोर मांडण्यासाठी कमिटी स्थापन करण्यात आली आहे. या समितीचा अहवाल आल्यानंतर या बाबतीत अंतिम निर्णय होईल. आता मंत्रिमहोदय सांगत आहेत की, ती समिती आपला अहवाल कोर्टाला सादर करणार आहे. मग नेमके खरे काय आहे ? दिशाभूल करणारे उत्तर येत असल्यामुळे हा प्रश्न लटकून राहीला आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, यामध्ये दिशाभूल करण्याचे कोणतेही कारण नाही. यामध्ये लवकर निर्णय होत नाही म्हणून मला देखील वेदना होत आहेत. तेव्हा जे म्हणालो होतो तेच आता देखील म्हणत आहे की, सरकारने पारंपरिक मच्छीमारांच्या बाजूने निर्णय दिला. त्याला सुप्रीम कोर्टामध्ये आव्हान पर्ससीन नेटने मच्छीमारी करणाऱ्या व्यावसायिकांनी दिले. छोट्या मच्छीमारी व्यावसायिकांचे रक्षण करणे ही शासनाची भूमिका आहे. त्या अनुषंगाने समिती नेमलेली

..3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.भास्कर जाधव.....

आहे. सदर बाब कोर्टामध्ये असल्यामुळे मी जास्त काही खुलासा करू इच्छित नाही. मी फक्त एवढेच सांगेन की, सरकार छोट्या मच्छीमार व्यावसायिकांच्या समवेत आहे. तसेच स्मार्ट कार्ड नसलेल्यांवर कारवाई होते. ही बाब बंदरे विकास विभागाकडे आहे. मत्स्यव्यवसाय विभागाकडे नाही.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.राजन तेली : सभापती महोदय, याठिकाणी लक्षवेधी सूचनेबाबत उत्तर दिले आहे. पण मी दोन वर्षापूर्वी देखील लक्षवेधी सूचना दिली होती, त्यावेळी जे उत्तर देण्यात आले होते, तशाच प्रकारचे याठिकाणी उत्तर दिलेले आहे. त्यामध्ये काही वेगळे नाही.

उप सभापती : मला सन्माननीय सदस्य श्री.राजन तेली यांना विचारावयाचे आहे की, एकच प्रश्न आपण सारखा-सारखा का विचारीत आहात ? सन्माननीय सदस्यांनी मागे विचारलेला प्रश्न आता चर्चेसाठी आला आहे काय ?

श्री.राजन तेली : 2007 पासून ज्या काही संस्था आहेत उदाहरणार्थ भद्रकाली देवी, मत्स्य सहकारी संस्था, ता.मालवण याचे डिझेल टँकरच्या संबंधात किंवा आईस फॅक्टरीच्या संबंधात जे प्रस्ताव होते त्याला केंद्र शासनाकडून मंजुरी देण्यात आलेली आहे. पण राज्य शासनाने त्यांच्या हिश्श्याची रक्कम द्यावयास पाहिजे त्याबाबतीत गेल्या दोन वर्षापासून त्यासाठी बजेट करण्यात आलेले नाही. अशा वेळी आपण या मच्छीमारांना मदत करणार आहात काय ? एन.सी.डी.सी.चे 2007 सालापासूनचे प्रस्ताव आहेत. मात्र या लोकांना राज्य शासनाचा वाटा उपलब्ध होत नाही. या साठी लोकांनी बऱ्याच वेळा प्रयत्न केलेले आहेत. तसेच आता दर देखील वाढलेले आहेत. म्हणून मागील प्रस्ताव जे दोन वर्षापासून मंजुरीच्या प्रतिक्षेत आहेत, त्यांना आपण मान्यता देणार आहात काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी अत्यंत मूलभूत प्रश्न विचारलेला आहे आणि मी सन्माननीय सदस्यांना पॉझिटीव्ह उत्तरच देत आहे. याठिकाणी केंद्र शासनाने एन.सी.डी.सी.चे प्रस्ताव मंजूर केलेले आहेत. परंतु राज्याचा वाटा ज्या प्रमाणात यावयास पाहिजे तो येत नाही ही गोष्ट खरी आहे. गेल्या काही वर्षामधील हा वाटा अत्यंत अत्यल्प होता. याकरता यावर्षीच्या बजेटमध्ये 46 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. पण त्यांनी सुध्दा हा प्रश्न सुटत नाही. खरेतर केंद्र शासन निधी देते.परंतु राज्य शासनाच्या वतीने मच्छीमार व्यावसायिकांचा जो हिस्सा भरावयाचा आहे म्हणजे जो आर्थिक भार उचलावयाचा आहे, त्यासाठी खरेतर केंद्र शासन निधी देते. परंतु पहिल्यांदा आपल्याला हिस्सा द्यावा लागतो, पण केंद्र शासनाकडून हा निधी उशीरा मिळतो. म्हणून हा हिस्सा वाढवून देण्याकरता आणि मच्छिमार व्यावसायिकांची प्रकरणे मंजूर करण्याकरता शासन निश्चितपणे पुढाकार घेईल.

श्री.विजय सावंत : सभापती महोदय, महाराष्ट्र शासन सुप्रीम कोर्टामध्ये हरले आहे आणि त्यामध्ये शासनाची चूक आहे. कारण महाराष्ट्र शासनाने जो जी.आर.काढला, त्याचे कायद्यामध्ये

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विजय सावंत . . ..

रुपांतर करावयास पाहिजे आणि त्यासाठी एक प्रोसेस आहे, ती म्हणजे एक कमिटी नियुक्त करणे, त्यानंतर सर्वांची जनहित चाचणी घेणे वगैरे हे सर्व करुन कायदा दुरुस्त कधी करणार आहात ? त्यानुसार जनहित चाचणी घेऊन कायदा दुरुस्त केला पाहिजे. सभापती महोदय, 12 बावमध्ये मासे मारावयाचे की नाही ही बाब तुमच्या लेव्हलवरील आहे.त्याबाबतीत केंद्र शासनाने काही सांगितलेले नाही. कायदा दुरुस्त करण्यासाठी प्रोसेस आहे आणि ही प्रोसेस अर्धवट राहिली आहे. त्यानंतर जनहित सुनावणी झाली, त्याचा रिपोर्ट आला. तेव्हा हा कायदा कधी दुरुस्त करणार हा माझा पहिला प्रश्न आहे आणि दुसरा प्रश्न असा आहे की,जी.आर.मध्ये असे होते आणि कायद्यामध्ये नाही त्यामुळे आपण सुप्रीम कोर्टामध्ये हरलो. त्यामुळे जनहित सुनावणी झाल्यानंतर आता जी.आर.चे रुपांतर कायद्यामध्ये कधी करणार आहात ? तसेच दुसरा प्रश्न म्हणजे आपण समुद्रातून मासे काढतो आणि समुद्राला आपण मासे देत नाही. पण परदेशामध्ये बाहेर मासे मोठे करुन ते पुन्हा समुद्रामध्ये सोडले जातात.अशा प्रकारचा प्रस्ताव आपण कोकणासाठी राबविणार आहात काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, पहिली गोष्ट म्हणजे आपण सुप्रीम कोर्टामध्ये हरलो नाही तर हाय कोर्टामध्ये हरलो आहोत. सध्या सुप्रीम कोर्टामध्ये ही केस पेंडींग आहे. तसेच सन्माननीय सदस्य सांगत आहेत ते खरे आहे की, आपण सर्क्युलरच्या आधारे इतरांना मज्जाव करीत होतो की, त्यांनी 12 कदमच्या आतमध्ये येऊ नये. परंतु त्यालाच त्यांनी हाय कोर्टामध्ये चॅलेंज केल्यामुळे आपण हरलो ही गोष्ट खरी आहे. म्हणून आता आपण यासंदर्भात कमिटी कडून मसुदा तयार करुन घेऊन शासनाच्या वतीने सुप्रीम कोर्टामध्ये दाखल करणार आहोत.तसेच सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, इतर देशामध्ये बाहेरुन मासे समुद्रामध्ये सोडण्याचा जो काही प्रयोग केला जातो. आम्ही यासंदर्भात माहिती घेऊ.

उप सभापती : तुम्ही त्यांच्याबरोबर जाऊन यावे.

श्री.प्रकाश बिनसाळे : सभापती महोदय, याठिकाणी उत्तरामध्ये असे म्हटलेले आहे की, "सदर निकषानुसार मागील 3 वर्षाच्या उत्पादनाच्या 50 टक्क्यापेक्षा कमी उत्पादन झाल्यास दुष्काळ जाहीर करण्यात येतो."परंतु आपण जर आकडेवारी पाहिली तर सातत्याने साधारणत: साडेचार लक्ष टन ॲव्हरेज आहे. माझ्या माहितीप्रमाणे मासेमारी करणाऱ्या ज्या नौका आहेत, त्यांची संख्या निश्चितपणे वाढलेली असेल. त्यामुळे प्रत्येक नौकेच्या मागे किती टन उत्पादन झाले? म्हणजे समजा जर याठिकाणी 100 टक्के मासेमारी करणारे लोक वाढलेले असतील तर ही

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे . . ..

संख्या निश्चितपणे 50 टक्के कमी झालेली आहे.यादृष्टीकोनातून आपण मत्स्य दुष्काळ जाहीर करणार आहात काय ? ही पहिली बाब आहे. दुसरे म्हणजे सन्माननीय सदस्य श्री.विजय सावंत यांनी उल्लेख केला की, माशांची सीडस् सोडण्याची योजना केंद्र शासनाची आहे आणि या प्रकारचा प्रयोग रत्नागिरीमध्ये करण्यात येणार होता. परंतु तो काही कारणामुळे झालेला नाही.

यानंतर श्री.अ.शिगम . . ..

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.प्रकाश बिनसाळे....

तेव्हा या प्रयोगाला चालना देण्यासाठी केंद्र शासनाकडे पाठपुरावा करुन ती योजना राबविण्यात येईल काय ? माझा दुसरा प्रश्न असा की, माशांचे उत्पादन वाढविण्यासाठी शासन कोणती उपाय योजना करीत आहे ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, मासेमारी ही फक्त साडेचार टनापर्यंत मर्यादित राहिलेली आहे. या संदर्भात मी अगोदरच सांगितलेले आहे की, खाणारी तोंडे आणि मच्छीमारी करणारे हात वाढलेले आहेत. आपण प्रचलित नियमानुसारच मत्स्य दुष्काळ जाहीर करतो. या नियमामध्ये बदल होईपर्यंत पूर्वीच्या नियमाचा आपणास आधार घ्यावा लागेल. मी सन्माननीय सदस्यांना सांगू इच्छितो की, केंद्र सरकारची गोड्या पाण्यातील इन लॅन्ड फिशींगची योजना आहे. या ठिकाणी सन्माननीय सदस्यांनी अधिकची माहिती दिलेली आहे त्या बाबत माहिती घेऊन विभागा मार्फत निश्चितपणे कार्यवाही करण्याचा प्रयत्न केला जाईल.

श्री.किरण पावसकर : सभापती महोदय, माननीय मंत्री महोदय कोकणातील आहेत तेव्हा ते मच्छीमारांना नक्कीच न्याय देतील अशी अपेक्षा आहे. या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी सांगितले की, मच्छीमारांना चार टक्के दराने कर्ज देण्यासाठी केंद्र सरकारची परवानगी घ्यावी लागेल आणि ती सर्व राज्यांसाठी असेल. केरळ, पश्चिम बंगाल आणि ओरिसा या राज्यात मच्छीमारांना रॉकेलमध्ये सबसिडी मिळते. तेव्हा महाराष्ट्रातील मच्छीमारांना रॉकेलमध्ये सबसिडी केव्हा पासून देणार आहात ? या संदर्भातील परवानगी मिळण्यासाठी केंद्राकडून उशीर होत असला तरी आपण त्याबाबत आर्थिक वर्षामध्ये तरतूद केलेली आहे काय किंवा करणार आहात काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी या ठिकाणी दोन महत्वाचे निर्णय सांगितले. एनसीडीच्या प्रकरणाकरिता 46 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे, परंतु ही तरतूद अत्यंत अपुरी आहे. ही बाब माननीय उपमुख्यमंत्री व वित्त मंत्री यांच्या निदर्शनास आणून देऊन ही तरतूद वाढवून घेण्याचा प्रयत्न राहील. माननीय उप मुख्यमंत्री उद्या जे उत्तर देतील त्यावेळी ही रक्कम वाढविण्याबाबत प्रयत्न केला जाईल. मी पुन्हा एकदा सभागृहाला सांगू इच्छितो की, केंद्र सरकारने मंजूर केलेला कोटा तत्काळ उचलण्याची कारवाई करण्यात येईल. तसेच इतर राज्यांप्रमाणे महाराष्ट्रातील मच्छीमारांना रॉकेलमध्ये सबसिडी देण्यात येईल.

.2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, या ठिकाणी माननीय मंत्री महोदयांनी मत्स्य मोजमाप करण्याची पध्दती सांगितली. या मोजमाप पध्दतीनुसार शासनावर आजपर्यंत मत्स्य दुष्काळ जाहीर करण्याची वेळ आली काय, नसल्यास त्याची कारणे काय आहेत ? बाजारात मासे उपलब्ध होत नसल्यामुळे ते चढ्या दराने विकले जात आहेत. खरे म्हणजे आपल्याकडे मत्स्य दुष्काळ झालेला आहे परंतु मोजमाप पध्दतीमुळे दुष्काळ जाहीर होत नाही. तेव्हा या पध्दती बाबत फेरविचार करणार काय ? माझा दुसरा प्रश्न असा आहे की, आपण मच्छीमारांना स्मार्ट कार्ड दिलेले आहे. आमच्या येथे काही बोटी पकडल्या त्यातील खलाशांकडे स्मार्ट कार्ड नव्हते. या संदर्भात मी डेप्युटी एस.पी.ना भेटलो होतो. त्यांनी मला सांगितले की, हे आमच्या विभागाचे काम नाही. मत्स्य विभागाचे काम आहे. मत्स्य विभागाकडे विचारणा केली असता ते सांगतात हे पोलीस विभागाचे काम आहे. तेव्हा हे काम नक्की कोणत्या विभागाकडे आहे हे मंत्री महोदय सांगतील काय ? सन 2009 मध्ये पॅकेज दिले होते त्याप्रमाणे पॅकेज देणार काय ?

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, मी पुन्हा एकदा सांगू इच्छितो की, मत्स्य दुष्काळ जाहीर करण्याची जी विहित पध्दती आहे त्यानुसारच दुष्काळ जाहीर करण्यात येतो. या संदर्भात मत्स्य विभागात एक स्वतंत्र स्टॅटीस्टीक विभाग देखील कार्यरत आहे. त्याच बरोबर केंद्र विभागाचा सीएनएफआरआय विभाग आहे. हे दोन्ही विभाग स्टॅटीस्टीक घेत असतात, माहिती घेत असतात आणि त्या आधारे आपण आकडेवारी जाहीर करतो. तेव्हा प्रचलित नियमाच्या बाहेर जाऊन मत्स्य दुष्काळ जाहीर करणे अवघड आहे. सन्माननीय सदस्यांनी स्मार्ट कार्ड बाबत सांगितले. त्याबाबत सांगू इच्छितो की, मच्छीमारांकडे स्मार्ट कार्ड आहेत किंवा नाहीत किंवा त्यांना मच्छीमार करु द्यायची किवा नाही याची जबाबदारी मत्स्य आणि बंदरे विभागाची आहे. स्मार्ट कार्डसाठी अर्ज आल्यानंतर त्याचे व्हेरिफिकेशन पोलिसांनी करायचे आहे. रत्नागिरी जिल्ह्यामध्ये त्या त्या वस्तीमध्ये पोलिसांची पथके पाठवून मच्छीमारांना देण्याची व्यवस्था केली. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये काय परिस्थिती आहे मला समजून घ्यावे लागेल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. :कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या बालवाडी शिक्षकांना वेतनश्रेणी देण्याचा प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित असणे

मु.शी.: कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या बालवाडी शिक्षकांना वेतनश्रेणी देण्याचा प्रश्न अनेक वर्षे प्रलंबित असणे यासंबंधी सर्वश्री रामनाथ मोते, विनोद तावडे, संजय केळकर, भगवान साळुंखे, नागो पुंडलिक गाणार ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय मुख्यमंत्र्याचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रात पूर्वप्राथमिक शिक्षण देण्यासाठी प्रशासनाने सुरु केलेल्या बालवाड्यांसाठी नियुक्त केलेल्या बालवाडी शिक्षिकांना वेतनश्रेणी देण्याचा प्रश्न गेली अनेक वर्षे प्रलंबित असणे, ठाणे महानगरपालिकेच्या बालवाडी शिक्षिकांना प्रशासनाने वेतनश्रेणी मंजूर करणे व त्यास शासनाने मान्यता देणे, भिवंडी महापालिकेच्या बालवाडी शिक्षिकांना नियमित वेतनश्रेणीत वेतन मिळत असणे, खोपोली नगरपालिकेच्या बालवाडी शिक्षिकांना नियमित वेतनश्रेणी मिळणे, मात्र, कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेच्या बालवाडी शिक्षिकांना नियमित वेतनश्रेणीपासून वंचित ठेवणे, महिला शिक्षिकांचे आर्थिक शोषण होणे, प्रशासनाने व शासनाने बालवाडी शिक्षिकांच्या रास्त मागणीकडे दुर्लक्ष करणे, अल्प मानधनावर कुटुंब चालविणे अडचणीचे ठरणे, बालवाडी शिक्षिकांमध्ये निर्माण झालेला प्रचंड असंतोष, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व करावयाची कार्यवाही"

श्री.भास्कर जाधव (नगर विकास राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर कु.थोरात..

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, सन्माननीय मंत्री हे अत्यंत अभ्यासू आणि डायनॅमिक आहेत. गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नाला न्याय मिळेल अशी मी अपेक्षा व्यक्त करतो.

सभापती महोदय, आपल्या ठाणे जिल्ह्यातील कल्याण डोंबिवली महानगरपालिकेतील बालवाडी शिक्षकांचा हा प्रश्न आहे. या सर्व बालवाडया जिल्हा परिषदेकडून शासकीय अनुदानातून सुरु होत्या. कल्याण महानगरपालिका निर्माण झाल्यानंतर 1994 मध्ये या सर्व बालवाडया कल्याण महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात आल्या. तेव्हा पासून या सर्व बालवाडया कल्याण महानगरपालिकेच्या आस्थापनेवर आहेत. या बालवाडयांमध्ये काम करणाऱ्या बालवाडी शिक्षिकांना अल्प असे 500 रुपये मानधन मिळत होते. त्यानंतर त्यामध्ये वाढ करण्यात आली. सध्या त्यांना रु.2000 मानधन मिळत आहे. महानगरपालिकेकडून तीन तास बालवाडीचे काम आणि उर्वरित तीन तास महानगरपालिकेच्या विविध विभागांमध्ये त्यांना काम करावे लागत होते. मध्यंतरी या बाबत चर्चा झाली त्यानंतर प्रशासनाने त्यांच्या मानधनात वाढ केली पण हे काम बंद केले. सभापती महोदय, 1994 पूर्वीच्या या सर्व बालवाडी शिक्षिका आहेत. त्यांना वेतनश्रेणी मिळावी तसेच अन्य काही लाभ मिळावेत या दृष्टिकोनातून त्यांचे प्रयत्न सुरु आहेत. या संदर्भातील प्रस्ताव शासनाकडे गेलेला आहे. बालवाडी शिक्षिकांना वेतनश्रेणी देण्यात यावी आणि पदे निर्माण करण्यात यावीत या संदर्भातील पहिला प्रस्ताव दिनांक 18 मार्च, 1997 ला प्रशासनाने पारित केला होता. ठाणे महापालिकेला वेतनश्रेणी आणि पदे मंजूर करण्यात आलेली आहेत. भिवंडी महापालिकेला वेतनश्रेणी आणि पदे मंजूर केलेली आहेत. पण कल्याण महानगरपालिकेचा खर्च जास्त होतो म्हणून कल्याण महानगरपालिकेची पदे मंजूर करण्यास शासनाने नकार दिलेला आहे.

सभापती महोदय, या अनुषंगाने माझा स्पेसिफिक प्रश्न असा आहे की, सध्या राज्यामध्ये शिक्षण हक्क विधेयक आलेले आहे. शिक्षण हक्क विधेयकाच्या सन 2009 च्या कायद्यानुसार कलम 11 अन्वये प्राथमिक शिक्षणाबरोबरच पूर्व प्राथमिक म्हणजे 3 ते 6 वर्षे या वयोगटातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची जबाबदारी सुध्दा स्थानिक प्रशासनाची आहे. त्यामुळे साहजिकच या बालवाडयांसाठी होणारा खर्च, या पदांसाठी लागणारा खर्च करण्याची शासनाची आणि प्रशासनाची जबाबदारी आहे. म्हणून माझा प्रश्न असा आहे की, जरी निकषानुसार या महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील खर्च

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते....

हा 35 टक्क्यांपेक्षा अधिक होत असला तरी सुध्दा "अत्यावश्यक सेवा असेल तर ते वगळून" असे उत्तरात म्हटले आहे. ही अत्यावश्यक सेवा आहे. म्हणून खर्च जास्त असला तरी सुध्दा या पदांना मान्यता देण्यात येणार आहे का? ठाणे महापालिकेला वेतनश्रेणी आणि पदांना मान्यता दिलेली आहे. त्या ठिकाणच्या आस्थापनेवरील खर्च किती आहे? भिवंडी महापालिकेला वेतनश्रेणी आणि पदांना मान्यता दिलेली आहे त्या ठिकाणचा आस्थापनेवरील खर्च किती आहे? कल्याण महानगरपालिकेतील आस्थापनेवरील खर्च जास्त होत असला तरी तो शिथिल करुन लहान मुलांच्या शिक्षणाला प्राधान्य देऊन हा विषय मार्गी लावणार का आणि पदांना मान्यता देणार का?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. रामनाथ मोते यांनी जी माहिती दिलेली आहे ती माहिती बारकाईने ऐकल्यानंतर त्यांच्या प्रश्नामध्येच या प्रश्नाचे उत्तर आहे. 2009 मधील शिक्षण हक्क विषयक कायद्याच्या कलम 11(2) मध्ये शिक्षणाच्या संदर्भातील आणि पूर्व प्राथमिक शिक्षणाची माहिती देतांना असे सांगितले की, या संदर्भातील जबाबदारी ही स्थानिक स्वराज्य संस्थेची आहे. म्हणून हा विषय शासनाच्या अखत्यारित येतो की येत नाही यापेक्षा एखाद्या महानगरपालिकेला, एखाद्या नगरपालिकेला जर स्वत:ला तशा प्रकारचा निर्णय घ्यावयाचा असेल तर त्यावर शासनाचे बंधन नाही. परंतु हा विषय शासनाच्या धोरणांचा किंवा नियमांचा विषय होऊ शकत नाही. जर शासनाने अशा प्रकारचे धोरण घेतले तर राज्यामध्ये नाशिक, मालेगाव अशा वेगवेगळया महानगरपालिकांचे प्रस्ताव देखील आहेत. म्हणून त्या संदर्भातील निर्णय घेणे अडचणीचे होऊ शकते. म्हणून हा निर्णय महानगरपालिकेने घ्यावयाचा आहे. अंगणवाडीमध्ये काम करणाऱ्या सेविका किंवा दाई यांची नेमणूक मानधनावर झालेली असते. यापूर्वी बालवाडीमध्ये 10 महिन्याचा कालावधी असावयाचा आता त्यांना बारा महिन्याचे मानधन दिले जाते. त्यांच्याकडे अशैक्षणिक कामे होती ती मध्यंतरीच्या चर्चेनंतर सन्माननीय सदस्यांनी सांगितल्याप्रमाणे काढून घेण्यात आली आहेत. या बालवाडी शिक्षिकांना आता फक्त तीनच तास काम करावयाचे आहे. दोन हजार रुपये मानधन दिले जात आहे. या बाबतीत महानगरपलिकेने पुढाकार घेतला तर शासनाचा विरोध असण्याचे काही कारण नाही.

अशुधीत प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

यानंतर श्री. बरवड....

श्री. संजय केळकर : सभापती महोदय, कल्याण डोंबिवली महानगरपालिकेने शासनाकडे पदांना मान्यता मिळण्यासाठी प्रस्ताव पाठविलेला आहे. त्या पदाला जी मान्यता द्यावयाची आहे त्यामध्ये शासनाला खर्च करावयाचा नाही. पदाला मान्यता देण्याचे काम शासन किती दिवसात करणार आहे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, साधारणपणे नगरपालिका, महानगरपालिका यांची पदे भरत असताना त्याचे काही अधिकार जिल्हाधिकाऱ्यांना दिलेले आहेत, काही अधिकार विभागीय आयुक्तांना दिलेले आहेत आणि काही अधिकार संचालकांना दिलेले आहेत. त्याउपर जर आवश्यकता भासली तर शासनाकडे तशा प्रकारच्या पदांच्या मंजुरीकरिता प्रस्ताव येतो. अंगणवाडी सेविका हा विषय जर शासनाच्या अखत्यारीत असेल तर शासन त्याचा विचार करील. अन्यथा त्याचा विचार त्या त्या ठिकाणी करावा.

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, प्रशासनाकडे, शासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करुन, भेटून, चर्चा करुन हा विषय मार्गी लागलेला नाही. हे प्रकरण न्यायालयामध्ये सुध्दा गेले होते. न्यायालयाने असा निकाल दिला की, या कर्मचाऱ्यांना कायम करण्यासाठी, त्यांना वेतनश्रेणी देण्यासाठी शासनाने या पदांना मंजुरी देणे आवश्यक आहे. इतर महानगरपालिकांमध्ये शासनाने पदांना मंजुरी दिली, त्यांना वेतनश्रेणी दिली. ठाणे, भिवंडी महानगरपालिकेमध्ये, खोपोली नगरपालिकेमध्ये शासनाने पदांना मान्यता दिली. त्यांच्या पदांना शासनाकडून मान्यता मिळाली तर त्यांच्यासाठी वेतनश्रेणी आणि अन्य काही लाभ देणे् प्रशासनाला सोयीचे होईल. म्हणून शिक्षण हक्क विधेयकाच्या अनुषंगाने याचे महत्व लक्षात घेऊन शासन स्तरावरुन या पदांना मंजुरी देण्याच्या संदर्भात शासन सकारात्मक विचार करणार का ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी अत्यंत स्पष्टपणे सांगितले आहे. सन्माननीय सदस्य प्रत्येक प्रश्नामध्ये अधिकची माहिती देतात आणि आपणच उत्तर देतात. सन्माननीय सदस्यांनी सांगितले की, हा विषय कोर्टामध्ये गेला होता. कोर्टाने सुध्दा हा विषय नाकारला.

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. रामनाथ मोते : सभापती महोदय, त्यांना वेतनश्रेणी मिळण्याच्या संदर्भातील प्रश्न होता. न्यायालयाने एवढेच सांगितले की, या संदर्भात जर शासनाने पदांना परवानगी दिली तर तो विषय येईल. प्रथम पदांना शासनाची परवानगी घ्यावी असा विषय आहे.

उप सभापती : सन्माननीय सदस्यांचा प्रश्न या महानगरपालिकेने शासनाकडे पदांना जी मंजुरी मागितलेली आहे त्या संदर्भात आहे. राज्य शासनाने इतर महानगरपालिकांच्या पदांना जशी परवानगी दिलेली आहे त्या निकषावर या महानगरपालिकेला ही पदे भरण्यासाठी परवानगी देण्यामध्ये काय हरकत आहे ?

श्री. भास्कर जाधव : सभापती महोदय, मी काही गोष्टी आपल्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. मी नावे घेत नाही पण काही नगरपालिकांचा प्रशासनावरील खर्च 103 ते 104 टक्के आहे. स्वत:च्या उत्पन्नाच्या पलीकडे त्यांचा खर्च आहे. शासनाकडून मिळणाऱ्या उत्पन्नातून ते कर्मचाऱ्यांचे पगार देतात. काही महानगरपालिकांचा प्रशासनावरील खर्च 87 टक्के, 97 टक्के आहे. यामध्ये आर्थिक शिस्त यावी म्हणून शासनाने नगरपालिकांना एकंदरीत उत्पन्नाच्या किती टक्क्यापर्यंत प्रशासनावर खर्च करावा, हे ठरवून दिलेले आहे. अ वर्ग, ब वर्ग, क वर्ग नगरपालिकांचा रेश्यो ठरवून दिलेला आहे. महानगरपालिकांचा रेश्यो ठरवून दिलेला आहे. त्या रेश्योमध्ये जर ही पदे निर्मिती करण्याकरिता महानगरपालिका प्रस्ताव शासनाकडे पाठविणार असेल आणि ते शासनाच्या अखत्यारीत असेल तर शासन म्हणून आम्हाला परवानगी देण्यास काही हरकत नाही. परंतु आर्थिक शिस्त राहण्याच्या दृष्टीने या नियमाचे पालन करणे सुध्दा अत्यंत महत्वाचे आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ MMP

पृ.शी.: (पुरवणी) विनियोजन विधेयक

L.A. BILL NO. VI OF 2012

(A BILL TO AUTHORISE PAYMENT AND APPROPRIATION OF CERTAIN FURTHER SUMS FROM AND OUT OF THE CONSOLIDATED FUND OF THE STATE FOR THE SERVICES OF THE YEAR ENDING ON THE THIRTY-FIRST DAY OF MARCH 2012.)

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री) : सभापती महोदय, मी महाराष्ट्र विधानसभेने संमत केल्याप्रमाणे सन 2012 चे वि. स. वि. क्रमांक 6- दिनांक 31 मार्च, 2012 रोजी संपणाऱ्या वर्षाच्या कामांसाठी राज्याच्या एकत्रित निधीतून आणखी विवक्षित रकमा देणे व त्यांचे विनियोजन करणे यांस अधिकृत मंजुरी देण्यासाठी विधेयक विचारात घेण्यात यावे, असा आपल्या अनुमतीने प्रस्ताव मांडतो.

असे करीत असताना मी सभागृहाच्या निदर्शनास आणू इच्छितो की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद 207, खंड (1) व्दारे महाराष्ट्राच्या राज्यपालांना प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करुन त्यांनी हे विधेयक महाराष्ट्र विधान परिषदेसमोर मांडण्यासाठी शिफारस केली आहे.

प्रश्न मतास टाकून संमत झाला

उप सभापती : विधेयक विचारात घेण्यात आले आहे. आता मी विधेयक खंडश: सभागृहाला सादर करतो. शिफारशी करावयाच्या असल्यास सदस्यांनी मांडाव्यात

(खंड 2 व 3, अनुसूची, खंड 1, संपूर्ण शीर्षक व हेतुवाक्य हे एका पाठीमागून एक याप्रमाणे विचारात घेण्यात आले. त्यांच्या बाबतीत कोणतीही शिफारस करण्यात आली नाही.)

उप सभापती : ज्याअर्थी, विधान परिषदेस कोणतीही शिफारस करावयाची नाही, त्याअर्थी, परिषदेला कोणतीही शिफारस करावयाची नाही, अशा शिफारशीसह हे विधेयक विधानसभेकडे परत पाठविण्यात येईल.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : मुंबईतील धारावी, कुर्ला, भायखळा, माहीम, शाहूनगर, शास्त्रीनगर येथील 200 जणांना विषारी रंगाची बाधा होणे

मु. शी. : मुंबईतील धारावी, कुर्ला, भायखळा, माहीम, शाहूनगर, शास्त्रीनगर येथील 200 जणांना विषारी रंगाची बाधा होणे यासंबंधी सर्वश्री संजय केळकर, रामनाथ मोते, विनोद तावडे, श्रीमती अलका देसाई, डॉ. सुधीर तांबे, डॉ. दीपक सावंत, सर्वश्री रामदास कदम, दिवाकर रावते, परशुराम उपरकर , डॉ. नीलम गोऱ्हे, सर्वश्री जयप्रकाश छाजेड, अशोक ऊर्फ भाई जगताप, सुभाष चव्हाण, राजन तेली, उल्हास पवार, मोहन जोशी ,वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.संजय केळकर (कोकण विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय गृहमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"दिनांक 8 मार्च, 2012 रोजी मुंबईतील धारावी, कुर्ला, भायखळा, माहीम, शाहूनगर, शास्त्रीनगर परिसरातील 5 ते 15 वयोगटांतील मुलांसह 200 जणांना विषारी रंगाची बाधा झाल्याने अनेक जण बेशुध्द पडणे, रंगबाधा झालेले अनेक रुग्ण उपचारासाठी केईएम, सायन रुग्णालयात दाखल होणे, दाखल झालेल्या रुग्णांची प्रकृती चिंताजनक असणे, सदरहू रंग माहीम व धारावी परिसरातील मुलांनी माहीम पाईपलाईन येथून विकत घेणे, सदरहू विषारी रंगांमुळे अनेक मुलांना बाधा झाल्याने पालकांमध्ये निर्माण झालेला तीव्र स्वरुपाचा असंतोष, या घटनेची तातडीने चौकशी करण्याची व घातक रंग विकणाऱ्या इसमांचा शोध घेऊन त्यांच्याविरुध्द गुन्हे दाखल करण्याची नागरिकांकडून होत असलेली मागणी, या प्रकरणी तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.संजय केळकर : सभापती महोदय, दिनांक 8 मार्च, 2012 रोजी धारावी, कुर्ला, भायखळा, माहीम, शाहूनगर, शास्त्रीनगर या ठिकाणी ही घटना घडली आहे. या भागातील 200 मुलांना विषारी रंगाची बाधा झालेली आहे. या रंगामध्ये बेन्झिन हे रसायन होते. त्यामुळे शरीरातील हिमोग्लोबीन व ऑक्सिजन कमी झाल्यामुळे शरीरात मिथेन ब्ल्यू नावाचे रसायन तयार झाल्याची माहिती लोकमान्य टिळक रुग्णालयाचे अधिष्ठाता यांनी दिली आहे. या घटनेमुळे 6 जणांना अटक केलेली आहे. विषबाधा झालेल्या रंगाची पोती कोणत्या तरी कारखान्यातून आली होती. हा रंग इतर रंगात मिसळल्यामुळे विषबाधा झालेली आहे. असे घातक रंग निरनिराळया कारखान्यात तयार होतात. त्या कारखान्यांवर शासनाने कारवाई केली आहे काय, हा रंग कोठून आला याची माहिती घेतली आहे काय ? या घटनेनंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषदेत एक समिती गठित केल्याचे व त्या समितीकडून 2 आठवडयात अहवाल मागविण्यात येईल असे घोषित केले होते. त्या समितीचा अहवाल शासनाकडे आला आहे काय, असल्यास त्या समितीचे निष्कर्ष काय आहेत ?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, नवरंग कम्पाऊण्ड या एरियामध्ये काही लोकांना खाजगीरित्या गोदाम बांधलेले आहेत. त्या ठिकाणी कापडासाठी वापरण्यात येणाऱ्या डायचे रंग ठेवलेले होते. अतिक्रमित जागेवर बांधलेली ही गोदामे असल्यामुळे ती काढण्याच्या सूचना शासनाने दिल्या होत्या. पण काही गोण्या तेथे पडून राहिल्या होत्या. त्या गोण्यांमधील रंगाचा वापर या मुलांनी केला व पुढील घटना घडली आहे. या घटनेतील 6 आरोपींना पोलीस कोठडीत ठेवलेले आहे. हा माल कोठून आला, कोठे जाणार होता याचा तपास चालू आहे. माननीय मुख्यमंत्र्यांनी जाहीर केल्या प्रमाणे मुख्य सचिवांनी वैद्यकीय शिक्षण विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक समिती गठित केलेली आहे. त्या समितीच्या आतापर्यंत दोन बैठका झालेल्या आहेत आणि आज तिसरी बैठक होत आहे. जे प्राथमिक निष्कर्ष सन्माननीय सदस्यांनी सांगितले आहेत तेच निष्कर्ष माझ्याकडेही आहेत. कपडयासाठी वापरल्या जाणाऱ्या डायचा तो रंग होता. हे एक मूलभूत कारण आहे. त्यामुळे लोकोबेरिन कॅल्शियम व मिथेलीन या रासायनामुळे ही घटना घडलेली आहे.

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे : सभापती महोदय, ही घटना घडल्यानंतर मी स्वत: सायन रुग्णालयात दाखल केलेल्या लहान मुलांना व त्यांच्या पालकांना भेटलो आहे. मुलांनी हा रंग लावला त्यावेळी त्यांना हा त्रास झाला नाही. त्या मुलांनी घरी जाऊन आंघोळ केली त्यावेळी पाण्यात रंग मिसळला गेला. त्यामुळे त्यांना उलट्या सुरु झाल्या.

यानंतर श्री.शिगम....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

भायखळा येथील पोलीस स्टेशनमध्ये गुन्ह्याची नोंद नाही. शाहूनगर पोलीस स्टेशनला गुन्ह्याची नोंद आहे. हाझार्डस केमिकलचे उद्योग धारावी परिसरामध्ये मोठ्या प्रमाणावर चालतात अशा प्रकारच्या अनेक तक्रारी नागरिकांनी शाहूनगर पोलीस स्टेशनला केलेल्या आहेत. काही राजकीय नेत्यांचे आणि पोलीस स्टेशनचे अशा प्रकारे हाझार्डस केमिकलचे व्यवसाय करणा-या रॅकेटला संरक्षण आहे असे म्हटले जाते. या हाझार्डस केमिकलमुळे तेथील नागरिकांना, मुलांना विविध प्रकारचे आरोग्य विषयक त्रास होत असतात आणि डॉक्टर देखील प्रकृती अस्वास्थ्याची कारणे तेथील हाझार्डस केमिकलचे व्यवसाय असे सांगतात. तेव्हा या हाझार्डस केमिकलचे व्यवसाय करणा-यावर कारवाई करण्यास तेथील पोलीस स्टेशनला सांगण्यात येणार आहे की नाही ? नागरिकांनी तक्रारी करुन देखील कारवाई न करणा-या अधिका-यांवर काय कारवाई करण्यात येणार आहे ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : तशा प्रकारच्या तक्रारी आल्या असतील तर त्याबाबतीत कारवाई करण्याच्या सूचना निश्चितपणे दिल्या जातील. महानगरपालिकेचे गोडाऊन यासाठी वापरले जात असतील तर त्याबाबतीत महानगरपालिकेची संयुक्त जबाबदारी आहे. त्यांना व्यवसाय करण्यासाठी परवाने दिले असतील तर ते परवाने कोणते आहेत, ते अनधिकृतपणे व्यवसाय करतात का हे सर्व पहाण्याची महानगरपालिकेची संयुक्त जबाबदारी असते. पोलिसांकडे जेव्हा तक्रारी येतात त्यावेळी निश्चितपणे कारवाई केली जाते. अशा तक्रारी येऊन देखील कारवाई केली गेली नसेल तर त्याबाबतीत निश्चितपणे चौकशी केली जाईल.

श्री. विनोद तावडे : आपणाकडे तक्रार प्राप्त झाल्यानंतर ती कारवाई करण्यासाठी महानगरपालिकेकडे पाठविण्यात आलेली आहे काय ?

श्री.सतेज उर्फ बंटी डी. पाटील : हा महानगरपालिकेचा विषय आहे हे मी आधीच माझ्या उत्तरामध्ये सांगितलेले आहे. तशा प्रकारच्या तक्रारी केलेल्या असतील आणि त्यांची दखल घेतली गेली नसेल तर त्याबाबतीत निश्चितपणे चौकशी केली जाईल. आमच्याकडे तक्रारी आल्या तर महानगरपालिकेबरोबर संयुक्त मोहीम राबवून या गोष्टींना कसा पायबंद घालता येईल या दृष्टीने कारवाई केली जाईल.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत :सन्माननीय विरोधी पक्षनेते श्री. विनोद तावडे यांनी सांगितल्या प्रमाणे लोकांनी तक्रारी केल्या तरी पोलीस दाद देत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. माझा प्रश्न असा आहे की, धारावी परिसरामध्ये जेवढे रासायनिक कारखाने आहेत त्यांची महानगरपालिकेबरोबर संयुक्त मोहीम राबवून फेर तपासणी किती दिवसात करण्यात येईल ?

श्री. सतेज उर्फ बंटी डी. पाटील : जनतेच्या जीवाचे रक्षण करण्याच्या दृष्टीने कराव्या लागणा-या सर्व कारवाया करण्यात येतील. सन्माननीय सदस्यांनी विशिष्ट तक्रार दिली तर त्याही बाबतीत कारवाई केली जाईल.

श्रीमती अलका देसाई :धारावी परिसरामध्ये अनेक घातक उद्योग सुरु असतात आणि त्यामध्ये महानगरपालिकेचे मोठे योगदान आहे असे मला वाटते. याचे कारण असे की, एक दगड जरी लागला तरी महानगरपालिकेचे अधिकारी तेथे हजर होतात आणि त्याबाबतीत चौकशी करतात. एवढया मोठ्या प्रमाणावर मुलांना रंगबाधा झालेली असताना रंग बनविणा-यांवर आणि ते विकणा-यांवर काही निर्बंध घालण्यात येणार आहे की नाही ? अशा व्यवसायाची महानगरपालिकेच्या अधिका-यांना माहिती असते, पोलीस स्टेशनला देखील याची जाणीव असते. तेव्हा महानगरपालिका आणि स्थानिक पोलीस स्टेशनने याबाबतीत काय कारवाई केलेली आहे ?

...नंतर श्री. भोगले....

अशुधारित प्रत / शीघ्रलेखासाठी नाही

श्रीमती अलका देसाई..... लक्षवेधी सूचना क्र.3...

आता घटना घडली म्हणून कारवाई केली असे म्हणण्यास वाव ठेवू नये. या अगोदर याची जाणीव होती तर त्याबाबत काय कारवाई केली याचे उत्तर मंत्री महोदयांनी द्यावे.

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, मी मघाशी उत्तर दिले आहे. संबंधित पोलीस स्टेशनला तक्रारी आल्या असतील आणि त्यांनी कारवाई केली नसेल तर त्याची चौकशी केली जाईल.

श्री.रामदास कदम : सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेचा उल्लेख मंत्री महोदयांनी केला आहे. या सभागृहात माननीय गृहमंत्र्यांनी घोषणा केली होती की, मुंबई महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये अनधिकृत गोडावून, झोपडपट्टी हटविण्यासाठी महापालिकेला दहा अधिकारी दिले जातील. या घोषणेची अंमलबजावणी किती दिवसात होईल?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : सभापती महोदय, ज्या ज्या महानगरपालिकांकडून अतिक्रमणे हटविण्यासाठी पोलीस बंदोबस्त मागितला जातो त्यांना तो देण्याची व्यवस्था केली जाते. त्याचबरोबर महानगरपालिकेला स्वतंत्रपणे अधिकारी देण्यासाठी ज्या महानगरपालिकांचे प्रस्ताव असतात त्यांना स्वतंत्र अधिकारी देण्याची व्यवस्था केली जाते.

श्री.रामदास कदम : हा धोरणात्मक निर्णय मुंबईसाठी सभागृहात घोषित करण्यात आला होता. या निर्णयाची अंमलबजावणी अद्याप झालेली नाही. गृहमंत्र्यांनी सभागृहात घोषित केलेल्या निर्णयाची अंमलबजावणी किती दिवसात केली जाईल, आतापर्यंत अंमलबजावणी का झाली नाही?

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील : या अनुषंगाने प्रश्न उपस्थित झाला असला तरी आता माझ्याकडे माहिती उपलब्ध नाही. निश्चितपणे त्याची माहिती दिली जाईल.

उप सभापती : महानगरपालिकांकडून अतिक्रमणे काढण्यासाठी पोलीस बंदोबस्त मागितला असेल तर पोलीस बंदोबस्त पुरविला जातो ही वस्तुस्थिती आहे.

श्री.रामदास कदम : 10 वेळेला पोलीस स्टेशनकडे लेखी पत्राद्वारे मागणी केली होती. परंतु पोलीस उपलब्ध नसल्यामुळे अतिक्रमणे हटविण्यासाठी पोलीस बंदोबस्त देता येत नाही असे कळविण्यात आले. त्यामुळे शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी झाली पाहिजे.

उप सभापती : शिवसेना, भारतीय जनता पक्षाच्या वतीने मोर्चा काढण्यात आला असेल तर कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न असतो. माननीय सदस्यांनी शासनाची अडचण समजून घ्यावी.

---- ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: पुणे येथील ससून रुग्णालयातील अपुऱ्या सोयी सुविधा

मु.शी.: पुणे येथील ससून रुग्णालयातील अपुऱ्या सोयी सुविधा याबाबत सर्वश्री मोहन जोशी, जयप्रकाश छाजेड यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री.मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय वैद्यकीय शिक्षणमंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"पुणे शहरातील नामांकित शासकीय ससून रुग्णालयात दररोज मोठया प्रमाणात रुग्ण दाखल होत असणे, औषधांसाठी रुपये 8 कोटीची मागणी असताना केवळ रुपये 4.40 कोटी इतकाच निधी मिळणे, परिणामी गरीब रुग्णांना औषधे न मिळणे, औषधाअभावी रुग्ण दगावणे, रुग्णालयातील सी.टी.स्कॅन मशीन एक वर्षापासून बंद असणे, कर्मचाऱ्यांची असलेली अत्यल्प संख्या, त्यांच्या विविध मागण्या प्रलंबित असणे, त्यामुळे या रुग्णालयामध्ये उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांमध्ये व त्यांच्या कुटुंबीयात पसरलेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने त्वरित लक्ष घालून करावयाची तातडीची उपाययोजना व प्रतिक्रिया."

डॉ.विजयकुमार गावीत (वैद्यकीय शिक्षणमंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उपसभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.मोहन जोशी : सभापती महोदय, पुणे जिल्हयामध्ये ससून हे एकमेव जिल्हा रुग्णालय असून त्या रुग्णालयातील दररोजची रुग्णसंख्या आणि उपलब्ध सोयी सुविधा याबाबत या सभागृहात अनेकदा चर्चा झालेली आहे. शासनाच्या वतीने अद्याप आवश्यक ती पावले उचलली गेली नाहीत. तेथील स्वच्छतागृह, रुग्णालयाचा परिसर विचारात घेतला तर रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांचा आजार बळावल्याशिवाय राहणार नाही अशी स्थिती आहे. निवेदनामध्ये म्हटले आहे की, मागील वर्षी 7 कोटी व त्यानंतर 2 कोटी रुपये औषधांवर खर्च केलेला आहे. या रुग्णालयातील सी.टी.स्कॅन यंत्र मागील 14 महिन्यापासून बंद अवस्थेत आहे. हे शासनाला भूषण आहे काय? या रुग्णालयातील वर्ग.3 व वर्ग.4 ची 228 पदे रिक्त आहेत. कर्मचाऱ्यांची पदे भरली जात नाहीत.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी ..... लक्षवेधी सूचना क्र. 1.....

पर्यायी व्यवस्था देखील शासन करीत नाही. त्याचप्रमाणे अनेक गोष्टींचा या रुग्णालयात अभाव असल्याने शासन याबाबत कोणत्या उपाययोजना करणार आहे याची माहिती मिळाली पाहिजे. तसेच मेंटल स्कोअर आणि सर्जिकल स्कोअर या खरेदीसाठी कमीत कमी 12 कोटीची आवश्यकता आहे. ही मागणी सन 2012-13 मध्ये शासन पूर्ण करणार काय, एमआरआय मशिनच्या मेंटेनन्ससाठी तरतूद करण्याची गरज आहे ती शासन करणार काय, तसेच वर्ग-3 व 4 ची 228 पदे रिक्त आहेत ती भरण्यात येतील काय अथवा पर्यायी व्यवस्था शासन करणार काय ?

डॉ. विजयकुमार गावित : महोदय, ससून रुग्णालयात सरासरी 1464 रुग्ण ओपीडीमध्ये येतात तर 880 आंतररुग्ण म्हणून ट्रिटमेंट घेतात. हे पुणे जिल्ह्यातील मुख्य हॉस्पिटल असून हॉस्पिटलसाठी जागा कमी पडत होती म्हणून आपण 11 मजली स्वतंत्र इमारत बांधली व त्यात इतर सुविधा उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न करीत आहोत. कारण या हॉस्पिटलच्या परिसरात मुळात जागाच कमी असल्याने ही 11 मजली इमारत बांधावी लागली. त्यात ऑपरेशन थिएटर आणि इतर वॉर्ड्सची व्यवस्था करीत आहोत. औषधासाठी या वर्षी 7.15 कोटी इतकी रक्कम उपलब्ध करुन दिली आहे. तसेच सन्माननीय सदस्यांनी मेंटल आणि सर्जिकलशी संबंधित बाबींसाठी 12 कोटीची मागणी केली त्यानुसार ही रक्कम देण्यात येईल. तसेच या रुग्णालयातील सी.टी. स्कॅनचे लाईफ संपल्यामुळे फेब्रुवारी, 2011 पासून बंद आहे, तरी देखील ट्यूब बसवून ते आपण दोन वर्षे वापरले पण 18 फेब्रुवारी, 2011 पासून पूर्णपणे बंद पडलेले आहे. त्यामुळे एमएलसी आणि बीपीएल चे जे पेशंट आपण कमला नेहरु हॉस्पिटलमध्ये पाठवितो. तेथे जनरली ब्रेनशी संबंधित तपासणीसाठी 2500 रुपये बाहेर घेतले जातात पण या पेशंटकडून फक्त 800 रुपये घेतले जातात. एमआरआय साठी 3500 रुपयाऐवजी 1200 रुपये आकारले जातात. अशा प्रकारे आतापर्यंत एकूण 3031 रुग्णांना ही सेवा दिलेली आहे. मधल्या काळात सी.टी. स्कॅन आणि एमआरआय साठी आपण आऊट सोर्सिंग करणार होतो पण त्याला वेळ लागेल म्हणून ही दोन्ही यंत्रे नव्याने खरेदी करण्याच्या ऑर्डर्स दिलेल्या आहेत. यासंबंधीचे पुरवठा आदेश 7 मार्च, 2012 रोजी देण्यात आले असून पुढील तीन महिन्यात ही दोन्ही यंत्रे आपल्याकडे येतील. तसेच रिक्त पदांच्या बाबतीत आऊट सोर्सिंगच्या माध्यमातून भरती करणार

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावित .....

आहोत. ही पदे भरली नसली तरी बदली कामगारांच्या रुपाने ही भरती आपण करीत आहोत. अशा प्रकारे दोन महिन्यात ही सर्व कामे मार्गी लागतील.

डॉ. सुधीर तांबे : महोदय, ख्यातनाम बी.जे. मेडिकल कॉलेजला जोडलेले हे हॉस्पिटल असून त्यात केवळ पुणे जिल्हाच नव्हे तर उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम महाराष्ट्रातील गरीब लोकांसाठी असलेले महत्वाचे वैद्यकीय केंद्र आहे. या हॉस्पिटलमध्ये वेगवेगळ्या सुविधा उपलब्ध करुन देण्याचा निर्णय शासनाने घेतला होता व त्या सुविधा कधीपर्यंत देण्यात येतील, तसेच ज्याप्रमाणे शासनाने जे.जे.हॉस्पिटलला सुपर स्पेशॉलिटीचा दर्जा दिलेला आहे तसा दर्जा ससून रुग्णालयाला देणार काय ?

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. विजयकुमार गावीत : सभापती महोदय, पूर्वी आपण ससून हॉस्पिटलमध्ये युरॉलॉजी, प्लॅस्टिक सर्जरी, सीबीटी, नेफ्रालॉजी असे सुपर स्पेशालिटीचे चार विभाग सुरु केले होते परंतु त्यासाठी लागणारे इन्फ्रास्ट्रक्चर्स, मनुष्यबळ त्या पध्दतीचे निर्माण केले नव्हते. आता आपण इन्फ्रास्ट्रक्चर्स व मनुष्यबळासाठी वित्त विभागाकडे मागणी केली असून यामुळे आपण फूल फ्लेज डिपार्टमेंट सुरु करणार आहोत. हे डिपार्टमेंट फूल फ्लेज सुरु झाल्यानंतर डायलसीससाठी जी काही मशिनरी लागतील ती उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याच बरोबर इतर स्पेशालिटीचे डिपार्टमेंट वेल इक्वीपड् सुरु होऊ शकतील.

श्रीमती दिप्ती चवधरी : सभापती महोदय, पुणे येथील ससून हॉस्पिटल गोरगरिबांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचे हॉस्पिटल आहे. परंतु या ठिकाणी कार्यरत असणारा डॉक्टरांचा तसेच कर्मचा-यांचा स्टाफ व या हॉस्पिटलमध्ये येणा-या रुग्णांची संख्या यामध्ये फार मोठी तफावत आहे. त्यामुळे माझा प्रश्न असा आहे की, ससून हॉस्पिटलमध्ये डॉक्टरांची व कर्मचा-यांची संख्या वाढवली जाणार का ? पुणे शहर व त्या परिसरात स्वाईन फ्ल्यूने मोठया प्रमाणात थैमान घातलेले आहे. त्यामुळे स्वाईन फ्ल्यूच्या संदर्भात पुढील काळात शासनाने काही नियोजन केले आहे काय ? ससून हॉस्पिटलमध्ये 10 व्हेंटीलेटर्स घेण्यात यावे अशा प्रकारचे आदेश माननीय उप मुख्यमंत्र्यांनी दिल्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते. परंतु हे 10 व्हेंटीलेटर्स केव्हा पर्यंत उपलब्ध करुन दिले जाणार आहेत ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री. मोहन जोशी, डॉ. सुधीर तांबे तसेच सन्माननीय सदस्या श्रीमती दिप्ती चवधरी यांनी प्रश्न उपस्थित केलेले आहेत. ससून हॉस्पिटलमध्ये केवळ पुण्यातीलच नाही तर पुण्याच्या आजुबाजूच्या जिल्हयातील रुग्ण सुध्दा उपचारासाठी येत असतात. ससून हॉस्पिटल हे सर्वसामान्य गोरगरीब जनतेसाठी आहे अशी या हॉस्पिटलची ओळख आहे. राज्याचा अर्थमंत्री या नात्याने सभागृहाच्या लक्षात एक गोष्ट आणून देऊ इच्छितो की, वैद्यकीय शिक्षण मंत्री डॉ. गावित साहेब तसेच वैद्यकीय शिक्षण राज्यमंत्री श्री. डी.पी.सावंत यांनी यासंदर्भात बैठक घ्यावी. ससून हॉस्पिटलसाठी खरोखरच अधिकचे किती डॉक्टर्स लागतात तसेच या लक्षवेधी सूचनेच्या संदर्भात ज्या काही सूचना

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. अजित पवार....

सन्माननीय सदस्यांनी केलेल्या आहेत त्याची अमलबजावणी करण्यासाठी अधिकचा किती निधी लागतो याबाबत येत्या महिना भरात सन्माननीय मंत्रीमहोदयांनी मला माहिती उपलब्ध करुन द्यावी. या सर्वांची तरतूद उप मुख्यमंत्री म्हणून माझ्याकडून केली जाईल व ससून हॉस्पिटलचा प्रश्न मार्गी लावला जाईल एवढे या निमित्ताने मी सांगू इच्छितो.

श्री. उल्हास पवार : सभापती महोदय, माननीय उपमुख्यमंत्र्यांनी शासनाच्या वतीने ससून हॉस्पिटलच्या संदर्भात जी भूमिका मांडली त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. ससून हॉस्पिटलमध्ये केवळ पुणे जिल्हयातीलच नाही तर पश्चिम महाराष्ट्रातील खेडया पाडयातून रुग्ण येत असतात. या हॉस्पिटलमधील गर्दी दिवसेंदिवस वाढत चालली आहे. त्यामुळे यासंदर्भातील विचार करुन शासन या ठिकाणी नोव्हेंबर 2011 रोजी 11 माळयाची इमारत बांधून पूर्ण होणार होती. परंतु आता ती सहा मजल्याचीच झालेली आहे. या ठिकाणी गर्दी वाढते आहे, रुग्णांची संख्या वाढते आहे त्यामुळे या सगळया गोष्टी लक्षात घेऊन सन्माननीय उप मुख्यमंत्र्यांना माझी विनंती आहे की, या 11 माळयाच्या इमारतीचे बांधकाम कधी पर्यंत पूर्ण होणार आहे ?

श्री. अजित पवार : सभापती महोदय, पुणे जिल्हयाचा पालक मंत्री या नात्याने अधिवेशन संपल्यानंतर यासंदर्भात बैठक घेतली जाईल. या इमारतीच्या वरील पाच मजल्यांच्या संदर्भात ठेकेदाराचा काही प्रश्न निर्माण झाल्यामुळे ठेकेदार चालढकल करीत आहे. त्यामुळे यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम खात्याचे संबंधित अधिकारी तसेच वैद्यकीय शिक्षण खात्याचे अधिकारी व संबंधित मंत्र्यांची बैठक घेऊन या कामाला गती कशी देता येईल, यामध्ये कोणती अडचण आलेली आहे, ही अडचण स्थानिक स्थरावरील असेल तर जिल्हयाच्या बैठकीमध्ये ही अडचण सोडवली जाईल व ही अडचण राज्यस्थरावरील असेल तर त्यासंदर्भात सकारात्मक निर्णय घेऊन सोडवली जाईल.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी. : कोथरुड जि.पुणे येथील सामाजिक प्रतिष्ठानच्या स्वीकार बालकाश्रमातील बालकांची होत असलेली हेळसांड

मु. शी. : कोथरुड जि.पुणे येथील सामाजिक प्रतिष्ठानच्या स्वीकार बालकाश्रमातील बालकांची होत असलेली हेळसांड यासंबंधी सर्वश्री हेमंत टकले, रमेश शेंडगे, श्रीमती उषाताई दराडे, सर्वश्री. विक्रम काळे, अनिल भोसले, अरुण गुजराथी, श्रीमती विद्या चव्हाण, वि. प. स. यांनी दिलेली लक्षवेधी सूचना.

श्री. हेमंत टकले (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, मी नियम 101 अन्वये पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे आपल्या अनुमतीने सन्माननीय महिला व बाल विकास मंत्र्यांचे लक्ष वेधू इच्छितो आणि त्याबाबत त्यांनी निवेदन करावे, अशी विनंती करतो.

"कोथरुड, जि.पुणे येथील "आशा सामाजिक प्रतिष्ठानच्या स्वीकार बालकांश्रमातील" मुलांना गेल्या बरेच महिन्यांपासून अर्धेपोटी उपाशी रहावे लागणे, त्याठिकाणी स्वच्छतेचा असलेला अभाव, आरोग्याची होणारी हेळसांड, निकृष्ट दर्जाचे अर्धवट जेवण देण्यांत येणे, शासनाकडून परवानगी घेऊन हे बालकाश्रम चालविण्यात येत असून दानशूर व्यक्तींकडून मिळणाऱ्या वस्तूंचा तेथील संचालकांकडून होत असलेला गैरवापर, याप्रकरणाची चौकशी करुन संबंधितांविरुध्द कारवाई करण्याची होत असलेली मागणी, यावर शासनाने केलेली वा करावयाची उपाययोजना."

प्रा.वर्षा गायकवाड (महिला व बालविकास मंत्री) : सभापती महोदय, लक्षवेधी सूचनेसंबंधीच्या निवेदनाच्या प्रती माननीय सदस्यांना आधीच वितरित केल्या असल्यामुळे मी ते निवेदन आपल्या अनुमतीने सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

उप सभापती : निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

निवेदन

(प्रेस : येथे सोबतचे निवेदन छापावे)

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, या लक्षवेधी सूचनेच्या निमित्तने सभागृहापुढे एचआयव्ही बाधित बालकांचा एक गंभीर विषय चर्चेला आला आहे. समाजामध्ये अजूनही एचआयव्ही बद्दल गैरसमज आहेत. त्यामुळे एक प्रकारची नवीन अस्पृश्यता निर्माण केली जात आहे. त्यामुळे एचआयव्ही बाधित मुलांचे जगणे कठीण झाले आहे. त्यांच्या शिक्षणामध्ये, पालनपोषणामध्ये प्रचंड असे आव्हानात्मक चित्र आपल्या समोर उभे राहिलेले दिसते. स्वीकार या संस्थेबद्दल माहिती देण्यात आली आहे. सन 2007 पासून 2012 पर्यंत अनधिकृतरित्या संस्था चालविली जात होती. एवढ्या कालावधीत आपल्या खात्याकडून त्या संस्थेची पाहणी, तपासणी काहीच झाले नाही काय ? पाहणी केल्यानंतर तेथे कर्मचारी वर्ग नसल्याचे, निकृष्ट दर्जाचे भोजन देत असल्याचे, मुलांना आजार झ ाल्याचे आढळून आले आहे. एचआयव्हीच्या यातना भोगत असल्यामुळे ती मुले तेथे आश्रयाला आली. पण त्यांच्या विरोधात जाणीवविरहित कारभार चालत होता. सरकारच्या डोळ्या देखत अनधिकृत बालकाश्रम पुण्या सारख्या शहरामध्ये चालविले जातो. पुण्यामध्ये भर वस्तीत असलेल्या एका बंगल्यामध्ये हा प्रकार घडला आहे. ही खरोखरच अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. आपण या मुलानां येथून स्थलांतरित केले. तेथे गेल्या नंतर तेथील मुलांना, अधीक्षकांना या संबंधातील कल्पना येते. पुन्हा त्यांना वेगळे करण्याची, बाजूला ठेवण्याची पद्धत त्या बालकाश्रमामध्ये सुरू झाल्याचे आढळून येते. या सर्व प्रकाराला आळा घातला गेलाच पाहिजे. त्यांचे जीवन आधीच उद्ध्वस्त झालेले आहे. त्यांच्यासाठी काही तरी नवीन योजना जिल्हा स्तरावर, विभागीय स्तरावर शासन आणणार आहे काय ? तसेच एचआयव्ही बाधित बालकांसाठी शासन एक विशेष उपक्रम हाती घेईल काय व या प्रश्नाची तड लावेल काय ? एवढेच मला या निमित्ताने विचारावयाचे आहे.

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांनी उपस्थित केलेला प्रश्न अत्यंत संवेदनशील असा आहे. एचआयव्हीग्रस्त मुलांसाठी बालकाश्रम काढला होता. पण त्यासाठी त्यांनी कुठलाच परवाना घेतला नव्हता. आमच्याकडे दिनांक 2.1.2012 रोजी तक्रार आली. त्यानंतर अधिकाऱ्यांच्या मार्फत अचानक तपासणी झाली व त्यातून हे सर्व प्रकरण बाहेर आले. तेव्हा आम्हाला कळले की, तेथे साधारणत: 12 मुले होती. यामध्ये 6

..2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. वर्षा गायकवाड....

मुले व 6 मुली होत्या. यापैकी एक मुलगी तापाने व एक मुलगा त्वचारोगाने आजारी होता. तेथील वातावरण बरोबर नव्हते म्हणून या संस्थेतील 12 प्रवेशितांपैकी 6 मुलांना आपण मुलाचे निरीक्षणगृह बालगृह, शिवाजी नगर व 6 मुलींना मुलींचे निरीक्षणगृह, पुणे येथे तात्पुरते ठेवले. त्यानंतर या सर्व मुलांना मानव्य, भूगाव, पुणे येथे ठेवले. या मुलांच्या भवितव्यासाठी जिल्हा किंवा विभागीय स्तरावर काही उपाययोजना करण्यात येणार आहेत काय ? असा सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले यांचा मूलभूत प्रश्न होता. या संदर्भात महाराष्ट्र एडस् कंट्रोल सोसायटी समवेत बैठक घेण्यात येईल. त्यानंतर सार्वजनिक आरोग्य विभागाशी चर्चा करून अशा मुलांसाठी कोणकोणत्या सुविधा पुरविल्या पाहिजेत याचा बृहत आराखडा निश्चितपणे तयार करण्यात येईल.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, माझा मूलभूत प्रश्न असा आहे की, एचआयव्ही बाधित मुलांचे पुनर्वसन करण्यासाठी अशा संस्थांना परवानगी देते काय, असल्यास, त्यासाठी कोणते निकष लावले जातात आणि अशा एचआयव्ही बाधित मुलांना, रूग्णांना समाज लांब ठेवतो त्यासाठी विशिष्ट कायदा शासन प्रस्तावित करेल काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, अशा मुलांसाठी बालगृहे आहेत काय अशा प्रकारचा प्रश्न विचारला आहे. अशा प्रकारची अनुदानित बालगृहे 10 आहेत, तर विनाअनुदानित 6 बालगृहे आहेत. आपण मधल्या काळात निकष केले आहेत. महाराष्ट्र एडस् कंट्रोल बोर्ड, सार्वजनिक आरोग्य विभाग यांच्या समवेत बसून या संबंधातील निकष, घ्यावी लागणारी काळजी इत्यादी ठरवावे लागेल. आपण मतिमंद मुलांची पूर्ण वैद्यकीय तपासणी करण्यास सांगितले आहे. त्यांना कशा प्रकारचा आहार दिला पाहिजे, कशा प्रकारची ट्रीटमेंट दिली पाहिजे, एकूण किती मुले आहेत, हे सर्व बघितले जाईल व जिल्ह्याला गरज आहे की, विभागाला गरज आहे, हे सर्व पाहूनच सगळे काही ठरविले जाईल.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती उषा दराडे : सभापती महोदय, याठिकाणी आता महिला व बालकल्याण विभागाच्या माननीय मंत्री महोदयांनी असे सांगितले की, 6 विना अनुदानित बालगृहे आहेत आणि त्याठिकाणी एडस्च्या मुलांची सोय केली जाते. माझा असा प्रश्न आहे की, या विना अनुदानित बालगृहांना कधी अनुदानावर आणले जाईल, तसेच दुसरी महत्वाची गोष्ट अशी की, ज्या-ज्या ठिकाणी अशी बालगृहे आहेत, त्या सगळ्यांचा सर्व्हे केला जाईल काय, तसेच त्यामध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी काय करण्यात येणार आहे, तसेच त्यांच्या शिक्षणासाठी शासन विशेष योजना आखणार आहे काय, विशेषत: बीड मध्ये बारगजे नावाचे एक कुटुंब आहे त्या कुटुंबातील पती-पत्नी अतिशय चांगल्या पध्दतीने बालगृहे चालवितात. त्यांना शासन विशेष मदत करण्याचा प्रयत्न करणार आहे काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी विना अनुदान तत्वाच्या अनुषंगाने प्रश्न उपस्थित केला आहे. त्याबाबत मला सांगावयाचे आहे की, त्यांनी शासनाकडे प्रस्ताव सादर करावा. पुष्कळशा लोकांकडून प्रस्ताव येत नाहीत. कालही कोल्हापूरच्या संबंधात प्रश्न विचारण्यात आला होता, तेव्हाही मी सांगितले की, याबाबत प्रस्ताव सादर करावा. तसेच दुसरा प्रश्न उपस्थित केला त्याबाबत सांगावयाचे तर जी बालगृहे आहेत त्याची आमच्याकडे नोंदणी नाही, याबाबतीत रजिस्टर प्रमाणपत्र देखील नाही. आम्ही मधल्या काळामध्ये साधारणत: 1070 पैकी जवळजवळ 945 संस्थांना नोंदणी प्रमाणपत्र दिलेले आहे. तसेच या बाबतीतील 22 डिसेंबरला जी.आर. काढून निकष बदलल्यामुळे नवीन ज्या बालगृहांना मान्यता दिलेल्या आहेत त्यांची पूर्ण तपासणी करुनच त्यांना नोंदणी पत्र देण्यात येईल. मात्र याठिकाणी सन्माननीय सदस्यांनी जो मूलभूत प्रश्न विचारला आहे, त्याबाबत मला फक्त एवढेच सांगावयाचे आहे की, (बाल मुलांची काळजी व संरक्षण अधिनियम, 2006) हा केंद्र शासनाचा कायदा असून त्यानुसार आपण संबंधित संस्था चालकांवर कलम 34 (3) आणि कलम 23 अन्वये गुन्हा सुध्दा नोंदविलेला आहे. कलम 23 अन्वये सहा महिन्याची शिक्षा आहे पण कलम 34 (3) अन्वये शिक्षा नाही. म्हणून जर अनुदानित संस्था असेल तर मग संबंधितांना शिक्षा मिळाली पाहिजे. याबाबतीत आम्ही केंद्र शासनाला जरुर शिफारस करु.

डॉ.नीलम गोऱ्हे : सभापती महोदय, ज्याप्रमाणे एखादे छोटेसे झाड उगवावे, त्याप्रमाणे अचानक कुठेतरी एक बालकाश्रम उभा राहिल्याचे दिसते आणि तसे सापडल्यानंतर आपण त्याबाबत कारवाई करतो.माझा प्रश्न असा आहे की, पुणे महानगरपालिका असो किंवा अन्य महानगरपालिका असो किंवा जिल्हा परिषदा असोत, त्यामध्ये महिला व बालकल्याण समित्या आहेत. पण त्याठिकाणी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.नीलम गोऱ्हे . . . .

बालगृहे अस्तित्वात आहेत काय,असतील तर त्यासाठी परवानगी घेतलेली आहेत काय,तेथे मुलांची काय व्यवस्था केलेली आहे? यासंदर्भात तुम्ही त्यांचे सक्षमीकरण केले आणि त्यांनाही यामध्ये जोडून घेतले तर त्यांनाही चांगले काम मिळेल आणि तुमच्याही कामाला थोडे मनुष्यबळ मिळू शकेल. तसा उपक्रम राबविणार आहात काय ?

प्रा.वर्षा गायकवाड : सभापती महोदय, मी कालच एका प्रश्नाला उत्तर देताना सांगितले की मधल्या काळामध्ये मराठवाडा विभागामध्ये पूर्णत: तपासणी केलेली आहे. त्यावेळी ज्या त्रुटी दिसून आल्या त्याबाबतीत काहींना कारणे दाखवा नोटीस देण्यात आलेली आहे. पण सन्माननीय सदस्या डॉ.नीलम गोऱ्हेताई यांनी जे सजेशन केलेले आहे, ते चांगले आहे की, तेथील जिल्हापरिषद किंवा महानगरपालिका यांच्याशी समन्वय साधण्यात येईल. या मधल्या काळामध्ये आपण तेथे गेलो नाही. पण सध्या जी स्थिती आहे त्याबाबत तपासणी करुन त्यासंबंधीचा अहवाल महिला बाल विकास समितीच्या सभापतींच्या माध्यमातून होत असेल तर सजेशन फॉर ॲक्शन, ही चांगली सूचना आहे.

3सी-3. . . .

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

विशेष उल्लेख

पृ.शी./ मु.शी: राज्यामध्ये श्री.मल्हारराव होळकर यांचे स्मारक उभारणे याबाबत सन्माननीय सदस्य श्री.रमेश शेंडगे वि.प.स.यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.रमेश शेंडगे (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्लेखाची सूचना मांडतो.

सभापती महोदय, मी आपल्याला धन्यवाद देतो. होळकर घराण्याचे संस्थापक आपल्या पराक्रमाने कसलीही घराणेशाहीची परंपरा नसताना स्वबळावर पुढे येत मराठेशाहीचे मुख्य आधारस्तंभ बनलेले एक धोरणी, मुत्सद्दी व शिवरायांच्या गनिमी काव्याला अंगिकारणारे सेनानी, अंगी गुण असले, वीरश्री असली तरी एक असामान्य अनाथ धनगर मुलगा भटकंती समाजामध्ये जन्म घेऊन भारताच्या इतिहासाला घडविणारा महानायक कसा बनू शकतो हे सिध्द करणारे श्री.मल्हारराव होळकर यांनी असामान्य पराक्रम गाजवून मराठ्यांची सत्ता उत्तर भारतामध्ये आणण्याचे मोठे कार्य केले. तसेच शिंदे-होळकर यांच्यामध्ये जरी वैर असले तरी मराठी साम्राज्याच्या ऐक्यासाठी त्यांनी शिंदे यांच्याशी मैत्री साधण्याचा अथक प्रयत्न केला. अशा या मुत्सद्दी महानायक मल्हारराव होळकर यांचे स्मारक राज्यामध्ये उभे करण्यासाठी समाजाकडून होत असलेली मागणी, सदरहू मागणीच्या अनुषंगाने मुत्सद्दी महानायकाचे स्मारक उभारण्यात यावे अशी मागणी मी या विशेष उल्लेखाव्दारे करीत आहे.

श्री.अ.शिगम . . ..

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: समाज कल्याण विभागाच्या दि.7 मे 1999 च्या शासन निर्णयानुसार आंतरजातीय विवाह केलेल्या व्यक्तींना सवलती न मिळणे या बाबत श्री.रामनाथ मोते,वि.प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.रामनाथ मोते (कोकण विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ा संबंधीची सूच□ा मांडतो.

राज्य शासनाने दिनांक 12 ऑगस्ट 1958, दिनांक 19 ऑक्टोबर, 1959, दिनांक 16 मे 1966, दिनांक 9 ऑगस्ट 1971, दिनांक 27 जानेवारी 1976, दिनांक 1 डिसेंबर 1979 व दिनांक 18 नोव्हेंबर 1996 या शासन निर्णयाच्या अनुषंगाने अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती व इतर मागासवर्गीय व्यक्तीने अमागासवर्गीय व्यक्तीशी विवाह केल्यास, आंतरजातीय विवाह केल्यास अशा जोडप्यास व त्यांच्या अपत्यांना त्या त्या जातीच्या सवलती देण्या बाबतचे तसेच अमागसवर्गीय व्यक्तीसही सवलती देण्याबाबत शासनाने जाहीर केले होते. या निर्णयाच्या आधारे आंतरजातीय विवाह केलेल्या जोडप्यांना जातीचे दाखले मिळाले असून त्यांना आरक्षणाचे फायदेही देण्यात आलेले आहेत.

सभापती महोदय, आता शासनाने सर्वोच्च न्यायालयाच्या निकालानुसार दिनांक 7 मे 1999 च्या (समाज कल्याण विभाग) शासन निर्णयानुसार आंतरजातीय विवाह केलेल्या व्यक्तींना आरक्षणाचे फायदे देण्याचा निर्णय रद्द केला आहे. माझी या विशेष उल्लेखाद्वारे एवढीच विनंती आहे की, माननीय सर्वोच्च न्यायालयाचा दि.7 मे 1999 चा आदेश येईपर्यंत ज्या व्यक्तींना फायदे मिळालेले आहेत, प्रमाणपत्र मिळालेली आहेत, त्यांना सेवा मिळालेल्या आहेत, त्यांचे फायदे काढून घेण्यात येऊ नयेत आणि या आदेशाची अंमलबजावणी 7 मे 1999 नंतर करण्यात यावी अशी विनंती आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ. शी/ मु. शी : चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यामध्ये तेंदूपत्त्याची निविदा न काढल्यामुळे वन मजूर रोजगारापासून वंचित राहणे या बाबत श्रीमती शोभा फडणवीस, वि.प.स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ा संबंधीची सूच□ा मांडते.

सभापती महोदय, गडचिरोली, चंद्रपूर, भंडारा आणि गोंदिया या चारही जिल्ह्यात मोठ्या प्रमाणावर तेंदू पत्ता होतो. विशेषत: चंद्रपूर आणि गडचिरोली जिल्ह्यामध्ये जास्त मोठ्या प्रमाणावर तेंदू पत्ता होतो. त्यामुळे आदिवासींचे मुख्य उदरनिर्वाहाचे साधन तेंदू पत्ता आहे. चंद्रपूर व गडचिरोली जिल्हा हा जंगलाचा जिल्हा असून सदर जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात तेंदू पत्ता होतो. वन विभागाने तेंदू निविदाच्या अट कमांक 12 व 14 मध्ये बदल करुन कडक अटी लादल्यामुळे वन मजुरांवर रोजगारापासून वंचित राहण्याची पाळी आली आहे. अद्याप तेंदू पत्त्याचे टेंडर निघाले नाही, त्यामुळे मजुरांना कामे मिळत नाहीत. या जिल्ह्यात आदिवासी मजुरांची संख्या मोठ्या प्रमाणात असून सदर आदिवासींना वन मजुरी करुनच आपली उपजीविका करावी लागते. त्यामुळे तेंदू पत्त्याचे टेंडर त्वरित काढून वन मजुरांना कामे उपलब्ध करुन देण्याची अत्यंत आवश्यकता आहे. तेंदू पत्त्यामुळे शासनाला देखील महसूल मिळतो. तेव्हा या बाबत शासनाने लवकरात लवकर निर्णय घ्यावा अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या असलेल्या कालखंडामध्ये शिक्षकांसाठी प्रशिक्षण आयोजित करणे या बाबत श्री.नागो पुंडलिक गाणार, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री.नागो पुंडलिक गाणार (नागपूर विभाग शिक्षक) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ मांडतो.

राज्य शासनाच्या शिक्षण विभागाने 1 फेब्रुवारी 2012 ते 18मार्च 2012 पर्यंत शिक्षक्ांचे प्रशिक्षण आयोजित करणे. सदरहू कालखंड हा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा आहे. या कालखंडात अभ्यासक्रम पूर्ण करणे, उजळणी घेणे, प्रश्नपत्रिका सोडविण्याचा सराव करुन घेणे, तोंडी परीक्षा घेणे इत्यादी महत्वाची कामे शिक्षकांना करावी लागतात. परंतु शिक्षण विभागाने या बाबींकडे दुर्लक्ष करुन प्रशिक्षणाकरिता आलेला निधी खर्च करण्यासाठी कोणत्याही प्रकारचे नियोजन न करता प्रशिक्षण सुरु केले आहे. फक्त मार्च महिना आला की निधी खर्च करण्यासाठी शिक्षकांना प्रशिक्षण करण्यास लावणे, शिक्षकांना त्यांचा भत्ता न देता अधिकाऱ्यांनी तो स्वत:च्या खिशात टाकणे. सदरहू शिक्षकांचे प्रशिक्षण रद्द करण्या बाबत राज्य शिक्षक शिक्षण परिषदेच्या शिष्टमंडळाने शिक्षण उप संचालक, नागपूर विभाग यांना निवेदन दिलेले आहे. प्रशिक्षण रद्द न झाल्याने शिक्षकांची शाळेत कमी उपस्थिती आहे. त्यामुळे निधी वाया गेलेला आहे आणि विद्यार्थ्यांचे देखील शैक्षणिक नुकसान झालेले आहे. तेव्हा भविष्यकाळात शासनाने दक्षता घेऊन योग्य ती उपाय योजना करावी, अशी मी या विशेष उल्लेखाद्वारे शासनास विनंती करीत आहे.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी. : टंचाई निवारणाच्या जी.आर.चा व्यवस्थित अर्थ न काढल्याने शेतकऱ्यांना त्याचा लाभ न मिळणे याबाबत डॉ. नीलम गोऱ्हे वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

डॉ. नीलम गोऱ्हे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा मांडते.

"राज्यातील टंचाई निवारण संदर्भातील शासनाने माहे फेब्रुवारी, 2012 च्या शेवटच्या आठवडयात काढलेला "जी.आर"(शासन निर्णय), या जी.आर.चा अर्थ अधिकाऱ्यांनी व्यवस्थित न काढल्याने टंचाई निवारणाची कामे तसेच शेतकऱ्यांना त्यांचा लाभ न मिळणे, जिल्हा प्रशासनाकडून या जी.आर. चा अर्थ व्यवस्थित न काढल्याने चितळेसारख्या मोठया डेअरी व्यवसायिकांना म्हशीसाठी मोफत चारा मिळणार नाही असे म्हटले असतांना शासकीय यंत्रणेने याचा वेगळा अर्थ काढून डेअरीमध्ये दूध घालणाऱ्या सामान्य शेतकऱ्यांच्या म्हशीनाही यंत्रणेने "कमर्शिअल" या निकषात गोवल्यामुळे या शेतकऱ्यांना त्याचा लाभ न मिळणे, शासनाच्या या जी.आर.मुळे शेतकऱ्यांना लाभ होण्याऐवजी नुकसान झाल्याने त्यांच्यात निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण याकरिता शासनाने तातडीने या जी.आर चा योग्य अर्थ संबंधित सर्व जिल्हा प्रशासनाला ज्ञात करण्याची आवश्यकता, तसेच टंचाईबाबत काम न केलेल्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन कडक कारवाई करण्याची नितांत गरज असल्याने याबाबत शासनाने तत्काळ निवेदन करावे."

सभापती महोदय, आज सकाळी दुष्काळ निवारणाच्या संदर्भात या सभागृहात चर्चा झाली त्यावेळी सुध्दा मी हा मुद्दा मांडला होता. राज्यात टंचाई निवारणाच्या संदर्भात फेब्रुवारी, 2012 च्या शेवटच्या आठवडयात शासनाने जो जी.आर.काढला त्याचा अर्थ व्यवस्थित न काढल्यामुळे टंचाई निवारणाच्या संदर्भात प्रत्येक तालुक्यातून शेतकऱ्यांच्या आणि लोकांच्या तक्रारी आहेत.

महाराष्ट्रातील ज्या-ज्या तालुक्यात सातत्याने दुष्काळ पडतो आणि पाण्याची टंचाई असते अशा तालुक्यांच्या संदर्भात दुष्काळ निवारणासाठी एखादा विशेष प्रयत्न किंवा एखादे महामंडळ राज्य स्तरावर करण्यात येईल असे आश्वासन वेळोवेळी देऊन सुध्दा त्याची अंमलबजावणी झालेली नाही तसेच प्रत्येक तालुक्यात काय परिस्थिती आहे याचा सातत्याने आढावा घेणारी यंत्रणा

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. नीलम गोऱ्हे. . . .

राज्यस्तरावर नसल्यामुळे जनतेला सातत्याने हाल भोगावे लागत आहेत म्हणून या टंचाई निवारणाच्या संदर्भात दुष्काळ निवारणासाठी राज्यस्तरावरील यंत्रणा सक्षम करावी याकडे मी शासनाचे लक्ष वेधीत आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

SMT/ KTG/ KGS/

पृ.शी./मु.शी.: राष्ट्रीय रक्तपेढी धोरणाची अंमलबजावणी होत नसल्याने रुग्णांची होत असलेली गैरसोय याबाबत श्री. सतीश चव्हाण वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. सतीश चव्हाण (औरंगाबाद विभाग पदवीधर) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा मांडतो.

"राज्यातील गरीब आणि गरजू रुग्णांना तातडीने रक्त मिळून त्यांचे प्राण वाचावेत राष्ट्रीय रक्तपेढी धोरणाची अंमलबजावणी योग्यरित्या व्हावी यासाठी शासनाने राज्यभरात समान दराने रक्त पुरवठा करण्याचे बधंनकारक करण्यात येणे, तसेच रुग्णांस रक्त पुरवठा करण्याची जबाबदारी रुग्णालयाची असेल असे स्पष्ट निदेश शासनाने नवीन आदेशाद्वारे देवूनही राज्यभरातील विविध रुग्णालयामार्फत अंमलबजावणी होत नसल्याने रुग्णांची होत असलेली लुबाडणूक थांबविण्यासाठी व नवीन आदेशाची अंमलबजावणी होण्याबाबत रुग्णालयांना सूचना देण्यात याव्यात अशी मागणी मी या विशेष उल्लेखद्वारे करीत आहे."

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी./मु.शी.: : पुणे शहरातील वाहनांची वाढती संख्या, वाहन चालकांकडून होत असलेल्या अपराधांचे आणि नियमांच्या उल्लंघनाचे वाढते प्रमाणे याबाबत श्री. माहेन जोशी, वि. प. स. यांनी दिलेली विशेष उल्लेखाची सूचना.

श्री. मोहन जोशी (नामनियुक्त) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने पुढील विशेष उल्ले□ासंबंधीची सूच□ा मांडतो.

" पुणे शहरातील वाहनांची वाढती संख्या आणि वाहन चालकांकडून होत असलेल्या अपराधांचे आणि नियमांच्या उल्लंघनाचे प्रमाण पाहता आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाहतूक पोलिसांनी करणे अत्यंत आवश्यक झाले आहे. वाहन चालकाने भूतकाळात केलेल्या अपराधांचे रेकॉर्ड कारवाईचे वेळीस पडताळून पाहण्याकरिता एम गव्हर्नस आणि ई गव्हर्नस या नवीन कार्यपध्दतीद्वारे सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी पार्क च्या सहकार्याने पुणे वाहतूक पोलिसांनी जून, 2009 मध्ये ट्रॅफिकॉप या प्रणालीची योजना मंजुरी करिता मंत्रालयात सादर करुनही शासनास अद्याप या योजनेवर विचार करता आलेला नाही. सदहू योजना प्राथमिक टप्प्यावर पुणे शहरात राबविण्यात आली होती. वारंवार अपघात करणाऱ्या वाहनचालकांनी पूर्वी केलेल्या नियमभंगाबाबत थेट प्रणालीच्या सर्व्हरवर नोंदी होत असल्यामुळे तीन महिन्यांत 66 गंभीर गुन्हयांमध्ये वाहने व आरोपी शोधण्यात आले. 320 बिनधनी वाहनांचे मालक शोधण्यात आले एवढेच नव्हे तर त्यातील 68 वाहने ही चोरीच्या गुन्ह्यातील होती. या तीन महिन्यांत तडजोडीच्या रक्कमेमध्ये 93 लक्ष रुपयांची वाढ झ ालेली आहे. सदरहू प्रणालीचा वापर करताना 7500 वाहन परवाने निलंबनासाठी सादर करण्यात येऊन त्यापैकी 4200 पेक्षा जास्त वाहन चालकांचे परवाने निलंबित झाले आहेत. सदरहू प्रणालीस भारत सरकार, नवी दिल्ली यांनी TBI आणि ISBA चा वार्षिक पुरस्कार तत्कालीन सन्माननीय केंद्रीय राज्यमंत्री आणि आताचे या राज्याचे माननीय मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराज चव्हाण यांच्या हस्ते देण्यात आला होता. सदरहू प्रणाली योजनेस अंतिम मंजुरी देण्यास मागील अडीच वर्षापेक्षा जास्त कालावधीपासून मंत्रालयातील संबंधित विभागाचे अधिकारी वेळकाढूपणाचे

..5..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. मोहन जोशी....

धोरण अवलंबित आहेत. ज्या योजनेचा भारत सरकारने गौरव केला, ज्या योजनेचा केंद्र शासनाने पुरस्कार केला त्या योजनेस महाराष्ट्र शासनाने लवकरात लवकर मंजुरी देऊन पुणे शहरातील वाहतुकीचा प्रश्न सोडविण्यास मदत करावी अशी मी शासनास विनंती करतो.

यानंतर श्री. बरवड....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: नियम स्थगित करणे

मु.शी.: नियम स्थगित करण्याबाबत उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्र्यांचा प्रस्ताव

श्री. अजित पवार (उप मुख्यमंत्री तथा वित्त मंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने खालील प्रस्ताव मांडतो.

"महाराष्ट्र विधान परिषद नियमातील नियम 289 अन्वये अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेच्या संदर्भात विधान परिषद नियमातील नियम 228(1) मधील सात दिवसांच्या कालावधी बाबतची जी तरतूद आहे, ती स्थगित करण्यात यावी."

प्रस्ताव मतास टाकून संमत झाला.

...2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी. : अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

मु.शी. : सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

उप सभापती : आजपासून अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेला प्रारंभ होईल. ही चर्चा दिनांक 27, 28 व 29 मार्च, 2012 अशी एकूण 3 दिवस होणार आहे. चर्चेसाठी एकूण जो वेळ उपलब्ध होईल त्यापैकी वित्त मंत्र्यांच्या उत्तरासाठी असलेला एक तास जमेस धरुन निम्मा वेळ सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांकरिता आणि निम्मा वेळ विरोधी पक्षाचे सदस्य व स्वतंत्र सदस्य यांना देण्यात येईल. या चर्चेत ज्या सदस्यांना भाग घ्यावयाचा असेल त्यांनी आपली नावे व ते ज्या तारखेस बोलू इच्छितात ती तारीख आपल्या प्रतोदामार्फत माझ्याकडे त्वरित पाठवावी. आता माननीय विरोधी पक्ष नेते चर्चेला सुरुवात करतील.

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे (विरोधी पक्ष नेता) : सभापती महोदय, अर्थसंकल्पावर आपण तीन दिवस सर्वसाधारण चर्चा करणार आहोत. गेल्या वर्षी दोन दिवस चर्चा झाली होती. माझे भाषण सुरु करण्यापूर्वी माझा एक पॉइन्ट ऑफ इन्फॉर्मेशन आहे. महाराष्ट्र राज्याचे विद्यमान अर्थमंत्री आणि अर्थ राज्यमंत्री कोण आहेत, याची मला माहिती पाहिजे. कारण विरोधी पक्ष नेता नवीन आहे, त्याला बहुदा माहीत नसेल, थोडासा उत्साहात असतो, असे काही बुजुर्ग सन्माननीय सदस्यांना वाटू शकते. मी आज सकाळी 11 वाजून 57 मिनिटांनी महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाच्या वेबसाईटवर गेलो. त्या वेबसाईटवर श्री. सुनील तटकरे आणि श्री. विजय वडेट्टीवार यांचे फोटो आहेत. मी त्यांना मेल केला. गव्हर्नमेंट ऑफ महाराष्ट्र वेबसाईट, डिपार्टमेंट ऑफ फायनान्सच्या वेबसाईटवर मी ई-मेल केला. मला एनआयसीचे असे उत्तर आले की, " Every effort has been made to ensure accuracy of information on this Site. This information is supplied by the Finance department, Govt. of Maharashtra. National Informatics Centre, Pune, will not be responsible for any information that may be incorrect." आज दिनांक 27 मार्च, 2012 रोजी सकाळी 11 वाजून 57 मिनिटांनी मी केलेला हा ई-मेल आहे. त्याला एनआयसीचे हे उत्तर आले आहे. माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये असा उल्लेख केला आहे की, माझे शासन नागरी सुविधा केंद्राव्दारे नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा देण्यावर भर देत आहे. माहितीकोषाचे अंतर्गत आदानप्रदान, विशेष ओळख क्रमांक जोडणीव्यवस्था आणि सर्व संकेतस्थळांची मराठी आंतरजोडणी व्यवस्था निर्माण करण्यासाठी ई-गव्हर्नन्स धोरण राबविण्यावर या वर्षात आमचा जोर राहील. हा जोर कधी सुरु होणार ? माननीय राज्यपालांनी आपल्या ई-गव्हर्नन्सचे इतके कौतुक केले असताना ज्यावेळी अशा पध्दतीच्या गोष्टी पहावयास मिळतात तेव्हा मला खरोखरच मनापासून धक्का बसतो.

ही या वर्षी समोर आलेली घटना असेल पण गेल्या काही वर्षाच्या अर्थसंकल्पातील जर घोषणा पाहिल्या तर असे दिसते की, त्या घोषणा होतात आणि वर्ष संपताना विरुन जातात. विधिमंडळाच्या कामकाजातील अर्थसंकल्पासारख्या पावित्र्य असणाऱ्या महत्वाच्या भागातील या घोषणा होत्या की,

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

आघाडी व युतीमधील निवडणुकीपूर्वी चौका चौकात सभा घेत असताना केलेल्या घोषणा होत्या ? सन 2006-07 मध्ये पुढील 5 वर्षात 5 हजार मेगावॉट विजनिर्मितीची घोषणा करण्यात आली होती. सन 2006-07 मध्ये 5357 मेगावॉटची घोषणा करण्यात आली. सन 2010-11 पर्यंत एका युनिटचेही विजेचे उत्पादन झाल्याचे आम्हाला दिसून आलेले नाही. सन 2007-08 मध्ये अशी घोषणा करण्यात आली होती की, कुलाबा ते माहीम असा 38.24 कि.मी.पर्यंत तसेच चारकोप-वांद्रे-मानखुर्द पर्यंत 31.87 कि.मी.पर्यंतच्या मेट्रो रेल्वेच्या प्रकल्पास मान्यता देण्याचे काम यावर्षी पूर्ण करण्यात येईल. या प्रकल्पाला अजून मान्यता मिळालेली नाही. सन 2008-09 मधील अर्थसंकल्पीय भाषणामध्ये अशी घोषणा केली की, पुणे-नाशिक या महामार्गाचे चौपदरीकरण करण्यात येईल. अद्याप त्याची सुरुवात सुध्दा झालेली नाही. सन 2009-10 मध्ये 26 जुलैच्या पार्श्वभूमीवर बुलेटप्रूफ जॅकेट खरेदी करणे व सीसीटीव्ही बसविण्याबाबत घोषणा करण्यात आली. अद्यापपर्यंत सीसीटीव्ही बसविले गेले नाहीत व बुलेटप्रूफ जॅकेटची खरेदी झालेली नाही. सन 2010-11 मध्ये कोकणाचे सुपूत्र ना.श्री.सुनील तटकरे यांनी खणखणीत आवाजात अर्थसंकल्प मांडला होता. त्यावेळी त्यांनी असे घोषित केले होते की, पाचाड येथे शिवसृष्टी उभी करु. शासनाने अद्याप जमीन सुध्दा ताब्यात दिलेली नाही. या प्रकल्पासाठी खाजगी जमीन घेण्यासाठी नियोजन विभागाकडे प्रस्ताव गेलेला आहे. तेथे तटबंदी होऊन बसली आहे. त्याला परवानगी मिळत नाही असे तत्कालीन अर्थ मंत्री श्री.तटकरे यांनी सांगितले आहे.

त्याच वर्षी त्यांनी असे सांगितले होते की, प्राथमिक आरोग्य केंद्राच्या स्तरावर इपीजी सुविधा दिली जाईल तसेच ग्रामीण रुग्णालयामध्ये रक्त पेढीची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल. प्रत्यक्षात एकाही ठिकाणी ही सुविधा उपलब्ध करुन दिलेली नाही. सन 2011-12 मधील अर्थसंकल्पीय भाषणात मागेल त्याला विजेचे कनेक्शन दिले जाईल असे घोषित केले होते. पण 2 लाख 17 हजार 835 कृषी पंपाचे अर्ज प्रलंबित आहेत. या सर्व घोषणा मागील 4-5 वर्षातील अर्थमंत्र्यांच्या भाषणातील आहेत. या घोषणांना संबंधित खात्याच्या मंत्र्यांनी गांभीर्याने घेतल्या पाहिजेत, सरकारने गांभीर्याने त्या घेतल्या पाहिजेत अशी आमची अपेक्षा आहे.

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

श्री.विनोद तावडे....

पण या सभागृहात यायचे, भाषण करावयाचे, सभागृहाच्या बाहेर जाऊन इलेक्ट्रॉनिक मीडियासमोर बाईट द्यावयाचा. पेपरमध्ये छापून आले की धन्य मानावयाचे असे सुरु आहे.

सभापती महोदय, सन 2004 साली या सरकारने अर्थसंकल्प मांडला होता. पण पुढील वर्षी सामाजिक खात्याच्या तरतुदीमध्ये 40 टक्के कपात करण्यात आली. फुले, शाहू महाराज, आंबेडकर यांच्या राज्याची सन्माननीय सदस्य श्री.सुरेश नवले यांना उजळणी पाठ असते.

सभापती महोदय, अर्थसंकल्प मांडण्यापूर्वी दरवर्षी महाराष्ट्राची आर्थिक पाहणी नावाचा अहवाल सादर केला जातो. त्यामध्ये राज्याच्या आर्थिक स्थितीची माहिती दिली जाते. राज्यपालांनी अभिभाषणामधून व्यक्त केलेल्या मनोदयामुळे किंवा त्यातील शब्दांकनामुळे राज्याला दिशा मिळते असे माझ्यासारख्या राजकीय कार्यकर्त्याला वाटते. राज्यपालांच्या भाषणात ज्या मुद्यांचा उल्लेख आला होता त्यावेळी सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी बाके वाजविली होती. राज्यपालांनी अभिभाषणात असे म्हटले आहे की, "सन 2012 हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष असल्यामुळे शासन संपूर्ण वर्षभर सहकाराचे कार्यक्रम राबविल." पण माननीय अर्थमंत्र्यांच्या भाषणात सहकार क्षेत्राबाबत एक वाक्य सुध्दा उच्चारलेले नाही. सहकार क्षेत्रातील घोटाळे दूर करण्याबाबतचा मनोदय व्यक्त होईल असे आम्हाला वाटले होते. माननीय अर्थमंत्र्यांनी भाषणात समतोल प्रादेशिक विकासाचा उल्लेख केला आहे. या सभागृहात माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी भाषण करीत असताना असे म्हटले होते की,

हा लेखा जोखा नाही, हे समतेचे तोरण आहे
सर्वांना समान न्याय देणे हे आमचे धोरण आहे

प्रत्यक्षात मात्र भाषणामध्ये काही दिसून आले नाही.

यानंतर श्री.शिगम....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

(सभापतीस्थानी तालिका सभापती श्री. मोहन जोशी)

माननीय राज्यपालांच्या अभिभाषणानंतर वने खात्याचे मंत्री महोदय, डॉ. पतंगराव कदम हे छाती फुगवून सांगत होते की राज्यामध्ये 100 कोटीची वृक्ष लागवड करणार. या अर्थसंकल्पामध्ये त्यासाठी एका पैशाची देखील तरतूद नाही. मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम हे ज्येष्ठ मंत्री असताना देखील ते सायडिंगला जातात. त्यांच्या खात्यासाठी अर्थसंकल्पामध्ये कोणतीही तरतूद नाही. रेशीम शेती क्षेत्रामध्ये 10,000 हेक्टरपर्यन्त वाढ करण्याचे शासनाने ठरविलेले असून त्यामुळे सुमारे 1,30,000 लोकांना रोजगार मिळेल असे माननीय राज्यपालांनी आपल्या अभिभाषणामध्ये म्हटले आहे. पण या रेशीम शेतीचा या अर्थसंकल्पामध्ये काहीच उल्लेख नाही. अन्न सुरक्षा, प्रभावी मानके आणि सत्वर अन्न चाचणी यांची निश्चिती करण्यासाठी राज्यात विभागीय स्तरावर 5 नवीन अन्न चाचणी प्रयोगशाळा स्थापन करण्यात येत आहेत असे अभिभाषणामध्ये म्हटलेले आहे. सभापती महोदय, महामहीम राज्यपालांनी ज्या गोष्टींचा आपल्या अभिभाषणामध्ये उल्लेख केला त्या गोंष्टीचा अंतर्भाव या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये होईल असे वाटले होते. परंतु तसा कोणताही उल्लेख अर्थसंकल्पामध्ये नाही. कोणकोणत्या गोष्टी घेतलेल्या आहेत आणि कोणकोणत्या गोष्टी राहिलेल्या आहेत याचा आढावा घेण्यासाठी मी महाराष्ट्राच्या आर्थिक पाहणीचा अहवाल पहात होतो. राज्यातील कुष्ठरोगाच्या रुग्णांमध्ये वाढ झालेली आहे. परंतु या बाबतीत उपाययोजना करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये कोणतीही तरतूद केलेली नाही. या कुष्ठरोगाच्या रुग्णांची वाढ राज्यामध्ये होणार नाही या दृष्टीने राज्यात शासन अशा अशा प्रकारची उपाययोजना करणार आहे असा मनोदय या अर्थसंकल्पाद्वारे व्यक्त होईल असे वाटले होते.

मानव विकास निर्देशांक, शिक्षण विकास निर्देशांक या बाबतीत आर्थिक पाहणी अहवालामध्ये उल्लेख केलेला आहे. उद्योगाच्या वार्षिक पाहणीमध्ये महाराष्ट्राचे दरडोई उत्पन्न 55108 इतके आहे. शेजारच्या गुजरात राज्याचे नाव घेतले की आपले राज्यकर्ते चिडतात. शेजारच्या राज्याचे दरडोई उत्पन्न 80 हजाराच्या आसपास आहे. असे असताना औद्योगिकीकरणाला अर्थसहाय्य करण्यासाठी गेल्यावर्षी 2366 कोटी रुपयाची केलेली तरतूद या वर्षी 1480 कोटी रुपयापर्यन्त खाली आली. उद्योग मंत्री महोदय श्री.नारायण राणे यांनी ही तरतूद इतकी कमी का केली हे सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी विचारावयास पाहिजे होते. नागरी बेरोजगारीचा दर अन्य

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

राज्याच्या तुलनेत आपल्या राज्यात खूप जास्त आहे. आपल्या राज्यातील नागरीकरण 46-47 टक्क्याच्या पुढे झालेले आहे. असे असताना येथील बेरोजगारीचा विषय हा राज्यासमोरील मोठा चिंतेचा विषय आहे. हा बेरोजगारीचा प्रश्न कसा सोडविणार या दृष्टीने अर्थसंकल्पामध्ये काही उल्लेख होईल असे वाटले होते. परंतु त्याही बाबतीत माझी निराशा झाली.

सभापती महोदय, राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनेचा देखील अर्थसंकल्पामध्ये उल्लेख नाही. महाराष्ट्रातील दारिद्रय रेषेखालील लोकसंख्या 32 टक्के आहे. त्याबाबतीत कुठे चर्चा नाही. स्त्री-पुरुषांच्या प्रमाणामध्ये महाराष्ट्राचा 22वा क्रमांक आहे. ही परिस्थिती सुधारण्यासाठी शासन काय करणार आहे ? मुला-मुलींमधील मुलींचे प्रमाण सुधारण्यासाठी शासन काय करणार आहे ? महाराष्ट्रामध्ये मुलींचे जे प्रमाण कमी होत चालले आहे त्यासंदर्भात काही निर्धार या अर्थसंकल्पामध्ये व्यक्त केलेला दिसत नाही. तुमच्या सारखा या चळवळीतील कार्यकर्ता जागृत असताना देखील सरकार काही बोलत नाही याचे खरे आश्चर्य वाटते.

सभापती महोदय, कुपोषणाचा प्रश्न हा केवळ कोणत्या तरी दुर्गम आणि आदिवासी भागातच आहे असे नाही तर मुंबईमध्येही चेंबूर आणि डम्पिंग ग्राऊंडच्या ठिकाणची 17 मुले कुपोषणामुले दगावलेली आहेत. परवा उल्काताई महाजन यांनी कुपोषणाच्या संदर्भात तेथे परिषद घेतली आणि अंत्योदय कार्ड, अन्नपूर्णा कार्ड याबाबतीत काही मागण्या केल्या. मुंबईमध्ये एकीकडे मुकेश अंबानी सारखे उद्योगपती आपल्या पत्नीच्या वाढदिवसाला विमान भेट देतात आणि दुसरीकडे 17 मुले कुपोषणामुळे मरतात. अंबानीने कमवू नये असे मला म्हणावयाचे नाही. इतका विरोधाभास या मुंबईमध्ये असताना, आपल्या सारखी राजकीय व्यवस्था या महाराष्ट्रामध्ये असताना हा कुपोषणाचा विषय आपण कसा संपविणार आहात याचा कुठे तरी निर्धार अर्थसंकल्पामध्ये व्यक्त झाला असता तर आगामी काळातील दिशा, ध्येय ठरविण्याची आणि ते अंमलात आणण्याची सरकारची जिद्द आहे असे वाटले असते.

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

पाणी टंचाई पूर्ण राज्यभर आहे. या पाणी टंचाईवर कशी मात करायची या संदर्भात अर्थसंकल्पात शेरो शायरीच्या माध्यमातून काहीही उल्लेख दिसून आलेला नाही. नेहमीप्रमाणे होते, त्यातूनच व्यवस्था होणार असेल तर तसे सांगितले पाहिजे. सर्व वृत्तपत्रातील रकाने पाहिल्यानंतर स्पेशल स्टोरेज होणार असल्याचे वाचावयास मिळते. लोकप्रतिनिधी जेव्हा एकत्र बसून चर्चा करतात तेव्हा याचा उल्लेख केला जातो. मात्र पाणी टंचाईबाबत विशेष काय प्रयत्न करणार याचा कोणताही उल्लेख अर्थसंकल्पामध्ये दिसत नाही. त्यामुळे हा अर्थसंकल्प पुढील वर्षाची दिशा, ध्येयधोरणे दाखविणारा आहे असे म्हणणे कितपत संयुक्तिक आहे? हा अर्थसंकल्प सरकारचा निर्धार व्यक्त करणारा आहे असे प्रामाणिकपणे वाटत नाही. शासनाची निरनिराळी खाती आहेत, त्यांना वेगवेगळ्या प्रकारे आर्थिक तरतूद केली आहे, ती पाहिल्यानंतर उद्योग क्षेत्राचा विचार केला तर केलेली तरतूद कमी आहे असे म्हणावे लागेल.

सभापती महोदय, माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चेमध्ये भाग घेत असताना महाराष्ट्रातील उद्योग क्षेत्राविषयी मी बोलल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी जोशात येऊन सभागृहात आकडेवारी जाहीर केली होती. आकडेवारी कशी असते? ठराविक प्रकारची आकडेवारी जाहीर करुन आम्ही कसे पुढे आहोत हे दाखविता येते. प्रामाणिकपणे विश्लेषण करावयाचे असेल तर आतील आकडेवारी काय आहे ती जाहीर केली तर खरे चित्र समोर येऊ शकते. महाराष्ट्रातील औद्योगिक क्षेत्रात रुपये 8,74,053 लाख कोटी गुंतवणूक होत असताना गुजराथमध्ये 10 लाख कोटी गुंतवणूक झाली आहे. देशाच्या तुलनेत महाराष्ट्रातील गुंतवणुकीचे प्रमाण 8.4 टक्के असताना गुजराथमध्ये ते 11.2 टक्के एवढे आहे. असे असताना गुजराथ आपल्या राज्यापेक्षा क्षेत्रफळाच्या तुलनेत आणि लोकसंख्येच्या तुलनेत निम्मा आहे. हे सांगताना आम्हाला अजिबात आनंद होत नाही. एका ओळीचा मी उल्लेख केल्यानंतर माननीय मुख्यमंत्र्यांनी विश्लेषण करुन आकडेवारी दिली. आम्हाला महाराष्ट्र पुढे न्यायचा आहे त्या दृष्टीने मी तो संदर्भ दिला होता. औद्योगिक क्षेत्रात आपण कसे पुढे जाऊ शकतो, आपण या संकटावर कशी मात करु शकतो एवढ्यापुरता तो संदर्भ होता. हे सांगत असताना आम्हाला कधीच आनंद होत नाही. ही जर आमची टीका असेल तर ती टीका विधायक असून आपल्या राज्याला कसे पुढे नेता येईल या अर्थाने आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे.....

सभापती महोदय, मला एका गोष्टीबाबत आश्चर्याचा धक्का बसला. केंद्रीय अर्थमंत्री श्री.प्रणव मुखर्जी यांचे अर्थसंकल्पीय भाषण सुरु होते. आपल्या सभागृहाचे कामकाज सुरु असताना वेळ काढून आम्ही ते भाषण ऐकत होतो. केंद्रीय अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात 12 व्या पंचवार्षिक योजनेतील मॅन्युफॅक्चरिंग जीडीपीचे प्रमाण 25 टक्क्यावर नेण्याचे निश्चित केले. त्याचवेळी नॅशनल मॅन्युफॅक्चरिंग अँड इन्व्हेस्टमेंट झोन स्थापन करण्याचे निश्चित करण्यात आले. याकरिता इतर राज्यांना एकच स्पेशल टाऊनशिप मंजूर करण्यात आली. मात्र महाराष्ट्र राज्याला केंद्र सरकारने दोन स्पेशल टाऊनशिप मंजूर केल्या आहेत. जर नॅशनल मॅन्युफॅक्चरिंग अँड इन्व्हेस्टमेंट झोनसाठी आपल्या राज्याला दोन स्पेशल टाऊनशिप मंजूर केल्या असतील, त्यामागे कदाचित माननीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरद पवार यांचा पाठपुरावा असेल किंवा केंद्रीय मंत्रीमंडळातील महाराष्ट्राच्या मंत्र्यांनी पाठपुरावा केल्यामुळे हा निर्णय झाला असावा. परंतु याचा अर्थसंकल्पात कुठेच विचार झालेला दिसत नाही. दोन औद्योगिक टाऊनशिप मंजूर केलेल्या असताना त्याबद्दल एका शब्दानेही अर्थसंकल्पीय भाषणात उल्लेख केलेला नाही. इतर राज्यांनी घोषित केल्याबरोबर 625 चौ.कि.मी.जागा ताब्यात घेतली. स्पेशल पर्पज व्हेईकल करुन ती राज्ये पुढे जायला निघाली आहेत. आपण या बाबतीत काय करणार? देणारा देतो परंतु आपली झोळीच फाटकी आहे हे आपल्या राज्याचे दुर्दैव आहे. दोन स्पेशल टाऊनशिप मंजूर करुनही आपण काही करु शकलो नाही. याचा अर्थसंकल्पात कुठेही उल्लेख केलेला नाही.

औद्योगिक क्षेत्रासाठी गेल्या वर्षी 2265 कोटी रुपयांची तरतूद केली होती.

नंतर श्री.खर्चे....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे .....

या वर्षी केवळ 1800 कोटीची तरतूद करण्यात आली. शेवटी राज्याचा विकास हा इंजिनिअरिंग आणि मॅन्युफॅक्चरिंगच्या आधारावरच असतो. सर्व्हिस सेक्टर्स हे केवळ नाममात्र असतात. अमेरिकेचे अध्यक्ष श्री. बराक ओबामा यांनी सर्व्हिस सेक्टर्सच्या बाबतीत थोडी जरी टाईट परिस्थिती केली तरी आपल्याकडील सर्व्हिस सेक्टर्स डुबून जातील, कारण ते कधीच कायम स्वरुपी नसते. कायमस्वरुपी फक्त इंजिनिअरिंग आणि मॅन्युफॅक्चरिंग हे दोनच भाग असतात. पण त्या सेक्टरचा विकास 11.09 टक्क्यावरुन मागील वर्षी 7.7 टक्क्यावर आला होता आणि चालू वर्षी तर हे प्रमाण फक्त 4.2 टक्क्यापर्यंत घसरत चालले आहे. वास्तविक या सेक्टरसाठी मेजर बजेटची तरतूद अपेक्षित होती पण ती करण्यात आली नाही. अशा सेक्टरसाठी शासनाने इन्फ्रास्ट्रक्चर सपोर्ट देणे आवश्यक होते पण त्यासाठी विजेची सवलत नाही, रेल्वेची सुविधा नाही आणि हे सर्व देण्याबाबत कोणत्याही प्रकारचा उल्लेख या बजेटमध्ये करण्यात आला नाही.

देशाचे अर्थमंत्री श्री. प्रणव मुखर्जी यांनी केंद्राच्या बजेटमध्ये उल्लेख केल्याप्रमाणे आपल्या राज्यात एनएमआयझेड आल्याचा उल्लेख केला. मुंबई-दिल्ली इन्व्हेस्टमेंट कॉरिडॉरचा उल्लेख केला. जपानसारख्या देशाला आपल्या राज्यात इन्व्हेस्टमेंट करण्याची इच्छा होणार नाही, अशी आपल्या राज्याची परिस्थिती आहे. इन्व्हेस्टर्सचे एक शिष्ट मंडळ जपानला आपल्या देशात इन्व्हेस्टमेंट आणण्यासाठी गेले असता त्यांचे मार्गदर्शक ब्रिफिंग करुन निघाल्यानंतर असे म्हणाले की, कृपा करुन दिल्ली-मुंबई कॉरिडॉर आम्ही महाराष्ट्रात आणू असा उल्लेख तेथे करु नका कारण असे केले तर एक दमडीही मिळणार नाही. या कॉरिडॉरमध्ये वरच्या काही राज्यांनी जागा ॲक्वायर केल्या पण आपण मात्र काहीच केलेले नाही याचाही उल्लेख अर्थसंकल्पात करण्यात आलेला नाही. अशा प्रकारे जगाच्या पाठीवर आपल्याला गप्प बसावे लागत असेल, आपली मान खाली घालायला लागत असेल तर उद्योग क्षेत्रच काय करणार याची चिंता वाटते. आपल्या राज्याचे अगोदरचे मुख्यमंत्री इतर राज्यांची तुलना करीत होते. मी जसे मघाशी म्हटले की, माझा रिझल्ट लागल्यानंतर मी अगोदर तो माझ्या खिशात ठेवतो. प्रथम शेजारचा काळे दोन विषयात नापास झाला, तिकडचा अत्रे हा एक विषयात नापास झाला त्यानंतर पुढच्या गल्लीतला जोशी 40 टक्क्यांनी पास झाला हे जाणून घेतो आणि मग शेवटी माझा 42 टक्क्याचा रिझल्ट बाहेर काढतो.....अडथळा.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

आताचे माननीय मुख्यमंत्री हे युरोप आणि अमेरिकेची चर्चा करीत असतात.

सन 2007 चे बजेट मांडतांना त्यावेळच्या अर्थमंत्र्यांनी उल्लेख केला होता की, इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट डेव्हलपमेंट स्वित्झर्लंडच्या संस्थेने महाराष्ट्र हा जगामध्ये 37 व्या स्थानी असल्याचे सांगून पाठ थोपटून घेतली होती. परंतु यासंदर्भात मी जेव्हा वेबसाईटवर गेलो तेव्हा महाराष्ट्राचा क्रमांक 37 नाही, 38 नाही, 40 नाही, 50 नाही, 100 नाही, 155 नाही तर त्या वेबसाईटवर महाराष्ट्राचे नावच नव्हते. सहा वर्षापूर्वी जो क्रमांक सांगून पाठ थोपटून घेतली होती तो क्रमांक डायरेक्ट गायब झाला होता. असे असतांना आम्ही टीका करायची नाही तर काय कौतुक करायचे ? आपले राजेंद्र मुळक हे तरुण मंत्री आहेत, कुरियर सर्व्हीस आहेत, इकडे तिकडे ते जात असतात, नागपूर अमरावती करीत असतात म्हणून आम्ही कौतुक करावयाचे का ? जेव्हा समतोल विकासाचा विषय येतो तेव्हा अंमलबजावणी केवळ 60 टक्के एवढीच झाली आहे असे मी राज्यपाल महोदयांच्या अभिभाषणाच्या प्रसंगी निदर्शनास आणले होते व त्यामध्ये खोटे व विशाल प्रकल्प कसे मागास भागात राबविण्यात येतात ते सांगितले होते. आर्थिक पाहणीच्या पुस्तकावरुन एवढे लक्षात येते की, मुंबई-ठाणे-पुण्याचे दर डोई उत्पन्न 20 हजार रुपयाने वाढले असतांना जर हे विशाल प्रकल्प मागास जिल्हयात गेले तर 7-8-10 हजारा पुरतीच वाढ मर्यादित का राहिली, त्यामध्ये वाढ का झाली नाही ?

सभापती महोदय, शेतीच्या संदर्भातील माननीय उपमुख्यमंत्र्याचे भाषण वाचले त्यावेळेस माझ्या असे लक्षात आले की, एकात्मिक पाणलोट कार्यक्रम, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना, राष्ट्रीय कृषी विकास योजना, महाराष्ट्र स्पर्धात्मक कृषी विकास प्रकल्प, समन्वीत कृषी विकास प्रकल्पांचा उल्लेख करण्यात आलेला आहे परंतु या योजना केंद्रशासनाच्या आहेत त्यामध्ये महाराष्ट्र शासनाचे काही सुध्दा योगदान नाही. यामध्ये कृषीच्या संदर्भात राज्याच्या योजना कोणत्या आहेत, आपण काय करीत आहोत, कृषी क्षेत्राच्या वाढीसाठी आपल्या राज्याचे काय योगदान आहे ?

सभापती महोदय, सर्वात आश्चर्याची बाब अशी आहे की, कृषी क्षेत्रासाठी सन 2008-2009 मध्ये 212 कोटी रुपये महसूल होता तो सन 2012-2013 ला 984 कोटी रुपयांवर गेलेला आहे व तो सुध्दा निगेटीव्ह ग्रोथ रेट असतांना . शेतक-यांकडून कर वसूल केला परंतु शेतक-यांवर मात्र

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे....

रक्कम खर्च केली नाही. या सरकारने शेतकऱ्यांच्या खर्चासाठी 20 कोटी रुपयांची तरतूद केल्याची घोषणा केली. महाराष्ट्रात साधारणत: 1.5 कोटी वहिती खातेदार आहेत. 20 कोटी रुपयांच्या खतामध्ये प्रत्येक शेतक-याला केवळ 13 रुपये येतात. 13 रुपये हा तर हमालीचा सुध्दा खर्च होत नाही.

सभापती महोदय, अल्प व्याज पीक कर्जासाठी 138 कोटी रुपयांची शासनाने तरतूद केलेली आहे. 1 लाख रुपयांपर्यंत बीन व्याजी कर्ज देण्याची शासनाने घोषणा केलेली आहे. 1.20 कोटी शेतक-यांना 1 लाख किंवा त्या पेक्षा कमी कर्ज घेतले असे गृहीत धरले तर 138 कोटी रुपयांची तरतुदीमध्ये प्रत्येक शेतक-याला केवळ 115 रुपयांची तरतूद केलेली आहे. बाकीच्या शेतकऱ्यांवर अटी घालणार व शेतक-याला किती अधिक प्रमाणात कर्ज दिले ते शासनाच्या वतीने सांगितले जाईल. 1.20 कोटी शेतकरी सरासरी 25 हजार रुपये कर्ज घेतात असे गृहीत धरले तर 2000 कोटी रुपयांची तरतूद करावयास पाहिजे होती परंतु ती करण्यात आलेली नाही. नाही तर 13 वा वित्त आयोग दंडुका घेऊन बसलाच आहे. शेवटी त्यालाही आपल्याला मूर्ख बनवायचेच आहे ना ?

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

गेल्या तीन वर्षात एक लाख शेततळ्यांचे लक्ष्य होते. पण या वर्षी मात्र फक्त तीन हजार शेततळ्यांचे लक्ष्य ठेवले आहे. मग आपण कशासाठी घोषणा करता ? खरे म्हणजे 30 हजार शेततळ्यांचे उद्दिष्ट ठेवणे गरजेचे होते. पण ते देखील ठेवले नाही.

अर्थसंकल्पीय भाषणामध्ये कृषी विषयक तरतुदी पाहिल्यानंतर असे वाटते की, आपण दक्षिणेकडील कर्नाटक राज्याकडे पहावे. या राज्याने कृषीसाठी 19 हजार कोटींचा वेगळा अर्थसंकल्प सादर केला. माझे एवढेच म्हणणे आहे की, जे चांगले आहे ते तरी घ्या ना. रेल्वेसाठी वेगळा अर्थसंकल्प असतो. तसा कृषीसाठी वेगळा अर्थसंकल्प दिला तर बरे होईल. यातून शेतकऱ्यांना चांगल्या गोष्टी देता आल्या तर त्यात काही चुकणार आहे काय ? कर्नाटक राज्याने 19 हजार कोटींची तरतूद केली आहे.

1970-1971 मध्ये 2 कोटी 11 लक्ष एवढे वहिती खालील क्षेत्र 2 कोटी हेक्टरपर्यंत खाली आले आहे,ही वस्तुस्थिती आहे. 1970-71 मध्ये महाराष्ट्रामध्ये प्रत्येक शेतकऱ्यांकडे सरासरी 4.28 हेक्टर क्षेत्र होते ते सन 2005-2006 पर्यंत 1.6 हेक्टर पर्यंत आले आहे. अन्नधान्याचे राष्ट्रीय सरासरी प्रती हेक्टर उत्पादन 17.79 क्विंटल असताना महाराष्ट्रात ते 10.13 क्विंटल एवढे आहे. या क्षेत्राला आपण वाढ देऊ शकलो तरच आपल्याला त्याचा उपयोग होणार आहे.

नागपूरला आम्ही दोन-तीन दिवस सभागृह बंद पाडल्यानंतर राजा उदार झाला आहे ह्या भावनेने दोन हजार कोटी रूपयांची घोषणा शासनाने जाहीर केली. त्याबाबत बाके वाजविण्यात आली. सभागृहातील पहिल्या ओळीतील सन्माननीय सदस्यांनी आपल्याकडे पहावे म्हणून बाक जोरात वाजविण्याची स्पर्धा सभागृहात लागली होती. आपण शेतकऱ्यांसाठी 2000 कोटींचे पॅकेज जाहीर केले. पण त्यापैकी शेतकऱ्याला किती मदत मिळणार हे स्पष्ट झाले पाहिजे. मार्च महिन्याच्या अखेरीस शेतकऱ्यांना 300 कोटी रूपयांचे वाटप करण्यात आले. जिल्हाधिकाऱ्यांकडे प्रत्यक्षपणे 180 कोटी रूपयेच गेले होते. असे का झाले ? म्हणे सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले नाही म्हणून आम्हाला पैसे पाठविले नाहीत. काही तरी प्राथमिक सर्वेक्षणावर ही मदत घोषित केली होती. पुढे सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले नाही अशा प्रकारचे उत्तर माननीय मुख्यमंत्र्यांनी अधिवेशन सुरू होण्यापूर्वी घेण्यात आलेल्या पत्रकार परिषदेमध्ये दिले. ...2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

सोयाबीन आणि धान उत्पादन शेतकरी आहेत त्यांचे तर अजून सर्वेक्षणच झालेले नाही. 50 टक्केपेक्षा कमी आणेवारी येणार नाही हे आता आपण पाहणार आहात. आकस्मिकता निधीतून काढण्यात आलेल्या आगाऊ रकमेची भरपाई करण्यासाठी 300 कोटी रूपये इतक्या व अतिरिक्त तरतूद करण्यासाठी 1285 कोटी इतक्या मिळून रूपये 1585 कोटीची पूरक मागणी आवश्यक ती तरतूद करण्यासाठी व हा खर्च विधान मंडळाच्या निदर्शनास आणून देण्यासाठी सादर केली आहे, असे माननीय मंत्र्यांनी पुरवणी मागणीच्या वेळी सांगितले. म्हणजे 1585 कोटी रूपयेच मागितले. आपण शेतकऱ्यांसाठी दोन हजार कोटींची घोषणा केली होती. म्हणजे वरचे पैसे तुम्ही खालच्या खाली खाल्ले. ते शेतकऱ्यांना मिळालेच नाहीत. 2000 कोटीची घोषणा केली त्यापैकी 450 कोटी रूपये येथेच संपविले. एवढे सगळे असताना हिरानंदानीचा मात्र 2000 कोटीचा टॅक्स माफ केला आहे. शेतकऱ्याला मात्र काही द्यायचे नाही असे ठरविलेले दिसते.

शेतकऱ्याला कृषी पंप दिले जातात. त्यासाठी अडीच हजार कोटींचे अनुदान जाहीर करण्यात आले. आपल्याकडे एकूण 28 लाख कृषी पंपधारक ग्राहक आहेत. रूपये 8925.57 प्रती कृषीपंप ग्राहक अनुदान शासनाकडून देण्यात येत आहे. 1092 प्रति युनिट हॉर्स पॉवरचा वापर दाखविण्यात आला आहे. तो देखील वाढीव आहे. प्रत्यक्षात शेतकरी एवढी वीज वापरतच नाही. हा आकडा खरा पकडला तरी खालीलप्रमाणे प्रत्येक कृषी पंपधारक विजेचे युनिट वापरतो हे लक्षात येईल. ते सूत्र असे आहे की - 3hp=1092X3=3276 unit. म्हणजे कृषी पंपधारक दरवर्षी 7600 रूपयांची वीज वापरतात.

यानंतर श्रीमती रणदिवे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

दरवर्षी कृषी पंप धारक दरवर्षी 7600 रुपयांची वीज वापरत असताना,श्री.दिवाकर रावते साहेब शासनाने मात्र प्रति कृषी पंपधारक 8925 इतकी रक्कम उर्जा विभागाला दिलेली आहे. आपण शेतकऱ्यांना बदनाम करीत आहात. रात्री-अपरात्री वीज वापरत नाही, पण जरी ही वीज लागली तरी प्रत्यक्षात त्यातील 600 रुपयांची वीज वापरली जाते.प्रत्येक शेतकऱ्याकडे कोणती थकबाकी आहे? त्यामुळे कृषी विषयाबाबत ज्या सगळ्या घोषणा केल्या आहेत आणि मी जी माहिती दिली आहे, ती आपण जर खरेच तपासून पाहिली तर कृषी विषयाच्या बाबतीत केवळ जय जवान,जय किसान असे या सरकारने म्हणावयाचे पण प्रत्यक्षात सन्माननीय सदस्य श्री.सय्यद जमासाहेब, किसानों की क्या हालत है, वो आपने देखी है.

सभापती महोदय, महानिर्मिती बाबत सांगावयाचे तर येथे सगळयाच गोष्टींची महानिर्मिती आहे. कोळशाच्या बाबतीत मी माहितीच्या अधिकारामध्ये सर्व पत्र व्यवहार केला. तेव्हा असे दिसून आले की, देशी कोळसा 1785 रुपये प्रति मे.टन, विदेशी कोळसा 895 रुपये प्रति मे.टन आहे. विदेशी कोळसा चांगला असतो आणि तो आयात करण्यावर आपला भर आहे असे म्हटले जाते. ठीक आहे. पण वेस्टर्न इंडिया कोल फिल्ड लिमिटेड कडून पुरविला जाणारा कोळसा उचलला जात नाही. खाजगी कंपन्या कोळसा आयात करण्यावर भर देतात. त्यासाठी कोळसा मंत्रालयाकडे मागणी पत्रे दिली जातात. खाजगी कंपन्या चांगला देशी कोळसा वापरणार आणि त्यासाठी येथील सरकारला तसे पत्र देणार. मग या कोळशातून प्रत्यक्षात किती मे.वॅ.ची वीज निर्माण होते याबाबत मी पत्र पाठवून माहिती मागविली, तेव्हा असे उत्तर आले की, देशी आणि आयात केलेला कोळसा याचे मिश्रण करुन तो बाष्पात वापरला जातो. तसेच देशी कोळशा पासून किती वीज निर्माण होईल हे सांगता येणार नाही. मला याबाबतीत खरे किती आणि खोटे किती याची माहिती घ्यावयाची होती. परंतु दोन्ही मिक्स करुन टाकलेले आहे असे सांगितले, मग याबाबत कळणार कसे हा मुद्दा आहे.

सभापती महोदय, वीज निर्मिती प्रकल्पामध्ये एकूण किती टक्के वीज निर्माण होते. यावर प्लॅन्टचा लोड फॅक्टर ठरवता येईल. पण या विषयामध्ये त्या-त्या वेळी सर्व चर्चा झालेली आहे. महाराष्ट्रात वीज निर्मितीच्या प्रकरणामध्ये किती भ्रष्टाचार होत आहे हे सिध्द होते. महापारेषण मध्ये गळतीचा विषय देखील असाच आहे. मी माननीय उप मुख्यमंत्री यांना सांगू इच्छितो की, वीज गळती 28 टक्के आहे, पण भिवंडीमध्ये इतकी जास्त आहे की, तेथे फ्रेंचायझी दिली आणि गळतीचे

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रमाण एकदम खाली झाले. मग ही वीज गळती आहे की भ्रष्टाचार आहे हे कुठेतरी शोधले पाहिजे आणि ते कोणी शोधताना दिसत नाही. त्यामुळे महापारेषण मधील हा भ्रष्टाचार आहे. विजेच्या दराबाबत शुंगलू समितीने वारंवार उल्लेख केला आहे, मी त्यामध्ये जात नाही. पण अर्थसंल्पातील घोषणा किती खऱ्या आहेत? माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी आत्मविश्वासाने सांगितले होते की, डिसेंबर 2012 मध्ये महाराष्ट्र लोडशेडींग मुक्त करणार आणि माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार यांनी घोषणा केल्यानंतर ते होणारच हे आम्ही गृहीत धरतो. पण ते कसे होणार ? तर आम्ही खाजगी वीज विकत घेणार आणि यामुळे कोणाचे उखळ किती पांढरे होते याची गावामध्ये चर्चा आहे आणि याबाबत चर्चा सुरु असताना खाजगी विजेशिवाय आम्ही राज्य लोड शेडींग मुक्त करु, तो दर आम्ही घेऊ मग त्यातून राज्य लोड शेडींग मुक्त करु आणि असा जर निर्धार असेल तर तो खरा माननीय श्री.अजितदादा पवार यांचा निर्धार आहे असे आम्ही म्हणू. नाहीतर खाजगी वीज विकत घेऊन प्रति युनिट 20 पैसे घ्यावयाचे की काय करावयाचे ? कुठे जावयाचे कसे करावयाचे याबाबत लोकांमध्ये चर्चा असते. ते मला मांडण्याची गरज नाही. पण 4468 मे.वॅ.इतकी तूट आहे, ती 2012 मध्ये आपण कशी पूर्ण करणार आहात हा यातील मुद्दा आहे.

सभापती महोदय, यानंतर रस्त्यांच्या बाबतीत सांगावयाचे तर त्याचे नियोजन 20 वर्षाच्या प्लॅननुसार चालत असते. 1981 ते 2001 हा जो प्लॅन होता, तो संपलेला आहे. त्यानंतर माननीय उप मुख्यमंत्री महोदय, 2001 ला पुढच्या 20 वर्षाचा रस्त्यांचा प्लॅन आपण तयार करावयास हवा होता. आता 2012 हे वर्ष सुरु आहे पण अजूनही याबाबतीत प्लॅन तयार केलेला नाही. जर राज्यातील रस्त्यांचा प्लॅन बनविला आणि त्याप्रमाणे रस्ते केले, याबाबतीत आराखडा तयार झाला तर राज्यातील रस्त्यांचा विकास नियोजित पध्दतीने होऊ शकतो.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

असुधारित प्रत / प्रसिध्दीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

पण रस्त्याचा आराखडा करायचा नाही. ट्रॅफिकच्या आधारे आराखडा करायचा नाही, नंतर बी.ओ.टी.चा ठेकेदार येतो आणि तोच आराखडा करतो, तोच फाईल करतो आणि तो रस्ता मान्य होतो. तेव्हा हा आराखड्यातील रस्ता आहे काय याचे उत्तर नाही असे आहे.

सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री.हेमंत टकले साहेब, माननीय दादा हे सार्वजनिक बांधकाम मंत्री मा.श्री.छगन भुजबळ साहेब यांच्यावर कसा अन्याय करीत आहेत ते पहा. सन 2012-2013 मध्ये 3600 कोटी रुपयांची स्पील कॉस्ट आहे तर या वर्षीचा नियतव्यय 2899 कोटी रुपये आहे. त्यामध्ये सीआरफ 386, नाबार्ड 500, मराठवाडा आणि अन्य 392 आहे. सर्व सन्माननीय सदस्यांना खूष करण्यासाठी तो दिलेला आहे. म्हणजे जो स्पील ओव्हर 600 चा आहे तो देखील पूर्ण होणार नाही. तो स्पील ओव्हर पूर्ण होणार नसेल तर बांधकाम विभागासारख्या खात्याला श्री.छगन भुजबळ यांच्यासारखे अतिशय कर्तृत्वान मंत्री कशाला ठेवायचे, तो विभाग अन्य मंत्र्यांकडे देऊन टाकावा. तेव्हा जेवढे स्पील ओव्हर आहे तेवढे द्यायला पैसे नाहीत. वर्तमानपत्रामध्ये यांच्या भ्रष्टाचाराची चर्चा आहेच. मग ते असे म्हणातात की,

" हम आह भी भरते हे तो हो जाते है बदनाम,
वो कत्ल भी करते है तो चर्चा नही होती "

अशी चर्चा रामटेकवर होत असेल तर त्याची चर्चा कुठेतरी झाली पाहिजे.

सभापती महोदय, सिंचनाच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर माझी मागणी आहे की, त्याबाबत न्यायालयीन चौकशी झाली पाहिजे. माझी माननीय उप मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की, या संदर्भात एकदा न्यायालयीन चौकशी करावी. सिंचन महामंडळामध्ये भ्रष्टाचार झाल्याची चर्चा आहे. त्या बाबत नागपूर अधिवेशनात चर्चा झाली. विधानसभेत माननीय विरोधी पक्ष नेते श्री.एकनाथराव खडसे आणि सन्माननीय सदस्य श्री.देवेंद्र फडणवीस यांनी चर्चा केली, त्या बाबत घोषणाही झाल्या. सन 2008-2009 मध्ये प्रति लक्ष एक घनलीटर पाणी साठा करण्यासाठी 1 कोटी 56 लाख रुपये खर्च येतो. सन 2009-2010 मध्ये हा खर्च 3.56 कोटींवर गेला. सन 2010-2011 मध्ये 7.11कोटींवर गेला. सन 2008-2009 मध्ये 1 द.घ.ली.पाणी साठा करण्यासाठी

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

1कोटी 56 लक्ष रुपये खर्च आला असताना दोन वर्षात ही रक्कम 7 कोटी 11 लाखांवर कशी गेली ? इतर विभागांतील खर्च 20 ते 25 टक्क्यांनी वाढला असेल परंतु येथे इतकी तफावत येते याचा अर्थ यामध्ये काही तरी गडबड आहे. या मध्ये गडबड नसेल तर मागील दहा वर्षात सिंचन प्रकल्पावर किती खर्च झाला, किती सिंचन वाढले याची चौकशी माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी निवृत्त न्यायाधीशा मार्फत करावी. आपण स्वच्छ आहात ना, तर मग ही चौकशी करावी. सभापती महोदय, सिचंनामध्ये 60 हजार कोटी रुपये सिंचित होत आहेत ते सिंचन पाण्याचे होते आहे की पैशाचे होत आहे यातील वास्तव जाणून घेण्याची आमची इच्छा आहे. हे वास्तव समाजाला कळले पाहिजे म्हणून दादांसारखी एक रोखठोक व्यक्ती माझी मागणी मान्य करतील अशी मला अपेक्षा आहे.

सभापती महोदय, मी हे पहिले बजेट असे पाहिले की, ज्यामध्ये वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ आणि मौलाना आझाद महामंडळ या महामंडळाकरिता कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. आपण या समाजाच्या विकासासाठी काही देणार नसाल तर या समाजाच्या विकासासाठी आपल्याला काही करण्याची इच्छा आहे याबद्दल आमच्या मनात शंका आहे. मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती आणि व्यावसायिक शिक्षणावरील फीची प्रतिपूर्ती सलग तीन वर्षे न दिल्यामुळे विद्यार्थी न्यायालयात गेले.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.....

शेवटी न्यायालयाने फटकारल्याने विद्यार्थ्यांना न्याय मिळाला. कोर्टाने वाजवली की मग सगळे यांच्याकडून सुटते. तोपर्यंत कितीही अर्ज, विनंत्या केल्या, नियम 93 अन्वये सूचना,लक्षवेधी सूचना, अर्धा-तास चर्चा उपस्थित केल्या तरी प्रश्न सुटत नाहीत या संदर्भात गोलमाल उत्तरे दिली जातात. दलित इंडियन चेंबर्स ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्रिज यांनी अनेक गोष्टी शासनासमोर मांडल्या आहेत. त्या चेंबर्सचे श्री. मिलिंद कांबळे असतील किंवा बाकीचे मान्यवर असतील ते शासनाला भेटले आहेत. आदरणीय श्री. शरद पवार देखील बीकेसीला गेले होते. त्यांनी मागणी केली की, मध्यप्रदेश शासनाने काही टक्के व्यवसाय हा अनुसूचित जाती, अनुसूचित जमातीच्या तरुण उद्योजकांसाठी राखून ठेवलेला आहे. केंद्र शासनाने अशा प्रकारचे काही धोरण लागू केलेले आहे का, असा काही निर्धार व्यक्त केलेला आहे का? असा काहीही निर्धार भाषणात दिसला नाही. खरे म्हणजे कै. माननीय यशवंतराव चव्हाण यांच्या जन्म शताब्दी वर्षात त्यांनी दिलेल्या सामाजिक न्यायाच्या तत्वाला कुठे तरी समर्थन मिळेल असे वाटले होते पण माननीय अर्थ मंत्र्यांच्या भाषणात ते मिळाले नाही.

सभापती महोदय, कै. यशवंतराव चव्हाण यांच्या जन्म शताब्दी वर्षाच्या निमित्ताने 100 कोटी रुपयांची तरतूद करण्यात येणार असल्याची घोषणा या ठिकाणी करण्यात आली आहे. ही तरतूद कशासाठी, कुठे, कधी करण्यात येणार आहे या संदर्भात मी सगळी पुस्तके चाळली पण त्यासंदर्भात आम्हाला काहीच माहिती मिळाली नाही. कै. यशवंतराव चव्हाण यांचा आग्रह उत्तम नियोजन आणि प्रशासनावर होता. आणखी 200 कोटी रुपयांची तरतूद करा पण या राज्यकर्त्यांना नियोजन शिकवा असे म्हणण्याची वेळ आलेली आहे. नाही तर या 100 कोटी रुपयांचे काय होणार आहे? कै. यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठानच्या माध्यमातून पुस्तके काढण्यात येतील, त्याला पैसे देण्यात येतील, श्री. जब्बार पटेल सिनेमा काढतील त्याला पैसे देण्यात येतील पण या पैशातून काही तरी ठोस व्हायला पाहिजे पण या पैशातून काही ठोस होताना दिसेल अशी वास्तवता नाही. मुंबईकरिता केलेल्या घोषणे बद्दल मला समजले नाही. 350 कोटी रुपये एमएमआरडीएला देणार असे सांगण्यात आले. म्हणजे त्याची केवळ आठवण केली की, शासनाने एमएमआरडीएला दिले. यामध्ये नेमके काय आहे? एमएमआरडीएचे वेगळे बजेट आहे. असे असताना अर्थसंकल्पीय भाषणात त्या संबंधीचा उल्लेख करणे अपेक्षित नाही. त्यामुळे आम्ही या ठिकाणी ऐकताना चुकून ऐकले की, खरेच राज्यमंत्री श्री. राजेंद्र मुळक यांनी एमएमआरडीएला 350 कोटी रुपये दिले?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

सभापती महोदय, त्याप्रमाणे या ठिकाणी काही घोषणा करण्यात आल्या आहेत. सन 2006-2007 ला शिवडी -न्हावाशेवा सी-लिंकची घोषणा करण्यात आली होती ती घोषणा दरवर्षी करण्यात येते त्याप्रमाणे या वर्षीही करण्यात आलेली आहे. वर्सोवा-अंधेरी -घाटकोपर मेट्रो रेल्वेचे काम या वर्षी पूर्ण करण्यात येणार यासंबंधीची घोषणा दरवर्षी करण्यात येते त्याप्रमाणे यावर्षी पुन्हा ती घोषणा करण्यात आलेली आहे. कुलाबा-माहीम-चारकोप मेट्रोरेल प्रकल्पाला मान्यता देण्यात आली आहे. अद्याप या मेट्रोरेल प्रकल्पाचे काम चालू झालेले नाही. विशेष करुन मुंबईतील अंधेरी-घाटकोपर वर्सोवा,गाडगेमहाराज सर्कल, वडाळा, चेंबूर या संबंधीचे सर्व मुद्दे माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील माझ्या भाषणात आलेले आहेत म्हणून पुन्हा मी त्या मुद्यांची पुनरावृत्ती करणार नाही. मुंबई संबंधी मी आग्रहाने या ठिकाणी मांडत आहे याचे कारण असे की, केंद्रीय हिश्श्यातून महाराष्ट्राला 3109 रुपयाचा इन्कम टॅक्सचा परतावा मिळतो तसेच महानगरपालिकेच्या टॅक्समधून 5746 कोटी रुपये आणि सर्व्हिस टॅक्सच्या माध्यमातून 2033 कोटी रुपये असे 10888 कोटी रुपये राज्याला मिळतात. स्वाभाविकपणे कॉर्पोरेट टॅक्स, सर्व्हिस टॅक्स पैकी 60 ते 70 टक्के वाटा मुंबई, पुणे, नागपूर या मोठया शहरांचा असणार आहे. त्या तुलनेत आपण त्यांना काय देतो? एममएआरडीए जे काम करीत आहे त्यामध्ये आमच्याच जमिनी विकावयाच्या, त्याचे भाव वाढवावयाचे, आमचा एफएसआय वाढवावयचा, आमचा ट्राफिक वाढवावयाचा, आमचीच गटारे तुंबवावयची आणि त्यातून येणाऱ्या पैशातून आम्ही ही कामे करीत आहोत असे आम्हाला दाखवावयचे. माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार मुंबईचे नाहीत. सन्माननीय सदस्य श्री. भाई जगताप मुंबईचे आहेत. तसेच सन्माननीय राज्य मंत्री श्री. भास्करराव जाधव कोकणचे असल्यामुळे तेही मुंबईचे असल्याचे मानले पाहिजे.

श्री. अजित पवार : मुंबई महाराष्ट्राची आहे.

श्री. विनोद तावडे : मुंबई 100 टक्के महाराष्ट्राची आहे पण त्याची जाणीव या महाराष्ट्राच्या अर्थसंकल्पात नाही. 10888 कोटी रुपये या राज्याला मिळत असताना मुंबईसाठी काय तरतूद करण्यात आलेली आहे? शेवटी पैसे पाहिजेत म्हणून 600 कोटी रुपयांची करवाढ करण्यात आलेली आहे. माननीय उप मुख्यमंत्री एकदा बोलल्यानंतर मागे हटत नाहीत असे आम्ही

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे.. ..

ऐकतो. पण श्री. माणिकराव ठाकरे यांनी दणका दिला आणि बहुदा घरी गेल्यानंतर सुनेत्रा वहिनी काही तरी बोलल्या असणार म्हणून गॅसच्या बाबतीत माननीय उप मुख्यमंत्री, पटवून बघू, सांगून बघू, त्यात कमी करता आले तर बघू असे बोलतांना मी पहिल्यांदाच पाहिले. गॅसच्या विषयाच्या संदर्भात उप मुख्यमंत्री संवेदनशील झाले असतील तर आम्ही नक्की त्यांचे स्वागत करु. रोलबॅक केलेच पाहिजे.

यानंतर श्री. बरवड....

अप्रधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे ....

सभापती महोदय, ही जी 600 कोटी रुपयांची करवाढ केलेली आहे ती बारीकबारीक गोष्टींवर केलेली आहे. गेल्या वेळी हॉटेलमधील वडापाववर करवाढ केली होती. वडापाववरच्या करातून किती पैसे जमा झाले याची माहिती घेण्यासाठी मी सहज उत्सुकता म्हणून माहितीच्या अधिकाराखाली अर्ज केला. त्या बाबतीत आम्ही एवढे कोठे मोजतो असे सांगण्यात आले. मग आपण जे मोजत नाही ते भाषणात एवढे जोरात का सांगता ? ते तुमच्या खिजगणतीत नाही हे तुम्हाला कळत नाही का ? मला माहितीच्या अधिकाराखाली त्यांच्याकडून असे पत्र आले की, ते फार मायनर आहे. ते मायनर आहे पण आपल्या भाषणावर वर्तमानपत्रात चौकट येते. ही जी 600 कोटी रुपयांची करवाढ केलेली आहे त्यामध्ये प्लास्टर ऑफ पॅरीसवर करवाढ केलेली आहे. त्यामुळे गणपती महागणार.. माननीय उप मुख्यमंत्री म्हणत आहेत की, गणपती मातीचा करा. मी त्यांना सांगू इच्छितो की, आपण अतिशय स्तुत्य बोलत आहात पण आपण एकदा ठरवावे आणि आपल्या भाषणात सांगावे की, जो गणपती प्लास्टर ऑफ पॅरीसचा बनविलेला आहे त्या ठिकाणी माननीय मंत्री श्री. सचीन अहिर यांनी बोलविले तरी जाणार नाही. आपला स्तुत्य उपक्रम आहे. जर आपले पर्यावरणावर एवढे प्रेम असेल तर प्लास्टर ऑफ पॅरीस वापरुन तयार केलेला ज्यांचा ज्यांचा गणपती आहे किंवा तसा गणपती वर्षा बंगल्यावर जरी बसविला तरी मी जाणार नाही असे सांगावे. मातीचा गणपती करा, शाडूचा गणपती करा. मी त्याचे स्वागत करतो. माझा मुद्दा एवढाच आहे की, 600 कोटी रुपये आपण अशा बारीकबारीक गोष्टीपासून जमा केले.

सभापती महोदय, मुद्रांक शुल्क गोळा करण्याचे जे काम होते ते फ्रेंचाईजीमध्ये तीन कंपन्यांना दिले. सन 2006 च्या दरम्यान घर खरेदी, भाडेपट्टा करार इत्यादी दस्तऐवजांच्या स्कॅनिंगचे काम अभिषेक इन्टरप्रायझेस (मुंबई), एस.एन.कॉम्प्युटर्स (पुणे, नाशिक, औरंगाबाद विभाग) आणि जे.के. कॉम्प्युटर्स (ठाणे) यांना देण्यात आले होते. एक कागदपत्र स्कॅन करण्यासाठी 1 रुपया 75 पैसे आणि कार्यालयाच्या मेन्टेनन्ससाठी प्रती महिना 15 हजार रुपये इतकी रक्कम द्यावयाची असे ठरले होते. या तीनही कंपन्यांचा कॉन्ट्रक्ट 28 फेब्रुवारी, 2007 ला संपला. त्यांना काम देताना टेंडर काढून दिले नाही. ते काम तसेच दिले. कॉन्ट्रॅक्ट संपल्यानंतर नवीन निविदा काढणे गरजेचे होते. परंतु श्री. आनंद रेड्डी (अभिषेक इंटरप्रायझेस, मुंबई), श्री. सुरेश कांकरीया

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ MMP/ D

श्री. विनोद तावडे ....

(एस.एम.कॉम्प्युटर) आणि श्री.कौशाल पौराणा (जे.के.कॉम्प्युटर) यांचेवर विशेष मर्जी असल्याने शासनाने निविदा न काढता स्वत:चे व ग्राहकांचे कोट्यवधी रुपयांचे नुकसान केले आहे असे माझे म्हणणे आहे. मुद्रांक शुल्काव्दारे होणाऱ्या वसुलीच्या बाबतीत गेल्या वर्षी 1 हजार कोटी रुपये वसुली होती आता 2 हजार कोटीवर गेला आहात. या तीन कंपन्यांना शासनाने जी विशेष सवलत दिली त्या कंपन्यांमध्ये दोन माजी मुख्यमंत्र्यांचे चिरंजीव सहभागी आहेत असे मी ठामपणे सांगतो. यामध्ये 600 ते 700 कोटी रुपयांचे नुकसान झाले. जर टेंडर काढून ते नुकसान थांबविले असते तर ही 600 कोटी रुपयांची करवाढ करावी लागली नसती.

सभापती महोदय, सेल्स टॅक्समध्ये चांगला महसूल जमा झाला. तेथील कर्मचाऱ्यांनीजे चांगले काम केले त्याचे कौतुक केले पाहिजे, याबद्दल शंका नाही. पण "Much has been done, much has to be done". जे चांगले आहे ते चांगलेच आहे. त्याचे आम्ही नेहमीच कौतुक करु. परंतु केवळ एकदोन व्यक्ती चांगल्या असून चालत नाही तर पूर्ण यंत्रणा चांगली लागते. ती यंत्रणा देखील चांगली आहे पण त्या यंत्रणेमागे राजकीय इच्छाशक्ती उभी राहणार आहे का, हा महत्वाचा प्रश्न आहे. 27 हजार 577 कोटी रुपये डिस्प्युटमध्ये आहेत. त्याच्या बाबतीत आपण अतिशय हलका पर्याय काढलेला आहे. तो पर्याय अधिक परिणामकारक असावा असे माझे मत आहे. सेल्स टॅक्सचे हे जे 27 हजार 577 कोटी रुपये डिस्प्युटमध्ये पडलेले आहेत ते वसूल करता येत नाहीत. ते वसूल करता न येण्यामध्ये त्या ठिकाणचे काही अधिकारी सुध्दा सहभागी आहेत आणि ते यातून मार्ग दाखवितात का ? आपण ज्या तीन घोषणा केलेल्या आहेत त्याही पलीकडे जाऊन आपण काही केल्याशिवाय 27 हजार 577 कोटी रुपयांपैकी 10 ते 15 हजार कोटी रुपये सुध्दा आपल्या पदरात पडणार नाहीत. आपण त्यांना दंडुका दाखविण्याची गरज आहे. आपण तो दंडुका त्यांना दाखविला तर काही तरी होईल अन्यथा काही होणार नाही. तरी सुध्दा सेल्स टॅक्समध्ये काही ना काही चोरी होत असते. जेएनपीटीमध्ये जे फर्नेस ऑईल व इतर ऑईल्स येतात ते घेऊन जाण्याबाबत नवीन नवीन जी.आर. निघतात.

यानंतर श्री. खंदारे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे...

तो सगळा माल सेल्स टॅक्स चुकवून महाराष्ट्रामध्ये विकला जातो. जी घटना मनमाडला झाली होती. ती घटना चोरीच्या माध्यमातूनच घडली होती. या राज्यामध्ये चोरीच्या माध्यमातून सर्व काही विकले जाते. मी त्यावेळी काहीजणांची नावे सुध्दा घेतली होती. पण विक्रीकर विभागाच्या अधिकाऱ्यांनी संबंधित लोकांची चौकशी केली नाही किंवा माहितीही घेतली नाही. ती घेतली असती तर शासनाला सेल्स टॅक्स वाचविता आला असता.

सभापती महोदय, टीडीआरचे पैसे कोठे जातात ते कळत नाहीत. ते पैसे न वाचविता सामान्य लोकांच्या वस्तुंवर अधिक कर लावून त्यांचे जीवन जिकिरीचे केले जाते. एक टेंडर होळीच्या आदल्या दिवशी फ्लोट झाले होते. शिवशाही पुनर्वसन प्रकल्प लि.अंतर्गत तुर्भे, मंडाले व मानखुर्द एम/इ वॉर्डमधील 26 हजार चौरस मीटरचे टेंडर होते. हे टेंडर भरण्याची मुदत दिनांक 7 मार्च, 2012 पर्यंत होती. दुसऱ्या दिवशी होळी होती. दिनांक 9 मार्च रोजी टेंडर उघडून ते संबंधिताला देण्यात आले. त्या जागेची 90 कोटी इतकी बाजारभावानुसार किंमत होती. परंतु ती जागा कमी किंमतीमध्ये देण्यात आली. त्या जागेमुळे 600 कोटींपैकी 60-70 कोटी रुपये वाचविता आले असते. शिवशाही प्रकल्पामध्ये असे प्रकार होत असल्याचे मी निदर्शनास आणून देत आहे.

सीमा तपासणी नाक्याच्या संगणकीकरणाच्या घोषणा झाल्या आहेत. प्रत्यक्षात होत नाही. 2 कि.मी.अंतरावर असलेल्या तपासणी नाक्यावर काही कोटींचा महसुली फरक दिसून येतो. मग गुजरात राज्यात दिसत नाही, कर्नाटक राज्यात दिसून येतो, मध्य प्रदेश राज्यात दिसून येतो. आपल्या व तेथील नाक्यावरील महसुलामध्ये काही कोटींचा फरक दिसून येतो. संगणकीकरणामुळे ही चोरी पकडता येईल. कारण जी गाडी येथून गुजरातमध्ये जाते त्या गाडीची आपल्याकडे नोंद होत नाही, मात्र ती गाडी गुजरातमध्ये पैसे जमा करते. त्यामुळे शासनाने एकदा सर्व सीमा तपासणी नाक्यांची माहिती घेऊन यामध्ये सुधारणा करण्याबाबत विचार करावा.

सभापती महोदय, अकरावी पंचवार्षिक योजना महाराष्ट्र शासनाने मांडलेली नाही. कारण पंचवार्षिक योजनेवर माननीय अर्थमंत्र्यांचा विश्वास नसावा. आपण स्व.यशवंतराव चव्हाण यांचे अनुयायी आहात. त्यांनी पंचवार्षिक योजनेला महत्व दिले होते. पण शासनाने पंचवार्षिक योजना

2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनोद तावडे....

तयारच केली नाही. वार्षिक योजनेमुळे पंचवार्षिक योजनेकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जात आहे काय, नॉन प्लॅन एक्सपेंडिचर वाढविण्यावर शासनाचा भर आहे काय, 2-3 वर्षामध्ये वार्षिक योजनेचे आकारमान कमी गतीने वाढलेला आहे. राज्यपालांच्या अभिषणावरील चर्चेच्या वेळी मी असे म्हटले होते की, महाराष्ट्राचे नेतृत्व सर्वांगीण विकास करणारे असेल तरच पंचवार्षिक योजना आखली जाते. पण राज्यात तर आपापल्या जिल्ह्याचे सुभेदार आहे. त्यामुळे प्लॅन व नॉन प्लॅन खर्च करणे सोपे असते. इकडचा खर्च तिकडे व तिकडचा खर्च इकडे करता येतो. पण शासनाला राज्याचा विकास करावयाचा आहे. शासनाला राज्याला पुढे न्यावयाचे असेल तर पंचवार्षिक योजनेची महती कळू शकते. ते होत नसल्यामुळे सलग तिसऱ्या वर्षी महसुली तूट दिसून येते.

बजेट मांडताना सन 2009-10 मध्ये 8 हजार 5 कोटी 68 लाखाची तूट दाखविली होती. त्यानंतर सन 2010-11 मध्ये 591 कोटींची तूट दाखविली होती. सन 2011-12 मध्ये 2058 कोटींची तूट दाखविली होती. सन 2012-13 मध्ये 152 कोटी 49 लाख अधिक्य असलेले बजेट मांडलेले आहे. प्रत्यक्षात काय होईल ते सांगता येत नाही. सन 2011-12 मध्ये 2058 कोटींची तूट दाखविली होती. पण गेल्या वर्षी तेवढया रकमेचे शिलकी बजेट आहे असे सांगितले होते. साधे सरळ चौथीचे गणित आहे. 2000 कोटींचे पॅकेज अचानक द्यावे लागले त्यामुळे 2058 कोटी इतकी तूट वाढली, इतके साधे गणित कळत नाही का असा सवाल मला कोणीही विचारु शकेल. पण मला तेवढे कळते. 2000 कोटींच्या पॅकेजमुळे ही तूट निर्माण झाली असे माननीय मुख्यमंत्र्यांनी पत्रकार परिषदेत सांगितल्यामुळे मी हे बोलत आहे. खरे तर 3809 कोटी रुपयांचे वाढीव उत्पन्न दाखविण्यात आले होते. मग त्यातून 58 कोटींची शिल्लक व 2000 कोटींचे पॅकेज दिले होते. ही रक्कम 3809 कोटी ही रक्कम समाविष्ट करावी. असे असताना तूट का आली त्याचे उत्तर द्यावे लागेल. सातत्याने तिस-या वर्षी तुटीचा अर्थसंकल्प मांडला गेलेला आहे. हा चुकीचा पायंडा पडत आहे.

यानंतर श्री.शिगम....

अशुधीत प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

सभापती महोदय, या वेळच्या बजेटमध्ये नवीन वैद्यकीय महाविद्यालय सुरु करावयाचे आहे, मुंबई येथे हायराईज सुपर स्पेशॅलिटी हॉस्पिटल बांधायचे आहे, सुवर्ण महोत्सवी वर्षात शिवाजी विद्यापीठाला अनुदान द्यावयाचे आहे, आदिवासी घटकासाठी घरकुल योजना राबविण्याकरिता पैसे द्यावयाचे आहेत, अल्पसंख्याक आयोगासाठी पैसे द्यावयाचे आहेत, जुन्या सदनिकांसाठी पैसे द्यायचे आहेत, महात्मा गांधी यांच्या सेवाग्राम येथील आश्रमातील सोईसुविधा वाढविण्यासाठी पैसे द्यावयाचे आहेत. हे पैसे द्यायचे आहेत. दिलेले नाहीत. आता वित्तीय तूट आहे. वित्तीय तूट दिसली की 13व्या वित्त आयोगाचे पैसे मिळण्यासाठी परिस्थिती अवघड होते.

सभापती महोदय, हा अर्थसंकल्प सादर केल्यानंतर माझी प्रामाणिक प्रतिक्रिया एवढीच झाली की हा अर्थसंकल्प राजकीय नेतृत्वाचा अर्थसंकल्प नसून तो अर्थ खात्याच्या कक्ष अधिका-याने डावीकडचे आकडे उजवीकडे जुळवून बाईंडिग करुन दिलेला अर्थसंकल्प आहे. राज्याचे उप मुख्यमंत्री यांच्याकडे आम्ही अपेक्षेने पहात आहोत. राज्याचे भावी मुख्यमंत्री म्हणून त्यांच्याकडे सर्वजण पहात असतात. गरजेला मित्र पक्षाला बाजूला टाकून काही ठिकाणी तुम्ही सत्ता मिळवता. ही चांगली गोष्ट आहे. जो महाराष्ट्राचा पुढे मुख्यमंत्री होणार आहे त्याला आपल्या अर्थसंकल्पामध्ये महाराष्ट्राला एक व्हिजन द्यावी लागते, एक दिशा द्यावी लागते. महाराष्ट्रातील अडचणींवर मात करण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये सूतोवाच करावे लागते. या दृष्टीने पाहिले तर हा अर्थसंकल्प अर्थ मंत्र्यांचा नसून तो कक्ष अधिका-याचा आहे असेच म्हणावे लागेल. जर का हा अर्थसंकल्प अर्थमंत्र्यांचा असेल तर मग महाराष्ट्राचा मुख्यमंत्री होण्यासाठी त्यांना बराच काळ वाट पहावी लागणार आहे. काही आमदार किंवा काही जिल्हा परिषदेचे अध्यक्ष एकत्र जमले म्हणजे मुख्यमंत्री होता येत नाही, महाराष्ट्राचा विकास साधता येत नाही. श्री. अजित पवार हे विनोद तावडे यांचे मित्र आहेत असे लोक म्हणतात. पुणे पॅटर्न ते आणतात असेही म्हटले जाते. मग आम्हाला अभिमानाने सांगता आले पाहिजे की, हा आमचा माणूस पुढे मुख्यमंत्री होईल... होणार नाही हे माहीत आहे.. पण त्याच्यामध्ये ती ताकद आहे. सभापती महोदय, महाराष्ट्रातील 11 कोटी जनतेला जे काही अपेक्षित आहे ते या अर्थसंकल्पामध्ये दिसत नाही. माननीय उपमुख्यमंत्री श्री. अजितदादा पवार हे महाराष्ट्राला अपेक्षित दिशा दाखवू शकतात. परंतु ती त्यांनी दाखविलेली नाही. त्यामुळे हा

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. विनोद तावडे...

अर्थसंकल्प एका कक्ष अधिका-याने डावीकडचे आकडे उजवीकडे जुळवून केलेला अर्थसंकल्प आहे एवढेच मला म्हणावेसे वाटते. धन्यवाद.

--

डॉ. दीपक सावंत : मला बोलण्याची संधी द्यावी.

श्री. अजित पवार : माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या भाषणानंतर आता सत्ताधारी पक्षामधील सदस्य भाषण करतील आणि तशी प्रथा आहे.

श्री. विनोद तावडे : अर्थसंकल्पावर विरोधी पक्षनेता बोलल्यानंतर शिवसेना पक्षाच्या सन्माननीय सदस्यांना बोलण्याची संधी दिली जाते आणि त्यानंतर सत्ताधारी पक्षातील सदस्यांना बोलण्याची संधी दिली जाते. मागील वर्षी देखील असा क्रम ठेवण्यात आला होता.

श्री. विनायक मेटे : सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांचे अर्थसंकल्पावरील भाषण 3 वाजून 20 मिनिटांनी सुरु झाले. त्यांनी 1 तास भाषण केले. अर्थसंकल्पावर तीन दिवस सर्वसाधारण चर्चा होणार असून सत्ताधारी आणि विरोधी पक्षाला निम्मा-निम्मा वेळ देण्यात आलेला आहे. त्यामधील एक तास माननीय अर्थमंत्र्यांच्या उत्तरासाठी आहे. आता माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या भाषणानंतर सत्ताधारी पक्षातील सदस्यांना बोलण्याची संधी दिली गेली पाहिजे.

...नंतर श्री. भोगले...

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.विनायक मेटे.....

साधारणपणे असेच संकेत आहेत. त्यामुळे आपण त्या संकेतानुसार संधी दिली पाहिजे.

तालिका सभापती (श्री.मोहन जोशी) : अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेसाठी तीन दिवस उपलब्ध होणार आहेत. चर्चेच्या एकूण वेळेतील निम्मा वेळ विरोधी पक्षाला आणि निम्मा वेळ सत्ताधारी पक्षाला देण्यात येईल. माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी भाषण सुरु करावे.

श्री.हेमंत टकले : सभापती महोदय, दररोज तीन तास याप्रमाणे तीन दिवसाच्या चर्चेसाठी एकूण नऊ तासांची वेळ उपलब्ध होणार आहे. दररोजच्या वेळेतील 20 मिनिटांचा वेळ याप्रमाणे माननीय मंत्री महोदयांच्या उत्तरासाठी एक तासाचा अवधी दिला पाहिजे. उर्वरित 2 तास 40 मिनिटांपैकी निम्मा वेळ सत्ताधारी व निम्मा वेळ विरोधी पक्षास देण्यात यावा. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी एक तास भाषण केलेले असल्यामुळे विरोधी पक्षाच्या वाट्याला आता फक्त 20 मिनिटांचा अवधी शिल्लक आहे. सत्ताधारी पक्षासाठी 1 तास 20 मिनिटांचा वेळ उपलब्ध होणार आहे.

श्री.भास्कर जाधव : सभापती महोदय, माझा पॉईंट ऑफ प्रोसीजरबाबतचा मुद्दा आहे. माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना बोलण्याची संधी दिली त्याबद्दल माझा आक्षेप नाही. माननीय राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दलचा आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव सत्ताधारी पक्षाकडून मांडण्यात येतो. सभागृहापुढे एखादे विधेयक चर्चेसाठी आले किंवा अर्थसंकल्पावरील चर्चा असेल तेव्हा विरोधी पक्षाकडून चर्चेला सुरुवात केली जाते. त्यानंतर सत्ताधारी पक्षाकडील सदस्यांना संधी देऊन त्यांची बाजू किंवा त्यांचे मुद्दे मांडण्याची संधी दिली जाते एवढेच मला निदर्शनास आणावयाचे आहे.

तालिका सभापती : माननीय राज्यपालांच्या अभिभाषणावरील चर्चा सुरु होते त्यावेळी सत्ताधारी पक्षातील सन्माननीय सदस्य त्या प्रस्तावाचे सूचक व अनुमोदक असतात. त्यामुळे त्या चर्चेची सुरुवात सत्ताधारी पक्षाकडून होते. माननीय विरोधी पक्षनेत्यांचे भाषण पूर्ण झाल्यानंतर आता माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांना भाषण करण्यास अनुमती देण्यात आली आहे. माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी भाषण सुरु करावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत (मुंबई विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेत भाग घेण्यासाठी व त्यावर माझे विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, माननीय विरोधी पक्षनेत्यांनी चौफेर टोलेबाजी करणारे भाषण केले आहे. या अर्थसंकल्पात विभागनिहाय कोणकोणत्या गोष्टी अंतर्भूत आहेत याचे त्यांनी वर्णन केले आहे. मी त्यापैकी काही मुद्यांबाबत बोलणार आहे. अर्थसंकल्पावर टीका केली म्हणजे भाषण झाले असे होत नाही. त्यातील कच्चे दुवे हेरुन सत्ताधारी पक्षाच्या निदर्शनास आणून दिले पाहिजेत. ते विरोधी पक्षाचे कर्तव्य असते आणि ते कर्तव्य पार पाडण्याचे काम आम्ही करीत आहोत.

सभापती महोदय, मागील दोन वर्षाचे अर्थसंकल्प तुटीचे होते. या वर्षीचा अर्थसंकल्प सुंदर असेल, सर्वसामान्यांना दिलासा देणारा असेल अशी आमची अपेक्षा होती. परंतु गॅसवरील कर वाढविल्यामुळे त्या आशेवर पाणी फिरले आहे. माननीय अर्थमंत्री श्री.अजित पवार हे राज्याला आर्थिक शिस्त लावण्याचा प्रयत्न करीत होते. त्यांनी जाहीर केले होते की, सभागृहापुढे कमीत कमी पुरवणी मागण्या आणल्या जातील. मागील तीन अधिवेशनातील पुरवणी मागण्यांमध्ये हे चित्र कुठेच दिसून आले नाही.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

मागील तीन वर्षात शासनाने जवळपास 1,68,473 कोटी रुपयांच्या पुरवणी मागण्यां सभागृहाकडून मान्य करुन घेतल्या. याचे द्योतक असे आहे की, राज्याची आर्थिक शिस्त बिघडलेली आहे आणि अशा परिस्थितीत शासनाने कितीही ठिगळ लावण्याचा प्रयत्न केला तरी दुर्दैवाने जी सत्य परिस्थिती आहे त्यात बदल होणार नाही. यातून मेळ साधताना माननीय उप मुख्यमंत्र्यांच्या नाकी नऊ आले आणि शेवटी 153 कोटीचा शिलकी अर्थसंकल्प त्यांनी सादर केला. पण राज्यावर रुपये 253085 कोटीचे कर्ज असून सन 2012-13 मध्ये त्यात 39427 कोटीची भर पडणार आहे. हे सर्व करता करता उत्पन्न आणि कर्ज यांचे प्रमाण हे 18.8 टक्के इतके होते. नेहमीप्रमाणे महसुली जमेत असलेल्या रकमेतून 63.49 टक्के इतका खर्च वेतन व व्याज दर यावर खर्च होणार आहे. मग विकासासाठी फक्त 35 टक्के एवढीच रक्कम राहिली म्हणून हा अर्थसंकल्प काटकसरीचा असल्याचे म्हटले तरी तो तसाही नाही. उलट 152.49 लाख करोड इतकी महसुली थकित दाखविली आणि ही रक्कम कदाचित वाढली असेल पण दुर्दैवाने काही करांची आपल्या राज्यात वसुली झालेली नाही. त्यात 9684 कोटी एवढ्या रकमेची शासनाला वसुली करता आली नाही. या सर्व रकमा निर्वेध आहेत, त्याला चॅलेंज नाही, शासनाने मनात आणले असते तर वसूल सुध्दा करता आल्या असत्या. याशिवाय 2537.66 कोटी इतका महसुली कर थकित आहे, तो वसूल का झाला नाही, यात मागील वर्षीची 1582 कोटीची थकबाकी सुध्दा लक्षात घेण्यासारखी आहे. शासन आणि अधिकारी जर सक्षम असते तर, मंत्री महोदय सक्षम असते तर कदाचित आपल्यावर असा बाका प्रसंग ओढवला नसता.

आपल्याला असे वाटते की, बजेटमध्ये काही तरी नवीन योजना येतील, राज्याला नवीन दिशा मिळेल, मंत्रिमंडळाला नवीन दिशा मिळेल. पण या योजनांसाठी आपल्या राज्यातून फक्त 2.4 टक्के इतकाच निधी दिल्याचे दिसून येतो. त्यामुळे फक्त 1087 कोटीच्या योजना आपण संपूर्ण राज्यात राबवू शकू, यात माझी चूक होत असेल तर मंत्री महोदयांनी दुरुस्त करावी. राज्याने ज्या ज्या योजना दाखविलेल्या आहेत त्यात आपल्या राज्याचा थोडा हिस्सा आहे पण मुळात सर्वच योजना केंद्र शासनाच्या आहेत. यासंदर्भात माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सविस्तर माहिती दिलेलीच आहे. प्रामुख्याने या 15 योजना असून त्या सर्व योजनांमध्ये आपला फक्त 15

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत .....

टक्के एवढाच वाटा आहे. त्यात एकात्मिक पाणलोट योजना, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार योजना, सिंचन बाग योजना, आंतरराष्ट्रीय कृषी विकास योजना, राष्ट्रीय माध्यमिक शिक्षण व प्रशिक्षण योजना, सर्व शिक्षा अभियान योजना, शालेय पोषण आहार योजना अशा सर्व योजनांवर फक्त 10 टक्के एवढाच आपला हिस्सा खर्च होतो. उर्वरित रक्कम केंद्र सरकार मार्फत दिली जाते. बजेट तसे सुंदर दिसते पण त्यातील वस्तुस्थिती अशी आहे.

महोदय, आज आपल्या राज्यात सर्वात मोठ्या वैद्यकीय क्षेत्रात जी तरतूद केली त्यातून 620 कोटी रुपये जे.जे. हॉस्पिटलच्या हायराईज इमारतीसाठी तरतूद केली आहे. जे.जे. हॉस्पिटलला एम्सचा दर्जा मिळाला पाहिजे याबद्दल दूमत नाही. आपणास माहीत आहेच की जे.जे. हॉस्पिटलची एकूण 44 एकर जमीन आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

परंतु या इमारतींचे बांधकाम करतांना आपल्याला एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, यातील काही इमारती हेरिटेज दर्जाच्या असल्यामुळे या इमारतींना आपल्याला हातच लावता येणार नाही. मुख्यत्वे करुन मुलींच्या होस्टेलची जी इमारत आहे ती हेरिटेज इमारतीमध्ये येते. यासाठी आपण 630 कोटी रुपये देणार आहोत. जी.टी. हॉस्पिटलमध्ये 14 मजल्यांची इमारत बांधून तशीच पडलेली आहे. ही 14 मजल्याची इमारत सुपर स्पेशालिटीसाठी राखून ठेवली असून यामध्ये केवळ कबुतरेच राहतात. त्यामुळे इमारतीचे आपण नक्की काय करणार आहोत ? युतीच्या काळात म्हणजे ज्यावेळेस वैद्यकीय शिक्षण खात्याचे सचिव श्री. पी.सी.बेंजामीन होते तेव्हापासून ही इमारत तशीच पडून राहिलेली आहे. आता यासाठी आपण 630 कोटी रुपये जे. जे. हॉस्पिटलसाठी दिलेले असून जी.टी.हॉस्पिटलचा कॅम्पस आणि जे. जे. हॉस्पिटलचा कॅम्पस हे दोन दोन वेगवेगळे भाग असल्यामुळे इकडचे पैसे तुम्हाला तिकडे वापरता येणार नाहीत.

सभापती महोदय, रायगड, सातारा, नंदूरबार व मुंबई येथे नवीन वैद्यकीय महाविद्यालये सुरु होणार आहेत. आज लातूरच्या व अकोल्याच्या महाविद्यालयाचे काय झालेले आहे ? जेव्हा एमसीआयचे इन्स्पेक्शन येते त्यावेळी येथील डीनला ॲडीशनल चार्ज देऊन तिकडे पाठविले जाते. डॉ. इनामदार हे डीन होते त्यावेळेस त्यांना कोठल्या कोठे पाठविले जात असे आज डॉ. लहाने हे डीन आहेत. एक तर डीनची पदे रिक्त ठेवायची व दुस-या बाजूने नवीन महाविद्यालये काढावयाची असेच शासनाचे काम सुरु आहे. परवा हाच प्रश्न तारांकित प्रश्न म्हणून सभागृहात उपस्थित झाला होता. त्यावेळी वैद्यकीय शिक्षणमंत्र्यांचे उत्तर होते की, "अशा प्रकारे आम्ही जागाही प्रोक्युअर केलेली नाही." माननीय अर्थमंत्र्यांनी म्हटले आहे की, आम्ही 500 खाटांचे तसेच 100 रुग्ण क्षमतेचे वैद्यकीय महाविद्यालय सुरु करणार आहोत. त्यामुळे हे महाविद्यालय आपण कसे काय सुरु करु शकणार आहोत ? आपल्याकडे जागा नसतांना आपण पैशाची तरतूद केलेली आहे. मला असे म्हणावयाचे आहे की, ज्या गोष्टी नजीकच्या भविष्य काळात होऊ शकणार नाहीत त्याचे दिवा स्वप्न महाराष्ट्रातील जनतेला का दाखवता ? मेडिकल कॉलेजेसची आवश्यकता आहे ही बाब सत्य जरी

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ. दीपक सावंत ....

असली तरी आपल्या वैद्यकीय शिक्षण खात्याने यासंदर्भात कसल्याही प्रकारे श्रीगणेशा केलेला नाही. जागा प्रोक्युअर करण्यापासून सर्व गोष्टी प्रलंबित आहेत व पुढील पाच वर्षामध्ये आपल्यसला हेच वाक्य पुन्हा वाचावयास मिळणार आहे.

सभापती महोदय, आपत्कालीन वैद्यकीय सेवेला सुरुवात केली जाणार आहे अशी घोषणा बजेटमध्ये करण्यात आलेली आहे. आपत्कालीन वैद्यकीय सेवा सुरु करणार म्हणजे नेमके काय करणार आहात ? आज सकाळी माननीय गृह राज्य मंत्री श्री. सतेज पाटील यांना प्रश्नोत्तराच्या तासात आम्ही असे विचारले की, "ज्यावेळेस हायवेवर टँकरमधून गळती होईल त्यावेळेस आपण काय करणार आहात"? त्यावेळेस मंत्री महोदयांनी सांगितले की, "आम्ही ॲम्ब्युलन्स सेवा सुरु करणार असून फोन केल्यानंतर काही वेळातच ही ॲम्ब्युलन्स अपघात स्थळी पोहचेल. ज्या कंपनीचा टँकर असेल त्या कंपनीमार्फत ॲम्ब्युलन्सची सेवा दिली जाईल". सभागृहात असत्य किती बोलायचे याला काही तरी मर्यादा आहेत. माझ्या अर्धातास चर्चेला माननीय श्री. सुरेश शेट्टी यांनी सांगितले होते की, "पुण्याला तुम्ही साधा एक फोन केला तर महाराष्ट्रात तुम्हाला कोठेही वैद्यकीय सेवा उपलब्ध होईल". मुंबईत ॲम्ब्युलन्स मिळत नाही त्यामुळे लोकांचा जीव जातो अशी परिस्थिती असतांना असे उत्तर देणे योग्य नाही. एक्स्प्रेस हायवेवर ॲम्ब्युलन्स सेवा असती तर आज किती तरी लोकांचे जीव वाचले असते. पुणा एक्स्प्रेस हायवे झाला त्याच वेळी ॲम्ब्युलन्स सेवा, ट्रामा केअर ची सुविधा ठेवण्याचे नक्की झाले होते.

सभापती महोदय, दुसरी महत्वाची बाब अशी आहे की,

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापती स्थानी तालिका सभापती श्री.विनायक मेटे)

डॉ.दीपक सावंत....

राज्य शासनाचा कागद माझ्याकडे आहे. राजीव गांधी जीवनदायी योजनेसाठी जवळ जवळ 3.50 कोटी इतका निधी दिला आहे. हे पैसे 31 जानेवारी पर्यंत खर्च होत नाहीत. 31 जानेवारी ते 15 मार्च या कालावधीतच पैसे का खर्च होतात ? मलेरिया, फायलेरिया, कीटकजन्य रोगा पर्यंतची सर्व आकडेवारी माझ्याकडे आहे. शेवटच्या तीन महिन्यामध्ये 50 टक्क्याच्यावर निधी खर्च होत असतो. एवढ्या मोठ्या प्रमाणात निधी का खर्च होतो ? 24 कोटी 72 लाख रूपये आश्रमशाळा तपासणीसाठी आले होते. त्यापैकी 18 कोटी 75 लाख रूपये 31 जानेवारी पर्यंत संपले आणि 22 कोटी रूपये 15 मार्च पर्यंत संपले. आज देखील 3 कोटी 55 लाख रूपये शिल्लक आहेत. हे पैसे आश्रमशाळा तपासणीचे आहेत. तसेच मलेरिया कंट्रोल प्रोग्रॅमचे आहे. अजूनही 15 मार्च अखेर पर्यंत 10 कोटी रूपये खर्च करावयाचे बाकी आहेत. तोच प्रश्न फायलेरिया कंट्रोल प्रोग्रॅममध्ये आहे. तोच प्रश्न लेप्रसी कंट्रोल प्रोग्रॅममध्ये आहे. जीवनदायी योजनेमध्ये किती पैशाची तरतूद केली आहे ते मी आपणास सांगत आहे.

सभापती महोदय, आरोग्य खात्याच्या किती योजना आहेत ? प्रजनन बाल आरोग्य योजना, जननी सुरक्षा योजना, सार्वत्री लसीकरण, शालेय आरोग्य, राष्ट्रीय कीटकजन्य रोग निदान योजना, राष्ट्रीय क्षय रोग, राष्ट्रीय अंधत्व, कुष्ठरोग नियंत्रण व निर्मूलन आणि राष्ट्रीय आयोडिन योजना. याचे फक्त आकडे येतात, पण पैसे कुठे जातात हेच कळत नाही. प्रजनन बाल आरोग्य योजना आहे. या योजनेसाठी 214.57 कोटी रूपये आले आहेत. ते त्यावर खर्च होत नाहीत. ही दुर्दैवाची गोष्ट आहे. जननी सुरक्षा योजनेमध्ये 2658 लाख रूपये खर्च झाले आहेत. यात लाभार्थींची संख्या 2.43 लाख एवढी आहे. सन 2010-11 मध्ये 3 लाख 117 लोकांनी या मंजूर निधीचा लाभ घेतला. असे जर चालणार असेल तर या सर्व योजनांचे काय करायचे ?

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : एकूण 25 सन्माननीय सदस्य बोलावयाचे बाकी आहेत. त्यामुळे माझी सन्माननीय सदस्यांना विनंती आहे की, त्यांनी वेळेची मर्यादा पाळावी. आपले भाषण सुरू होऊन 15 मिनिटे झालेली आहेत. त्यामुळे आपण आपले विचार लवकरात लवकर व्यक्त करावेत.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, मला आपण अजून पाच-सहा मिनिटे द्यावीत. कोल्हापूर युनिव्हर्सिटीला पैसे देण्याचे प्रस्तावित केले आहे. या राज्यामध्ये बेरोजगार पदवीधर आहेत.यासंबंधातील प्रश्न आपण, सन्माननीय सदस्य श्री.तांबे साहेब लावून धरत असतात. आपण व्यवसायानुरूप विद्यापीठ कधी तरी निर्माण करणार आहात काय ? आज आपले विद्यार्थी परदेशी कंपनीमध्ये नोकरीला जातात किंवा परदेशी कंपनी येथे येते त्यावेळी त्यांना जो काही अभ्यासक्रम हवा असतो तो नसतो. त्यामुळे माननीय वित्त मंत्र्यांकडून खूप अपेक्षा आहेत. अशा प्रकारचे विद्यापीठ व्हावे की, ज्याचा अभ्यासक्रम हा थोडासा वेगळा असावा. आपल्या अभ्यासक्रमानुसार विद्यार्थी तेथे गेल्यावर तो निवडला गेला पाहिजे. तेव्हा परदेशी कंपनी समवेत आपले विचार मांडून अभ्यासक्रम ठरविला पाहिजे. अभिमत विद्यापीठा मागे हीच संकल्पना होती. दुर्दैवाने तेथे एक छत्री कार्यक्रम झ ाला. त्यांच्या अभ्यासक्रमात आणि आपल्या अभ्यासक्रमात साधर्म्यता असली पाहिजे. तेव्हा अशा प्रकारची विद्यापीठे सुरू करण्यासाठी मदत केली पाहिजे.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . ..

सभापती महोदय, राज्यामध्ये क्रीडा संस्कृती जोपासण्यासाठी आपल्याकडे क्रीडा धोरण कुठे आहे? युवा धोरण कुठे आहे? ज्येष्ठ नागरिकांसाठी धोरण कुठे आहे? सदनामध्ये या तिन्ही धोरणांच्या बाबतीत वारंवार घोषणा होते. पण क्रीडा धोरण अजूनपर्यंत मांडण्यात आलेले नाही. आपण युवकांना प्रोत्साहन देण्यासाठी युवा धोरण आणणार होता, यासाठी माननीय मंत्री श्री.सुरेश शेट्टी साहेबांनी छाती ठोकून सांगितले होते की, पुढील वर्षी युवा धोरण आणले जाईल. पण ते धोरण कुठे आहे हा प्रश्न आहे.आज ज्येष्ठ नागरिकांची काय परिस्थिती आहे.आज ज्येष्ठ नागरिकांना घरामध्ये रहाणे असह्य झाले आहे.त्यांच्यासाठी देखील धोरण जाहीर केले पाहिजे. आपण त्यांना लिव्ह ॲण्ड रिलेशनशीपसाठी परवानगी देणार आहात काय? आपण ज्येष्ठ नागरिकांच्या धोरणाच्या बाबतीत अशा प्रकारचा बोल्ड निर्णय घेणार आहोत काय? मध्यंतरी पुणे, नागपूर येथे असा प्रयोग झाला.

श्री.भाई जगताप (खाली बसून) : तो यशस्वी झाला.

डॉ.दीपक सावंत : सभापती महोदय, तो प्रयोग यशस्वी झाला. त्यामुळे अशा प्रकारे ज्येष्ठ नागरिकांच्या बाबतीतील जी धोरणे आहेत तशीच युवा लोकांच्या बाबतीत देखील आहेत. यात क्रीडा, युवा आणि ज्येष्ठ असे तीन टप्पे आहेत. प्रत्येक माणूस ज्येष्ठ होणार आहे. आज आपले ज्येष्ठ नागरिकांविषयी जे धोरण आहे ते अतिशय कुचकामी आहे. मी दोनच गोष्टी सांगून माझे भाषण संपविणार आहे.

सभापती महोदय, माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजितदादा पवार साहेब येथे उपस्थित आहेत. त्यांना मी एक गोष्ट सांगू इच्छितो की, आपण सकाळी व्हेन्टीलेटर बाबत फार मोठ्या प्रमाणात सांगितले. याबाबत घोषणा केल्यानंतर आपल्या खालच्या वर्गामध्ये डी.एच.एस.लेव्हलवर किंवा वैद्यकीय शिक्षण विभागामध्ये दहा व्हेन्टीलेटर्स घेण्यासाठी जीवघेणी स्पर्धा लागली आहे. या रेसमध्ये दोन कंपन्या आहेत पण मी त्यांची नावे घेऊ इच्छित नाही. दोनपैकी एक कंपनी कशी बाद होईल ते पाहिले जात आहे.पण ही स्पर्धा कुठेतरी थांबली पाहिजे. या व्हेन्टीलेटरच्या खरेदीमध्ये अनेक जणांचा बळी गेला आहे.आपण सांगितले त्याप्रमाणे आणखी दहा व्हेन्टीलेटर्सची खरेदी करण्यात येणार आहे. त्यानंतर ताबडतोब 15 मार्च ते 30 मार्चच्या कालावधीत ही संख्या 20 म्हणजे दुप्पट करण्यात येईल. कारण आज पैसे शिल्लक आहेत. माझी आपल्याला विनंती आहे की, 15 मार्च ते 30 मार्च दरम्यान होणाऱ्या खरेदीबाबत आपण लक्ष ठेवावे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

डॉ.दीपक सावंत . . ..

सभापती महोदय, तिसरी महत्वाची गोष्ट म्हणजे शिक्षण. आज याबाबतीत काय परिस्थिती आहे. आपण सर्वशिक्षा अभियान केले तरी देखील विद्यार्थ्यांच्या गळतीचे प्रमाण जवळजवळ 20 टक्के आहे. मध्यंतरी राज्यात पट पडताळणी झाली. पण ती बोगस झाली, केवळ कागदावर झाली. आजही पहिलीमध्ये न बसणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या जवळजवळ 13 टक्के आहे. आपण बजेटमध्ये असे म्हटलेले आहे की, "औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या बाबतीत सांगावयाचे तर त्यामध्ये आणखी 40 संस्थांची भर घालण्यात आली."पण दरवर्षी जवळजवळ 1 लाख 57 हजार 523 विद्यार्थी प्रशिक्षण घेऊन बाहेर पडतात, त्यांच्या रोजगाराचे काय ? हा महत्वाचा प्रश्न आहे. आपण त्यांच्या हाताला काम दिले नाही तर ते क्रिमिनल माईंडेड होतात आणि वेगळ्या मार्गाला जातात. त्यांच्यासाठी रोजगार उपलब्ध झाला पाहिजे. आपण 21 लाख रोजगाराच्या बाबतीत घोषणा करतो, पण ते कुठे आहेत हे आपण लोकेट करु शकत नाही.

सभापती महोदय, आदिवासींच्या बाबतीत मुद्दा मांडून मी माझे भाषण संपविणार आहे. आदिवासींच्या आश्रमशाळांसाठी 400 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. पण निम्म्याहून अधिक जागा आपल्या मालकीच्या नाहीत. मग शासन आदिवासींसाठी आश्रमशाळा कशा बांधणार आहे? आज आदिवासी आश्रमशाळांमध्ये छप्पर नाही, दरवाजे नाहीत, खिडक्या नाहीत अशी स्थिती आहे. अशा वेळी तेथील आश्रमशाळेतील विद्यार्थ्यांना कुठे हालविणर आहात? तसेच विद्यार्थ्यांना जो उपस्थिती भत्ता दिला जातो, तो गेल्या चार-पाच महिन्यापासून दिले जात नाही आणि अजूनही याबाबतीत बजेटमध्ये तरतूद करण्यात आलेली नाही. फक्त माननीय राज्यपालांच्या अभिभाषणामध्ये याची दखल घेतलेली आहे.

सभापती महोदय, आपण आदिवासींना जीवनावश्यक वस्तू देतो, त्याची आणि आदिवासी विकास विभागाची एकदा सी.आय.डी.मार्फत चौकशी करण्यात यावी. माननीय मंत्री महोदयांकडे हे खाते असले तरी आपल्याकडे लोक वेगळ्या नजरेने पहात आहेत.आपण सडेतोडपणे आदिवासी विकास विभागाची सी.आय.डी.मार्फत चौकशी करा असे सभागृहातील प्रत्येक सन्माननीय सदस्यांचे मत आहे आणि आपल्या समोर काय येते ते पहा. येथील आदिवासी लोकांपर्यंत 10 रुपयातील 1 रुपया जरी पोहोचला तर तुमचे काम झाले. पण त्यांच्या पर्यंत दहा पैसे देखील पोहोचत नाहीत ही दुर्दैवाची गोष्ट आहे. शेवटी या अर्थसंकल्पामध्ये केरोसीन आणि गॅसवर जो कर लावण्यात आलेला आहे, तो कमी करावा अशी विनंती करुन मी माझे भाषण संपवितो.

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : आता सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी आपले भाषण सुरु करावे.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, विरोधी पक्षाकडील सन्माननीय सदस्यांचे भाषण झाल्यानंतर काँग्रेस पक्षाकडील सदस्य भाषण करतात, त्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडील सदस्य भाषण करतात अशी आता पर्यंतची परंपरा आहे.

तालिका सभापती : सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना मी सांगू इच्छितो की, आपण म्हणता ते बरोबर आहे. परंतु सन्माननीय सदस्य श्री.किरण पावसकर यांनी माझ्याकडे विनंती की, मला बाहेर जावयाचे आहे, तेव्हा मला अगोदर बोलण्याची संधी द्यावी. मी त्यांची विनंती मान्य केली. म्हणून त्यांना बोलण्याची संधी दिलेली आहे. त्यांचे भाषण झाल्यानंतर काँग्रेस पक्षाचे सदस्य भाषण करतील.

श्री.भाई जगताप : सभापती महोदय, या चर्चेची सुरुवात आदरणीय ज्येष्ठ सदस्य श्री.उल्हासदादा पवार करणार होते. परंतु त्यांनी मला सांगितले की, आपण सभागृहात उपस्थित रहावे.

तालिका सभापती : मी सन्माननीय सदस्य श्री.भाई जगताप यांना सांगू इच्छितो की, आपल्या पक्षाकडून बोलण्यासाठी पहिले नाव प्रा.सुरेश नवले यांचे आहे. आपले नाव दुसऱ्या क्रमाकांवर आहे.

श्री.किरण पावसकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आपण मला बोलण्याची संधी दिली त्याबद्दल आपल्याला धन्यवाद देतो.

सभापती महोदय, सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेवर माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे.

सभापती महोदय, बजेट म्हणजे विधिमंडळास सादर केलेला फायनान्शिअल रिपोर्ट. अर्थसंकल्पामध्ये पुढील एक किंवा दोन वर्षाचा विचार न करता त्यामध्ये आर्थिक, सामाजिक परिवर्तन व विकासाच्या माध्यमातून भविष्याचा वेध घेतला जातो. या दृष्टीने सन्माननीय वित्त राज्यमंत्री आणि माननीय उप मुख्यमंत्री महोदयांनी सभागृहाला सादर केलेला अर्थसंकल्प महाराष्ट्र राज्याला निश्चितपणे प्रगती आणि दिशा देणारा आहे. म्हणून मी सर्वप्रथम माननीय वित्त मंत्री व उपमुख्यमंत्री यांचे अभिनंदन करतो.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

सभापती महोदय, सन 2010-2011 मध्ये 7 हजार 774 कोटी रुपयांचा तुटीचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला होता. या वर्षी 152 कोटी 49 लाख रुपयांचा शिलकीचा अर्थसंकल्प सादर केलेला आहे. आपण प्रगतीचा टप्पा गाठला नसता तर आपणास अशा प्रकारचा अर्थसंकल्प सादर करता आला नसता.

सभापती महोदय, विकासाच्या प्रगतीत राज्यातील सर्व स्तरावरील जनतेला बरोबरीने घेऊन जाणारा आणि विकासाच्या दृष्टीने ठोस पाऊल उललेला हा अर्थसंकल्प आहे असे मला वाटते. या अर्थसंकल्पामध्ये वेगवेगळ्या योजना, त्याचे उत्पन्न, त्यावर होणारा खर्च या संदर्भातील माहिती देखील दिलेली आहे. कोणत्या नवीन योजनांचे उद्दिष्ट गाठायचे आहे त्याची माहिती दिलेली आहे. वाढत्या शहरीकरणाची टक्केवारी पाहता शहराच्या विकासासाठी आपल्याला इन्फ्रास्ट्रक्चर, वीज निर्मिती यावर लक्ष देण्याची गरज भासते. ती या अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. त्याच प्रमाणे या अर्थसंकल्पात शेती उत्पादनात वाढ करण्याचा प्रयत्न झालेला आहे. त्याच बरोबर औद्योगिक क्षेत्रातील उत्पादन वाढीसाठी देखील आपण प्रयत्न केला पाहिजे. आपणास नुसते उत्पादन वाढवून चालणार नाही तर त्याचे वितरण चांगल्या पध्दतीने कसे होईल याचा देखील आपणास विचार करावा लागेल.

सभापती महोदय, आपण महागाईला आळा घालू शकत नाही त्यावेळी आपण केंद्र शासनाने कोणत्या योजना आखलेल्या आहेत, अर्थसंकल्पामध्ये कोणकोणत्या गोष्टी आलेल्या आहेत हे पाहतो. एकीकडे आपण ऊसाला चांगला भाव मिळाला पाहिजे असे म्हणतो, तर दुसरीकडे साखर देखील स्वस्त झाली पाहिजे असे आपण म्हणतो. तेव्हा या साठी इफेक्टीव्ह प्लानिंगची आवश्यकता आहे. शेतकऱ्यांना हवामानातील बदलामुळे, अनियमिततेमुळे विविध समस्यांना तोंड द्यावे लागते. शेतकऱ्यांना खताचा पुरवठा केला जातो त्यामध्ये भेसळ असते आणि त्या बाबत येथे वारंवार चर्चा देखील झालेली आहे. शेतकऱ्यांवर सावकरांचे कर्ज आहे. आपण ही आकडेवारी पाहिल्यास सन 2010 मध्ये 489 कोटी रुपये सावकरी कर्ज दिले गेले आहे.

यानंतर कु.थोरात..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर...

सन 2011 मध्ये 851 कोटी सावकारी कर्ज देण्यात आलेले आहे. खऱ्या अर्थाने ही चिंतेची बाब आहे. याकडेही शासनाने लक्ष देण्याची गरज आहे. सभापती महोदय, एकीकडे सावकाराचे कर्ज दुसरीकडे भेसळ तिसरीकडे पावसाची अनियमितता यातून शेतकऱ्यांना वाचविण्यासाठी कायद्यातील बदलाची व प्रशासकीय यंत्रणेकडून वारंवार ज्या चूका होत असतील त्या सुधारण्याची गरज आहे. मला असे वाटते की, यासाठी खऱ्या अर्थाने प्रायव्हेट सेक्टर, पब्लिक सेक्टर, को-ऑपरेटिव्ह सेक्टर आणि जॉईन्ट सेक्टर यांच्या माध्यमातून काही योजना राबविल्या तर शेतकऱ्यांना त्याचा नक्कीच फायदा झाल्याशिवय राहणार नाही. ज्या देशातील शेतकरी सुखी, ज्या देशातल्या शिक्षकांना सन्मान त्याच देशाची प्रगती महान असे म्हटले जाते. जपान हे याचे चांगले उदाहरण आहे.

सभापती महोदय, संपूर्ण राज्याचा विचार करत असताना काही क्षेत्रे अशी आहेत की, ज्याकडे सातत्याने दुर्लक्ष होते. आज सकाळी एका लक्षवेधी सूचनेच्या माध्यमातून मच्छीमारांचा प्रश्न चर्चेला आला होता. या महाराष्ट्राला निसर्गाने 720 कि.मी. ची किनारपट्टी दिलेली आहे. याचा उपयोग करुन घेण्यासाठी आपण कमी पडत आहोत. बंदरांचा विकास करावयास पाहिजे. समुद्रमार्गे वाहतुकीला चालना द्यावयास पाहिजे आणि जे मच्छीमार पारंपरिक पध्दतीने व्यवसाय करीत आहेत त्या मच्छीमारांच्या अडचणी दूर कराव्या लागतील. या संदर्भात प्रशासनाला काही अडचणी येतात. या संदर्भात या सदनामध्ये वारंवार चर्चा झालेली आहे मग ती पर्सोनेट जाळयांच्या बाबतीत मच्छिमारांचे नुकसान झालेले असेल त्या बाबत असेल किंवा त्यांच्यासाठी द्यावयाची डिझेल सबसिडी बाबत असेल. आमचे कोकणचे मंत्री श्री. भास्कर जाधव यांचे अभिनंदन करावे लागेल. केरळ आणि पश्चिम बंगालमध्ये केरोसीनवर जशी सबसिडी दिली जाते त्याच पध्दतीने आपणही येथील मच्छीमारांना सबसिडी देऊ अशा प्रकारचे आश्वासन त्यांनी दिलेले आहे.

सभापती महोदय, याच अनुषंगाने मला असे सुचवावयाचे आहे की, पर्यटनाकडे जास्त लक्ष देण्याची गरज आहे. जेवढे पर्यटक या देशात येतात त्यातील जवळ जवळ 45 टक्के पर्यटक हे महाराष्ट्रामध्ये येतात. महाराष्ट्रात येणाऱ्या या पर्यटकांसाठी आपल्याकडे समुद्र आहे, थंड हवेची ठिकाणे आहेत, अनेक ठिकाणी धरणे बांधलेली आहेत त्याच्या आजूबाजूचा परिसर पर्यटकांना आनंद देऊ शकेल अशा पध्दतीने आहे. ॲग्रो टुरिझमसाठी चालना देण्यात येत आहे. पण यासाठी लागणाऱ्या इन्फ्रास्ट्रक्चरच्या बाबतीत महाराष्ट्र शासन कमी पडत आहे का?

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर...

कारण इन्फ्रास्ट्रक्चर देत असताना त्यासाठी लागणाऱ्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देत असताना त्याच्या क्वालिटीची चाचपणी करणे गरजेचे आहे. अशा प्रकारे क्वालिटीची चाचपणी केली तर पर्यटनाचा व्यवसाय मोठया प्रमाणात वाढू शकेल. ऑस्ट्रेलिया असेल, स्पेन असेल, इटाली असेल यांची अर्थ व्यवस्था ही तिकडच्या टुरिझमवर अवलंबून आहे. महाराष्ट्र राज्याच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर आपल्या बाजूला असलेले गोवा असेल केरळ असेल या ठिकाणचे पर्यटनाचे पर्सेंटेज हे महाराष्ट्रापेक्षा जास्त आहे, याकडे आपल्याला दुर्लक्ष करुन चालणार नाही. निसर्गाने न मागता या महाराष्ट्राला भरभरुन दिले असतानाही आपण पर्यटनाच्या बाबतीत कुठे कमी पडतो याचा विचार करण्याची आवश्यकता आहे आणि त्यावर ठोस पाऊले उचलण्याची गरज आहे. सभापती महोदय, पर्यटनासाठी चारही बाजूने निसर्गाची खाण आहे त्यामुळे इतर राज्यांमध्ये, इतर देशांमध्ये पर्यटनाचा व्यवसाय कसा चांगल्या पध्दतीने चालतो आणि आपल्याकडे आपण कुठे कमी पडतो हे पाहण्यासाठी एक अभ्यास गट स्थापन केला तर त्या अभ्यासगटाच्या माध्यमतून काही तरी फायदा करुन देऊ शकू आणि असलेल्या इतर गोष्टींच्या बाबतीत सूचना करुन पर्यटनाच्या व्यवसायाला चालना देता येईल.

सभापती महोदय, शिक्षण व क्रीडा संकुलासाठी 90 कोटी रुपयांची तरतूद या अर्थसंकल्पात केलेली आहे. कबड्डीला ऑलिंपिकचा दर्जा मिळालेला आहे. या मातीतील खेळ पण या कबड्डीला ऑलिंपिकचा दर्जा मिळवून देण्यासाठी सर्वांची धडपड चालू होती. सन्माननीय केंद्रीय मंत्री श्री. शरद पवार तसेच सन्माननीय उप मुख्यमंत्री श्री. अजित पवार यांचीही यासाठी धडपड चालू होती. पण आज कबड्डीला तो दर्जा मिळालेला आहे. महाराष्ट्रातील तीन कन्यांनी कबड्डीमध्ये जो नावलौकिक मिळविलेला आहे त्याबद्दल शासनाने त्यांचा सत्कारही केलेला आहे.

सभापती महोदय, तसाच एक खेळ हॉकी हा आहे.

यानंतर श्री. बरवड....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. किरण पावसकर ....

हॉकीच्या बाबतीत मुंबई हॉकी असोसीएशनचा कारभार अतिशय गलथानपणे चालू आहे. आपण खेळासाठी प्राधान्य देतो, खेळांसाठी मैदाने ठेवतो. ज्या मुंबईमध्ये एक चौरस फूट जागेसाठी मारामाऱ्या होतात त्या ठिकाणी खेळांसाठी मैदाने ठेवण्यास सांगतो पण या खेळांमध्ये जे एक एक प्रकार चालले आहेत ते फार भयानक आहेत. त्यामधीलच एक प्रकार मी सांगू इच्छितो. मुंबई हॉकी असोसिएशनमध्ये जे सदस्य भरलेले आहेत त्यामध्ये जे खेळाडू राष्ट्रीय पातळीवर हॉकी खेळलेले आहेत, जे खेळाडू राज्यासाठी खेळलेले आहेत, जे खेळाडू युनिव्हर्सिटीकडून खेळले आहेत त्यांना दूर ठेवण्यात आले असून कोठे तरी टॅक्सी ड्रायव्हर, इन्शुरन्स एजंट यांना घेऊन ही असोसिएशन चालली आहे. त्या असोसिएशनचा एवढा गलथान कारभार चालू आहे. श्री. पवार साहेब यांनी आताच केंद्र शासनाकडून त्यांना 3 कोटी रुपये मिळवून दिलेले आहे. त्यानंतर सुध्दा जे खरे खेळाडू आहेत ते या खेळापासून वंचित राहात आहेत आणि इतर लोक त्या ठिकाणी येऊन कब्जा घेऊन बसलेले आहेत. आपण माननीय क्रीडा मंत्र्यांना या संदर्भातील निवेदने दिलेली आहेत. नवीन अर्थसंकल्पामध्ये 90 कोटी रुपयांची तरतूद करुन खेळांच्या संकुलांसाठी मदत करीत आहोत पण ज्या ठिकाणी अशा पध्दतीचे गैरव्यवहार चालू आहेत ते ताबडतोब थांबविण्यात यावेत.

सभापती महोदय, शासनाने पर्यटनासाठी 228 कोटी रुपये दिलेले आहेत परंतु ही तरतूद खरोखरच कमी आहे असे म्हणता येईल. कारण 2010-2011 मध्ये 494 कोटी रुपये तीर्थक्षेत्रांच्या विकासासाठी देण्यात आले होते. आपल्याकडे पर्यटन हे केवळ समुद्र किंवा थंड हवेच्या ठिकाणीच होत नाही तर काही तीर्थक्षेत्रे अशी आहेत की, जी या पर्यटनामध्ये घेण्यात आलेली आहेत. तीर्थक्षेत्र विकासाच्या कार्यक्रमासाठी भरीव तरतूद करण्याबाबत उल्लेख करण्यात आलेला आहे पण त्यामध्ये किती कोटी रुपयांची तरतूद आहे हे सांगितलेले नाही. माझी माननीय मंत्री महोदयांना विनंती आहे की, याकडे जास्तीत जास्त लक्ष देऊन पर्यटनाबरोबरच तीर्थक्षेत्रांचाही विकास करावा.

सभापती महोदय, पायाभूत सुविधांमध्ये रस्ते विकासासाठी 2899 कोटी रुपयांचा नियतव्यय दिलेला आहे. खरे म्हणजे 1980 साली बॅ. अंतुले साहेब मुख्यमंत्री असताना सागरी महामार्गाच्या निर्मितीचा संकल्प करण्यात आला होता. सर्व महत्वाचे पूल बांधून झालेले आहेत. जर हा सागरी महामार्ग झाला तर 12 तासांचा प्रवास 8 तासात होऊ शकेल. आताही आपण रस्त्यांच्या

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/ D/ KTG/ KGS/ MMP

श्री. किरण पावसकर ....

विकासासाठी निधीची उपलब्धता करुन दिलेली आहे. मुंबई, ठाणे, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि त्यानंतर गोवा या ठिकाणी अपघाताचे प्रमाण जास्त आहे. या संदर्भातील मागच्या दोन वर्षातील आकडे सन्माननीय सदस्य श्री. राजन तेली यांनी सभागृहात मांडले होते. या चौपदरी मार्गासाठी लवकरात लवकर उपाययोजना करुन रस्ते विकासाच्या दृष्टीने काम कसे करता येईल आणि चांगला सागरी महामार्ग कसा होऊ शकेल याकडे लक्ष देण्याची गरज आहे.

सभापती महोदय, गृह विभागामध्ये पोलीस दलाच्या आधुनिकीकरणासाठी 156 कोटी 55 लाख रुपयांची आणि पोलिसांची कार्यालये आणि निवासाच्या इमारतींकरिता 256 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न आला की, या सभागृहामध्ये विरोधकांकडून सर्व सभागृह डोक्यावर घेतले जाते. पोलीस ड्युटीवर असतात म्हणून आपण आपल्या घरी शांतपणे झोपू शकतो. पण त्याच पोलिसांच्या वसाहतींची अवस्था जर पाहिली तर त्या बाबतीत विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी तसेच सत्ताधारी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी आवाज उठविलेला आहे. त्या वसाहतींची डागडुजी करण्याची गरज आहे. मला असे वाटते की, पोलीस कार्यालये आणि निवासी इमारतींकरिता जी 256 कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे ती फार अल्प तरतूद आहे. आपण बेकायदेशीर झोपडपट्टयांमध्ये राहणाऱ्या लोकाना घरे देतो. मग ते 1995 च्या अगोदरचे असतील किंवा 2000 च्या अगोदरचे असतील अशा लोकांना आपण घरे देऊ शकतो, एसआरए अंतर्गत आपण घरे देऊ शकतो, पुनर्बांधणी प्रकल्पामध्ये चांगल्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देता येतील का हे आपण बघतो. या पोलीस वसाहतींची डागडुजी किंवा दुरुस्ती न करता ज्या वसाहती जीर्ण अवस्थेत आहेत त्यांची पुनर्बांधणी करण्याची गरज आहे. हे जर तातडीने केले तर खऱ्या अर्थाने आपण पोलिसांना न्याय मिळवून दिला किंवा त्यांच्या येणाऱ्या नवीन पिढीला कोठे तरी नवीन काम करुन इन्फ्रास्ट्रक्चर उभे करुन दिले अशा पध्दतीचे काम होऊ शकेल.

सभापती महोदय, आताच माननीय विरोधी पक्ष नेते श्री. विनोद तावडे यांनी भाषण केले. कक्ष अधिकारी यांनी जोडलेली कागदपत्रे डावीकडची आणि उजवीकडची आहेत वगैरे त्यांनी सांगितले. विरोधी पक्ष नेता म्हणून ज्या आवेशाने भाषण करावयास पाहिजे त्या आवेशामध्ये त्यांचे भाषण झाले. ते त्यांचे काम आहे. ते काम त्यांनी चांगल्या पध्दतीने बजावलेले आहे. त्यांनी एमएमआरडीएला 350 कोटी देण्याच्या बाबतीत सांगितले.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर.....

शासनाने एमएमआरडीएला 350 कोटी रुपये देणे बाकी आहे की एमएमआरडीए शासनाला देणार आहे ते सांगितले नाही. त्यांच्या मनात भरपूर शंका होत्या. मी त्यांचे भाषण शांतपणे ऐकलेले आहे.

सभापती महोदय, मुंबई महानगरपालिकेचे 26 हजार कोटींचे बजेट आहे. मागील दोन वर्षाचे बजेट प्रत्येकी 23 हजार कोटींचे होते. माननीय मुख्यमंत्र्यांनी असे सांगितले की, या तिन्ही वर्षाचे ऑडिट झालेले नाही. खड्डे बुजविण्यासाठी 800 कोटी रुपये खर्च केले जातात. मिठी नदीचा गाळ काढण्यावर खर्च केला जातो. तिच तिच कामे दरवर्षी केली जातात. त्या कामावर पैसे खर्च केले जात आहेत. याबाबतची चर्चा करीत बसतो. म्हणून मुंबई महानगरपालिकेचे 26 हजार कोटींचे बजेट असल्यामुळे त्यांचे ऑडिट तातडीने होणे आवश्यक आहे. जेणे करुन या कामांमध्ये भ्रष्टाचार झाला असेल तर तो जनतेसमोर येणे गरजेचे आहे.

माननीय विरोधी पक्ष नेत्यांनी 600 कोटी संबंधी चांगले भाषण केले आहे. त्यांचे असे म्हणणे आहे की, घरगुती गॅसवर 5 टक्के वाढ केल्यामुळे 600 कोटी रुपयांचा शासनाला महसूल मिळणार आहे. घरगुती गॅसवर 5 टक्के वाढ केल्यामुळे राज्यातील भगिनींना त्रास होणार आहे म्हणून या दरवाढीबाबत माननीय अर्थमंत्री फेरविचार करीत आहेत असेही म्हणाले आहेत. त्याबद्दल मी माननीय विरोधी पक्ष नेत्यांचे अभिनंदन करतो. जर महाराष्ट्रातील भगिनींना त्रास होत असेल तर माननीय उप मुख्यमंत्री श्री.अजित दादा विचार करणार नाही तर कोण करणार ? त्यांच्या नावात दादा असल्यामुळे आपण चिंता करण्याचे कारण नाही. आम्ही देखील मंत्री महोदयांना विनंती करु. जर 5 टक्के वाढ केल्यामुळे एलपीजीच्या किंमतीमध्ये 20 रुपये वाढ होत असेल तर त्यामध्ये कपात करण्याबाबत शासनाने जरुर विचार करावा.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये एक गोष्ट प्रामुख्याने दिसून आली. आतापर्यंत जेवढे अर्थसंकल्प सादर झाले आहेत त्याचा उल्लेख सन्माननीय सदस्य डॉ.दीपक सावंत यांनी सुध्दा केलेला आहे. या बजेटमधून घाम गाळून पैसे कमविणाऱ्यांकडून अधिक पैसे घेण्याचा शासनाचा उद्देश नाही. पण ज्यांना घामाशिवाय पैसा मिळाला आहे तो पैसा शासनाच्या तिजोरीत येण्यासाठी शासनाने तीच कृती करावी असे मला वाटते. त्याबाबत माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या भाषणात

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.किरण पावसकर....

विचार मांडले आहेत त्याबाबत मी त्यांना धन्यवाद देईन. जर हा उद्देश नसता तर पेट्रोल व डिझेलवरील कारवर टॅक्स वाढविला नसता. गॅसवर 20 रुपये वाढविल्यामुळे भगिनींना त्रास होत आहे. पण कारवर 2 किंवा 3 टक्के कर वाढविल्यामुळे श्रीमंतांना त्रास होणार नाही. याद्वारे माननीय अर्थ मंत्र्यांनी व माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी ही तूट भरुन काढलेली आहे. म्हणून मी दोघांचे आभार मानतो.

सभापती महोदय, अर्थसंकल्पीय अधिवेशन हे महाराष्ट्राच्या दृष्टीने महत्वाचे असून सदनामध्ये वेगवेगळ्या आयुधांचा वापर करुन भ्रष्टाचार व अनियमिततेची चर्चा केली जाते. संबंधितांच्या निलंबनाची मागणी केली जाते. राज्यात अन्नधान्यामध्ये, दुधामध्ये,खतांमध्ये, माव्यामध्ये, औषधांमध्ये, खाद्य पदार्थामध्ये भेसळ करण्याचे प्रकार वाढत आहेत. पण या भेसळीसाठी जे जबाबदार आहेत त्यांना जरब बसण्यासाठी सध्या असलेले कायदे अधिक प्रभावी करणे आवश्यक आहे. त्यासाठी या सदनाचा वापर झाला पाहिजे. कायद्यामध्ये नवीन सुधारणा करीत असताना त्यावर चर्चा करणे आवश्यक आहे. त्यासाठी सदनाचा वेळ खर्च केला पाहिजे. एका भ्रष्टाचारी अधिकाऱ्यास निलंबित करुन प्रशासनात सुधारणा होणार नाही. त्याऐवजी कायद्यात बदल करण्याची गरज आहे.

सभापती महोदय, राज्यात मागील वर्षी महसुली तूट असतानाही माननीय अर्थ मंत्र्यांनी या वर्षी शिलकीचा अर्थसंकल्प सादर करण्यात आलेला आहे. याचा अर्थ भ्रष्टाचार व भेसळ रोखणे यासाठी कायद्यात बदल केले तर वैभवशाली महाराष्ट्र घडविता येईल, एवढेच मी सांगतो आणि आपली रजा घेतो.

3.....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

प्रा.सुरेश नवले (नामनियुक्त) : सभापती महोदय, सन 2012-13 या वर्षाच्या अर्थसंकल्पावर अर्थपूर्ण विचार मांडण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्र राज्याचा अर्थसंकल्प मोठा आहे. तो सुनियंत्रितपणे मांडण्याचा प्रयत्न माननीय अर्थ मंत्री व माननीय अर्थ राज्यमंत्र्यांनी केलेला आहे. महाराष्ट्र राज्य हे भौगोलिक दृष्ट्या मोठे आहे.

यानंतर श्री.शिगम....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले...

देशाच्या एकूण लोकसंख्येच्या तुलनेत आपल्या राज्याची लोकसंख्या 9.3 टक्के आहे. नागरीकरण 45 टक्के झालेले आहे. ग्रामीण भागामध्ये 55 टक्के नागरिक राहातात. मला असे वाटते की, माननीय अर्थमंत्र्याची भावना ही असावी,

"माझीया गीतात वेडे दु:ख संतांचे भिनावे,
वाळल्या वेलीस माझ्या, अमृताचे फूल यावे"

महाराष्ट्राच्या वेलीला अमृताचे फूल यावे ही अपेक्षा आहे. जोपर्यन्त उपेक्षित घटक आणि गरीब जनतेला न्याय मिळत नाही, तिच्या पदरात काही पडत नाही तोपर्यन्त हे फूल मिळणार नाही. हे फूल देण्याचा प्रयत्न माननीय अर्थमंत्र्यांनी केलेला आहे. म्हणून मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. मुंबई ही देशाची आर्थिक राजधानी आहे. मुंबई ही वायदे मंडळ आणि भांडवली बाजाराची बाजारपेठ आहे. मुंबईमध्ये क्रय-विक्रयाचा मोठा बाजार भरला जातो. त्या दृष्टीने मुंबई हे व्यापाराचे केन्द्र आहे. अशा या मुंबईला डोळयासमोर गृहीत धरले तर मुंबई ही महाराष्ट्राचे मस्तक आहे. मुंबई नावाचे पुस्तक रोज आंतरराष्ट्रीय पर्यटक डोळयाखालून घालतात. अशा या मुंबईचा अंतर्भाव माननीय अर्थमंत्र्यांनी आपल्या अर्थसंकल्पामध्ये दूरदृष्टीने केलेला आहे त्याबद्दलही मी त्यांना मनापासून धन्यवाद देतो. देशाच्या एकूण स्थूल उत्पन्नमध्ये महाराष्ट्राचे उत्पन्न 14.9 टक्के आहे. औद्योगिक सेवा 87 टक्के आहे, कृषी आणि तत्सम स्वरुपाच्या सेवा 13 टक्के आहे. त्या दृष्टीने महाराष्ट्र हे अवाढव्य राज्य आहे. भौगोलिकदृष्ट्या देशातील दुस-या क्रमांकाचे राज्य आहे.

सभापती महोदय, आपल्या राज्यातील शेतक-यांचा विषय अतिशय महत्वाचा आहे. महाराष्ट्रातील 226.1 लाख हेक्टर जमीन लागवडीखाली असून 51.1 लाख हेक्टर क्षेत्र वनाखाली आहे. वनखालील क्षेत्र वाढविण्याची आवश्यकता आहे असे मला वाटते. वने खात्याचे माननीय मंत्री महोदय डॉ. पतंगराव कदम यांनी वृक्ष लागवडीवर 100 कोटी रु. खर्च करण्याचा संकल्प केलेला असून तो पूर्ण करण्यासाठी ते प्रयत्नशील रहाणार आहे. त्यामुळे 33.33 टक्क्यापर्यन्त वनक्षेत्र जाण्यास मदत होईल. उद्योगाच्या बाबतीत महाराष्ट्र प्रथम क्रमांकावर आहे. देशाच्या तुलनेत महाराष्ट्राची औद्योगिक प्रगती सर्वाधिक आहे. या वर्षी औद्योगिक वाढ 9.1 टक्का इतकी अपेक्षित आहे. मोटार वाहन आणि तंत्रज्ञानाच्या बाबतीत एक प्रमुख राज्य म्हणून महाराष्ट्र राज्याकडे पहावे लागेल.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

मोठया प्रमाणावर स्थापित होणारे विशेष निर्यात वृध्दी झोन महाराष्ट्रामध्ये आहे. त्यामुळे मी माननीय उद्योगमंत्री श्री.नारायण राणे साहेबांना मनापासून हार्दिक शुभेच्छा देतो. उद्योग विभागाची अशीच वृध्दी होवो. महाराष्ट्रातील बेकारी नष्ट करण्याचा जो संकल्प आपण सोडला आहे त्यामध्ये आपल्याला यश प्राप्त होवो. मला खात्री आहे, उद्योग क्षेत्रातील बेकारीचे उच्चाटन हा जो मंत्र आहे तो यशस्वी ठरल्याशिवाय राहणार नाही.

सभापती महोदय, देशामध्ये साक्षरतेचे प्रमाण 74 टक्के आहे. विरोधी पक्षाच्या सन्माननीय सदस्यांनी याचे आत्मपरिक्षण करण्याची गरज आहे. देशाचे साक्षरतेचे प्रमाण 74 टक्के असताना राज्यातील साक्षरतेचे प्रमाण 82.9 टक्के आहे. साक्षरतेच्या दृष्टीने महाराष्ट्र पुढे जात आहे. परंतु हे प्रमाण जेव्हा 100 टक्के होईल तेव्हा खऱ्या अर्थाने महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करावे लागेल. साक्षरतेचे प्रमाण 100 टक्के झाल्यानंतर महाराष्ट्र प्रगतीच्या दृष्टीने कमी पडणार नाही.

सभापती महोदय, पशुधन आणि कुक्कुटपालन या बाबतीत महाराष्ट्र सहाव्या क्रमांकावर आहे. काही राज्ये या क्षेत्रात दुसऱ्या किंवा तिसऱ्या क्रमांकावर आहेत. मानव विकास निर्देशांकाबाबत महाराष्ट्र पाचव्या क्रमांकावर आहे. त्याऐवजी महाराष्ट्र दुसऱ्या किंवा पहिल्या क्रमांकावर येण्यासाठी अर्थसंकल्पामध्ये निश्चितपणे जो संकल्प सोडला आहे तो निश्चितच स्तुत्य मानावा लागेल. महाराष्ट्राकडे पॉझिटिव्ह दृष्टीकोनातून बघितले पाहिजे. महाराष्ट्र हे पहिले राज्य आहे, ज्या राज्यात स्वतंत्रपणे महिला व बालविकास विभाग असून त्या विभागाला स्वतंत्र निधी दिला गेला आहे. मला आठवते, स्व.डॉ.विमलताई मुंदडा यांनी या विभागाचा कारभार अतिशय उत्तमप्रकारे सांभाळला होता. दुर्दैवाने त्यांच्या निधनासंबंधी जो शोकप्रस्ताव सभागृहात मांडण्यात आला होता, त्या प्रस्तावावर मला बोलण्याची संधी मिळाली नाही. अतिशय हृदयद्रावक अशी आदरांजली त्यांना वाहण्यात आली. महिला व बालविकास विभागाची या राज्यामध्ये स्थापना करुन महिलांना सक्षम करण्याच्या दृष्टीने एक पाऊल पुढे टाकण्यात आले. मी स्व.डॉ.विमलताई मुंदडा यांना विनम्रपणे आदरांजली व्यक्त करतो. एका महिलेचा विकास म्हणजे संपूर्ण कुटुंबाचा विकास असे मानले जाते. पुरोगामी राज्याला पुढे घेऊन जायचे असेल तर महिलांकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. घार हिंडते आकाशी, लक्ष तिचे पिल्लापाशी. या उक्तीप्रमाणेच सर्वसामान्य

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

व तळागाळातील माणसांपर्यंत जननीचे लक्ष असते. त्यामुळे माय भगिनी ही संस्काराची जननी आहे, या संस्काराच्या जननीकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. त्यांच्याकडे अधिक सक्षमपणे लक्ष देण्याची आवश्यकता आहे. त्या दृष्टीने शासनाने प्रयत्न करावा अशी विनंती करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्रामध्ये पर्यटनाला चालना देण्याचा प्रयत्न होत आहे ही अतिशय आनंदाची गोष्ट आहे. वेरुळ, अजंठा येथील लेणी पाहण्यासाठी अनेक भागातून पर्यटक येत असतात. आंतरराष्ट्रीय स्तरावरुन पर्यटक येत असतात. महाराष्ट्रात ज्या ज्या ठिकाणी लेणी आहेत ती लेणी पाहण्यासाठी देखील पर्यटक भेट देतात. या पर्यटन व्यवसायाला चालना देण्यासाठी शासनाने प्रयत्न केले तर मला खात्री आहे, भविष्यकाळात या क्षेत्रातील संधीचे सोने केल्यासारखे होईल.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

इंदिरा आवास योजनेच्या माध्यमातून राज्यात 1 लाख 56 हजार 575 घरे शासनाने बांधली आहेत. पूरक पोषण आहाराचा फायदा 75.77 लाख विद्यार्थ्यांनी घेतल्याचे पंचायती राज समितीच्या माध्यमातून दिसून येते. या समितीच्या माध्यमातून ज्यावेळेस ग्रामीण भागात जातो त्यावेळी समितीला दिसून येते की शासनाची या माध्यमातून गरीब विद्यार्थ्यांचे दैनंदिन चित्र बदलण्याची दुर्दम्य इच्छाशक्ती आहे. त्या इच्छाशक्तीच्या जोरावर राज्यातील गरीब विद्यार्थ्यांमध्ये सुधारणा होतानादिसत आहे. त्याचाच परिपाक म्हणून मध्यान्य भोजन योजना शासनाने सुरु केली असून एकूण 1.22 कोटी विद्यार्थ्यांनी त्याचा फायदा घेतला आहे. तसेच मुलांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण झाली व ते महाविद्यालयीन शिक्षण घेण्याचा प्रयत्न करीत आहेत. वाघिणीचे दूध ज्याला आपण म्हणतो ती इंग्रजी भाषा शिकण्याची तयारी या मुलांची आहे. अशा प्रकारे महात्मा फुले, शाहू छत्रपती राजे यांचा विसर कधीच हे शासन पडू देत नाही त्याबद्दल मी शासनाला मनापासून धन्यवाद देतो. सन 1941 पासून आतापर्यंत लोकसंख्या वाढीचा दर पाहिला तर पूर्वी जो 22.7 टक्के इतका दर होता तो सन 2001-2011 या दहा वर्षाच्या काळात 16 टक्क्यावर आलेला आहे, ही आनंदाची गोष्ट आहे. सन्माननीय सदस्य श्री. पाशा पटेल यांनी चांगल्या प्रकारे समाज प्रबोधन केल्याचाच हा परिणाम दिसतो आणि असेच प्रबोधन त्यांनी यापुढेही करावे, कारण ते एक दूरदर्शी नेते आहेत आणि त्यामुळेच आम्ही त्यांची वाट पाहत आहोत.

शासनाने शेतकऱ्यांच्या कृषी पंपावरील व्याज दरात 2500 कोटीची माफी जाहीर केली त्याबद्दल मी शासनाचे आभार व्यक्त करतो. त्याचे कारण राज्यातील शेतकरी हा अर्थव्यवस्थेचा कणा आहे, तो कणा सुरक्षित असेल तरच राज्याची प्रगती होते असा राज्यकर्त्यांचा विश्वास असल्यामुळेच ही सवलत जाहीर केलेली आहे.

महोदय, शेततळ्यांची योजना अत्यंत महत्वाची असून आपल्या राज्याचे सध्याचे सिंचन 17.5 टक्के आहे व राष्ट्रीय सिंचन 45 टक्क्यापर्यंत आहे. या 17.5 टक्के सिंचनात वाढ करावयाची असेल, ते 25 ते 30 टक्क्यापर्यंत न्यावयाचे असेल तर सध्या आपले नैसर्गिक स्त्रोत जे संपलेले आहेत त्या व्यतिरिक्त फक्त तीनच पर्याय आपल्याकडे शिल्लक आहेत. ते म्हणजे विहिरी, शेततळी आणि विहिरींचे पुनर्भरण करणे असे आहेत. हे तिन्ही पर्याय सक्षमपणे राबविले तर मला

....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा. सुरेश नवले .....

नक्कीच खात्री आहे की आपले सिंचन राष्ट्रीय सिंचनाइतके नक्कीच होईल. त्यात मंत्री महोदयांना मी विनंती करणार आहे की, ही योजना अधिक चांगल्या प्रकारे राबवावयाची असेल तर "ज्याला 7/12 त्याला शेततळी" देण्याचा विचार शासनाने करावा. ज्याच्याकडे 7/12 चा उतारा आहे किंवा ज्याचे नाव 7/12 च्या उताऱ्यावर आहे त्याला तळी दिली तर नक्कीच सिंचनात वाढ होऊ शकते. एकदा राज्यात सिंचन वाढले की, आम वृक्षांमध्ये वाढ होईल, अशा प्रकारे राज्यातील शेतकऱ्यांसाठी शासनाने योजनांची अंमलबजावणी करावी अशी माझी सूचना आहे. तसेच तांत्रिक आणि महत्वाचा मुद्दा म्हणजे 50 टक्के बाष्पीभवन हे तळ्यातून होत असते. कृषी विद्यापीठांमध्ये कोणत्या प्रकारचे संशोधन होते हाच मुळात संशोधनाचा विषय आहे. त्यांनी केलेल्या संशोधनाचे किती निष्कर्ष बाहेर आले आहेत.....

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

त्यामुळे कृषी विद्यापीठाच्या संशोधकांवर जबाबदारी टाकून शेततळयाच्या पाण्याचे जे काही 50 टक्के बाष्पीभवन होते ते थांबविण्यासाठी प्रयत्न केले तर महाराष्ट्रातील शेती निश्चितपणे समृध्दीच्या दिशेने वाटचाल करु शकेल.

सभापती महोदय, कोरडवाहू शेतक-यांसाठी महाराष्ट्र शासनाने जी रक्कम जाहीर केलेली आहे ती रक्कम अतिशय तोकडी आहे असे मला वाटते. महाराष्ट्रात कोरडवाहू शेतीचे प्रमाण फार मोठे आहे. महाराष्ट्रातील कोरडवाहू शेती ओलिताखाली आणण्याच्या दृष्टीने शासनाने अजून प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. प्रॅक्टीकली अनेक ठिकाणी शेतीच्या कामासाठी मजूरच मिळत नाही. मजूर नाही म्हणून शेततळी होत नाहीत, मजूर नाही म्हणून विहिरी होत नाहीत. मला असे वाटते की, ज्या ठिकाणी मजूर मिळत नाहीत अशा ठिकाणी यंत्राच्या सहाय्याने शेततळी व विहीर बांधणे आवश्यक आहे कारण महाराष्ट्राची ती संपत्ती आहे व महाराष्ट्राच्या संपत्तीमध्ये वाढ करण्याच्या दृष्टीने शासनाने निश्चितपणे प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे अशी मी या निमित्ताने विनंती करतो.

सभापती महोदय, महाराष्ट्र शासनाने मासेमारी करण्यासाठी नौकांच्या यांत्रिकीकरणासाठी 49.73 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात केलेली आहे. मासेमारी करणा-या नौका वेगाने पळाव्यात, मोठया प्रमाणात मासे पकडले जावेत, मासे खाणा-याला मासे मुबलक मिळावेत यासाठी शासनाने 49.73 कोटी रुपयांची तरतूद नौकांच्या यांत्रिकीकरणासाठी केलेली असल्यामुळे मी महाराष्ट्र शासनाचा मनापासून आभारी आहे. मांसाहारापेक्षा मासे बरे. मी शाकाहारी आहे, माळकरी आहे, जन्मजात वारकरी आहे. या विषयाच्या संदर्भात मी सन्माननीय सदस्य श्री. सय्यद पाशा यांच्या बरोबर तासनतास चर्चा करीत असतो. त्यामुळे हृदयाची जे काळजी घेतात त्यांच्यासाठी मासे चांगले आहेत.

सभापती महोदय, वर्गातील विद्यार्थ्यांना गुरुजींनी एक निबंध लिहायला सांगितला त्यावेळेस वर्गातील सर्व विद्यार्थ्यांनी निबंधाच्या संदर्भात आपापले मत व्यक्त केले तेव्हा एका विद्यार्थ्याने आपले मत व्यक्त करीत असतांना अशा भावना व्यक्त केल्या की, "या जगामध्ये सर्वात दु:खी हा मासा असून त्याचे अश्रू कोणालाही दिसत नाही." हा निबंध ज्यावेळेस गुरुजींनी वाचला तेव्हा गुरुजी त्या विद्यार्थ्याला म्हणाले की, "तू उद्याचा महाकवी होशील." हा जो विद्यार्थी होता तो खलील जिब्रा त्यानंतर उद्याचा महाकवी म्हणून उदयास आला. ..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले....

सभापती महोदय, आपत्कालीन वैद्यकीय सेवेसाठी दूरध्वनी करा आणि सेवा घ्या या संदर्भात राज्यशासनाने जो संकल्प सोडलेला आहे त्यामुळे यासंदर्भात मला असे वाटते की, नैसर्गिक आपत्ती किंवा अपघात घडला असेल व त्यावेळेस आरोग्य खात्याला कोणी दूरध्वनी केला तर तत्काळ आरोग्य सेवा उपलब्ध करुन देण्याचा संकल्प महाराष्ट्र शासनाने सोडलेला आहे त्याबद्दल मी महाराष्ट्र शासनास मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, शिवाजी विद्यापीठाचा सुवर्ण महोत्सव या वर्षी आहे. यासंदर्भात मला सभागृहाला एक आठवण करुन द्यावयाची आहे की, शिवाजी विद्यापीठाचा दीक्षांत समारंभाचा कार्यक्रम असतांना स्व.यशवंतराव चव्हाण यांच्या हस्ते त्या दीक्षांत समारंभाचे उद्घाटन झाले होते त्यावेळेस स्व. यशवंतराव चव्हाण असे म्हणाले होते की, "आपल्या राज्यातील विद्यार्थ्यांची जी बौध्दिक कुवत आहे तिचा उपयोग आपण म्हणावा तसा करुन घेतला नाही. परंतु बाहेरच्या देशातील लोकांनी तिचा फार मोठया प्रमाणात उपयोग करुन घेतला आहे." यासंदर्भात मला असे वाटते की, स्व. यशवंतराव चव्हाण साहेबांचे जे द्रष्टेपण होते ते आज महाराष्ट्र शासनाला कळालेले आहे व ते नेहमीच कळत राहणार आहे. त्यामुळे या द्रष्टया पुरुषाच्या नावाने यशवंतराव चव्हाण ग्राम सडक योजनेखाली 100 कोटी रुपये महाराष्ट्र शासनाने उपलब्ध करुन दिलेले आहेत त्यामुळे मी महाराष्ट्र शासनाचे मनापासून आभार मानतो, धन्यवाद देतो.

यानंतर श्री. भारवि...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

प्रा.सुरेश नवले.....

कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिवाजी विद्यापीठातर्फे अध्यासन उभे करण्यात येणार आहे. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी रयत शिक्षण संस्था उभी केली. आज या शिक्षण संस्थेचे वटवृक्षामध्ये रूपांतर झाले आहे. कर्मवीरांच्या मनामध्ये भावना होती की, बहुजनांची मुले शिकली पाहिजेत. पुढे गेली पाहिजेत, तरच ते महाराष्ट्र पुढे घेऊन जातील. त्या काळात कर्मवीरभाऊराव पाटील यांच्या रयत शिक्षण संस्थेचे अनुदान बंद करण्यात आले. तेव्हा गाडगे महाराजांनी मध्यस्थी केली आणि सांगितले की, हा बहुजनांचा देव आहे, त्याच्या मंदिरामधील फुले कोमेजून जातील. त्यांचा आपण विचार करावा. तेव्हा त्या काळात सरकारने पुन्हा अनुदान सुरू केले व कर्मवीर भाऊराव पाटलांना एक प्रकारे प्रोत्साहन दिले. हा योद्धा होता. हा कर्माने खऱ्या अर्थाने लढवय्या होता. संघर्षशील होता. अशा या संघर्षशील व्यक्तीचे अध्यासन उभे करण्याचा प्रयत्न राज्य शासनातर्फे केला जात आहे, त्याबद्दल मी राज्य शासनाला मनापासून धन्यवाद देतो.

सभापती महोदय, सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये सीवर्ल्ड, थीम पार्क आणि बोट हाऊस यांना चालना दिली जाणार आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यामध्ये मालवण पासून काही अंतरावर प्रवाळक्षेत्र सापडले होते. हे प्रवाळक्षेत्र आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पर्यटकांना आकृष्ट करू शकेल असे होते. त्यामुळे जगामधील पर्यटक तेथे येतील असे सांगितले होते. त्याचे काय झाले हे एकदा सांगण्याची आवश्यकता आहे. पुन्हा एकदा मी महाराष्ट्र शासनाला धन्यवाद देतो. या निमित्ताने मला एक कविता आठवते.

काल माझ्या सपनात आले राघू मैना
खेळ दोघे खेळू या सपनात राहू या
बायना ग बायना
काल माझ्या सपनात आले राहू मैना

हे प्रतीकात्मक आहे. लोकांना अनुकूल असे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न राज्य शासन करते म्हणून सामान्यांच्या स्वप्नामध्ये राघू मैना यावेत आणि त्यांचे स्वप्न पूर्ण व्हावे ही अपेक्षा करून मी थांबतो.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : मी सन्माननीय सदस्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो की, आपल्याला आज सायंकाळी 7.00 वाजे पर्यंत सभागृहाचे कामकाज संपवायचे आहे. आज सकाळी 11.15 वाजता सभागृहाची नियमित बैठक सुरू झाली आहे. त्या अर्थाने आज सायंकाळी 6.15 वाजे पर्यंत बैठक सपंली पाहिजे हे मान्य आहे. पण माननीय सभापती महोदयांनी सांगितले आहे की, आज आपण 7.00 वाजेपर्यंत सभागृहाचे कामकाज घ्यावे.

श्रीमती शोभा फडणवीस (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पावर माझे विचार मांडण्यासाठी मी उभी आहे.

या अर्थसंकल्पावर माझे विचार मांडत असताना मला खऱ्या अर्थाने पांडुरंगाची आठवण झाली आहे. याचे कारण की पांडुरंगाने दीन दुबळ्यांची, रंजल्या गांजल्यांची भक्त म्हणून सेवा केली आहे. आज या शासनाला गोरगरिबांची आठवण येते काय ? असा मला प्रश्न पडतो.

जे का रंजले गांजेल त्यासी म्हणे ना जो आपुले
तोचि संधी साधु ओळखावा, धोका तेथेचि जाणावा.

अशा प्रकारे या अर्थसंकल्पाची अवस्था आहे.

मागच्या म्हणजे सन 2011-2012 च्या अर्थसंकल्पामध्ये ज्या योजना मांडल्या होत्या त्या या अर्थसंकल्पामध्ये आहेत काय ? महिलांना अत्याचारापासून संरक्षण देण्याकरिता जिल्हा स्तरावर समुपदेशन मदत केंद्र स्थापन करण्याची घोषण केली. यासाठी 8 कोटी 74 लाखाची तरतूद करण्यात आली. परंतु, त्यावर केवळ 6.4 टक्केच रक्कम खर्च झाली. पूर्वी 39 समुपदेशन केंद्र स्थापन केली होती. पण यंदाच्या अर्थसंकल्पामध्ये त्याचा उल्लेख देखील झालेला नाही. या केंद्रामध्ये वाढही झालेली नाही.

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

मग मागची योजना विसरुन पुन्हा नवीन तिसरीच योजना हाती घेत असतो. खरे म्हणजे समुपदेशन केंद्राची महाराष्ट्राला अतिशय आवश्यकता आहे. आज देशाचा विचार केला तर महिलांवरील अत्याचारामध्ये महाराष्ट्र चौथ्या क्रमांकावर आहे.दिवसेंदिवस महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढत आहे.परवा गृह विभागाने जो अहवाल प्रसिध्द केला त्यामध्ये महिलांवरील अत्याचारामध्ये 6.4 टक्क्यांनी वाढ झाल्याचे कबूल करण्यात आलेले आहे. अशा वेळेला महिलांच्या सुरक्षिततेसाठी अर्थसंकल्पामध्ये कोणतीही तरतूद नाही. त्यासाठी वेगळी केंद्रे निर्माण केलेली नाहीत. म्हणून या अर्थसंकल्पामध्ये महिलांवरील अत्याचाराच्या बाबतीत कोणत्याही प्रकरची तरतूद केलेली नसल्यामुळे शासनाने 50 टक्के महिलांचाही विचार केलेला नाही असे मला येथे खेदाने म्हणावे लागते.

सभापती महोदय, मागच्या वर्षी शहरी भागामध्ये अंगणवाड्यांसाठी भाड्याने जागा घेण्याबाबत घोषणा केली. परंतु या वर्षी अर्थसंकल्पामध्ये या योजनेबाबत काहीही उल्लेख नाही. मागच्या वर्षी प्रस्ताव मंजूर करुन 10 कोटी रुपयांची तरतूद केली. परंतु प्रत्यक्षात यासाठी एकही रुपया खर्च केला नाही. शहरांमध्ये अंगणवाडीसाठी एकही जागा शासनाने घेतलेली नाही आणि यावर्षी तर याबाबतीत काही उल्लेखही करण्यात आलेला नाही. खरे म्हणजे अंगणवाड्यांसाठी जागा घेणे हे अतिशय जरुरीचे आहे आणि हा विषय बालविकास विभागाशी संबंधित असलेला आहे आणि तोच नेमका याठिक्राणी विसरला जातो. मग महाराष्ट्र राज्यात महिलांचा विचार केला जातो, त्यांच्यासाठी चांगल्या योजना, सबलीकरणाच्या योजना आखल्या जातात असे मला या अर्थसंकल्पामध्ये दिसत नाही. त्यामुळे खऱ्या अर्थाने या अर्थसंकल्पाला अर्थच नाही असे म्हटले तर ते वावगे होणार नाही.

सभापती महोदय, मागच्या वर्षी पोलिसांसाठी सहा हजार घरे बांधण्याची घोषणा केली. पण प्रत्यक्षात बहुतांशी घरे तयारच झालेली नाहीत.परंतु आपण घरे बांधून देण्याची योजना येथे मोठ्या हिंमत बहाद्दरपणे मांडतो.पण ते प्रत्यक्षात येत नाही.आज पोलिसांसाठी घरे बांधण्याची अत्यंत आवश्यकता आहे.जे दुसऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी 24 तास बाहेर असतात,त्यांच्या कुटुंबीयांच्या सुरक्षिततेचा विचार कोणी करावयाचा? घर जळत आहे,कवेलू पडत आहे,दरवाजाला कड्या नाहीत अशा पध्दतीची कच्ची घरे किंवा टीनच्या पत्र्याची शेड असलेली घरे पोलिसांना देणार असाल तर पोलीस आपल्या कुटुंबाला काय सुरक्षितता देणार आहेत हा प्रश्न आहे आणि मग अशा मानसिकते मध्ये ते राज्याला देखील काय सुरक्षितता देणार आहेत याचाही विचार करणे आवश्यक आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस . . . .

सभापती महोदय, याठिकाणी सिंचन, सामाजिक न्याय, राजकोषिय सल्लागार मंडळ स्थापन करणे इत्यादी बाबत 2011-2012 मध्ये प्रचंड आश्वासने देण्यात आली. पण प्रत्यक्षात मात्र यापैकी कोणतीही पूर्तता झालेली नाही आणि यावर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये त्याचा कुठे उल्लेख देखील करण्यात आलेला नाही. केंद्र शासनाने सेवा करामध्ये वाढ केली, स्टॅम्प ड्युटी वाढविली, सेल्स टॅक्स वाढविला आणि आजच्या महागाईमध्ये आपल्या घराचे बजेट कसे आखावे या विवंचनेतून जनता सावरलेली नसतानाच महाराष्ट्र सरकारने रंजल्या-गांजलेल्या लोकांसाठी जो अर्थसंकल्प सादर केलेला आहे त्यामध्ये गॅसवर पाच टक्के वाढ केली आहे. महाराष्ट्र शासनाने महिलांना दिलासा देण्यासाठी ही पाच टक्के वाढ केली आहे की काय की महिलांवर अन्याय करण्यासाठी केली आहे? हा महत्वाचा प्रश्न आहे. म्हणून अर्थसंकल्पावर भाषण करीत असताना एक विनंती करणार आहे की, राज्यातील महिलांना काहीच दिलेले नाही तर निदान पाच टक्के वाढीचा बोजा तरी कमीतकमी देऊ नका, हा बोजा कमी करावा. कारण मुंबई मध्ये 20 रुपयाने वाढ होणार आहे. पण ग्रामीण भागामध्ये 40 रुपयापर्यंत वाढ होणार आहे. त्यामुळे आज 450 रुपयांना मिळणाऱ्या गॅससाठी 500 रुपये भरावे लागणार आहेत. शासनाने आदिवासींना, गरीबांना गॅस सिलेंडर दिले. पण ज्यांची कुवत 50 रुपये खर्च करण्याची नाही त्यांना 500 रुपयाचा सिलेंडर घेणे परवडणार आहे काय याचाही येथे विचार करण्याची गरज आहे. म्हणून आपण गॅस सिलेंडरमध्ये भाडेवाढ करण्याचे जे ठरविलेले आहे ते रद्द करावे अशी माझी विनंती आहे.

"गरिबांवर अन्याय करणे हे राज्याचे धोरण आहे
आणि वाढत्या डोंगराच्या करा खालीच गरिबांचे मरण आहे"

असे येथे खेदाने म्हणावे लागते. आपण नागपूर येथे गोरेवाडा व गोरेगाव प्राणी संग्रहालयासाठी 15 कोटी रुपये दिले. प्रत्येक अर्थसंकल्पामध्ये गोरेवाड्याच्या बाबतीत आम्ही विषय मांडतो. परंतु 5 वर्षापासून गोरेवाड्याच्या प्राणी संग्रहालयाचे कोणतेही प्रारुप तयार झालेले नाही.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अशुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

परवा मी एका ऑफीसमध्ये बसले असताना मला ऐकायला मिळाले की, हा प्लान कोणी तयार करायचा ? हा विषय सार्वजनिक बांधकाम विभागाकडे गेला असताना त्यांनी सांगितले हा आमचा विषयच नाही. म्हणजे प्लान कोणी तयार करावा येथून सुरुवात असेल तर त्या 15 लाख रुपयांचा उपयोग गोरेवाड्याला होणार नाही तर तो गोरेगावला होईल आणि पुन्हा एकदा विदर्भावर अन्याय करायचा. आम्हाला एका हाताने दिले असे सांगायचे आणि दुसऱ्या हाताने काढून घ्यायचे असा प्रकार वर्षानुवर्षे सुरु आहे आणि या सरकारची तशी परंपरा आहे, जी या ठिकाणी दिसत आहे. वित्त राज्यमंत्री हे विदर्भातील आणि विशेषत: नागपूर जिल्ह्यातील आहेत. तेव्हा गोरेवाड्याचा प्लान लवकरात लवकर तयार करुन त्यास मूर्त स्वरुप द्यावे अशी विनंती आहे.

सभापती महोदय, सातारा, नंदूरबार, अलिबाग आणि मुंबई येथे शासन मेडिकल कॉलेजेस उभारणार आहे. आपण स्व.यशवंतराव चव्हाण यांचे जन्मशताब्दी वर्ष साजरे करीत आहोत. संयुक्त महाराष्ट्र झाला तेव्हा विदर्भाला स्व.यशवंतराव चव्हाण यांनी आश्वासन दिले होते की, ज्यावेळी विदर्भाचा विकास होणार नाही, त्यावेळी विदर्भ वेगळा करण्याची मागणी करणारी पाहिली व्यक्ती मी असेन. आज ते हयात नाहीत. आमच्यावर नेहमीच अन्याय होत आहे. आमचा कोणीच विचार करीत नाहीत. आमच्यावर किती अन्याय झाला हे कोणी पाहत नाही. तत्कालीन माननीय मुख्यमंत्री श्री.विलासराव देशमुख यांनी चंद्रपूमध्ये मेडिकल कॉलेज करण्यात येईल अशी घोषणा चंद्रपूरमध्ये केली होती. चंद्रपूर आणि गडचिरोली हे दोन्ही मागासलेले जिल्हे आहेत. येथील आदिवासी मुलांची पुढील शिक्षण अन्यत्र जाऊन घेण्यासारखी परिस्थिती नाही. आपणास आदिवासीमधील एखाद दुसरी डॉक्टर झालेली व्यक्ती सापडते. तेव्हा चंद्रपूर येथे मेडिकल कॉलेज व्हावे अशी आमची मागणी होती. परंतु नेहमीच पश्चिम महाराष्ट्राने आमच्यावर अन्याय केलेला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील मेडिकल कॉलेज सातारा येथे नेले. सातारा व सांगली जिल्ह्यातील लोक शिक्षण क्षेत्रात पुढे गेलेले आहेत. त्यांची आर्थिक स्थिती चांगली आहे. परंतु गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यात भरपूर गरिबी आहे. परंतु या ठिकाणी कोणालाही मन मोठे करण्याची इच्छा झालेली नाही. तेव्हा चंद्रपूर जिल्ह्यासाठी एक मेडिकल कॉलेज मंजूर करावे अशी विनंती आहे.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

किमान माननीय उप मुख्यमंत्री महोदयांकडून तरी विदर्भावर अन्याय होणार नाही अशी आमची अपेक्षा आहे.

सभापती महोदय, या संपूर्ण अर्थसंकल्पात कुपोषाच्या प्रश्ना बाबत विचार झालेला नाही. माननीय पंतप्रधान डॉ.मनमोहन सिंग यांनी सांगितले की, देशात 42 टक्के कुपोषण आहे. महाराष्ट्रात 27 टक्के कुपोषण आहे. असे असताना कुपोषणा बाबत अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद करण्यात आलेली नाही. कुठेही त्याचा विचार झालेला नाही. कुपोषण आहे म्हटल्यावर महिला बाल कल्याण विभागाने एका परिपत्रकाद्वारे अंगणवाडीसेविका आणि मदतनीस यांना कळविले की, "कुपोषणाचा दर वाढला की तुम्हाला नोकरीवरुन काढून टाकण्यात येईल." हा कोणता न्याय झाला ? मुलांचे कुपोषण अंगणवाडी मदतनीस कमी करणार काय ? आपण जो खाऊ देणार तो त्या मुलांना देणे हे तिचे काम आहे. तिच्यावर जबाबदारी टाकून राज्याने स्वत:ला मोकळीक देणे बरोबर नाही. ही जबाबदारी महाराष्ट्र राज्याची आहे आणि ही सामुहिक जबाबदारी आहे. अंगणवाडी सेविकांना वेठीस धरुन, त्यांना नोकरीवरुन कमी करण्याची धमकी देणे, हे बरोबर नाही. शासनाने अशा प्रकारची हुकूमशाही जपणे योग्य नाही असे मला वाटते. तेव्हा कुपोषणाचा विषय अर्थसंकल्पामध्ये असायला हवा होता असे मला वाटते.

सभापती महोदय, सिंचनाच्या बाबतीत बोलावयाचे झाले तर अजूनही गोसीखुर्द प्रकल्प पूर्ण झालेला नाही. शेतकऱ्यांना अजून सिंचनाचा लाभ मिळालेला नाही. वैनगंगेमध्ये अतिरिक्त पाणी शिल्लक आहे म्हणून नद्याजोड प्रकल्पाच्या माध्यमातून वैनगंगा नळगंगा प्रकल्पाला मान्यता मिळणार आहे. तसेच गोसीखुर्द प्रकल्पातील 22 हजार हेक्टर शेतीचे पाणी मौदा एनटीसीपीला देण्याबाबत मंजुरी मिळालेली आहे. ऊर्जानगर थर्मल पॉवर प्रकल्पाला पाणी देण्यासाठी मंजुरी दिलेली आहे. अजूनपर्यंत गोसीखुर्द प्रकल्पाचे पाणी शेतकऱ्यांना मिळालेले नाही, तो प्रकल्प अजून पूर्ण झालेला नाही. केवळ एका आमदाराच्या हट्टापायी वारंवार चौकशी करुन तो पैसा आमच्या पर्यंत न येता दुसरीकडे वळविण्याचा प्रयत्न होत आहे. आपणास जेवढी चौकशी करायची आहे तेवढी चौकशी करावी, पण आपण प्रकल्प का अडविता हे समजत नाही. एका प्रकल्पाचे पैसे दुसऱ्या प्रकल्पाला का देत आहात ? आपण विदर्भावर कशासाठी अन्याय करीत आहात ?

यानंतर कु.थोरात...

अशोधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस...

जो पैसा या वर्षी मंजूर केलेला आहे तो पैसा गोसीखुर्द प्रकल्पासाठी खर्च व्हावा अशी मी या ठिकाणी मागणी करते.

सभापती महोदय, ह्युमण प्रकल्पाच्या बाबतीत काय झाले? 198 कोटी रुपये एनपीए भरला पुन्हा 84 कोटी रुपये वन विभागाने मागितले. वन विभागाची भूक कशाने शमणार आहे, हेच मला समजत नाही. 198 कोटी रुपये भरा, 171 कोटी रुपये भरा असे वन विभागाने संगितले त्याप्रमाणे शासनाने ते पैसे भरले. त्यानंतर त्यांनी 64 कोटी रुपयाची नोटिस दिली. पुन्हा 84 कोटी रुपयांची नोटिस दिली, अशा पध्दतीने जाणूनबुजून या ह्युमण प्रकल्पावर अन्याय करण्यात येत असेल तर शासन या बाबतीत काही विचार करणार आहे का? वन विभागाचे अधिकारी विदर्भावर जाणूनबुजून अन्याय करणार असतील तर त्याचा विचार होण्याची गरज आहे. वन विभागामुळे अडलेले प्रकल्प आम्ही पूर्ण करु शकत नाही. सिंचन वाढले पाहिजे असे वाटत असताना सुध्दा आम्ही ते वाढवू शकत नाही.

सभापती महोदय, मला एका गोष्टीचे नवल वाटते की, आम्हाला प्रकल्प करण्यास वन विभागाची परवानगी मिळत नाही मग आंध्र प्रदेशला टनेल खोदण्याकरिता केंद्र शासनाची परवानगी कशी मिळाली? त्यांनी त्या ठिकाणी टनेल खोदला कसा आणि तेथून ते पाणी नेणार कसे? आंध्र प्रदेशला जर टनेल खोदण्यासाठी परवानगी मिळू शकते तर ती विदर्भाला का मिळू शकत नाही. याचाच अर्थ असा की, महाराष्ट्र राज्याची मानसिकता विदर्भाचा विकास करण्याची नाही. विदर्भाचे पाणी आंध्र प्रदेशला द्यावयाचे आणि आंध्र प्रदेशमधून कृष्णा खोऱ्याचे पाणी स्वत: घ्यावयाचे आणि पश्चिम महाराष्ट्राचा झालेला विकास आणखी वाढवावयाचा आणि विदर्भाला कोरडवाहू परिस्थितीत नेऊन शेतकऱ्यांना आत्महत्या करावयाला भाग पाडावयाचे असे असेल तर वेगळा विदर्भ झालाच पाहिजे अशी मला या ठिकाणी मागणी कराविशी वाटते. यशवंतराव चव्हाण यांची जन्म शताब्दी आहे. ज्यांनी आम्हाला धोक्यात आणून संयुक्त महाराष्ट्रात नेले त्यांच्या जन्म शताब्दीच्या वर्षात आम्हाला वेगळा विदर्भ दिला तर आम्ही स्वत:ला धन्य मानू.

सभापती महोदय, विशेषकरुन काही योजनांच्या संदर्भात मी या ठिकाणी बोलणार आहे. वैयक्तिक लाभाच्या योजनांतर्गत खुल्या विहिरींचा कार्यक्रम राबविण्याचे ठरविले आहे. त्या करिता 18 हजार खुल्या विहिरी देण्यात येणार आहेत पण त्यासाठी अनुदानित नियतव्यय किती ठेवण्यात

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

येणार आहे, एका विहिरीची किंमत काय राहणार आहे आणि किती कोटी रुपये त्यासाठी ठेवण्यात येणार आहेत याचा यामध्ये उल्लेख करण्यात आलेला नाही. 158 कोटी रुपये राखीव निधी ठेवून अर्थसंकल्प करण्यात येत असला तरी बऱ्याच ठिकाणच्या निधीचा उल्लेख केलेला नाही. मागच्या वेळी अशाच प्रकारे प्रत्येक तालुक्याला पाच पिण्याच्या पाण्याच्या विहिरी देण्यात येतील असे सांगितले होते. अर्थसंकल्पात त्यासाठी तरतूद करण्यात आली नव्हती. फक्त त्या बाबत घोषणा करण्यात आली होती. आज पाच वर्षे झाली. त्या विहिरी मागून आम्ही थकलो पण आम्हाला त्या पिण्याच्या पाण्याच्या विहिरी मिळाल्या नाहीत. तशीच अवस्था या अठरा हजार खुल्या विहिरींची होणार आहे का, यासाठी किती निधी देण्यात येणार आहे, नियतव्यय किती राहणार आहे, एका विहिरीची किंमत किती राहणार आहे यासंबंधीची माहिती देण्यात यावी अशी मी मंत्री महोदयांना विनंती करते.

सभापती महोदय, पीक विमा योजना, अपघात विमा योजना घेण्यात आल्या. शेतकऱ्यांच्या अपघात विमा योजनेचे काय झाले? अपघात झाल्यानंतर 30 दिवसाच्या आत प्रपोजल सादर करावे लागते. पोस्टमॉर्टेम रिपोर्ट मिळत नाही. चौकशीचा रिपोर्ट मिळत नाही. त्यामुळे एका महिन्यात शेतकऱ्यांच्या अपघाताचे प्रकरण आम्ही शासनाकडे देऊ शकत नाही. ते तहसीलदारकडून विमा एजंटकडे जाईपर्यंत वेळ लागतो. अपघाताचे प्रकरण 30 दिवसात आले नाही म्हणून शेतकऱ्यांना अपघात विम्याचे पैसे मिळत नाहीत. शेतकऱ्यांच्या अपघात विम्याच्या बाबतीत काही वेळा कृषी मंत्री महोदय, श्री. बाळासाहेब थोरात हे मदत करावयाचे. पण 48 अपघात विम्याच्या प्रकरणांपैकी केवळ 18 प्रकरणातील व्यक्तिंना विम्याचे पैसे मिळण्यामध्ये यश मिळाले आणि बाकीच्या प्रकरणात यश मिळाले नाही. त्यामुळे अपघात विमा योजना ही एलआयसीचे पोट भरण्याकरिता आणि त्यांचे उत्पन्न वाढविण्याकरिता राबविण्यात येत आहे का? या संदर्भातील 30 दिवसांचा निकष बदलण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थी अपघात विमा योजना आहे पण या विमा योजनेचा फायदा विद्यार्थ्यांना मिळत नाही. कारण त्यांची प्रकरणे जाण्यास विलंब होतो. झालेला विलंब विमा एजंट मान्य करण्यास तयार नसतात म्हणून या संबंधीच्या निकषात बदल करण्याची आवश्यकता आहे.

सभापती महोदय,रोजगार हमीच्या माध्यमातून शेततळी देण्यात आली आहेत पण रोजगार हमी योजनेतून शेततळी बांधण्याची अधिकाऱ्यांची मानसिकता नाही त्यामुळे राष्ट्रीय ग्रामीण विकास

..3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस....

योजनेंतर्गत मोठया प्रमाणात शेततळी बांधली जात आहेत. म्हणून माझी विनंती आहे की, राष्ट्रीय कृषी योजनेंतर्गत शेततळयांचा आकडा वाढवून दिल्यास शेतकऱ्यांना शेततळी बांधण्याकरिता सहजपणे निधी उपलब्ध होईल. त्यांचे निकष रोजगार हमीपेक्षा वेगळे असल्यामुळे शेतकऱ्यांना त्याचा फायदा होईल.

यानंतर श्री. बरवड...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ...

सभापती महोदय, या ठिकाणी आपण रुग्णालये आणि कर्मचाऱ्यांच्या इमारतींची बांधकामे मंजूर करतो, बांधकामे पूर्ण करतो, उपकरणे देतो, यंत्रसामुग्री देतो परंतु त्या ठिकाणी डॉक्टर्स नाहीत, नर्सेस नाहीत, तज्ज्ञ नाहीत, प्रयोगशाळा तंत्रज्ञ नाहीत. अशी स्थिती असल्यामुळे त्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर उपलब्ध असलेली यंत्रसामुग्री धूळ खात पडलेली आहे. एकीकडे पैसे खर्च करावयाचे, लोकांना न्याय देतो असे सांगावयाचे आणि दुसरीकडे प्रत्यक्षात लोकांना त्याचा उपयोग होत नसेल तर त्या योजनेच्या बाबतीत आपण फेरविचार करावा. आम्ही प्रत्येक अधिवेशनामध्ये सांगतो की, त्या ठिकाणी आपण पहिल्यांदा सर्व अधिकारी आणि कर्मचारी नेमावेत. परंतु आपण ते नेमलेले नाहीत. अजूनही त्या ठिकाणी ही व्यवस्था नाही. ही व्यवस्था आधी करावी अशी मी विनंती करते. आपण या ठिकाणी सुधारणा करीत आहात याबद्दल दुमत नाही. परंतु ज्यांच्या हाताने आम्ही ही सर्व यंत्रसामुग्री वापरणार, ज्यांच्या हाताने आम्ही जनतेला या सोयी उपलब्ध करुन देणार आहात ती व्यवस्था पहिल्यांदा करण्याच्या बाबतीत शासनाने विचार करावा अशी माझी विनंती आहे.

सभापती महोदय, सर्व शिक्षा अभियानामध्ये शाळेबाहेर असणारी मुले, शाळा सोडून गेलेली मुले यांना शिक्षणाच्या दृष्टीने शाळेत प्रवेश देणे, त्यांना शाळेत आणणे, त्यांचा आकडा निश्चित किती आहे हे ठरविणे हे सर्व काम खरोखरच केले जाते का ? ते काम सर्व शिक्षा अभियानामध्ये केले जात नाही. मी ज्यावेळी जिल्हा परिषदेमध्ये जाते त्यावेळी असे दिसून येते की, सर्व शिक्षा अभियानातून इमारती बांधतात, शाळा बांधतात तसेच अन्य बाबींवर खर्च करण्यात येतो. जी मुले शाळेच्या बाहेर आहेत त्या मुलांवर खर्च होत नाही. त्या मुलांचा आकडा सुध्दा नाही. शाळाबाह्य मुले किती आहेत असे जेव्हा मी जिल्हा परिषदेमध्ये विचारते तेव्हा त्यांनी मला शाळा सोडून गेलेल्या मुलांची यादी दिली. परंतु शाळाबाह्य मुलांची यादी त्यांच्याकडे नव्हती. त्यांचा सर्व्हे सुध्दा झालेला नव्हता. त्यामुळे शाळा बाहेरील मुलांचा खऱ्या अर्थाने सर्व्हे करुन, अशी किती मुले आहेत त्याचा विचार करुन त्यांना परत मूळ प्रवाहात आणण्याची आवश्यकता आहे. त्याचबरोबर सर्व शिक्षा

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

अभियानामध्ये बाल कामगारांचा प्रश्न आहे. ज्या ठिकाणी बाल कामगार असतील त्यांच्या शिक्षणाची, जेवणाची, राहण्याकरिता वसतिगृहाची सोय असावी हे सर्व शिक्षा अभियानामध्ये करावयाचे आहे. परंतु सर्व शिक्षा अभियानांमधून ही सोय अद्यापपर्यंत बाल कामगारांसाठी केलेली नाही. ती सोय करण्यात यावी अशी माझी मागणी आहे.

सभापती महोदय, नक्षलग्रस्त भागामध्ये युवकांच्या विकासासाठी आपण कौशल्य विकास कार्यक्रम राबवित आहोत, ही चांगली गोष्ट आहे. प्रश्न असा आहे की, कौशल्य विकास असेल, शिक्षण असेल त्यामध्ये शिक्षण झालेल्या किती मुलांना, ग्रॅज्युएट झालेल्या किती मुलांना नोकऱ्या देतो हे शासनाने सांगावे. त्या ठिकाणी पोलीस भरतीसाठी गेलेल्या मुलांचे नक्षलवादी खून पाडतात. व्यवसायासाठी कोणी मुले जात असतील तर त्यांना अडवून त्यांचे भरचौकात खून करतात. त्या मुलांना संरक्षण नाही. त्या मुलांना रस्ते नाहीत. त्या मुलांना कोणतीही सोय नाही. आश्रमशाळेमध्ये सुध्दा शिक्षक नाहीत. त्या ठिकाणी जेवणाची बरोबर व्यवस्था नाही. त्या ठिकाणी विजेची सोय नाही. आपण आदिवासी मुलांना चांगल्या पध्दतीचे शिक्षण देण्याची सोय आधी करावी. खरोखरच औद्योगिक प्रशिक्षण केंद्र आणि युवक कौशल्य विकास योजना राबविणार असाल तर त्या मुलांच्या नोकरीसाठी आणि रोजगारासाठी स्वतंत्र व्यवस्था करावी, जेणेकरुन त्या मुलांना आपल्याला न्याय मिळेल असे वाटले पाहिजे. तशा प्रकारचा विचार करावा अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, त्या ठिकाणी ज्या रिक्त जागा आहेत त्याबाबत सांगू इच्छिते की, अजूनपर्यंत गडचिरोलीतील रिक्त जागा भरलेल्या नाहीत. अजूनही त्या ठिकाणी शिक्षकांच्या जागा भरलेल्या नाहीत, तहसीलदारांच्या जागा भरलेल्या नाहीत. चंद्रपूरमध्ये नायब तहसीलदारांच्या 59 जागांपैकी 19 जागा रिक्त आहेत. तहसीलदारांच्या 14-15 जागांपैकी 9 जागा रिक्त आहेत. मग कशाच्या जोरावर आपण रोजगार हमी योजनेच्या कामांचा विचार करता ? कशाच्या जोरावर राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेचा विचार करता ? कशाच्या जोरावर आपण महाराष्ट्राच्या विकासाचा विचार करता ? त्या ठिकाणी काम करण्यासाठी लोकच नाहीत. वरच्या पातळीवर मात्र

...3...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती शोभा फडणवीस ....

आपण सचिवांची तीन-तीन पदे वाढविता, उप सचिवांची पाच-पाच पदे वाढविता. मात्र खालच्या पातळीवर तहसीलदार आणि नायब तहसीलदारांच्या जागा रिक्त ठेवता. कशाच्या जोरावर महाराष्ट्र पुढे जाणार आहे, याचाही विचार करण्याची आवश्यकता आहे. त्या जागा आधी भरण्याची घोषणा करावी अशी मी विनंती करते.

सभापती महोदय, प्रत्येक अर्थसंकल्प आला की, याचा पुतळा उभारण्यात येईल, त्याचा पुतळा उभारण्यात येईल अशी घोषणा करण्यात येते. दोन वर्षापूर्वी कन्नमवार यांचा पुतळा उभारण्याचे आपण मान्य केले. दोन वर्षे झाली तरी अजून जागा फायनल झालेली नाही. कन्नमवारजी यांचा पुतळाही झाला नाही. तो पुतळा शासनाच्या यादीतून निघून गेलेला आहे. पुढच्या अर्थसंकल्पात हे दोन पुतळे सुध्दा बाहेर जातील. फक्त स्व. यशवंतराव चव्हाण यांची जन्म शताब्दी तेवढी शिल्लक राहील. अशा प्रकारे आपण थोर लोकांची थट्टा करु नका. पुतळे उभारावयाचे असतील तर खऱ्या अर्थाने पुतळे उभारावेत. खरोखर तशी मानसिकता असेल तर पुतळे उभारावेत. पण या ठिकाणी पुतळ्यांच्या नावाखाली थोरामोठ्यांचा अपमान करुन अशा पध्दतीने लोकांच्या भावनांशी खेळू नका असे मला या ठिकाणी खेदाने म्हणावे लागते. त्यामुळे शासनाने या ठिकाणी ताबडतोब पुतळे उभे करावेत अशी विनंती करते.

यानंतर श्री. खंदारे ...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.रमेश शेंडगे : सभापती महोदय, सन्माननीय सदस्या श्रीमती शोभाताई फडणवीस यांनी यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दी साजरी करीत असताना शासनाने पुतळ्यांची थट्टा चालविली आहे असे उद्गार काढले आहेत. हे उद्गार कामकाजातून काढून टाकावेत अशी मी विनंती करतो.

तालिका सभापती (श्री.विनायक मेटे) : सन्माननीय सदस्या श्रीमती शोभा फडणवीस यांचा संदर्भ वेगळा होता.

श्रीमती शोभा फडणवीस : सभापती महोदय, शासनाने क्रीडा धोरण जाहीर केलेले नाही. ते केव्हा जाहीर केले जाणार ते सांगावे. दुसरे असे की, खेळाडूंची गैरसोय दूर करण्याकरिता क्रीडा संकूल बांधले जाणार आहेत. पण खेळांच्या सूचीमध्ये स्केटिंग या खेळाचा समावेश करण्यात आलेला नाही. या खेळातील खेळाडू राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत भाग घेऊन गोल्ड मेडल आणतात. पण या खेळाचा खेळाच्या सूचीमध्ये अंतर्भाव केलेला नाही. तो लवकरात लवकर करण्यात यावा व त्या खेळाडूंना प्रोत्साहनपर बक्षिसे देण्यासाठी शासनाने व्यवस्था करावी अशी विनंती करते. माननीय अर्थ मंत्र्यांनी मांडलेला हा अर्थसंकल्प गरिबांच्या हिताचा नाही, विद्यार्थ्यांच्या हिताचा नाही, शेतकऱ्यांच्या हिताचा नाही, हा अर्थसंकल्प श्रीमंतांच्या हिताचा आहे एवढेच बोलून मी या ठिकाणी थांबते.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

NTK/ KGS/ KTG/

पृ.शी.: धानोरा, जिल्हा गडचिरोली येथे नक्षलवाद्यांनी भूसुरुंग पेरुन घडविलेला स्फोट

मु.शी.: धानोरा, जिल्हा गडचिरोली येथे नक्षलवाद्यांनी भूसुरुंग पेरुन घडविलेला स्फोट यासंबंधी माननीय गृह राज्यमंत्र्यांचे निवेदन

श्री.सतेज ऊर्फ बंटी डी.पाटील (गृह राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम 46 अन्वये पुढील निवेदन करतो.

"आज मंगळवार, दिनांक 27 मार्च, 2012 रोजी दुपारी 12.10 च्या दरम्यान सीआरपीएफच्या फुलगाव कॅप, ता.धानोरा, जिल्हा गडचिरोली येथून सीआरपीएफच्या जवानांची बस जात असताना कारवाफा गट्टा रस्त्यावरील पुसेटोला येथे नक्षलवाद्यांनी पेरलेल्या भूसुरुंगाचा स्फोट घडवून आणला. सदर स्फोटात सीआरपीएफचे 12 जवान शहीद झाले व एकूण 28 जवान गंभीर जखमी झाले असल्यामुळे त्यांना शासकीय हेलिकॉप्टरने नागपूर येथे आणून वोक्हार्ट रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु आहेत. उर्वरित 20 जखमी जवानांना उपचारार्थ गडचिरोली येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. त्यांच्यावरही उपचार सुरु आहेत. सदर घटनास्थळी सीआरपीएफचे महासंचालक श्री.विजयकुमार, अपर पोलीस महासंचालक, (नक्षल विरोधी अभियान) त्याचबरोबर श्री.व्ही.डी.मिश्रा, (पोलीस उपमहानिरीक्षक) (गडचिरोली परिक्षेत्र) श्री.सुनील रामानंद यांनी तातडीने भेट दिली आहे."

3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

सभागृहाच्या कामकाजासंबंधी

तालिका सभापती : आज मंगळवार, दिनांक 27 मार्च, 2012 रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या बाब क्रमांक 8 नंतर बाब क्रमांक 8 (अ) जोड पत्र वितरित केल्या प्रमाणे वाचावे.

4....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

पृ.शी.: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

मु.शी.: अर्थसंकल्पावर सर्वसाधारण चर्चा

(चर्चा पुढे सुरु....)

श्रीमती दीप्ती चवधरी (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, सन 2012-13 या वर्षाच्या अर्थसंकल्पाला पाठिंबा देण्यासाठी मी या ठिकाणी उभी आहे.

माननीय अर्थमंत्र्यांनी सन 2012-13 या वर्षाचे महसुली उत्पन्न 1 लाख 36 हजार 711 कोटी 70 लाख असून महसुली खर्च 1 लाख 36 हजार 559 कोटी 21 लाख अपेक्षित आहे. महसुली शिल्लक अपेक्षित असलेला हा अर्थसंकल्प माननीय उप मुख्यमंत्री व माननीय अर्थ राज्यमंत्री यांनी दिनांक 26 मार्च, 2012 रोजी अनुक्रमे विधानसभेच्या सभागृहात व विधानपरिषदेच्या सभागृहात मांडलेला आहे. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करते.

स्व.यशवंतराव चव्हाण जन्मशताब्दीसाठी 100 कोटी रुपयांची भरीव तरतूद केलेली आहे. त्यामुळे महाराष्ट्र राज्याचे पहिले मुख्यमंत्री स्व.यशवंतराव चव्हाण यांना माननीय अर्थ मंत्र्यांनी उत्तम आदरांजली अर्पण केली आहे असे मला वाटते.

यानंतर श्री.शिगम....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी....

यंदाच्या अर्थसंकल्पात शेतक-यांसाठी प्रोत्साहानात्मक योजना, कृषी पंपांचे विद्युतीकरण, शेती विषयक सुधारणा, राष्ट्रीय कृषी विकास योजना, कृषी विषयक इतर योजना, कोरडवाहू शेती विकासासाठी विशेष निधी अशा अनेक योजना जाहीर केलेल्या आहेत. यशवंतराव चव्हाण जन्म शताब्दी वर्ष साजरे करण्याठी 100 कोटीची तरतूद अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेली आहे. मराठी भाषा विकासासाठी मुंबइमध्ये भाषाभवन बांधण्याचे ठरविलेले आहे. तसेच मराठी भाषा जतन व संवर्धनाच्या दृष्टीने दुर्मिळ ग्रंथांचे युनिकोडमध्ये रुपांतरित ई-बुक तयार करणे, विश्वकोश निर्मिती मंडळाकडून प्रकाशित करण्यात आलेले खंड इंटरनेटवर उपलब्ध करुन देणे इत्यादी महत्वाच्या कामांसाठी अर्थसंकल्पात तरतूद करण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र-कर्नाटक सीमा भागात मराठी भाषा व संस्कृती जोपासण्यासाठी 5 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. एलपीजी वरील करामध्ये 5 टक्के वाढ करण्याची घोषणा करण्यात आलेली आहे. त्यामुळे घरगुती गॅसच्या दरामध्ये 1 एप्रिल पासून वाढ होणार आहे. आधीच महागाईची झळ सोसाणा-यांना या करामुळे गॅससाठी 25 ते 27 रुपये अधिक मोजावे लागणार आहेत.. नैसर्गिक वायूवर 12.5 टक्के कर लादल्यामुळे सीएनजी महागण्याची शक्यता असून त्यामुळे टॅक्सी, रिक्षाचे, सार्वजनिक वाहतूकीचे दर वाढण्याची भीती आहे. हा कर रद्द करण्यात यावा अशी मी सूचना करते. आपले माननीय वित्तमंत्री संवेदनशील असल्यामुळे ते निश्चितच या सूचनांचा आदर करतील अशी मला खात्री आहे.

थकबाकीदार शेतक-यांच्या कर्जावरील व्याज माफ करुन शेतक-यांना दिलासा देण्यात आलेला आहे. यंत्रमाग व्यवसायासाठी 500 कोटीची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आलेली आहे. महाराष्ट्राला महाराज्य बनविण्याची घोषणा अर्थ मंत्री महोदयानी केलेली आहे. मोटारीवरील विक्रीकरात वाढ करण्यात आलेली आहे. मात्र सीएनजी वरील मोटारींना त्यातून सूट देण्यात आलेली आहे. सुकामेव्या वरील विक्रीकरात 2 टक्के वाढ केलेली आहे. राज्यातील विमानतळांसाठी अर्थसंकल्पात विशेष निधी देण्यात आल्याची घोषणा केलेली आहे. हे अतिशय महत्वाचे असे पाऊल आहे. पर्यटन विकासासाठी 228 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे. केन्द्र सरकारच्या मदतीने राज्यात वीज निर्मितीसाठी 500 कोटी रुपयाची तरतूद केलेली असल्यामुळे राज्यातील वीज प्रकल्पांना त्यामुळे निश्चितपणे संजीवनी मिळणार आहे. राज्यात 3 हजार शेततळी बांधण्यात येणार

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

असल्यामुळे शेतीच्या पाण्याचा प्रश्न निश्चितपणे मार्गी लागण्याच्या दृष्टीने हे एक महत्वाचे पाऊल सरकारने उचललेले आहे. राज्यात 4 नवीन वैद्यकीय महाविद्यालये उभारण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांच्या मिड-डे मिलसाठी 1534 कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पामध्ये करण्यात आलेली आहे. शैक्षणिक साहित्य स्वस्त होणार असल्यामुळे विद्यार्थ्यांसह पालकांनाही दिलासा मिळणार आहे.

बळीराजाला यंदाच्या अर्थसंकल्पात महत्वाचे स्थान देण्यात आलेले असून कोरडवाहू शेतीसाठी 200 कोटी रु.ची तरतूद करण्यात आलेली आहे. विदर्भातील कोरडवाहू शेतीला निश्चितपणे या घोषणेचा फायदा होणार आहे. सर्व सामाजिक घटकांचा विचार करता मागासवर्गीय विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीसाठी 1230.60 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. दारिद्र्य रेषेखालील ज्येष्ठ नागरिकांना 1310.37 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या सुवर्ण महोत्सवी वर्षासाठी विविध कार्यक्रम राबविण्यासाठी आवश्यक निधी देण्याचे आश्वासन देण्यात आलेले आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील पाणी पुरवठा योजना, शेतक-यांसाठी कृषी संजीवनी योजना, कृषी घरगुती व औद्योगिक ग्राहक तसेच आदिवासी ग्राहक यांच्या थकबाकीवरील व्याज व दंड माफ करण्याच्या घोषणेमुळे तब्बल 1700 कोटी इतक्या रकमेची माफी ग्राहकांना मिळालेली आहे. यामुळे त्यांना निश्चितपणे मोठा दिलासा मिळणार आहे.

कोकणासह राज्यातील पर्यटन व्यवसायाला चालना देण्यासाठी या वर्षीच्या अर्थसंकल्पात 228 कोटीची तरतूद करण्यात आलेली आहे. कोकणातील सिंधुदुर्ग जिल्ह्यात सीवर्ल्ड व थीमपार्कचे काम हाती घेण्यात आलेले आहे. महाराष्ट्राच्या दृष्टीने हा अतिशय महत्वाचा असा प्रकल्प पर्यटन क्षेत्रामध्ये होणार आहे. मत्स्यव्यवसायाला चालना देण्यासाठी बंदरे विकासाचा कार्यक्रम हाती घेण्यात आलेला आहे. राज्यातील रेल्वे प्रकल्पाला चालना देण्यासाठी कोकणवासीयांची मागणी असलेल्या कराड-चिपळूण या मार्गासाठी आवश्यक निधी अर्थसंकल्पात उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. मोठ्या बंदरांच्या विकासाबरोबरच मत्स्य व्यवसायाला चालना मिळावी यासाठीही अर्थसंकल्पात विशेष लक्ष पुरविण्यात आलेले आहे. अर्थसंकल्पामध्ये सांस्कृतिक चळवळीला गती

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. स्वातंत्र्य संग्रामात लोकोपयोगी व त्यागाचे योगदान देणा-या तसेच अनेक लोकोपयोगी कार्याद्वारे सर्वसामान्यांच्या कल्याणासाठी प्रयत्न करणा-या भाई कोतवाल यांच्या कार्याची ओळख व प्रेरणा पुढील पिढयांना मिळावी या दृष्टीने त्यांची जन्म व कर्मभूमी असलेल्या माथेरान या ठिकाणी त्यांचे स्मारक, गौरव ग्रंथ व जीवनपट निर्मितीसाठी 1 कोटी रुपयाची तरतूद करण्यात आलेली आहे.

...नंतर श्री. भोगले....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्रीमती दिप्ती चवधरी.....

मुंबई महानगर प्रदेशात पायाभूत सुविधांवर प्रचंड ताण निर्माण झाल्यामुळे त्याचा अभ्यास करुन एमएमआरडीएने ठाणे, रायगड जिल्हयात 1488 कोटी रुपयांची कामे नियोजित केली असून या माध्यमातून 11 रस्ते, 3 रेल्वे उड्डाण पूल, 8 उड्डाण पूल आणि 3 पुलांची कामे हाती घेतली आहेत. यासाठी या अर्थसंकल्पात 250 कोटी रुपये खर्च करण्याचे शासनाने घोषित केले आहे.

सभापती महोदय, नरिमन पॉईंट ते बोरीवली पश्चिम किनारा जल वाहतूक प्रकल्प अंतर्गत पायाभूत सुविधांसाठी 750 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. पाणी टंचाईच्या समस्येने संपूर्ण महाराष्ट्र ग्रासलेला असताना आणि कुपोषणाच्या समस्येने मुंबईपर्यंत मजल मारुनही याबाबतचा उल्लेख अर्थसंकल्पात केलेला दिसत नाही. त्याचप्रमाणे शिवाजी महाराजांचा पुतळा अरबी समुद्रात उभा करण्याबाबत अर्थसंकल्पात तरतूद केलेली दिसत नाही. नाशिकमध्ये 2013 साली भव्य कुंभमेळा होणार आहे. त्याबाबत या अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद केलेली दिसत नाही. हा अर्थसंकल्प निश्चितपणे राज्याला प्रगतीकडे नेणारा आहे. म्हणून मी पुन्हा एकदा वित्तमंत्र्यांचे अभिनंदन करते आणि माझे भाषण पूर्ण करते.

..2.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2012-2013 च्या अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, राज्याच्या स्थूल उत्पन्नात 11 टक्क्यानी वाढ झाली आणि राज्याचे निव्वळ उत्पन्न 47 टक्क्यानी वाढल्याचे अर्थसंकल्पात नमूद केले आहे. राज्याच्या स्थूल आणि निव्वळ उत्पन्नात एका बाजूला वाढ होत असताना दुसरीकडे राज्याच्या डोक्यावर 2.28 लाख कोटी रुपयांच्या कर्जाचा डोंगर उभा केला आहे. भविष्यात हे राज्यच बीओटी तत्वावर चालविण्यास देणार की काय अशा प्रकारचा संभ्रम सर्वसामान्य जनतेच्या मनामध्ये निर्माण झाला आहे.

सभापती महोदय, राज्य सरकारने अनेक योजना बीओटी तत्वावर राबविण्याचे ठरविल्यामुळे ही शंका माझ्याही मनामध्ये निर्माण झाली आहे. आंबा, काजू या फळपिकाचे हवामानामध्ये बदल झाल्यामुळे गेली दोन वर्षे सातत्याने नुकसान होत आहे. या वर्षी आंबा, काजू या फळपिकाबाबत नुकसान भरपाई देण्याची गरज आहे. परंतु अर्थसंकल्पात त्या संदर्भात काहीही उल्लेख केलेला दिसत नाही. या सभागृहात दोन ते तीन वेळा अर्थसंकल्प आणि अन्य चर्चेच्या माध्यमातून जांभूळ, काजू आणि करवंदापासून वाईन निर्माण करण्याचे धोरण शासनाकडून राबविले जाईल असे सांगितले होते. परंतु ते धोरण अद्याप कागदावरच शिल्लक राहिले आहे, त्या धोरणाची अंमलबजावणी झालेली नाही, म्हणून मी शासनाच्या या कृतीबद्दल नाराजी व्यक्त करतो.

सभापती महोदय, आज सकाळी सभागृहामध्ये मच्छीमारांच्या संदर्भातील लक्षवेधी सूचना चर्चेला आली होती. मागील 15 वर्षापासून मासेमारी करणारे बांधव मासळीचा दुष्काळ जाहीर करावा अशी सातत्याने मागणी करीत आहेत. आज मासळीचे उत्पादन कमी झालेले आहे. परंतु शासन या संदर्भात ठोस भूमिका घ्यायला तयार नाही. मध्यंतरी झालेल्या चर्चेच्या वेळी मंत्री महोदयांनी उत्तर दिले की, मच्छीमारांना पर्यटन व्यवसायाकडे वळवून त्यांना पर्यटनाचा धंदा करण्यास प्रोत्साहन देण्याचे ठरविले आहे. परंतु या धोरणाची अद्याप अंमलबजावणी झालेली नाही. मच्छीमारांना रॉकेलवर सबसिडी देऊ असे सभागृहात मंत्री महोदयांनी सांगितले होते. परंतु त्यासाठी अर्थसंकल्पात कोणतीही तरतूद केलेली नाही.

सभापती महोदय, एनसीडीसी मार्फत बोटी खरेदी करण्यासाठी कर्ज दिले जाते. त्या कर्जासाठी राज्य शासनाला काही हिस्सा द्यावा लागतो. ही तरतूद राज्य शासनाने वाढवून देण्याची गरज आहे. आज सिंधुदुर्ग हा जिल्हा संपूर्ण देशातील एकमेव पर्यटन जिल्हा घोषित

.3....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर.....

झालेला आहे. सृष्टी सौंदर्य, समुद्र किनारे, मंदिरे अशा निसर्ग सौंदर्याने नटलेला हा जिल्हा असल्यामुळे या जिल्हयामध्ये पर्यटक यावेत म्हणून विमानतळ विकसित करण्याचा शासनाने प्रयत्न केला.

नंतर श्री.खर्चे...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर .....

या विमानतळाचा नारळ या शासनातील एका मंत्री महोदयांनी तीन वेळा फोडला पण त्याचे पुढे काय झाले हे समजत नाही. अशा प्रकारे यापूर्वी झालेल्या अनेक घोषणा फक्त कागदावरच राहिल्या. कोकणात रेल्वेबाबतची घोषणा करण्यात आली होती. त्यात वैभववाडी ते कोल्हापूर, रत्नागिरी ते कराड आणि चिपळूण ते कराड अशा मार्गांबाबत सभागृहात वेगवेगळ्या आयुधांच्या माध्यमातून उपस्थित झालेल्या प्रश्नांना उत्तरे देताना सांगण्यात आले, तसेच अर्थसंकल्पात सुध्दा काम दाखविले होते पण प्रत्यक्षात त्याचे कोणत्याही प्रकारे सर्व्हेक्षणाचे काम सुरु झालेले नाही, हे काम शासनाने सुरु करावे अशी माझी विनंती आहे.

सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा म्हणून ओळखला जातो. त्यात अधिकाधिक सुविधा देण्याबाबत मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चा झाली व 190 कोटी रुपये देण्याचे शासनाने मान्य केले पण अद्यापही ती रक्कम मिळाली नाही. तसेच युतीच्या काळात कोकण पर्यटन विकास कंपनी स्थापन करण्यात येईल असे ठरले होते पण नंतरच्या काळात त्याचा कोठेही थांगपत्ता नाही. कोकणातील जल वाहतुकीच्या संदर्भात अनेक घोषणा झाल्या पण प्रत्यक्षात कोणतीच अमलबजावणी झालेली नाही त्याचा विचार करावा. दि. 25.2.2009 रोजी सिंधुदुर्ग-ओरोस येथे मंत्रिमंडळाची खास बैठक घेण्यात आली होती. त्यात जल वाहतुकीच्या संदर्भात निर्णय घेण्यात आला होता.. तसेच घोषणा केल्यानुसार 25 ऑगस्ट, 2009 रोजी त्यासंबंधीचा जी.आर. सुध्दा काढण्यात आला आणि एका वर्षात निधी देण्यात येईल म्हणून सांगितले.

गाळ काढण्यासाठी तीन वर्षासाठी 60 कोटी रुपये राखून ठेवण्यात आल्याचेही सांगण्यात आले होते सभागृहात तारांकित प्रश्न, लक्षवेधी सूचना विचारल्यानंतर पुढील अधिवेशनात शासनाकडून उत्तर मिळाले की, ड्रेझर्स खरेदी करण्यासाठी 16.50 कोटी रुपये दिले. अशा प्रकारे 3 वर्षात 60 कोटी रुपये देण्याऐवजी फक्त 16 कोटी रुपये दिलेले आहेत. पाटबंधारे साठी 1500 कोटी रुपये देण्याचे शासनाने कबूल केले होते पण त्यातून एकही पैसा न दिल्यामुळे या प्रकल्पांच्या किंमतीत चार पटीने वाढ झाली.

मच्छिंद्र कांबळी नाट्य गृह निर्माण करण्याची घोषणा शासनाने केली होती. त्यासाठी 2.25 कोटी रुपयांची तरतूद केली होती पण अद्यापही पैसे मिळाले नाहीत. सिंधुदुर्ग किल्ल्यात

.....2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर .....

असलेल्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या मंदिराचा जीर्णोध्दार करण्यासाठी 1 कोटी रुपये ठेवले होते पण प्रत्यक्षात पैसे मिळाले नाहीत. अशा अनेक बाबींच्या संदर्भात अर्थसंकल्पात शासनाकडून सातत्याने सांगितले जाते पण त्याची अंमलबजावणी मात्र होताना दिसत नाही.

महोदय, कोकण विभागीय परीक्षा मंडळाची घोषणा मंत्रिमंडळाच्या बैठकीत झाली होती व त्यासाठी 16.88 कोटीची तरतूदही करण्यात आली आहे. त्यावेळी परीक्षा घेतल्या होत्या परंतु नियंत्रण अद्यापही कोल्हापूर परीक्षा मंडळाचेच आहे, कारण येथे कोणतीच नोकर भरती शासनाने केलेली नाही, त्याकडे लक्ष द्यावे. सिंधुदुर्ग जिल्हा पर्यटन जिल्हा तेथे खाण उद्योग चालत नाही. खाण उद्योग सुरु झाले तर पर्यटन संपुष्टात येते. असे असताना देखील या जिल्ह्यात खाण उद्योग आणण्याचा घाट घातला जात आहे. येथे 40:32 ची परवानगी घेऊन प्रत्यक्षात मात्र 52.25 चे उत्खनन करण्यात येते तरी देखील शासनाकडून कोणतीही कारवाई होत नाही. मौ. कळणा या गावातील लोकांनी त्यासाठी विरोध केला. त्याची जन सुनावणी ठेवली असता त्यालाही विरोध करण्यात आला पण तरी देखील नियमबाह्य खनिज उत्खनन सुरु आहे. इतके असूनही जिल्ह्यातील जनता विरोध करीत असताना देखील येणाऱ्या 15 तारखेला झोळंबे येथे जन सुनावणी होत आहे. या भागात वन जमीन आहे तसेच वन्य प्राण्यांचा संचार देखील आहे. तरी देखील वन जमिनीवर असे खनिज प्रकल्प राबविण्याचे काम शासनामार्फत चालू आहे. एका बाजूने सिंधुदुर्ग जिल्ह्याचा पर्यटन विकास करण्याचे शासन म्हणते पण त्याच जिल्ह्यात दुसऱ्या बाजूला अशा प्रकारे खाण उद्योगाचा विकास करण्याचेही काम शासन करीत आहे.

यानंतर श्री. जुन्नरे .....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ....

सभापती महोदय, राज्य सरकार एका बाजूने म्हणते की, ही राष्ट्रीय संपत्ती आहे. परंतु या राष्ट्रीय संपत्तीचा उपयोग सिंधुदुर्ग जिल्हयाच्या विकासासाठी केला जात नाही त्यामुळे यासंदर्भात मी खेद व्यक्त करतो.

सभापती महोदय, रोजगार व स्वयंरोजगाराच्या बाबतीत मी सिंधुदुर्ग जिल्हयातील रोजगार व स्वयंरोजगार केंद्रातील माहिती आणलेली आहे. सिंधुदुर्ग जिल्हयातील सन 2005 ते 2011 या कालावधीतील रोजगार व स्वयंरोजगार केंद्रात किती नोंदणी झाली व किती उमेदवारांना नोकरी मिळाली याची माहिती मी आणलेली आहे.

सिंधुदुर्ग जिल्हयात सन 2008 मध्ये 5847 तरुणांनी नोंदणी केली परंतु वर्षभरात केवळ 30 उमेदवारांना नोक-या दिल्या गेल्या. 2009 मध्ये 6115 उमेदवारांनी नोंदणी केली परंतु प्रत्यक्षात केवळ 269 उमेदवारांना नोक-या दिल्या गेल्या. सन 2010 मध्ये 5970 उमेदवारांनी नोंदणी केली परंतु प्रत्यक्षात वर्षभरात 431 नोक-या दिल्या गेल्या.

तालिका सभापती (श्री. विनायक मेटे) : सभागृहाची वेळ 7.00 वाजेपर्यंत वाढविण्यात येत आहे.

श्री. परशुराम उपरकर : सभापती महोदय, सन 2011 मध्ये 7924 उमेदवारांनी नोंदणी केली परंतु प्रत्यक्षात केवळ 347 उमेदवारांना नोक-या दिल्या गेल्या.

सभापती महोदय, मुंबईमध्ये सुध्दा मी अशाच प्रकारे माहिती गोळा केलेली आहे. सन 2010 मध्ये 41,000 उमेदवारांना नोक-या दिल्या गेल्या व 2011 मध्ये 31,000 नोक-या वर्षभरात दिल्या गेल्या. परंतु या ठिकाणी राज्य शासन व राज्य शासनाचा रोजगार व स्वयंरोजगार विभाग व मंत्री एका बाजूने अशा प्रकारे नोक-या देत आहेत. दुसऱ्या बाजूने एक माननीय मंत्री महोदयांनी बेरोजगाराच्या मेळाव्यात उपस्थित राहून त्या मेळाव्यात 25 हजार तरुणांना एकाच दिवशी नोक-या देण्याचा विक्रम केला. सिंधुदुर्ग जिल्हयात एकाच दिवशी 10,000 तरुणांना नोक-या देण्याचा विक्रम केला जातो. हे विक्रम करीत असतांना त्यांनी शिवसेनेवर सुध्दा टिका करण्याचे सोडले नाही. शिवसेनेने व अन्य पक्षांनी आजवर जितक्या नोक-या मराठी तरुणांना दिल्या नाहीत त्यापेक्षा हजारो पटीने अधिक नोक-या स्वाभिमान संघटनेने एकाच दिवशी मिळवून दिल्या. दगड हाती न देता परप्रांतियांचा द्वेष न करता नोक-या देतो असे काही वृत्तपत्रातून जाहीर केले गेले.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. परशुराम उपरकर ....

सभापती महोदय, या सभागृहात कामगार क्षेत्रात काम करणारे अनेक नेते आहेत. सन्माननीय सदस्य भाई जगताप, सन्माननीय सदस्य श्री. किरण पावसकर, सन्माननीय सदस्य श्री. सय्यद जामा हे कामगार नेते आहेत त्याच प्रमाणे सन्माननीय मंत्री महोदय श्री. सचिन अहिर हे सुध्दा कामगार क्षेत्रात काम करतात. परंतु या लोकांनी एकाच दिवसात अशा प्रकारे नोकरी देण्याचा विक्रम केल्याचे आतापर्यंत ऐकीवात आले नाही. हा सर्व प्रकार काय आहे बघण्यास मी सिंधुदुर्ग जिल्हयातील अनेक ठिकाणी जाऊन भेट दिली व तेथील तरुणांना विचारले की, बाबांनो तुम्हाला नोक-या मिळाल्या काय ? नोक-या मिळाल्या तर त्या कोठे मिळाल्या असे विचारले असता त्या तरुणांनी मालवणी भाषेतून सांगितले की, "साहेबानू, पुण्यातल्या फ्रिश कंपनीत जावन आम्ही काम केलव तर आमका फक्त चार हजार रुपये मिळतले. त्यापेक्षा आम्ही आमच्या घरातच राबलव तर घराक रवान आमका खावक तरी मिळात". अशा प्रकारच्या व्यथा व्यक्त केल्या गेल्या. म्हणजे त्या लोकांना ख-या अर्थाने नोक-या मिळाल्या काय ? याचाही शोध घेण्याची गरज आहे. ख-या अर्थाने ज्या मेळाव्याची ग्रिनीज बुकात नोंद होते त्या मेळाव्यातून नोक-या मिळाल्या काय ? हे सुध्दा बघण्याची गरज आहे. कारण एका बाजूने राज्य सरकार नोक-या देण्यामध्ये कमकुवत पडत आहे, बेकारी वाढते आहे व त्यासंदर्भात सातत्याने प्रश्न उपस्थित केले जात आहेत व दुस-या बाजूने एका दिवसात नोकरी देण्याचा जो विक्रम केला जात आहे त्या विक्रमाची राज्य शासन चौकशी करणार आहे काय ? एका बाजूने राज्य सरकारचा रोजगार व स्वयंरोजगार विभाग तरुणांना नोकरी देण्यामध्ये निष्क्रिय ठरतो आहे व दुस-या बाजूने संघटना चालविणारे एका दिवसात हजारो नोकऱ्या देत आहेत हे बघितल्यानंतर राज्य सरकारला खाली मान घालावी लागेल असे दिसून येत आहे. त्यामुळे या सर्व बाबीची चौकशी....

प्रा. सुरेश नवले : सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. सन्माननीय सदस्य श्री. उपरकर हे उत्तम प्रकारचे विवेचन करीत आहेत. त्यांनी असे सांगितले की, मुंबईमध्ये 25 हजार व सिंधुदुर्ग जिल्हयामध्ये 10 हजार नोक-या स्वाभिमान संघटनेने उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. खरे म्हणजे हा कौतुकाचा विषय आहे. एखादी संघटना चांगले काम करीत असेल तर त्यामध्ये हरकत घेण्यासारखे काय आहे हीच माझी हरकत आहे.

यानंतर श्री. भारवि...

अशुधित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.परशुराम उपरकर : सभापती महोदय, येथे कौतुक करीत असताना राज्य शासनाचा विभाग किती अकार्यक्षम आहे हे सांगण्याचा मी प्रयत्न करीत आहे. राज्य शासनाच्या जाहिरातीवर माननीय मंत्र्यांचे फोटो आहेत. काँग्रेस पक्षाचे नाव आहे. शासनाच्या माध्यमातून ते वर्षाला फक्त 350 नोकऱ्या देतात. मात्र, त्यांची संघटना दहा हजार नोकऱ्या एका दिवसात देते. ही शासनाला शरमेची बाब आहे. हे दाखविण्याचा प्रयत्न मी येथे करीत आहे. तेव्हा या सर्व बाबीची शासनाने चौकशी करावी. त्या मुलांना खरोखर नोकऱ्या मिळाल्या आहेत काय, ती मुले नोकरीवर गेली आहेत काय की, नुसती पत्र देऊन विक्रम केला आहे काय, याची पण चौकशी शासनाने करण्याची गरज आहे. नाही तर भविष्यात बेरोजगार तरूण शासनावर विश्वास ठेवणार नाही. त्यांचा शासनावरचा असलेला विश्वास उडून जाईल. शासनाच्या स्वयंरोजगार विभागात आपली नावे ते नोंदविणार नाहीत. खाजगी मेळाव्यामध्ये नोकऱ्या मिळतात म्हणून ते शासनाच्या विभागाकडे पाठ फिरवतील. याकडे मी खास करून लक्ष वेधित आहे.

मंत्रिमहोदयांनी या अर्थसंकल्पात ज्या घोषणा केल्या आहेत त्या पुढच्या अर्थसंकल्पात असतील काय, मागच्या घोषणांची अंमलबजावणी झाली आहे काय, यासंबंधी कुठेच काही बोलले जात नाही. म्हणूनच मी मघाशी सांगितले की, राज्य शासन आकडेमोड करून बजेट सादर करीत आहे. राज्य शासनाची एकंदरित परिस्थिती बघितल्यावर भविष्यात राज्य शासन एका उद्योगपतीला BOT वर चालवायला द्यावे लागेल अशा प्रकारची भीती आमच्या सारख्या सर्वसामान्य ग्रामस्थांचा मनामध्ये येत आहे म्हणून मी या अर्थसंकल्पाला पूर्णपणे नाराजी व्यक्त करून थांबतो. जय हिंद, जय महाराष्ट्र.

.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे (विधानसभेने निवडलेल्या) : सभापती महोदय, आपण मला विचार मांडण्याची संधी दिल्याबद्दल धन्यवाद. मी सुरूवातीलाच माननीय वित्त मंत्र्यांनी जो अर्थसंकल्प सादर केला आहे त्याला पाठिंबा देते.

माझा फक्त एक ठिकाणी आक्षेप आहे. जो माझ्या पूर्वीच्या सन्माननीय सदस्यांनी देखील व्यक्त केला आहे. तो म्हणजे गॅसवरचा जो कर आहे, तो कुठल्याही परिस्थितीमध्ये शासनाने कमी करावा. वाटल्यास, लक्झरीबाबीवर आपण कर सुचविला तरी चालेल. परंतु, कुठल्याही परिस्थितीमध्ये गॅसवरील कर कमी केला पाहिजे.

श्री.यशवंतराव चव्हाण साहेबांचे मी विचार वाचले आहेत. त्यापैकी एक विचार मला सभागृहासमोर सांगावयाचा आहे. यशवंत चिंतनिका या पुस्तिकेमध्ये पान क्र.25 वर असे म्हटले आहे की,

"लोकशाहीशी संबंधित असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, केवळ राजकीय क्षेत्रातच नव्हे तर सामाजिक व आर्थिक क्षेत्रांत देखील, लोकांचे समाधान हेच आपले अंतिम उद्दिष्ट मानले पाहिजे. राजकारण आणि प्रशासन या दोन्ही क्षेत्रातील लोकांचे हेच उद्दिष्ट असले पाहिजे. कारण या दोन्ही क्षेत्रातील व्यक्ती शेवटी जनतेतूनच आलेल्या असतात आणि त्यांना जनतेचे भवितव्य घडवून आणण्याचे कार्य करावयाचे असते. राज्यशास्त्र आणि लोकशाहीतील प्रशासन यांना सांधणारा दुवा हाच आहे, असे मला वाटते.

निवडणूक हा लोकशाहीचा एक भाग आहे आणि लोकशाहीमध्ये निवडणुकीला फार महत्त्वाचे स्थानही आहे यात शंका नाही. परंतु, निवडणुकीला किंवा लोकशाहीच्या बाह्य स्वरूपाला जनतेच्या समाधानापेक्षा अधिक महत्त्व नाही. तुम्ही कोणत्याही क्षेत्रात काम करीत असाल, जनतेचे समाधान हीच अंतिम कसोटी राहील.

शेवटी राज्य शासन आणि न्याय व्यवस्था ही एका रथाची दोन चाक आहेत. समाजकारण, राजकारण चालविणे, धोरण ठरविणे, निधी उपलब्ध करणे, आणि विकासाच्या योजना राबविणे महत्त्वाचे असते. हे राज्य कल्याणकारी आहे, पुरोगामी आहे हे चित्र कायम ठेवण्याची जबाबदारी राज्य शासनाची असते."

यानंतर श्रीमती रणदिवे.....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

या शासनाने आपल्या समोर जो अर्थसंकल्प ठेवलेला आहे, तो माननीय मुख्यमंत्री श्री.पृथ्वीराज चव्हाण साहेबांच्या विचाराला पूर्णपणे समर्थन देणारा आहे असे मला वाटते. केंद्रीय अर्थसंकल्पाच्या बाबतीत एके ठिकाणी असे लिहिल्याचे माझ्या वाचनात आले होते की, "युती सरकार केंद्रामध्ये सत्तेत असताना देशातील शेती कर्ज पुरवठा जेमतेम 80 हजार कोटीच्या आसपास होता. त्यानंतर माननीय डॉ.मनमोहन सिंग यांनी देशाच्या पंतप्रधान पदाची सूत्रे घेतल्यानंतर आणि केंद्रीय कृषी मंत्री नामदार श्री.शरदचंद्रजी पवार साहेब यांनी कृषी विभागाची सूत्रे घेतल्यानंतर त्यांनी जाणीव पूर्वक प्रयत्न करुन गेल्या चार-पाच वर्षामध्ये टप्प्याटप्प्याने पीक कर्ज पुरवठा वाढवत, वाढवत सव्वातीन लाख कोटीवर नेला आणि 2010 मध्ये तो जवळपास 4 लाख कोटीपर्यंत होता. यावर्षीचे साडेचार लाख रुपयांचे उद्दिष्ट आहे. जेव्हा सत्ता हातामध्ये असते तेव्हा लोकाभिमुख होण्याच्या दृष्टीने कशा पध्दतीने रावबावयाची याची एक दिशा शासनाला ठरवावी लागते. खऱ्या अर्थाने ज्यापध्दतीने आदरणीय केंद्रीय कृषी मंत्री श्री.शरदचंद्र पवार साहेबांनी विचार केला, त्याच पध्दतीने महाराष्ट्र शासनाने सुध्दा या अर्थसंकल्पामध्ये शेतीच्या बाबतीत विचार केलेला आहे आणि शेतकऱ्यांना बरे दिवस येतील अशा प्रकारचा प्रयत्न केला आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पाकडे पहात असताना तो सामान्य जनतेचे प्रश्न किती सोडवितो, बेकारीचा प्रश्न किती सोडवितो तसेच शिक्षणाच्या बाबतीत काय भूमिका घेतो, आरोग्य तसेच व्यापार याविषयी काय भूमिका घेतो या सर्व गोष्टी अर्थसंकल्पामधून पॉझिटीव्हली व्यक्त झाल्या पाहिजेत.कै.बाळासाहेब भारदे यांची विधान सभेतील 1952 ते 1962 या कालावधीतील भाषणे, तसेच 1953 मधील अर्थसंकल्पावर चर्चा झाली, तेव्हा त्यांनी केलेल्या भाषणातील पान क्र.1 व 2 वर त्यांनी असे म्हटलेले आहे की,"याठिकाणी जो पैसा खर्च करण्याचे ठरविले आहे, तो जनतेच्या हितासाठी खर्च होणार आहे की नाही ? त्याचप्रमाणे बजेटमध्ये नमूद करण्यात आलेल्या योजना यांच्याकडे राज्यातील लोकांच्या कल्याणाच्या योजना या दृष्टीकोनातून बजेटकडे पाहिले पाहिजे.कर घेतल्याशिवाय कोणत्याही सरकारचा कारभार चालणे शक्य नाही.म्हणून योग्य गोष्टींवर कर वाढ करणे आणि गरीब लोकांच्या ज्या गरजा आहेत त्यावरील कर कमी ठेवणे,त्यांना परवडतील अशा पध्दतीने कर लावणे ही भूमिका राज्य शासनाची असावयास पाहिजे.फक्त हे कर गरीब लोकांसाठी लागू होऊ नयेत एवढीच दक्षता घ्यावयाची असते. यादृष्टीने जर सन्माननीय . . .

. . . .4 क्यु-2

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषाताई दराडे . . ..

सदस्यांनी बजेटकडे पाहिले तर सन्माननीय सदस्य कोणत्याही पक्षाचे असले तरी ते त्याचेस्वागतच करतील असे मला वाटते. कल्याणकारी राज्यातील सरकार याप्रमाणे . . .."

(सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावते खाली बसून बोलतात.)

ॲड.उषाताई दराडे : सन्माननीय सदस्य श्री.दिवाकर रावतेसाहेब, आपण जरा ऐका. तुमची भगिनी भाषण करीत आहे. त्यांनी आपल्या भाषणात पुढे म्हटले आहे की,"ज्याप्रमाणे राष्ट्र संवर्धनाच्या कामासाठी शासन खर्च करीत असते त्याच प्रमाणे सरकारला आपल्या उत्पन्नाची गती स्थिर ठेवण्यासाठी संरक्षणावर सुध्दा खर्च करावा लागतो हे आपल्याला विसरुन चालणार नाही. फक्त अशा राज्यात जनतेच्या हितासाठी आर्थिक, सामजिक, सांस्कृतिक आणि नैतिक उत्पन्नाच्या दृष्टीने जो खर्च केला जातो तो या संरक्षणाच्या खर्चापेक्षा जास्त होणार नाही हे मात्र आपल्याला पहावे लागेल.याठिकाणी हा अर्थसंकल्प हा कल्याणकारी योजना देणारा आहे"आणि कै.बाळासाहेब भारदे यांनी जे विचार व्यक्त केलेले आहेत त्या प्रमाणेच आपल्या समोर अर्थसंकल्प मांडलेला आहे. माझ्या विरोधी पक्षाच्या काही सन्माननीय सदस्यांनी आपले मत व्यक्त करीत असताना अनुल्लेखाच्या काही गोष्टींचा उल्लेख केला.एखाद्या गोष्टीचा उल्लेख केला नाही एवढ्यावरुन त्या गोष्टीची उपेक्षा केली जाते असे म्हणण्याचे काही कारण नाही. जरी अर्थसंकल्पामध्ये काही गोष्टींचा अनुल्लेख असला तरी महाराष्ट्र राज्य शासन या गोष्टी निश्चितपणे पूर्ण केल्या शिवाय रहाणार नाही याची मला खात्री वाटते.

सभापती महोदय, राज्याच्या बजेटची जी ठळक वैशिष्ट्ये आहेत त्याचाही येथे उल्लेख करणे मला गरजेचे वाटते. त्यामध्ये हागणदारी मुक्त गावासाठी 45 कोटी रुपये, बंद पडलेल्या उद्योगांसाठी 50 टक्के कर्ज माफ, पर्यटन विकासासाठी 228 कोटी रुपये, राज्यातील 100 ठिकाणी जलद गती न्यायालय निर्माण करणे, सीमा भागामध्ये मराठीच्या संवर्धना साठी 5 कोटी रुपये दिलेले आहेत याबाबतीत मी नंतर भाष्य करीन. मराठी विकास विभागाला 15 कोटी रुपये देण्यात येणार आहेत. मुंबई मध्ये भाषा भवन उभारण्यात येणार आहे. दुर्मीळ मराठी पुस्तके संगणकावर आणणार, सूतावरील कर 5 टक्क्यावरुन 2 टक्के करण्यात येणार आहे तसेच कापड प्रक्रिया उद्योगांना करातून सूट देण्यात आली आहे, कुक्कुट पालनावरील कर कमी केला असून, विदर्भातील कृषी उद्योजकता कार्यक्रम, कोरडवाहू शेतीसाठी 200 कोटी रुपयांचा निधी, नक्षलग्रस्त

. . . .4 क्यु-3

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषाताई दराडे . . ..

भागांसाठी औद्योगिक प्रशिक्षण केंद्र आणि गडचिरोली, गोंदिया मध्ये आय.टी.आय.उभे करण्यात येणार आहेत आणि या व्यतिरिक्तही यामध्ये अनेक ठळक वैशिष्ट्ये आहेत आणि आपल्याला कोणत्याही परिस्थितीत या ठळक बाबींची दखल घ्यावीच लागेल.

यानंतर श्री.अ.शिगम . . . .

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे..

सभापती महोदय, भाषा संवर्धनासाठी राज्य शासन प्रामाणिकपणे प्रयत्न करताना दिसते. साहित्य सांभाळणे आणि इतिहासाची पाने लोकांसमोर ठेवणे आणि त्या आदर्शावर पुढच्या समाजाने वाटचाल करणे असे दिशादर्शक काम साहित्य नेहमी करीत असते. "साहित्याचे नवे प्रवाह" यामध्ये म्हटलेले आहे की, दलित व स्त्रीवादी साहित्याने चार्वाक, बुध्द, आंबेडकरांच्या ऐहिक जीवनवादी विचारात आपल्या साहित्य प्रेरणा असल्याचे मान्य केले आहे. फुले, शाहू, आंबेडकर व इतर मानवतावादी समतेचा विचार मांडणारे समाज सुधारणा हे या साहित्याचे प्रेरक आहेत." दलित साहित्याचा विरोध वर्ण व्यवस्थेमध्ये केला जातो आणि स्त्रीवादी साहित्याचा विरोध हा पुरुष प्रधान व्यवस्थेला असतो. या ठिकाणी दलित साहित्याची चळवळ ही समाज परिवर्तनाची चळवळ आहे, वर्ण व्यवस्थेला विरोध करणारी चळवळ आहे. तेव्हा स्त्रीवादी साहित्याच्या चळवळीची जोड ही समाज परिवर्तनाच्या चळवळीशी लावणे आणि दलितांची चळवळ व स्त्रियांची चळवळ एकत्रित आणणे ही काळाची गरज आहे. हे खऱ्या अर्थाने घडवून आणायचे असेल तर आपणास कोणत्याही परिस्थितीमध्ये साहित्याचे संवर्धन करावे लागेल. शाहू, फुले, आंबेडकरांच्या विचाराचे साहित्य लोकापर्यंत जाईल आणि देशात समाजपरिवर्तनाची चळवळ अधिक पुढे नेण्याच्या दृष्टीने प्रयत्न करील याची मला खात्री वाटते.

सभापती महोदय, या सदनाचे सदस्य माननीय श्री.अरुण गुजराथी यांनी दिनांक 29 मार्च 2011 रोजी आपल्या अर्थसंकल्पीय चर्चेच्या वेळी केलेल्या भाषणामध्ये जो उल्लेख केला तो मी वाचून दाखविते. त्यांनी आपल्या भाषणात म्हटले होते की, " नमुना "क" मध्ये असे म्हटलेले आहे की, "क्षमतेचे निर्धारण" आमची क्षमता काय आहे ? सन 2011-2012 मध्ये 22860 कोटीची ऋण उभारणी केली जाईल, ही ऋण उभारणी केंद्र शासनाने घालून दिलेल्या 35160 कोटी या मर्यादेपेक्षा बऱ्याच प्रमाणात कमी आहे. व्याजाचे महसुलाशी असलेले 14.85 टक्के गुणोत्तर हे केंद्र शासनाने घालून दिलेल्या 20 टक्के मर्यादेपेक्षा खूप कमी आहे. राज्याची आर्थिक कुवत संपलेली आहे. तिजोरीत काही राहिलेले नाही अशा प्रकारचा प्रचार विरोधी बाकाकडून होतो. त्यामुळे राज्यात परप्रांतातून येणाऱ्या तसेच अन्य राज्यातून येणाऱ्या गुंतवणुकीवर परिणाम होतो. मी या ठिकाणी देशातील काही पाच-सहा राज्यांच्या कर्जाची आकडेवारी देतो. विरोधकांचा आरोप

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे..

नकारात्मक दृष्टीकोनातून असतो. लोकशाहीमध्ये ज्या चांगल्या गोष्टी आहेत त्या स्वीकारल्या पाहिजेत आणि ते आवश्यक असते. ज्या चुकीच्या गोष्टी आहेत त्या नाकारल्या देखील पाहिजेत." मी अन्य राज्यांवर असलेल्या कर्जाची आकडेवारी सांगते. आंध्र प्रदेश 1 लाख 26 हजार कोटी, पश्चिम बंगाल 1 लाख 92 हजार कोटी, महाराष्ट्र 2 लाख 9 हजार कोटी, मुंबई एवढी ज्या राज्याची लोकसंख्या आहे त्या केरळ राज्यावर 65 हजार कोटी, उत्तर प्रदेश 2 लाख 21 हजार कोटी रुपये एवढे या राज्यांवर कर्ज आहे. आपल्याला कर्ज घ्यावे लागते, परंतु त्याचा वापर कसा करावा या संदर्भात निश्चितपणे शासनाला सूचना करु शकतो. अर्थसंकल्प म्हटल्यानंतर दरडोई उत्पन्न, दारिद्र्याची टक्केवारी, राज्यावर असलेला कर्जाचा बोजा, व्याज प्रदान, विकास खर्च, विकासेतर खर्च, योजने अंतर्गत खर्च, योजनेतर खर्च, भांडवली खर्च, महसुली खर्च, राज्याचे स्थूल उत्पन्न, उत्पादन खर्च, अनुत्पादक खर्च, तुटीचा अर्थसंकल्प आणि शिलकी अर्थसंकल्प, हे सर्व त्यामध्ये येतेच. वास्तविक राज्य शासनाकडून सादर केला गेलेला अर्थसंकल्पाच्या माध्यमातून पुढील वर्षात राज्याचे आर्थिक उत्पन्न कसे वाढेल, रोजगार कसा वाढेल या दृष्टीकोनातून चर्चा झाली पाहिजे. त्या दृष्टीने पाहिले तर सध्याचा अर्थसंकल्प हा राज्याची पुढील अनेक वर्षे दिशा ठरविणारा अर्थसंकल्प आहे. हा पुरोगामी अर्थसंकल्प आहे. तेव्हा या अर्थसंकल्पा बाबत नकारात्मक दृष्टीकोन न ठेवता त्यावर सभागृहात चर्चा झाली पाहिजे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना, सेंद्रींय शेती योजना, कृषी वित्त पुरवठा, प्राथमिक कृषी सहकारी पत पुरवठा, व्याजरहित व अल्प व्याजदराने कर्ज, किसान क्रेडीट कार्ड योजना, कृषी व पणन, किमान आधारभूत किंमत योजना, कृषी संजीवनी योजना, राष्ट्रीय कृषी विमा योजना, किसान जनता अपघात विमा योजना इत्यादी योजनांचा उल्लेख आहे.

सभापती महोदय, महाराष्ट्राची आर्थिक पाहणीमध्ये सेंद्रीय खता बाबत उल्लेख करण्यात आलेला आहे. त्यामध्ये नमूद केलेले आहे की, "सृष्टीचा समतोल राखण्यास मदत करणारी सेंद्रीय शेती ही काळाच्या कसोटीवर उतरलेली शेतीची पध्दत असून त्याचा प्रकर्षाने प्रसार करण्याची गरज आहे. राज्यात सेंद्रीय शेतीस प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने "गांडूळ खर्च उत्पादन" ही केंद्र

..3..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड.उषा दराडे..

पुरस्कृत योजना सन 2000-2001 पासून सुरु करण्यात आली. सदर योजनेची "गांडूळखत उत्पादन ही केंद्र पुरस्कृत योजना" व "सेंद्रीय शेतीचा वापर व प्रोत्साहन देणे" या दोन मुख्य घटकात पुनर्रचना करण्यात आली.

यानंतर कु.थोरात..

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे ...

सन 2003-2004 पासून खताचा एकात्मिक वापर, सेंद्रिय शेतीचे प्रोत्साहन व प्रमाणिकीकरण आणि मृद परीक्षण व मृद आरोग्य पत्रिका या योजना सुरु करण्यात आल्या आहेत. सन 2008-2009 पासून हिरवळीचे खत हा घटक नव्याने समाविष्ट करण्यात आला आहे. डिसेंबर 2011 पर्यंत पारंपरिक शेतीच्या या योजनेद्वारे 7.31 लाख हेक्टर क्षेत्र सेंद्रिय शेतीखाली आणण्यात आले आहे. त्यापैकी 1.5 लाख हेक्टर क्षेत्राचे प्रमाणिकीकरण करण्यात आलेले आहे. 2010-11 पर्यंत या योजनेंतर्गत करण्यात आलेला संचित खर्च 57 कोटी रुपये इतका होता. चालू वर्षात योजनेसाठी 4.31 कोटी रुपये इतके अनुदान मंजूर करण्यात आले. जानेवारी, 2012 पर्यंत 1.97 कोटी रुपये इतका खर्च करण्यात आला आहे असे आर्थिक पाहणीमध्ये दिसते. यावरुन मागच्या वर्षीच्या अर्थसंकल्पामध्ये कृषी या क्षेत्राला प्राधान्य देण्याचा प्रामाणिकपणे प्रयत्न शासनाने केलेला आहे त्यादृष्टीने हा अर्थसंकल्प निश्चितच कल्याणकारी आहे.शेतकऱ्यांना जी नुकसान भरपाई द्यावयची होती त्यासाठी तरतूद करुन दोन हजार कोटी रुपये नुकसान भरपाई देण्याचा निर्णय शासनाने घेतलेला होता त्याची अंमलबजावणी करण्याचे ठरविलेले आहे. खरे म्हणजे दोन हजार कोटी रुपये ही अत्यल्प रक्कम आहे हे सर्वांना माहीत आहे. तरी सुध्दा शेतकऱ्यांना काही ना काही मदत करण्यात येणार आहे म्हणून मी शासनाचे अभिनंदन करते.

सभापती महोदय, हा अर्थसंकल्प जेंडर सेन्सिटिव्ह असावयाला पाहिजे होते याबद्दल मी या ठिकाणी बोलले नाही तर अर्थसंकल्पावरील सर्वसाधारण चर्चेवर मी माझ्या वतीने अन्याय केला असे होईल. अर्थसंकल्प हा जनरल सेन्सिटिव्ह असावयास पाहिजे या संदर्भात या सभागृहातील सन्माननीय महिला सदस्यांनी अनेकवेळा पुनरुल्लेख करतात तो पुनरुल्लेख मी आजही करु इच्छिते. महाराष्ट्र खूप मोठा प्रदेश आहे. देशाचा पश्चिम आणि मध्य भाग व्यापलेला, 700 कि.मी. सागरी किनारा असलेला, पश्चिमेला सह्याद्रीच्या पर्वत रांगा, उत्तरेला सातपुडा पर्वत, पूर्वेस भामरागड-गडचिरोली-गायखुरी येथे डोंगररांगा आणि बालाघाटाच्या रांगा असा हा महाराष्ट्र आहे. या नैसर्गिकरित्या संपन्न अशा या प्रदेशात नद्या आहेत सर्व नैसर्गिक संपत्ती आहे. जमीन मोठया प्रमाणात उपलब्ध आहे. 3.08 चौ.कि.मी. भौगोलिक क्षेत्र आहे. लोकसंख्येच्या संदर्भात देशात दुसऱ्या क्रमांकाचे राज्य आहे. सन 2011 मध्ये महाराष्ट्राची लोकसंख्या 11 कोटी होती ती देशाच्या लोकसंख्येच्या 9.3 टक्के आहे. नागरीकरण 45 टक्के झालेले आहे. ग्रामीण भागामध्ये 55

..2...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

ॲड. उषा दराडे...

टक्के लोक राहतात ही बाब चिंतेची झालेली आहे. मोठया प्रमाणात होणारे नागरीकरण, त्यांना पुरवावयाच्या नागरी सुविधा आणि शेती विषयीची उदासीनता या गोष्टी सध्या घडू लागलेल्या आहेत त्यांनी या पुढे मोठे स्वरुप धारण केले तर समाजाचे फार मोठे नुकसान होऊ शकते. म्हणून नागरीकरण रोखणे, शेतीला उद्योगाचा दर्जा देणे, शेतीसाठी प्रोत्साहनपर योजना तयार करणे, ठिबक सिंचन, शेततळी, विहिरी, पाणी अडवा पाणी जिरवा किंवा सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी सांगितल्याप्रमाणे पाण्याचे पुनर्भरण करणे आवश्यक आहे पण कुठल्याही परिस्थितीत शेतकरी शेतामध्ये अडकून पडला पाहिजे. शेतीला एखादा दुय्यम व्यवसाय ठरवून तो शहराकडे पळणार नाहीत याची दक्षता घ्यावी लागेल.

सभापती महोदय, देशाच्या उत्पन्नात महाराष्ट्र राज्याचा 14.9 टक्के हिस्सा असणे ही खूपच चांगली बाब आहे. सन 2010-2011 चे स्थूल उत्पन्न 10,68,327 कोटी रुपये होते. औद्योगिक व सेवा या क्षेत्रांचा स्थूल राज्य उत्पन्नात एकत्रित हिस्सा 87 टक्के आहे. याचा उल्लेख सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी सुध्दा केलेला आहे. औद्योगिक क्षेत्राचा उत्पन्नामधील वाटा 87 टक्के आहे आणि कृषी क्षेत्राचा वाटा 13 टक्के आहे. जोपर्यंत शेतकऱ्यांची उत्पादकता वाढत नाही, देशाच्या विकास प्रक्रियेमध्ये शेतकरी आपल्या पत्नीसह, महिला भगिनीसह सामुदायिक सहभाग देणार नाही, जोपर्यंत त्याच्या श्रमाला प्रतिष्ठा मिळणार नाही, शेतीला उद्योगाचा दर्जा देण्यात येणार नाही तोपर्यंत हे विषम प्रमाण असेच राहणार नाही तर ते वाढत जाईल. त्या दृष्टीने गुंतवणूक करत असताना औद्योगिक क्षेत्रामध्ये जशी गुंतवणूक करण्यात येते तेवढयाच प्राधान्याने शेतीक्षेत्रामध्ये सुध्दा गुंतवणूक करण्याचा मंत्री महोदयांनी आणि महाराष्ट्र शासनाने प्रयत्न करावा आणि त्या दृष्टीने या ठिकाणी काही दुरुस्त्या करता आल्या तर त्या कराव्यात.

यानंतर श्री. बरवड....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

(सभापतीस्थानी माननीय उप सभापती)

ॲड. उषा दराडे ....

सभापती महोदय, पशुधन व कुक्कुटपालन यामध्ये देशात आपले राज्य सहाव्या क्रमांकावर आहे. देशांतर्गत तसेच विदेशी संस्थांकडून औद्योगिक क्षेत्रामध्ये गुंतवणुकीचे सातत्य राखले आहे इतकेच नव्हे तर ते आपण वाढवित आहोत. मोटार वाहने उत्पादनाचे तसेच माहिती तंत्रज्ञानाचे प्रमुख केंद्र आणि निर्यात वृध्दी झोन या संदर्भातही महाराष्ट्र फार प्रगतिपथावर जात आहे. साक्षरतेची देशाची टक्केवारी 74 टक्के आहे. महाराष्ट्राची साक्षरतेची टक्केवारी 82.9 टक्के आहे. तरी सुध्दा सन्माननीय सदस्य प्रा. सुरेश नवले यांनी सांगितल्याप्रमाणे 100 टक्के साक्षरता गरजेची आहे. समाजाला फक्त साक्षर करुन चालणार नाही तर आपल्याला त्याला सुसंस्कृत करावे लागेल आणि उत्पादन प्रक्रियेमध्ये सहभागी होऊ शकेल अशा क्षमतेचा नागरिक आपल्याला बनवावा लागेल. अशा पध्दतीने शिक्षण पध्दतीमध्ये आपल्याला खूप मोठे परिवर्तन करण्याची आवश्यकता आहे. तो विषय खूप मोठा आहे. त्या बाबतीत मी सभागृहाचा अधिक वेळ घेणार नाही. तरी सुध्दा शासन त्या क्षेत्रामध्ये प्रामाणिकपणे वेगाने काम करीत आहे.

सभापती महोदय, 2011 मध्ये देशाचा मानव विकास निर्देशांक 0.467 होता तर महाराष्ट्राचा 0.772 होता. या बाबतीत देशाच्या सरासरीपेक्षा महाराष्ट्र थोडासा पुढे आहे परंतु याचे प्रमाण अधिक वाढविणे गरजेचे आहे. महाराष्ट्र राज्याने मानव विकासच्या संदर्भामध्ये तालुका घटक धरावा असा जो निर्णय घेतलेला आहे त्याबद्दल मी महाराष्ट्र शासनाचे अभिनंदन करते. स्थूल उत्पन्नाच्या 2010-2011 च्या तुलेनमध्ये 2011 मध्ये आपण 23 टक्के प्रगती करु शकलो. कृषी सलग्न कार्यामध्ये 2011 मध्ये राज्यात सर्वसाधारण पडणाऱ्या पावसाच्या 102.3 टक्के पाऊस पडला. पण 46 तालुक्यांमध्ये अतिवृष्टी झाली आणि शेतकऱ्यांचे नुकसान झाले. 209 तालुक्यांमध्ये सर्वसाधारण पाऊस पडला. त्यामुळे शेतकरी समाधानकारक उत्पन्न घेऊ शकला नाही. 100 तालुक्यांमध्ये अपुरा पाऊस पडला. सरासरीच्या 102 टक्के पाऊस पडून सुध्दा ज्या पध्दतीने सगळीकडे समान पाऊस पडावयास पाहिजे होता आणि सिंचनाचे शेती योग्य वातावरण निर्माण व्हावयास पाहिजे होते ते या वर्षी होऊ शकलेले नाही. त्यामुळे उत्पादनामध्ये घट अपेक्षित आहे.

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

RDB/

ॲड. उषा दराडे ....

उत्पादनातील घट दूर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

सभापती महोदय, विजेची स्थापित क्षमता वाढविण्याचा आपण प्रयत्न करीत आहोत. महिला व बाल कल्याणमध्येही आपण फार भरीव अशा प्रकारची कामगिरी करीत आहोत पण महिला आणि बाल कल्याण खात्याची विभागणी करावी ही मागणी मी या सभागृहात आल्यापासून राज्य शासनाकडे वारवांर करीत आहे. बाल विकास खाते वेगळे आणि महिलांचे विकास खाते वेगळे करावे. ही काळाची गरज आहे आणि त्याचाच एक भाग म्हणजे जेंडर सेन्सेटीव्हीटी बजेट आहे. त्या दृष्टीने प्रयत्न करावा. पीसीपीएनडीसी ॲक्टमध्ये शासन चांगल्या पध्दतीने बदल करुन आणि प्रोसीजरमध्ये सुध्दा बदल करुन कशा पध्दतीने या भ्रूणहत्या थांबविता येतील, गर्भजल परीक्षा थांबविता येतील यासाठी प्रयत्न करीत आहे. खासदार श्रीमती सुप्रिया सुळे यांच्या नेतृत्वाखाली 'जागर जाणिवांचा, तुमच्या आमच्या लेकीचा' हा कार्यक्रम संपूर्ण महाराष्ट्रात राबविला जात आहे. या कार्यक्रमाला महाराष्ट्रामध्ये सामाजिक चळवळीचे स्वरुप येत आहे. अनेक संस्था, अनेक राजकीय पक्ष, अनेक शाळा, अनेक सामाजिक संघटना आता या गर्भजल परीक्षेच्या आणि भ्रूण हत्येच्या संदर्भात उघडपणे समाजासमोर यावयास सुरुवात झालेली आहे. खऱ्या अर्थाने ही यशाची गुरुकिल्ली आहे. मला जाता जाता शेवटी शासनाचे अभिनंदन करावयाचे आहे. आम्हा महिलांना 50 टक्के आरक्षण दिलेले आहे. महिलांना राज्यात राजकारणामध्ये जे 50 टक्के आरक्षण दिलेले आहे ते निश्चितपणे शाहू, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्राला साजेसे असे आहे.

सभापती महोदय, जर आपण या अर्थसंकल्पाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहिले तर निश्चितपणे हा अर्थसंकल्प राज्याला दिशा देणारा आहे. यामध्ये ज्या काही किरकोळ बाबी राहिल्या असतील, त्यांचा अनुल्लेख चुकून झाला असेल तर ते जाणीवपूर्वक झाले नसेल याची मला खात्री आहे. त्याही कामांच्या दृष्टीने शासन निश्चितपणे पुढे पाऊल टाकील अशी मी आशा व्यक्त करते. सभापती महोदय, या ठिकाणी शासनाचे अभिनंदन करुन आणि आपले आभार मानून मी आपले भाषण संपविते.

यानंतर श्री. खंदारे ....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, सन 2012-13 या वर्षाच्या अर्थसंकल्पावरील चर्चेमध्ये भाग घेण्यासाठी मी या ठिकाणी उभा आहे.

सभापती महोदय, या अर्थसंकल्पामध्ये पहिला शब्द कृषी हा आहे. कृषी क्षेत्राबाबत असे नमूद केले आहे की, कापूस, सोयाबीन, धान उत्पादक शेतकऱ्यांना शासनाने मदत केलेली आहे. खरे तर गेल्या 4 वर्षांपासून या राज्यात कोणते ना कोणते नैसर्गिक संकट येत आहे. मग ते फयानचे वादळ असेल, गारपीट असेल, अवेळी पडणारा पाऊस असेल, अशा प्रकारची नैसगिक आपत्ती सातत्याने येत आहे. त्यामुळे आपत्ती व्यवस्थापनासाठी शासनाने काही तरी रक्कम बाजूला काढून ठेवली पाहिजे. ग्लोबल वार्मिंगमुळे निसर्गात बदल होत असल्याने प्रत्येक वर्षी संकटे उभी रहात आहेत. त्याला तोंड देण्यासाठी या बजेटमध्ये काहीच तरतूद केल्याचे दिसत नाही.

महाराष्ट्राचा विकास करावयाचा असेल तर शेतीचा विकास झाला पाहिजे. पण या वर्षीच्या 'महाराष्ट्राची आर्थिक पाहणी' या पुस्तिकेमध्ये 23 टक्क्यांनी शेतीचे उत्पादन घटल्याचे नमूद केलेले आहे. त्याची चिंता सगळयांनी करावयास पाहिजे होती. परंतु या अर्थसंकल्पामध्ये ती दिसून आली नाही. जमिनीचा पोत हा शेतीचा मुख्य पाया आहे. जमिनीचा पोत चांगला असेल तर उत्पादन चांगले मिळू शकते. पण जमिनीचा पोत दिवसेंदिवस कमी होत चालला आहे. मराठवाड्यामध्ये 12 जिल्ह्यात मातीची तपासणी करण्यात आली होती. त्यामध्ये 70 गावांमध्ये खारवट व 60 गावांमध्ये क्षाराचे प्रमाण आढळून आलेले आहे. या गोष्टीकडे लक्ष देणे आवश्यक होते ते दिलेले नाही.

या बजेटमध्ये आणखी एक गोष्ट पहावयास मिळाली. राज्यामध्ये सगळयात जास्त कोरडवाहू शेती आहे. कोरडवाहू शेतीसाठी 200 कोटी रुपयांचा अतिरिक्त निधी देत असल्याचे नमूद केलेले आहे. दुसऱ्या बाजूला मुंबईत सर जे.जे.समूह रुग्णालयाच्या परिसरामध्ये सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल बांधण्यासाठी 625 कोटी रुपये खर्च होणार आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील कोरडवाहू शेतीसाठी 200 रुपये व एका हॉस्पिटलसाठी 625 कोटी रुपये खर्च होणार आहेत. हा खर्च जाहीर करणारे मंत्री महोदय खेड्यातील आहेत. ते असे का वागत आहेत ते आम्हाला कळत नाही.

2....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल....

सभापती महोदय, शेत तळ्याच्या बाबत राजा उदार झाला असेच म्हणावे लागेल. राज्यात 355 तालुके व 3000 शेत तळी आहेत. जमिनीमध्ये पाणी जिरविण्याचा शासनाचा मानस आहे. मी माननीय महसूल मंत्री श्री.बाळासाहेब थोरात यांना विचारतो की, आपण मंत्रिमंडळामध्ये आहात. आपण ही आकडेवारी कशी सहन करता ? ही विसंगती वाटत आहे. (अडथळा) बजेटवरील चर्चा करणे म्हणजे दरवर्षी सण साजरे करण्यासारखे आहे.

संपूर्ण राज्याला दरवर्षी 67.4 लाख टन खताची आवश्यकता असते. खताची साठवणूक करण्यासाठी फक्त 20 कोटींची तरतूद केलेली आहे, ही विचित्र गोष्ट आहे. या बजेटच्या माध्यमातून शेतक-यांना अक्कल शिकविण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे. या भाषणात असे नमूद केले आहे की, "विदर्भातील शेतकऱ्यांसाठी कृषी उद्योजका कौशल्य कार्यक्रम सुरु केला जाणार आहे." असे मोठे मोठे शब्द कशासाठी वापरले जातात ? कापसाचा भाव प्रती क्विंटल 7 हजार रुपये असताना 4 हजार रुपये भाव देऊन शेतकऱ्यांना अक्कल शिकविली जाते. हे कौशल्य शासनाला चांगले जमते. शेतक-यांनी कसे मरावे याचे कौशल्य शिकवावे. शेतकऱ्यांनी आत्महत्या कशी करावी, लिंबाच्या झाडाला लटकावे की, एन्ड्रीन प्यावे की आणखी रासायनिक द्रव्य प्यावे त्याचे कौशल्य शिकविण्यासाठी हा कार्यक्रम सुरु केला असेल तर मी माननीय अर्थ मंत्र्यांचे अभिनंदन करतो.

यानंतर श्री.शिगम....

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल...

करंट लावून जसे डुकरांना मारतात त्याप्रमाणे आमच्यासाठी काही मरण्याची सोय केलेली आहे काय ? सभापती महोदय, काही गोष्टीबाबत मला माननीय वित्त मंत्री महोदयांचे कौतुक करावेसे वाटते. या अर्थसंकल्पामध्ये कसे शब्द प्रयोग करण्यात आलेले आहेत ? अशा प्रकारचे शब्द प्रयोग केले जातात त्यावेळी आमच्यासारख्यांना त्रास होतो. शेतक-यांना आपण पुन्हा पुन्हा उल्लू बनविण्याचा प्रयत्न करीत आहात असे वाटते.

सभापती महोदय, 75 टक्के अनुदान देऊन 35 कोटीची दुभती जनावरे वाटण्याचा कार्यक्रम हाती घेतलेला आहे. संपूर्ण महाराष्ट्रामध्ये 35 कोटीची जनावरे वाटली तर तालुक्याला दोन-तीन गाई येतील. ही योजना कशासाठी आणलेली आहे ? ही फुकटची योजना दोन-चार कार्यकर्त्यांना पोसण्यासाठी आणलेली आहे. महाराष्ट्राच्या विकासासाठी ही योजना नाही. वैरण विकास कार्यक्रम हा देखील एक मजेशीर कार्यक्रम आहे. मंत्रिमंडळामध्ये चांगले चांगले लोक आहेत. कुठे तरी एका तालुक्यामध्ये 4 मक्याच्या पिशव्या देऊन वैरण विकास होत नाही. राज्यामध्ये ज्वारी आणि बाजरीच्या पे-याचे प्रमाण अत्यल्प होऊ लागले आहे. माणसाला ना ज्वारी खायला मिळत ना बाजरी. निसर्गाने किती चांगली सोय केलेली आहे. ज्वारी आणि बाजरी पेरली की कडबा जनावराला आणि ज्वारी मालकाला मिळते. जमिनीचा पोत देखील त्यामानाने खराब होत नाही. परंतु शेतकरी ज्वारी पेरत नाही आणि बाजरीही पेरत नाही. दोन महत्वाच्या गोष्टी आहेत. त्या बजेटमध्ये कशा अंतर्भूत करता येतील हे अर्थमंत्र्यांनी पहाणे आवश्यक होते. जसे कृत्रिम रक्त तयार करता येत नाही तसे कृत्रिम शेणखत तयार करता येत नाही. कंपोस्ट खत जमिनीला मिळाल्या शिवाय उत्पादकता वाढणार नाही. एका गोष्टीमुळे एवढ्या गोष्टी होतात. म्हणून ज्वारी पिकविणा-या शेतक-याला, बाजरी पिकविणा-या शेतक-याला न्याय दिला, ज्वारी-बाजरीच्या पिकातून दोन पैसे जास्त मिळतात हे शेतक-याच्या लक्षात आले तर गावामध्ये ज्वारीचा पेरा वाढेल, परिणामी कडबा वाढेल आणि कडबा वाढला तर जनावरांची संख्याही आपोआप वाढेल. जनावरांची संख्या आपोआप वाढली तर शेणखत आणि दुधाचाही प्रश्न मिटेल. आज जनावरांची संख्या कमी कमी होत आहे. त्याचे वैरणीचा प्रश्न हे एक कारण आहे. अशा पध्दतीने वैरण लावून हा प्रश्न सुटणार नाही. एवढी साधी आणि सरळ गोष्ट असताना देखील त्याबाबतीत सरकार काही करताना दिसत नाही.

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल....

सभापती महोदय, या अर्थसंकल्पातील एक दोन गोष्टी पहाता मला बिहारच्या सरकारची कमाल वाटते्. बिहारमध्ये शेतीसाठी दीड लाख कोटी रुपयाचे बजेट आहे. कसे हिंमतवान राज्यकर्ते आहेत ते, कसे त्यांचे राज्य पुढे जाणार नाही, कसे लोकांना काम करावेसे वाटणार नाही ? या सरकारची या वर्षीची योजना 3258.26 कोटीची आहे. यामध्ये काय होणार आहे ? त्या बिहार राज्याच्या मंत्र्यांचा वृत्तपत्रात कसा फोटो छापून आलेला आहे तो पहा. तुमचा देखील वृत्तपत्रातून तसा फोटो छापून आला असता. बजेट सादर करताना अर्थ राज्यमंत्र्यांच्या चेह-यावर उल्हास नव्हता, तेज नव्हते. गुलाबाचे फूल देखील ते लावायचे विसरले होते. बिहार राज्याचे कौतुक करा, कर्नाटक राज्याचे कौतुक करा...(अडथळा) "ॲग्रोवन" वृत्तपत्रातील बातमी मी येथे सांगितली...(अडथळा)..मी "तरुण भारत" किंवा "सामना" वृत्तपत्र येथे आणलेले नाही. आवश्यकता असेल तर वृत्तपत्रातील सर्व मजकूर मी सभागृहाला वाचून दाखवितो...(अडथळा)...

...नंतर श्री. भोगले...

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल.....

एका बाजूला हे सगळे बघितले आणि आमच्याकडचे बघितले तर आंधळ्यासमोर वाचून उपयोगाचे नाही आणि बहिऱ्यासमोर गाऊन उपयोगाचे नाही. बजेटवर काही बोललो नाही अशी रुखरुख मनात राहू नये म्हणून मी आपल्यासमोर भाषण करुन तो प्रयत्न करीत आहे.

सभापती महोदय, एका गोष्टीचे मला वाईट वाटते. सोयाबीन आणि कापूस यावर शासनाने कर लावला आहे. तेलावर कर लावला आहे. सोयाबीन आणि कापूस खरेदीवर कर लावण्याचे कारण काय? दुर्दैव एका गोष्टीचे आहे ते म्हणजे मराठवाडा आणि विदर्भामध्ये सोयाबीन आणि कापूस पिकतो, त्या भागातील शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. वित्त राज्यमंत्री त्याच भागातील आहेत. शेतकऱ्यांच्या आत्महत्या का होतात याचा त्यांनी विचार केला पाहिजे. मला प्रादेशिक वाद निर्माण करायचा नाही. ज्यावेळी या देशात कर्जमाफी आली ती विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्यामुळे आली होती. कर्जमाफी आल्यानंतर पश्चिम महाराष्ट्रातील 51 टक्के, मराठवाड्यातील 21 टक्के आणि विदर्भातील 19 टक्के शेतकऱ्यांना कर्जमाफीचा फायदा मिळाला. ज्या भागात अधिक लाभ मिळावयास पाहिजे होता तेथे तो न मिळता ज्या भागात कमी शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या त्याच भागातील शेतकऱ्यांना अधिक लाभ मिळाला. या वर्षी मराठवाडा आणि विदर्भातील शेतकऱ्यांच्या उत्पादनात मोठी वाढ झाली. परंतु त्यांच्या घरातून पीक निघून गेल्यानंतर किंमत वाढली. तरी शासनाला या संदर्भात लक्ष द्यावेसे वाटत नाही. 100 रुपये दर क्विंटलमागे शेतकऱ्यांचे नुकसान होणार आहे. कर लावल्याबद्दल मी शासनाचा निषेध करतो.

सभापती महोदय, सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या संदर्भात तीन महिन्याचे अनुदान एकत्र दिले जाणार आहे. अन्न सुरक्षा विधेयक येऊ घातले आहे. मला या संदर्भात शासनाकडून खुलासा हवा आहे. थेट अनुदान शिधापत्रिका धारकांपर्यंत पोहोचविण्यासाठी कुपनसारखी योजना राबविण्यात येणार आहे. केंद्रीय कृषी मंत्र्यांनी दोन वर्षापूर्वी याचा उल्लेख केला होता. राज्याने अशा प्रकारची अभिनव पायलट योजना राबविली असती तर खूप बरे झाले असते. शासनाने या संदर्भात जी दृष्टी दाखवावयास पाहिजे होती ती दाखविलेली नाही.

सभापती महोदय, अपारंपारिक ऊर्जेच्या संदर्भात 75 कोटी रुपये इतका निधी प्रस्तावित केला आहे. आता भारनियमनामुळे वीज गायब होत असते. सूर्यापासून सौर ऊर्जा निर्माण करण्याचा प्रयत्न केला तर मोठया प्रमाणात लोकांना दिलासा मिळू शकतो. माझ्या गावामध्ये

..2..

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री.सय्यद पाशा पटेल.....

शाळेतील वीज रात्री गेली तर दुसऱ्या दिवशी लाईनमनची उतरल्याशिवाय वीज पुरवठा पुन्हा सुरु होत नाही ही वस्तुस्थिती आहे. सौर ऊर्जा निर्माण करण्यासाठी अधिकाधिक प्रयत्न करावा आणि त्यासाठी अधिक निधीची तरतूद करावी अशी मी शासनाला विनंती करतो.

सभापती महोदय, मराठवाडा, खानदेश आणि विदर्भातील कापूस, ज्वारी आणि सोयाबीनची शेती मरु द्यायची नसेल तर या संदर्भात गांभीर्याने विचार केला पाहिजे. अजून काही करता येईल का हे शासनाने पहावे. ज्वारी, बाजरी पिकविणारा शेतकरी तुमच्या डोक्यात आहे. गरीब लोकांना स्वस्त दरामध्ये ज्वारी मिळाली पाहिजे.

नंतर श्री.खर्चे....

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

श्री. सय्यद पाशा पटेल .....

कोरडवाहू शेतीत बाजरी आणि ज्वारीचे टार्गेट ठरवून शेतकऱ्यांना काही फायदा देता येईल काय याचाही विचार करणे आवश्यक होते पण अर्थसंकल्पात तसा विचार झालेला नाही. शेवटचा मुद्दा एवढाच सांगू इच्छितो की, आयुष्यभर खस्ता खाऊन मजुरी करणाऱ्या माणसाची अवस्था बघितली तर वयाच्या शेवटी त्याचा पोरगा त्याला विडीसाठी सुध्दा पैसे देत नाही. या मजुराच्या संदर्भात शासनाने विचार करावा, अशी विनंती करुन माझे भाषण पूर्ण करतो.

उप सभापती : सभागृहापुढील कामकाज संपलेले आहे. सभागृहाची बैठक आता स्थगित होऊन उद्या बुधवार, दिनांक 28 मार्च, 2012 रोजी सकाळी 11.00 वाजता पुन: भरेल.

(सभागृहाची बैठक रात्रौ 7 वाजून 01 मिनिटांनी बुधवार, दि. 28 मार्च, 2012 च्या सकाळी 11.00 वाजेपर्यंत स्थगित झाली)

असुधारित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही

अप्रमाणित प्रत / प्रसिद्धीसाठी नाही